# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

दिनांक २२-०५-२००० ते ३१-०३-२००१

**रजिष्टर क्र.**

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २२.०५.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दि. २२.०५.२००० रोजी सकाळी ११.३० वाजता मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती " सभागृहात सभापती निवडी बाबतच्या सभेस सुरुवात झाली. या सभेस मा. आयुक्तांचे प्रतिनिधी म्हणुन उपआयुक्त (महसुल) श्री दिलीप शिंदे हे हजर होते. सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या गिताने झाली. सदर सभेस खालील स. सभासदांसह महानगरपालिका अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री अशरफ मोतीवाला | स. सदस्य |
| २) | स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | --//-- |
| ३) | स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ४) | स. स. श्री कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ५) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दैालत | --//-- |
| ६) | स. स. श्री गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ७) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघूनाथ | --//-- |
| ८) | स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | --//-- |
| ९) | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीत सिंग | --//-- |
| १०) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ११) | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | --//-- |
| १२) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | --//-- |
| १३) | स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | --//-- |
| १४) | स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल | --//-- |
| १५) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १६) | स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

**संवाद :**

**श्री अविनाश कुमावत :** आजच्या बैठकीचे पिठासन अधिकारी म्हणुन स. स. सौ. विजया रहाटकर यांचे निवडीसाठी मी नांव सुचवितो.

**श्री मोतीलाल जगताप :** स. स. श्री किशोर तुळशीबागवाले यांचे नांवे पिठासन अधिकारी म्हणुन निवडीसाठी मी सुचवित आहे.

**श्री दलबिरसिंग जाबिंदा :** यासमाझे अनुमोदन आहे.

**उपआयुक्त (म.) :** या बैठकीस हजर राहण्यास मला मा. आयुक्त यांनी प्राधिकृत केले आहे. नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यात येत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये मा. सभापती स्थायी समिती पदावर स्थायी समिती सदस्यामधुन निवड करणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, अनुसूची "ड" चे प्रकरण २ खालील नियम क्रमांक ३ (ब) अन्वये महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीनंतर स्थायी समितीच्य प्रथम सभेचे आज आयोजन करण्यात आलेले आहे. प्रत्येक सभेला पिठासन अधिकारी असणे आवश्यक आहे. मागील स्थायी समिती सभापती यांचे स्थायी समिती सदस्यत्व संपुष्टात आले असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (३)

अन्व्ये आत त्यांना सभापती किंवा पिठासन अधिकारी महणुन पद भुषविता येत नसल्याने सभा चालविण्यासाठी मा. सभापती, स्थायी समिती या पदावर निवड होईपर्यंत पिठासन अधिकारी यांची निवड करणे आवश्यक आहे. या संदर्भात प्रामुख्याने खालील प्रमाणे तरतुदी आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, अनुसूची प्रकरण २ खालील स्थायी समितीचे कामकाजातील नियम क्र. ३ (ई) अन्वये "स्थायी समितीच्या प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान सभा भरविण्यासाठी नेमलेल्या वेळी अध्यक्ष, उपस्थित असेल तर त्याने स्विकारले पाहिजे आणि अध्यक्ष अनुपस्थित असेल तर, सभेकडुन त्या प्रंसगी अध्यक्ष म्हणुन निवडण्यात येईल अशा उपस्थित सदस्यापैकी एका सदस्याने स्विकारले पाहिजे, अशी तरतुद आहे. या संदर्भात कायदेशीर तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

(अ) मा. सभापती, स्थायी समिती पदावर निवड करणे संबंधी.

१) महाराष्ट्र शासनाने दि. २९.१.१९८८ रोजी मंजुर केलेल्या सभा कामकाज नियमावलीचे जादा नियमातील नियम क्रमांक ६५ प्रमाणे "महापौराच्या पदाकरीता नामनिर्देशन व नेमणूकीबाबतचे नियम स्थायी समितीच्या अध्यक्षाच्या नामनिर्देशनाला आणि निवडणूकीला लागु पडतील" अशी तरतुद आहे.

(ब) पिठासन अधिकारी यांचे निवडी बाबत.

१) सभा कामकाज जादा नियमातील स्थायी समितीच्या कामकाजाबाबतचे नियम क्रमांक ६६ (१०) प्रमाणे मतदान हात वर करुन घेण्यात येईल. मताला टाकण्यात आलेल्या प्रत्येक प्रश्नांवर अनुकूल आणि प्रतिकूल अशी मते घेण्यात येतील.

२) सभा कामकाज जादा नियमातील नियम क्र. ४३ - मते कशी घ्यावीत - साधारणतः मतदान हात वर करुन घ्यावे.

३) नियम क्र. ४४ - गुप्त मतदान पध्दतीने मते केव्हा घ्यावित नियम क्र. ४४ (१) नियम क्र. ४३ मध्ये काहीही असेल तरी निवडणूकी आणि ज्या नेमणुका करण्याच्या पध्दती बद्दल नियमात अन्यथा तरतूद केलेली नसेल, त्या नेमणुका करताना गुप्त मतदान पध्दतीने मते घ्यावीत असे मुख्य सभेला ठरविता येईल. अशी तरतुद आहे.

तरी प्रथम पिठासन अधिकारी यांची निवड करण्याकरीता स. सदस्यांमधुन नांव सुचविण्यात यावे व त्यास अनुमोदन देण्यात यावे.

१) स. स. सौ. विजया राहाटकर
सुचक - श्री अविनाश कुमावत अनुमोदक - श्री गणेश तांबे

२) स. स. श्री किशोर तुळशीबागवाले
सुचक - श्री दलबिरसिंग जांबिदा - श्री मोतीलाल जगताप

यांची नांवे सुचविण्यात आलेली आहेत. तथापी पिठासन अधिकारी म्हणुन एकाच सदस्याची निवड करावयाची असल्याने व दोन सदस्यांची नांवे सुचविण्यात आलेली असल्याने एकाची निवड सभागृहाने करावी अशी सभागृहास विनंती करण्यात येते.

**श्री अविनाश कुमावत :** गुप्त पध्दतीने पिठासन अधिकारी पदासाठी निवडणुक घ्यावी व यासाठी महिला प्रतिनिधीचे आम्ही नांव सुचविलेले आहे. याबाबतचा विचार व्हावा.

**उपआयुक्त (म.) :** सभागृहात गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्याबाबत माझ्याकडे लेखी अर्ज प्राप्त झालेला आहे. त्यावर पुढील स. सदस्याच्या सहया आहेत.

१) श्री अविनाश कुमावत  ५) सौ. विजया रहाटकर
२) श्री जगदीश सिध्द  ६) श्री मधुकर सावंत
३) श्री भरत लकडे  ७) श्री साहेबराव कावडे
४) श्री भाऊसाहेब वाघ  ८) श्री गणेश रामचंद्र तांबे

त्यानुसार दोन्हीही बाजुच्या सन्मानीय सदस्यांचे एकमत व्हावे. याबाबत सभागृहाचे काय मत आहे. त्याप्रमाणे विधी विभागाचे प्रमुख यांनी नियमानुसार कशी पध्दत आहे. याची माहिती सभागृहाला दयावी.

(दोन्हीही बाजुचे सन्मानीय सदस्यांच्या मते गुप्त मतदान पध्दतीने पिठासन अधिकारी पदासाठी निवडणुक व्हावी असा होकार दिला जातो.)

**उपआयुक्त (प्र.) :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये सभा कामकाज जादा नियमातील नियम क्र. ४३ मते कशी घ्यावीत. साधारणतः मतदान हात वर करुन घ्यावेत.

नियम क्र. ४४ गुप्त मतदान पध्दतीने मते केव्हां घ्यावित नियम क्र. ४४ (१) मध्ये काहीही असेल तरी निवडणूकी आणि ज्या नेमणूका करण्याच्या पध्दती बद्दल नियमात अन्यथा तरतुद केलेली नसेल, त्या नेमणुका करतांना गुप्त मतदान पध्दतीने मते घ्यावीत असे मुख्य सभेला ठरविता येईल. अशी तरतुद आहे. याचाच अर्थ हा निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

**उप-आयुक्त (म.) :** पिठासन अधिकारी या पदाच्या निवडीबाबत गुप्त मतदान घ्यावयाचे किंवा कसे याबाबत सभागृहात ठरवावे. (यावेळी पुन्हा दोन्हीही बाजुचे सन्माननीय सदस्यांनी हात उंचावुन गुप्त मतदान पध्दतीने घेण्यासाठी होकार दिला.) गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यासाठी होकार दिल्याने आता मतपत्रिका तयार करण्याकरीता अर्ध्या तासाचा अवधी लागेल. तेंव्हा अंदाजे १२.१० वाजता प्रत्यक्षात मतदानास सुरुवात होईल. (वेळ ११.४० झाली होती)

पिठासन अधिकारी पदाची निवडणुक होणार आहे. त्यासाठी मतपत्रिका तयार झाली असुन ती आपल्याला पाहण्यासाठी नोटीस बोर्डवर लावण्यातयेते.

(त्यानुसार मतपत्रिका नोटीस बोर्डवर सर्वासमक्ष लावण्यात येते.) या पदासाठी दोन सन्माननीय उमेदवार असुन श्री किशोर तुळशीबागवाले व सौ. विजया रहाटकर यांच्यामध्ये गुप्त मतदान पध्दतीने पिठासिन अधिकारी यांची निवडणुक होईल. मतपत्रिकेवर अ. क्र. १ वर श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल व अ. क्र. २ वर सौ. विजया रहाटकर यांची नांवे आहे. मतदान प्रक्रिये बाबत नगरसचिव यांनी माहिती द्यावी.

**नगरसचिव :** १) ज्या सन्माननीय सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील त्यांनी कृपया आपले मत नोंदवावे.

२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (आय) प्रमाणे सभासदाला

दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. उपआयुक्त (म.) यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जे) नुसार जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांवे किंवा शब्द लिहीला असेल अथवा तो ओळखता येईल. अशा रितीने तिच्यावर काही खुण केली असेल, जी छिद्रांकित (पफेरिंटन) नसेल, जिच्यावर मत नोंदले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरुपयोगी होईल अशी मतपत्रिका अवैध समजली जाईल.

५) नियम क्र. ५० प्रमाणे प्रत्येक सदस्यांयना एक मत देण्याचा अधिकार आहे. मतदान करते वेळी प्रत्येक सभासदाने मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यायचे असेल त्याच्या नांवासमोर गुणाकाराची (X) फुली करावी.

६) मतपेटी पुर्ण रिकामी आहे. ती सभागृहात दाखवावी.

७) मतपेटीला सिल लावावे.

८) मत मोजणीसाठी आपले प्रतिनिधी पाठवावयाचे झाल्यास उमेदावारांनी आपले लेखी पत्र मा. उपआयुक्त (म.) यांच्याकडे द्यावे.

**उपआयुक्त (म.) :** मतदानाला सुरुवात होत आहे. ज्या सन्माननीय सदस्याची नावे पुकारण्यात येतील त्यांनी मतदान करावे सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी ३० मिनिटांचा कालावधी देण्यात येतो या कालावधतीत किंवा तत्पुर्वी सर्व सदस्यांचे मतदान झाले तर मतदान पुर्ण झाल्याचे घोषित करण्यात येईल.

**जनसंपर्क अधिकारी :** पिठासन अधिकारी पदाच्या निवडीसाठी सन्माननीय सदस्याचे नांवे पुकारण्यात येत आहे.

१) श्री अशरफ मोतीवाला
२) श्री कावडे साहेबराव
३) श्री कुमावत अविनाश
४) श्री कैसरखान बद्रोधीनखान
५) सौ. खरात कुसूमबाई
६) श्री गणेश तांबे
७) श्री मोतीलाल जगताप
८) श्री जगदिश सिध्द
९) श्री जाबिंदा दलबिरसिंग
१०) श्री किशोर तुळशिबागवाले
११) श्री लकडे भरत
१२) श्री भाऊसाहेब वाघ
१३) सौ. विजया रहाटकर
१४) श्री सलीम पटेल शमशेर पटेल
१५) श्री सावंत मधुकर
१६) श्री सुरगोणीवार नारायण

**उपआयुक्त (म.) :** मतदान संपलेले असुन मतपेटीजवळील मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदावारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीला मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. श्री सलीम पटेल शमशेर पटेल व श्री अविनाश यांनी मतपेटी जवळ यावे.

(मतपेटी सिल सर्वांसमोर उघडुन त्या १६ मतपत्रिका ज्यावर उपआयुक्त (म.) यांच्या स्वाक्षऱ्या करुन छाननी आणि मतमोजणीसाठी मतमोजणी अधिकारी श्री खैरनार यांचेकडे सुपूर्त केल्या जातात व प्रत्यक्षात ते छाननी व विभागणी झाल्यावर... )

**श्री गणेश तांबे :** मत पत्रिकेवर खुण दिसत असुन सदरील मतपत्रिकेवर आमचा आक्षेप आहे. ती बाद ठरविण्यात यावी.

(या वेळी सभागृहात काही वेळ इतर स. सदस्याचा जोरजोराने बोलण्याचा आवाज होतो अनेक सदस्य मतमोजणी अधिकाऱ्याजवळ जमा होतात. मतपत्रिकावरील खुणा या गोधंळात एकमेकांना दाखविण्याचा प्रयत्न होतो. यावेळी सन्मानीय सदस्य श्री अविनाश कुमावत आक्षेपाचा लेखी अर्ज सभागृहात उपआयुक्त (म.) यांचेकडे देतात. उपआयुक्त (म.) सर्व सदस्यांना मतपत्रिकेवर हात लावु नये अशी वारंवार विनंती करतात.)

**श्री सलीम पटेल समशेर पटेल :** अशाच प्रकारची खुण दुसऱ्या एका छाननी झालेल्या मतपत्रिकेवर असुन ती सुध्दा बाद ठरविण्यात यावी.

(अशा मतपत्रिका उपआयुक्त (म) यांच्या समक्ष मतमोजणी करतेवेळी दाखविल्या जातात व दोन्हीही पक्षाकडील सदस्यांकडुन मते बाद करण्याची जोरात मागणी होते. सभागृहात बराच कालावधीपर्यंत सन्माननीय सदस्यांमध्ये आपसात जोरजोरात चर्चा चालु असते. काहीही ऐकु येत नाही. मतमोजणी याच ठिकाणी थांबवल्या जाते. सदस्यातील चर्चा मात्र जोरजोरात होतांना दिसते. अंदाजे दुपारी २.२० पर्यंत.)

**उपआयुक्त (म.) :** सदरची बैठक स्थायी समितीच्या सभापती पदासाठी बोलावण्यात आली असुन या बैठकीचे पिठासन अधिकारी कोण असावे याबाबत गुप्त मतदान पध्दतीने मतदान प्रक्रीया पुर्ण झाली. परंतु मतमोजणी करतांना काही सन्माननीय सदस्यांनी जे आक्षेप घेतले त्यावरुन या ठिकाणी पिठासन अधिकारी नसल्याने व पिठासन अधिकारी या पदासाठीच निवडणुक असल्याने नियमाप्रमाणे सभागृहानेच निर्णय घ्यावयाचा आहे. सभागृहाने ठरविल्याप्रमाणे गुप्त मतदान पध्दती पिठासन अधिकार पदाची निवडणुक होत आहे. मतपत्रिका छाननी करुन मतमोजणी करण्यासाठी श्री खैरनार एम. पी. यांचा आदेश या कामी मा. आयुक्त यांनी काढलेला असुन ते त्यांचे काम करीत आहेत. मला मा. आयुक्त यांनी आदेशीत केल्यानुसार मी त्यांचा प्रतिनिधी म्हणुन फक्त काम पाहात आहे. परंतु पिठासीन अधिकारी कोण असावा या मतदान प्रक्रीयेचा निर्णय नियम ३ (ई) प्रमाणे सभागृहाने घ्यावयाचा असुन सभागृहात ज्या सन्माननीय सदस्यांनी मतपत्रिकेवरील काही खुणांचा आक्षेप नोंदविलेला आहे त्याबाबत सुध्दा निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

**श्री सलीम पटेल शमशेर पटेल :** जर गुप्त मतदान प्रक्रिया पुर्ण होत नसल्यास प्रकरण सर्वसाधारण सभेपुढे पाठविण्याची शिफारस करावी.

**श्री गणेश तांबे, अविनाश कुमावत :** आम्ही लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविलेला आहे आणि मतपत्रिकेवरील खुण ही स्पष्टपणे दिसते. त्यानुसार मतपत्रिका बाद ठरवावी व पुढील मतमोजणी प्रक्रिया चालु ठेवावी अशी आमची विनंती आहे.

**श्री कैसरखान बद्रोधीनखान, श्री दलबीरसिंग जबिंदा :** आक्षेपार्ह अशा प्रकारची मतपत्रिकेवर खुण नसुन तिला बाद ठरविता येऊ शकत नाही व त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे खाडाखोड नसुन गुणाकाराची फुली मारलेली आहे. ज्यात ओळख पटेल असे चिन्ह इ. असे आक्षेपार्ह काहीही दिसत नाही. तेव्हा या मतपत्रिकेला बाद न ठरविता वैध करुन मतमोजणीला सुरुवात व्हावी.

**श्री गणेश तांबे :** आम्ही एकदा आक्षेप घेतलेला आहे. या सभागृहात निवडणुक प्रक्रीयेविषयी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाची माहिती वाचुन दाखविली आहे व त्यात स्पष्टपणे सांगितले की, मतपत्रिकेवर कोणत्याही सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने मतपत्रिकेवर काही खुण केली असेल ती मतपत्रीका आक्षेपार्ह असुन तिला बाद ठरविण्यात यावे व तशा प्रकारची खुण या मतपत्रिकेवर दिसुन येते. त्यास आमचा आक्षेप आहे. ती बाद ठरवुन पुढील मतमोजणी सुरु करण्याची कार्यवाही व्हावी.

(अशा प्रकारची चर्चा चालु असतांनाच व अनेक सदस्य मतमोजणी अधिकाऱ्यापुढे जमुन गोंधळ करीत असतांना एका मतपत्रिकेवर अचानकपणे बॉलपेनची खुण उमटल्याचे दिसते. (सर्व मतपत्रिका मतमोजणी अधिकारी श्री. खैरनार यांचे ताब्यात असतात) त्यावरही सन्माननीय सदस्य श्री. अविनाश कुमावत सभागृहातच मोजणी ठिकाणी उपआयुक्त (म) यांच्या निर्दशनास आणुद देतात. त्यावेळी सभागृहातील दुसऱ्या पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री कैसरखान या आक्षेपावर तीव्र हरकत घेऊन विरोध दर्शवितात व मतपत्रिकेवर या ठिकाणी मतपत्रिका संबंधीत मतमोजणी अधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याने मतपत्रिकेवर कुणीही वेगळी खुण किंवा आक्षेपार्ह असे कृत्य करणार नाही व व केलेले नाही असे सांगतानाच मात्र या एका मतपत्रिकेबाबतही सभागृहात जोरजोरात चर्चा होऊन मतपत्रिका वैध असलेली तिच्यावर कुणीतरी खुण केली व आक्षेपार्ह करुन बाद करण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगितले. त्यावर उपआयुक्त (म.) यांनी ही बाब मान्य केली व सदरची मतपत्रीका वैध असल्याचे सुरुवातीलाच दिसल्याने स्पष्ट केले. पहिल्यांदा जेंव्हा मतपत्रिकेत छाननी करुन तिला वैध ठरविली तेव्हा अशी खुण नव्हती व कोणी आक्षेपही घेतला नव्हता ही बाब लक्षात आणुन दिली. याबाबत सभागृहात सन्माननीय सदस्य श्री कैसरखान बद्रोद्दीनखान व उपआयुक्त (म) यांचे समवेत जोरजोरात चर्चा झाली.)

**उप आयुक्त (म.) :** माझी सभागृहाला विनंती आहे की जिल्हाधिकारी कार्यालयातील माजी निवडणुक अधिकारी श्री गवळी साहेब यांना या सल्ल्यासाठी सभागृहात बोलावावे काय ? सर्वानुमते ठरवावे. ते जो सल्ला देतील व सांगतील तो सर्वांनी मान्य करावा. अशा प्रकारे यापुर्वी पहिल्या सर्वसाधारण सभेत नामनिर्देशित सदस्यांच्या निवडणुकीचे वेळी श्री गवळी यांचा सल्ला सर्वसाधारण सभेने घेतला होता.

**श्री अविनाश कुमावत :** सभागृहात निर्णय देत असतील तर बोलविण्यास हरकत नाही.

**श्री गणेश तांबे, श्री सलीम पटेल शमशेर पटेल, श्री दलबीरसिंग जाबिंदा :** जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणुक अधिकारी जरी असतील तरी श्री गवळी यांना माहिती देण्यासाठी बोलाविण्यात आल्यास आमची हरकत नाही. मात्र त्यांचे मत सभागृहाला बंधनकारक राहीलच असे नाही.

**श्री अविनाश कुमावत :** गुप्त पध्दतीने मतदानाची प्रक्रीया पुर्ण झालेली आहे व ज्या मतपत्रीकेबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे ती मतपत्रीका बाजुला ठेवुन पुढील मतमोजणीस सुरुवात करावी.

**श्री गणेश तांबे :** मतदान झालेले आहे. प्रक्रिया पुर्ण झाली असुन आम्ही घेतलेल्या दोन मतपत्रीकेवरील खुणांच्या संदर्भाने आक्षेपाचा अर्ज दिलेला आहे. त्यानुसार मतपत्रिका बाजुला ठेवुन मतमोजणी प्रक्रिया सुरु करावी.

**श्री दलबीरसिंग जाबिंदा :** या सभागृहात पिठासन अधिकारी नसल्याने निर्णय होत नाही. आणि त्यानंतरही जर निर्णय ठरविल्यास तो सभागृहास बंधकारक नाही.

(ही चर्चा चालु असतांना उपआयुक्त (म) मा. आयुक्त यांना मोबाईलवर बोलतात. श्री गवळी यांना बोलविण्याबद्दल त्यांची मान्यता घेतल्याची कल्पना देतात असे इतर अधिकाऱ्यांना सांगतात.)

**उप आयुक्त (म) :** जिल्हाधिकारी कार्यालयातील माजी उप जिल्हा निवडणुक अधिकारी म्हणुन काम करीत असलेले श्री गवळी साहेब यांना सभागृहाने ठरविल्याप्रमाणे निरोप दिलेला आहे. त्यांचेकडुन याबाबत सल्ला घेता येईल. ते येईपर्यंत मतपत्रिका सिल करुन ठेवाव्यात व १/२ तास सभा तहकुब करता येऊ शकते याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

**श्री सलीम पटेल शमशेर पटेल :** सभागृह तहकुब करता येत नाही. जो पर्यन्त मत मोजणी प्रक्रिया अर्धवट राहिलेली पुर्ण होत नाही तोपर्यंत.

**उप आयुक्त (म) :** ठिक आहे. श्री गवळी साहेब येत आहेत. तोपर्यन्त थांबता येईल. (वेळ दुपारी ३.१० वाजता)

(याच वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील माजी उप जिल्हा निवडणुक अधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी श्री गवळी साहेब यांचे सभागृहात आगमन. त्यांना उप आयुक्त (म) हे सभागृहातील मतमोजणी प्रक्रिया चालु असतांना सन्माननीय सदस्यांनी घेतलेल्या आक्षेपार्ह मतपत्रिकांची माहिती दिली व समक्ष दाखविली. आपसात मतमोजणी अधिकारी श्री एम. पी. खैरनार, उपआयुक्त (प्र) व उपआयुक्त (म) यांचे समवेत श्री गवळी साहेब यांनी सविस्तर सभागृहात झालेल्या घटनाक्रमांची चर्चा केली व गवळी साहेबांनी निवडणुकीबाबच्या प्रक्रीयेची कामकाज नियमावली प्रमाणे सभागृहात माहिती देण्यासाठी होकार दिला. )

**उप आयुक्त (म) :** पिठासन अधिकारी कोण असावा याबाबतची प्रक्रिया चालू आहे. पिठासन अधिकारी अधिकाऱ्याच्या निवडणुकीच्या प्रक्रियेबाबत मतपत्रिकांच्या अवैध/वैधतेच्या निर्णयासाठी मत जाणुन घेणेसाठी माजी उप जिल्हा निवडणुक अधिकारी श्री गवळी साहेब या ठिकाणी आलेले आहेत. नियमाप्रमाणे मतमोजणी वैध-अवैधतेच्या प्रक्रीयेबाबत श्री गवळी साहेब जे सांगितले ते सर्वांनी ऐकुण घ्यावे व ज्या मतपत्रिकाबाबत संशय घेतला गेला होता त्या बाजुला ठेवल्यानंतर पत्रिकाबाबत संशय घेतला होता त्या बाजुला ठेवल्यानंतर निर्णय घेतला जाईल. ज्या मतपत्रिकांबाबत संशय आहे त्या सर्व मतपत्रिकाबाबत गवळी साहेब प्रत्यक्षात पाहणी करुन आपले मत सांगतील.

श्री गवळी साहेब या मतपत्रिका संदर्भात त्यांचें ओपीनियन देतील व त्यानुसार मतमोजणी अधिकारी श्री खैरनार मतमोजणीचा निर्णय देतील असे सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्य केले आहे व मतमोजणी अधिकारी श्री. एम. पी. खैरनार हे निर्णय देतील.

(त्यानुसार उर्वरीत मतमोजणी थांबवलेली प्रक्रियेला पुन्हा सुरुवात)

(श्री गवळी सोहब यांनी मतपत्रिका पाहुन असे सांगितले की, ज्या मतपत्रिकांवर संशयास्पद खुण दिसते असे सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतलेला आहे व ती मतपत्रिका बाद करावी असे म्हणणे आहे. परंतु असे दिसते की, मतपत्रिकेवरील केलेली आक्षेपार्ह खुण कुणी केली असे सांगता येईल काय व ते सर्व पाहणाऱ्यानां कळावयास पाहिजे ते दाखवावे जर मतपत्रिकेवरील खुण कोणी केली हे स्पष्ट होत नसल्यास व मतदाराची ओळख पटत नसल्यास ती मतपत्रीका अवैध होणार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी संशय घेतलेल्या ६ मतपत्रिका सुध्दा ग्राहय धरुन मतपत्रिका वैध मानण्यास हरकत नाही असे माझे निवडणुक नियमाप्रमाणे मत आहे. यावेळी वैध अवैध मतपत्रिकांची निवडणुक आयोगाची पुस्तिका उदाहरणार्थ सर्वांना दाखविण्यात आली.)

**श्री अविनाश कुमावत :** आम्ही आक्षेप पत्र दिलेले आहे. त्यानुसारच कार्यवाही व्हावी.

(याच वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणुक अधिकारी श्री गवळी साहेब यांनी नियमाप्रमाणे माहिती सांगितली व ऐकुण घेतले त्याबद्दल धन्यवाद दिले मी कोणताही निर्णय दिलेला नाही. माझे मत सांगितले आहे असु सांगुन सभागृह सोडले.)

(आक्षेप पत्र उप आयुक्त (म.) मतमोजणी अधिकाऱ्यांकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव देतात.)

**उपआयुक्त (म) :** पिठासीन अधिकारी पदाची निवडणुक करणेसाठी जी मतदान प्रक्रिया झाली त्यानंतर मतमोजणी होऊन मतमोजणी अधिकारी श्री एम. पी. खैरनार यांनी माझ्याकडे अहवाल दिला आहे. माजी निवडणुक अधिकारी श्री गवळी साहेब यांनी आपले मत सांगितले. आता मतमोजणी अधिकारी यांनी छाननी व मतमोजणी अधिकारी यांनी छाननी व मतमोजणी तपशीलवार माहिती दिली आहे. ती आपल्या समोर मांडतो.

| | | |
|---|---|---|
| १) श्री किशोर तुळशीबागवाले | यांना | ८ मते |
| २) सौ. विजया रहाटकर | यांना | ८ मते |
| सर्व मते वैध.. | एकुण | १६ मते |

सन्माननीय सदस्य श्री अविनाश कुमावत यांनी मतमोजणीच्या वेळी घेतलेल्या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. आता पिठासन अधिकारी कोण बसवावे याबाबातचा निर्णय अद्यापही व्हावयचा असुन पुन्हा पाच मिनीटांचा अवधी दोन्हीही पक्षांकडील सदस्यांना देण्यात येतो. त्यांनी विचार करुन निर्णय सांगावा.

**श्री अविनाश कुमावत :** तीन दिवसांची नोटीस काढुन सदरची बैठक पुन्हा बोलविता येते. परंतु आम्ही घोषित केलेल्या पिठासन अधिकारी निवडणुकीसाठी श्रीमती विजया रहाटकर या महिला प्रतिनिधी राहणार आहेत. तद्धतच आपण सभागृहात सांगितलेली मतमोजणी पिठासन अधिकारी यांच्या निवडीची

माहिती बाबत आम्ही घेतलेल्या आक्षेपाचे आम्हास लेखी उत्तर द्यावे की, मतमोजणीच्या वेळी एका मतपत्रिकेवर कोणत्याही प्रकारची खुण नसतांना अचानकपणे खुण केलेली आढळली ती ग्राहय धरु नये. जाणीवपुर्वक कोणीतरी खुण केली याबाबतची दखल घेऊन त्या प्रकारचे लेखी पत्र आम्हास द्यावे म्हणजे न्यायलयात दाद मागता येईल. आपण सभागृहात दिलेल्या निकालाची माहिती आम्हास मान्य नाही. त्याशिवाय ही बैठक संपविता येणार नाही.

**उप आयुक्त (म) :** पिठासन अधिकारी कोण असावा याबाबत कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे. आता सभागृह याबाबत कोणत्याही निर्णयाप्रत आलेले नाही. पुढील सभेबाबत मा. आयुक्त हे निर्णय घेतील. पाच मिनीटांचा अवधी सभागृहात दोन्हीही पक्षाच्या बाजुने विचार करण्यासाठी दिलेला होता. तो संपल्यावरही एकमत अथवा बहुमत झालेले दिसत नाही. सन्माननीय सदस्य श्री अविनाश कुमावत यांनी घेतलेल्या मतपत्रिकेवरील आक्षेप बाबत श्रीमती रहाटकर यांना मिळालेल्या एका मतपत्रिकेवर मतमोजणीचे वेळी कोणीतरी बॉलपेनने बारीक खुण केलेली आढळली त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. इ. उत्तर त्यांना दिले आहे. पिठासन अधिकारी कोण असावा याबाबत सभागृहात एकमत झाले नसल्याने व मतमोजणीत समसमान मते पडल्याने आजच्या सभेचे कामकाज संपविण्यात येते.

याबरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २१.०६.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दि. २१.०६.२००० रोजी मा. सभापती श्री अविनाश लक्ष्मण कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली.**

**सभेला अधिकारी वर्गासह खालील स. सभासदांसह उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री अशरफ मोतीवाला | स. सदस्य |
| २) | स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | --//-- |
| ३) | स. स. श्री कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ४) | स. स. सौ. खरात कुसूमबाई दैालत | --//-- |
| ५) | स. स. श्री गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ६) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघूनाथ | --//-- |
| ७) | स. स. श्री जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | --//-- |
| ८) | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीत सिंग | --//-- |
| ९) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| १०) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | --//-- |
| ११) | स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | --//-- |
| १२) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १३) | स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल | --//-- |
| १४) | स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

**संवाद :**

**मा. सभापती :** सभेला सुरुवात करण्यापुर्वी मी नवनिवार्चीत स्थायी समिती सदस्यांचे अभिनंदन करतो. तसेच प्रशासनातील अधिकारी यांचेही अभिनंदन करतो. मला ज्यांनी निवडुन दिले त्यांचे व सभागृहाचे मी अभार मानतो. आता विषय क्र. १ ला सुरुवात करावी.

**विषय क्र. १ :**

ए. सी. पाईप व सी. आय.डी. जॉईंटस् खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,२२,८७९/- चे तयार करण्यात आले असुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील साहित्य खरेदीवर होणारा खर्च पाणीपुरवठा देखभाल व दुरुस्ती या लेखा शिर्षकातील तरतुदीमधुन करण्यात येईल. सदर साहित्य खरेदी करण्यासाठी अं. प. र रु. ६,२२,८७९/-चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

मा. सभापती : सदरचा विषय पाणी पुरवठयाशी निगडीत असल्याने व अत्यंत आवश्यक व महत्तवाची बाब असल्याने प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ए. सी. पाईप व सी. आय. डी. जॉईन्टस खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ६,२२,८७९/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २ :**

एन-७ सिडको येथील परिसरातील जलकुंभ क्रमांक १ हे सिडको तर्फे बांधण्यात आलेले आहे. त्याची दुरुस्ती करणे अत्यंत जरुरीचे आहे. त्या साठी जलकुंभाला सिमेंट सॅट गनायटींग ट्रिटमेंट करणे आवश्यक आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,७८,६४४/- चे तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रक सन १९९८-९९ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आले. सदरील कामावर होणारा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुसती या लेखा शिर्षकातील तरतुदीमधुन करण्यात येणार आहे.

सदर कामास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,७८,६४४/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री मधुकर सांवत :** संबंधीत भागात एकुण पाण्याच्या टाक्या किती आहेत व कोणत्या ठिकाणच्या टाकीची दुरुस्ती करणार याची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा. पु.) :** सिडको एन-७ येथे पाण्याची टाकी आहे. त्या ठिकाणच्या टाकीचे दुरुस्तीचे कामासाठी जलकुंभाला सिमेंट गनायटींग ट्रिटमेंट करणेसाठी दुरुस्तीचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री साहेबराव कावडे :** माझ्या वार्डातील पाण्याची टाकी आहे. त्या ठिकाणी एका वॉचमनची आवश्यकता असणे बाबत मी पत्र दिलेले होते.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** गनायटींग केल्याने त्याची स्ट्रेन्थ वाढले का.

**मा. सभापती :** सदरील विषयाला धरुन चर्चा नाही. तथापी कार्यकारी अभियंता यांनी तशी नोंद घ्यावी व प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन -७ सिडको येथील परिसरातील जलकुंभ क्रमांक १ च्या दुरुस्ती सिमेंट सँड गनायटींग ट्रिटमेंटचे काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ५,७८,६४४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा दैनंदिन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी विविध व्यासाचे सी. आय. डी. जॉईन्टस खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुची नुसार रक्कम रु. ४,९६,९५०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्ख हा देखभाल व दुरुस्तीच्या लेखा शिर्षकामधुन करण्यात येणार आहे. तरी अंदाजपत्रक र. रु. ४,९६,९५०/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री दलबीर सिंग जबिंदा :** यापुर्वीच्या प्रस्तावात व यातही सी. आय.डी. जॉईन्टस् प्रस्तावित आहेत.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** दोन ठिकाणचे आहे. एक शहरासाठी व दुसरे सिडकोसाठी.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा दैनंदिन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी विविध व्यासाचे सी. आय. डी. जॉईन्ट खरेदी करणे करीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ४,९५,९५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. आयुक्त महोदय यांचे म.न.पा. निवासस्थानी एका खोलीची वाढ करणेकरीता सन ९८-९९ च्या सा. बां. विभागाचे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. २,९८,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा. आयुक्त महोदय यांनी दि. १७-०६-२००० अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षाअंतर्गत सन २०००-०१ या आर्थिक वर्षात करण्यात येईल. त्यानुसार सदर कामास्तव अंदाजपत्रक र. रु. २,९८,३००/-चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री मधुकर सावंत :** एक खोली बांधण्यासाठी एवढा खर्च होतो का.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** डी. एस. आर. दर आर्थिक वर्षाचे अद्याप प्राप्त नाही काय? या शिवाय मा. आयुक्त यांच्या निवासस्थानी एक खोली वाढ करणे म्हणजे कोणत्या रुमची वाढीचा प्रस्ताव आहे. याची माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** मा. आयुक्त यांनी शिफारस व मागणी केल्यानुसार एका बेडरुमची वाढीव बांधकामाचा प्रस्ताव असुन डी. एस. आर. दरान्वये अंदाजपत्रक आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. आयुक्त यांचे महानगरपालिका निवासस्थानी एका खोलीची वाढ करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,९८,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५ :**

शहर अभियंता, महानगरपालिका यांनी मा. आयुक्त यांचे मान्यतेवरुन प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेल्या विविध विकासांच्या कामासाठी सिमेंटच्या आवश्यकता आहे. त्यानुसार ५०,०००/-(पन्नास हजार) गोणी सिमेंट खरेदी करण्यासाठी सा. बां. खात्याचे सन ९८-९९ वर्षाचे दरानुसार प्रती गोणी रु. १२५.०० प्रमाणे (भांडारात पोचते) र. रु. ६२,५०,०००/- (बासष्ट लाख पन्नास हजार) चे अंजदापत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले असता त्यास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ३-६-२००० रोजी सदर खरेदीचे अंदाजपत्रक स्थायी समितीपुढे बजेट तरतुदीसाठी

पाठविण्यात यावे असु सुचित केलेले आहे. तरी वरील प्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** सध्या सिमेंटचे मार्केट भाव कमी आहे व सिमेंट खरेदी करतांना डायरेक्ट एजन्सीकडुन माल गोडावुनमध्ये येणार की फॅक्टरीतुन याची माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** शासनाच्या दरसुची प्रमाणे सिमेंट खरेदी करावयाचा प्रस्ताव असुन प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर जाहिरात देवुन निविदा मागवुन निर्णय घ्यावयाचा आहे. येथील डिलर हे ॲथोराईज्ड आहेत. त्यांनी निविदा भरावी.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** हे काम लेखाशिर्षखाली मंजुर करता.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. सदरील विषय बजेटमध्ये तरतुदी साठी पाठविण्यासाठी आजच्या सभेमध्ये मंजुरीची आवयश्यकता होती. आता रितसर अंदाजपत्रकात तरतुद करण्यात येईल. याशिवाय पुढील कोणत्याही बैठकीत "ऐनवेळचे विषय" घेण्यात येणार नाही. कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**श्री दलबिरसिंग जंबिदा :** ऐनवेळचे प्रस्ताव तातडी पाहुन घेण्यात यावे. आमचे आपणांस सहकार्य राहील.

**मा. सभापती :** अत्यावश्यक असेल तर विचार करण्यात येईल. शांततेने सभा पार पाडली व सहकार्याबद्दल सर्वांचे धन्यवाद.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे हाती घेण्यात आलेल्या विविध विकासांच्या कामासाठी सिमेंटची आवश्यकता असल्याने त्यानुसार ५० गोणी सिमेंट खरेदी करण्याचे कामासाठी सा. बां. खात्याचे दरसुची नुसार प्रती गोणी रु. १२५/- (भांडारात पोचते) प्रमाणे रक्कम रु. ६२,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन सिमेंट खरेदीसाठी अर्थसंकल्पामध्ये वरील अंदाजपत्रकानुसार तरतुद करण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २९-६-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक २९-६-२००० रोजी मा.सभापती श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३-३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) श्री.अशरफ मोतीवाला | स.सदस्य |
| २) श्री.कावडे साहेबराव राणुबा | --//-- |
| ३) श्री.कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ४) सौ.कुसुमबाई दौलत खरात | --//-- |
| ५) श्री.गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ६) श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ | --//-- |
| ७) श्री.जगदीश कन्हैयालाल सिध्द | --//-- |
| ८) श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग | --//-- |
| ९) श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| १०) श्री.लकडे भरत श्रीपती | --//-- |
| ११) श्री.वाघ भाऊसाहेब बाबुलाल | --//-- |
| १२) सौ.विजया किशोर रहाटकर | --//-- |
| १३) श्री.सलीम समशेर पटेल | --//-- |
| १४) श्री.सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १५) श्री.सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

सन्माननीय सदस्य श्री.नंदू माधवराव फुलारी यांचे जेष्ठ बंधू कै.शिवाजी फुलारी यांचे नुकतेच निधन झालेले असल्याने ०२ मिनिटे स्तब्धता पाळून सभागृहातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**संवाद :**

**श्री.सलीम पटेल समशेर पटेल :** चर्चेसाठी वेळ देण्यात यावा, त्यानंतर विषयांस मंजुरी देण्यात यावी.

**मा.सभापती :** विषयास मंजुरी घेतल्यानंतर चर्चेसाठी १० मिनिटांचा वेळ देण्यात येईल. विषय क्रमांक १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ६/१ :**

दिनांक २२-५-२००० व दिनांक २१-६-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २२-५-२००० व दिनांक २१-६-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.सीआर/४८/२०००/औरंगाबाद/९९ दिनांक ५-१-२००० नुसार आरोपी लोकसेवक श्री.महंमद रफीक शे.मो.,कनिष्ठ लिपिक,झोन नं.२, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे विरुध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचेविरुध्द न्यायालयात खटला दाखल करणेसाठी परवानगी मागितली आहे.सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,पोलीस उप आयुक्त/पोलीस अधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद यांचे दिनांक ५-१-२००० चे पत्रानुसार आरोपी लोकसेवक श्री. महंमद रफीक शे.मो.,कनिष्ठ लिपीक,झोन नं. २ महानगरपालिका,औरंगाबाद यांचे विरुध्दची लाचलुचपतीची सापळा केस देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,जालाननगर उद्यानासमोर फरशी बसविणे,खेळणी बसविणे व वॉचमन खोली बांधणे बाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. १,४५,६९५/- चे सन ९७-९८ च्या सा.बां.विभागाच्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च "नविन उद्याने" या लेखा शिर्षकातून करण्यात येणार आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांची दिनांक ८-१२-९९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** डी.एस.आर.नविन आहे.सन ९७-९८ च्या रेटप्रमाणे कामे करणार आहोत.अद्यापपर्यंत बजेट मंजुर केलेले नाही. नविन बजेटमध्ये सदर कामाचे अंदाजपत्रक मंजूर करत आहोत. या बाबत खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :** चार महिन्याचे लेखानुदानातून हे काम करण्यात येणार आहे.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** मागील रेटप्रमाणे ठेकेदार बिलोने टेन्डर भरतात व विकास कामेही व्यवस्थित होत नाहीत.

**श्री.सलीम पटेल समशेर पटेल :** अंदाजपत्रक नविन डी.एस.आर.प्रमाणे करावयाचे आदेश द्यावेत.

**श्री.मधुकर सावंत :** जुन्या दराप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. काम चांगले होईल काय?

**अतिरिक्त शहर अभियंता :** जसे दर सादर केलेले आहेत, त्याप्रमाणे इस्टीमेंट तयार केलेले आहे.यासाठी बराच वेळ लागलेला आहे.

**मा.सभापती :** ठराव मंजूर करण्यात येतो. नविन डी.एस.आर.प्रमाणे दर आकारण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालाननगर उद्यानामध्ये फरशी बसविणे,खेळणी बसविणे व वॉचमन खोली बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,४५,६९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.या कामाकरीता नविन डी.एस.आर .प्रमाणे दर आकारण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/४:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपुरा येथील आरक्षण क्र.९४ खल्या जागेत उद्यान विकसित करणेबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,२३,०००/- चे सन ९८-९९ च्या सा.बां.विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च "शासकीय अनुदान" या लेखा शिर्षकातून करण्यात येणार आहे. सदर खर्चास मा.आयुक्तांची दि. १५-१२-९९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा येथील आरक्षण क्र. ९४ खुल्या जागेत उद्यान विकसित करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,२३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता शहरात सोडीयम व्हेपर दिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता सोडीयम व्हेपर साहित्य खरेदी करण्यासाठी सा.बां.खात्याच्या (विद्युत) सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ९,४२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी रक्कम रु. ९,४२,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** शहरात जेथे लाईन फिटींग केलेली आहे तेथे लाईट अद्याप लावलेले नाही.जे.ई.यांनी लाईन टाकून ३-३ वर्ष झाले. एकाही ठिकाणी वायर जागेवर दिसणार नाही, अशी परिस्थिती झाली.या संबंधी विद्युत विभागाने काळजी घेतली पाहिजे. जे कर्मचारी कामे करीत नाही त्यांचे वेतनवाढ रोखण्यात यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मागील चार महिन्यापूर्वी ३० लाखाचे साहित्य खरेदी केले. त्याबाबतचा हिशोब देण्यात यावा. ९-९ लाख रुपयांचे अंदाजपत्रक तीन वेळेस सभागृहाने मंजुरी दिलेली आहे.खुलासा करावा.

**उप-अभियंता (वि.) :** मागील वर्षासाठी (१९९९-२०००) साहित्य खरेदी केलेले होते. चार महिन्यांपूर्वी खरेदी केलेली नाही. ७० वॅट सोडीयम व्हेपरचे साहित्य खरेदीचा हा प्रस्ताव आहे. १५० वॅट व २५० वॅट बाबतचा प्रस्ताव येणार आहे.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** याविभागातर्फे व्यवस्थित कामे होत नाही. त्याबद्दल मी तक्रार करणार आहे.

**मा.सभापती :** आपण आपली तक्रार मांडावी. ती सत्य असेल तर संबंधीतांवर कार्यवाही निश्चित करण्यात येईल.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** विद्युत साहित्य कोठे बसविण्यात येते याची माहिती सन्माननीय सदस्यांना मिळत नाही.

**मा.सभापती :** यापुढे विद्युत साहित्य बसवितांना वार्डातील संबंधित सन्माननीय सदस्यांची सही घेऊनच कार्यवाही करावी. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता शहरात सोडीयम व्हेपर दिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता सोडीयम व्हेपर साहित्य खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ९,४२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/६:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, हबीब कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी दिनांक ३-१२-९९ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ४००/४२ अन्वये अंदाजपत्रक रक्कम रु. ३,४८,९००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरील काम करणेसाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा /लेखा/नि/४१/९९ दिनांक १०-१२-९९ चे निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण चौदा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजित तारखेस एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.एच.डी.पहूळ | ३४.६२% कमी दराने |
| २) | श्री.खान मुजाहिद | २५% कमी दराने |
| ३) | श्री.एस.ए.नवाब | १८.५३% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.६२% कमी दराची श्री.एच.डी.पहूळ यांची निविदा आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर. सदर काम सन १९९९-२००० च्या शासकीय अनुदानातून प्रस्तावित करण्यात आले आहे.

**संवाद :**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मागच्या वर्षीप्रमाणे,३५,३६,४० टक्के बिलो मध्ये कामे जातात. तशी कामे बंद करावी व कामाचा दर्जा कसा सुधारेल याची दक्षता घ्यावी.

**सौ.विजया रहाटकर :** आपण फक्त रेटस् बघतो.कामाच्या प्रतीची पडताळणी केली पाहीजे.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** सदर प्रस्तावात ३४.६२% कमी दराने निविदा दर नमूद केलेले आहे. या संबंधीचा खुलासा करावा. काम चांगले होईल काय?

**अतिरिक्त शहर अभियंता :** जे काम करण्यात येणार आहे ते खडीकरणाचे असून ३४% कमी दराने करण्यास व चांगल्या प्रतीचे काम पाहिजे याबाबत संबंधितांना विचारणा केलेली असून त्यांनी चांगल्या प्रतीचे काम होईल म्हणून लेखी कळविले आहे.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** खडीचे रेटस् वाढलेले आहेत. एवढया कमी दराचे काम करण्यात संबंधीत ठेकेदाराला परवडेल काय व काम चांगले होणार नाही असे वाटते.

**मा.सभापती :** संबंधीत ठेकेदाराने काम व्यवस्थित न केल्यास व खराब काम केलेले आहे असे आढळून आल्यास संबंधीताचे डिपॉझिट जप्त करावे व त्या कामाचे बिल रोखण्यात यावे.

**सौ.विजया रहाटकर,श्री.मोतीलाल जगताप :** कमी रेटमध्ये कामे दिल्यास कामाचा दर्जा खराब होईल. संबंधीत ठेकेदाराने कामच केले नाही तर काय उपाययोजना करणार.

**मा.सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन या प्रस्तावाबाबत फेरनिविदा काढण्यात याव्यात.

**ठराव :**

हबीब कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी फेरनिविदा काढण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/७:**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,मो.इंदिरानगर,बायजीपुरा स्लम येथे वार्ड क्र. २३ मध्ये विविध गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणे बाबतच्या कामाकरीता सा.बां.खाते यांची दरसूची १९९७-९८ नुसार रक्कम रु.९,९०,६५२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.सदरील काम "नविन खांडकी रस्ते" या शिर्षकातून करण्यात येईल.सदरच्या अंदाजपत्रकास दिनांक १२-५-९९ ला स्थायी समितीत विषय क्र. ३०/२० नुसार मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण २८ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (७) निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.ए.एम.फारुकी | ३४.५% | कमी |
| २) | श्री.मन्नान खान | ३३.१०% | कमी |
| ३) | श्री.आर.बी.चव्हाण | ३१.५०% | कमी |
| ४) | फाईव्हस्टार कन्स्ट्रक्शन | ३०.१०% | कमी |
| ५) | श्री.नंदकुमार घोडेले | २४.२४ % | कमी |
| ६) | श्री.एस.ए.नवाब | २३.२३% | कमी |
| ७) | श्री.एस.ए.सिद्दीकी | २१% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३४.५% कमी दराची असलेली श्री.ए.एम.फारुकी यांच्या निविदेस दि. १८-१०-९९ रोजी स्थायी समितीत विषय क्र. ३१९/६१ नुसार मंजुरी मिळालेली आहे.परंतु सदरील संचिका निविदा मंजुरीसाठी स्थायी समितीत (८८) दिवस प्रलंबित होती.त्यानंतर संचिका १४-६-२००० रोजी प्राप्त झाली. दरम्यान बी-१ निविदेच्या अटीनुसार (९०) दिवसांचा कालावधी संपुष्टात आला. त्यामुळे संबंधीत ठेकेदार श्री.ए.एम.फारुकी यांनी बी-१ निविदेच्या शर्तीनुसार (९०) दिवसांचा कालावधी संपल्यामुळे काम करण्यास नकार दिला.त्यामुळे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारांना काम करणेसाठी विचारणा करण्यात आली. तेव्हा दुसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारांनी काम करण्यास नकार दिला मात्र तिसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारांनी हे काम त्यांनी दिलेले दर म्हणजेच ३१.५% अं.प.दरापेक्षा कमी दराने करण्यास संमती दिली. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.आर.बी.चव्हाण यांची ३१.५% कमी (अं.प.दरापेक्षा) दराच्या निविदेस मंजुरीसाठी पाठविले असता दि. ९-२-२००० रोजी प्राप्त झाली आहे. तरी श्री.आर.बी.चव्हाण यांची अं.प.दरापेक्षा ३१.५% कमी दराची असलेली निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** हा भाग स्लम असून या ठिकाणी फरशी न करता खांडकी बसवावी असे माझे मत आहे.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** बी-१ निविदेच्या शर्तीनुसार ९० दिवसांचा कालावधी संपलेला नाही. संबंधीत ठेकेदार काम करण्यास तयार नाही.

**कार्यकारी अभियंता (स्लम) :** निवडणुकीचा कालावधी होता.त्यामुळे कार्यवाही होऊ शकली नाही. तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास यासंबंधी विचारणा केली

असता तेही काम करण्यास तयार नव्हते. परंतु तिसरे क्रमांकाचे निविदाधारक काम करण्यास तयार आहे.परंतु ९० दिवसांचा कालावधी संपलेला आहे. याबाबत निर्णय व्हावा.

**श्री.मोतीलाल जगताप,श्री.कैसरखान बद्रोदीनखान :** खांडकीचे काम करण्याऐवजी सिमेंट कॉंक्रीटचे करावे. काम करण्या अगोदर स्थळ पाहणी करण्यात यावी. नंतरच कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** हा खर्च कशामधून करणार आहोत.

**प्र.कार्य.अभियंता (स्लम) :** खांडकी ऐवजी कॉंक्रीट केल्यास मजबूत,टिकाऊ राहिल.सदरचा खर्च "नविन खांडकी रस्ते" मधून घेतलेला आहे.

**मा.सभापती :** या विषयाबाबत फेर निविदा मागविण्यात याव्यात व फरशी ऐवजी सिमेंट कॉंक्रीटचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

इंदिरानगर,बायजीपुरा स्लम येथे विविध गल्ल्यात शहाबाद फरशी बसविणे ऐवजी सिमेंट कॉंक्रीट करण्याबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही करावी. तसेच या कामासाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३/८:**

श्रीमती मरीयम बेगम,सहशिक्षिका,महानगरपालिका मुलींची मा.शा.औरंगपुरा यांनी कार्यालयाची परवानगी न घेता महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२००० मध्ये निवडणुकीस उभ्या राहिल्या.महाराष्ट्र नगरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ कलम ५ आणि ५ (४) मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

कलम (५) - राजकारणात किंवा निवडणुकीत भाग घेणे.

कलम ५(४) - कर्मचारी कोणत्याही विधासभेच्या किंवा स्थानिक संस्थेच्या निवडणुकीत प्रचार करणार नाही किंवा हस्तक्षेप करणार नाही किंवा त्यात भाग घेणार नाही.

श्रीमती मरीयम बेगम यांनी दिनांक ८-३-२००० रोजी स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज दिला. तथापी अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केलेले नाही. संबंधीत कर्मचारी हे स्वेच्छा निवृत्ती मंजूर होण्यापूर्वीच निवडणुकीस उभे राहिले, ही बाब गंभीर असून त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ कलम ५ आणि ५(४) चा भंग केलेला आहे. याबाबत श्रीमती मरीयम बेगम यांना दिनांक ४-४-२००० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येऊन स्पष्टीकरण विचारण्यात आले असता संबंधीताने अद्यापही खुलासा सादर केलेला नाही.

उक्त परिस्थिती लक्षात घेता,मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदीनुसार त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक आहे. करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उप कलम २(ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे नगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** संबंधीत शिक्षिका यांनी गैरवर्तन केलेले असून प्रशासकीय कामकाजाच्या विरुध्द असल्याने हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती मरीयम बेगम,सहशिक्षिका,महानगरपालिका मुलींची मा.शा.औरंगपुरा यांनी कार्यालयाची परवानगी न घेता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुक-२००० मध्ये निवडणुकीस उभ्या राहिल्या.त्यांनी स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज दिलेला असला तरी सदरील स्वेच्छा निवृत्ती मंजूर होण्यापूर्वीच निवडणुकीस उभ्या राहिल्या ही अत्यंत गंभीर बाब असून त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ कलम ५ आणि ५(४) चा भंग झालेला आहे.तसेच कार्यालयात संबंधीतास दि. ४-४-२००० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली असतांना त्याबाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २(ह) नुसार त्यांना "यापुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यास" सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**-:ऐनवेळचा विषय :-**

**विषय क्र. १४/१:**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाकरीता महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ली, २री,व ६वीच्या अनुसूचित जाती (नवबौध्द धरुन) अनुसूचित जमाती,विमुक्त व भटक्या जाती,आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना पुस्तकपेढी योजनेअंतर्गत नव्याने क्रमिक पाठयपुस्तकांचे संच उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून सर्वसाधारण घटक योजने अंतर्गत फक्त रु. ५,०००/- तरतुद मंजूर करण्यात आली आहे.यामध्ये नियमाप्रमाणे म.न.पा.चा हिस्सा रु. ५,०००/- या प्रमाणे एकूण रु. १०,०००/- ची क्रमिक पुस्तके खरेदी करुन दिल्यास ती क्रमिक पुस्तके फारच कमी पडतात.महानगरपालिकेच्या एकूण ८२ प्राथमिक शाळा असून विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या कमी तरतुदी व्यतिरिक्त मनपाच्या वतीने इयत्ता १ली, २री, ३री,४थी, ५वी व ६वी मराठी/उर्दू माध्यमांच्या विद्यार्थ्यांना रु. ४,९०,०००/- (चार लाख नव्वद हजार) म्हणजे एकूण रुपये ४,९०,०००+१०,०००=५,००,०००/- (पाच लाख) रुपयांची क्रमिक पाठपुस्तके खरेदी करण्याबाबत मा.आयुक्तांनी मान्यता प्रदान केली आहे.त्यानुसार महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,औरंगाबाद यांचेकडून पुस्तके खरेदी करुन ती विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येतील.

तरी याप्रमाणे रु. ५,००,०००/- (पाच लाख) खर्चाचा प्रस्ताव अंदाजपत्रकातील तरतुदीस अधिन राहून मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** शालेय विद्यार्थ्यांसाठी पुस्तके खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**श्री.मोतीलाल जगताप :** मागील २-३ वर्षापुर्वीची काही पुस्तके चालू खरेदीमध्ये उपयोगात येऊ शकतील काय.मागील वर्षाच्या पुस्तकांचे गठठेच्या गठठे पडून आहेत.

**शिक्षणाधिकारी :** ज्या ज्या वर्गातील विषयांचे अभ्यासक्रम बदलले असतील ती बेकामी असलेली पुस्तके नष्ट करावी लागतील.त्यासाठी तसे प्रशासनाचे आदेश असावेत.

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी तसे आदेश द्यावेत व त्यानुसार शिक्षणाधिकारी यांनी कार्यवाही करावी.प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाकरीता मनपाच्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ली, २री,व ६वी च्या अनु.जाती (नवबौध्द),अनु.जमाती,विमुक्त व भटक्या जाती,आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना पुस्तकपेढी योजनेअंतर्गत नव्याने

क्रमिक पाठयपुस्तकांचे संच उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून सर्वसाधारण घटक योजनेअंतर्गत असणारी रक्कम रु.५,०००/- ची तरतुद व यात नियमानुसार मनपाचा हिस्सा रु. ५,०००/- असे एकूण रु. १०,०००/- ची क्रमिक पुस्तके महानगरपालिकेच्या एकूण ८२ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता ही क्रमिक पुस्तके अत्यंत कमी पडतात.म्हणून शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदी व्यतिरिक्त मनपाच्या वतीने इयत्ता १ली ते ६वी (मराठी/उर्दू) माध्यमांच्या विद्यार्थ्यांना रु. ४,९०,०००/- (चार लाख नव्वद हजार) म्हणजेच वरील प्रमाणे रु. ४,९०,००० +१०,०००=५,००,०००/- (पाच लाख) रुपयांची क्रमिक पुस्तके महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,औरंगाबाद यांचेकडून खरेदी करुन विद्यार्थ्यांना वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**-:चर्चा :-**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** शहागंज येथील भाजी मंडई जाधववाडीत स्थलांतर झालेली असून महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या शहागंज मधील गाळे संबंधीतांकडून रिकामे करुन घेऊन पुन्हा लिलाव काढून कार्यवाही करण्यात यावी.

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी त्वरीत पाहणी करुन ती दुकाने संबंधीतांकडून परत घेण्याबाबत कार्यवाही करावी व नविन लिलाव करण्यात यावा व मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल हे पहावे.

**सौ.विजया रहाटकर :** तसेच पीरबाजार,उस्मानपुरा येथील रस्त्यावर आठवडी बाजार भरतो. बाजारच्या दिवशी बरेच विक्रेते रस्त्यावर विक्री करतात व त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.यामागील काळात बरेचशे अपघात झालेले असून असे असतांना सुध्दा महानगरपालिकेमार्फत १५ दिवसांपुर्वी पार्कीगचे टेंडर काढण्यात आले.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** सर्वात चांगला बाजार भरतो. येथे लेडीज जास्त प्रमाणात विक्रेत्या असून मनपाच्या माध्यमातून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास ही समस्या सुटेल असे माझे मत आहे.

**सौ.विजया रहाटकर :** बाजार विक्रेत्यांना नाल्यावर जागा देऊ केली होती,परंतु १६ घरमालकांनी आक्षेप घेतला व जागा देण्यात येऊ नये म्हणून न्यायालयात धाव घेतली.प्रशासनाच्या माध्यमातून पर्यायी व्यवस्था होत नसेल तर कमीत कमी बाजार भरतो त्या दिवशी तरी सदर रस्त्यावरील जाणाऱ्या जड वाहनांसाठीचा रस्ता बंद ठेवावा,जेणेकरुन अपघात होणार नाही.

**मा.सभापती :** पर्यायी काय उपाययोजना करता येईल त्यासंबंधी उपआयुक्त यांनी कार्यवाही करावी व जड वाहनास रस्ता बंद करण्यासंबंधी मा.पोलीस आयुक्तांशी चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**सलीम पटेल समशेर पटेल :** कैसरकॉलनी येथील जियाउद्दीन लेआऊट वर महानगरपालिकेकडून स्टेप तयार केलेले आहे. मा.आयुक्तांनी या ठिकाणी स्वतः पाहणी केली आहे.

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी परवानगी घेऊन ताबडतोब तोडण्यात येऊन रस्ता सुरळीत करण्यात यावा.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०६-०७-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक ०६ जुलै २००० रोजी मा. सभापती श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे दुपारी ०३.३० वाजता " वंदे मातरम् " या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १. स. स. श्री. अशरफ मोतीवाला | स. सदस्य |
| २. स. स. श्री. कावडे साहेबराव रणुबा | -//- |
| ३. स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान | -//- |
| ४. स. स. सौ. कुसुमबाई दौलत खरात | -//- |
| ५. स. स. श्री. गणेश रामचंद्र तांबे | -//- |
| ६. स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| ७. स. स. श्री. जगदीश कन्हैयालाल सिध्द | -//- |
| ८. स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | -//- |
| ९. स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १०. स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ११. स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुलाल | -//- |
| १२. स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | -//- |
| १३. स. स. श्री. सलीम पटेल शमशेर पटेल | -//- |
| १४. स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| १५. स. स. श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | -//- |

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** दि. २१-१२-९९ च्या स्थायी समितीच्या बैठकीत श्री. प्रविण पवार नावाच्या ठेकेदारास दि. ०६-०६-९९ रोजी एक परिपत्रक काढून काळया यादीत नांव समाविष्ट केले होते. श्री. मौला अली यार खान यांनी देखील त्यानुसार संबंधिताने बैठकीत अपील केले होते व त्यांचे नांव काळया यादीतून रद्द करण्यात यावे असा निर्णय झालेला असतांना व यास सहा महिन्यांचा कालावधी झालेला असून, प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

**मा. सभापती** : श्री. पवार यांना काळया यादीतून काढण्याबद्दल ठराव झाला होता. प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**श्री. सलीम पटेल :** मी दि. १०-०५-२००० ला एक पत्र देऊन कळविले होते की, कैसरकॉलनी येथे महानगरपालिकेने रस्त्यावर स्टेप तयार केलेले आहे. रहदारीला अडथळा निर्माण होत असून, त्या ठिकाणी उपआयुक्त यांनी सुध्दा दि. २३-०५-२००० ला प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. अद्याप काहीच कार्यवाही केलेली नाही. (स. सदस्य श्री. सलीम पटेल हे खुर्चीवरुन मा. सभापती यांच्या असनासमोर सभागृहात खाली बसतात.)

**मा. सभापती** : स. सदस्य यांनी सभागृहात खाली बसू नये. आपण केलेली तक्रार विचारात घेतली जाईल. याबाबत स. सदस्य यांनी मागील बैठकीत सूचना केलेली होती. या ठिकाणी उप आयुक्त हे मा. आयुक्त म्हणून उपस्थित आहेत. त्यांनी खुलासा करावा. कृपया स. सदस्यांनी आपल्या आसनावर बसावे.

(स. सदस्य श्री. पटेल हे पुन्हा त्यांच्या खुर्चीवर जाऊन बसतात.)

**मा. उप आयुक्त (म.) :** त्या ठिकाणी पायऱ्या झालेल्या आहेत. परंतु कधी तयार करण्यात आले आहे, याची चौकशी करण्यात येईल व या ठिकाणी मा. आयुक्त यांनी स्वतः पाहणी केलेली असून कार्यवाही करण्यात येईल असे प्रत्यक्ष स. सदस्य यांना सांगितलेले आहे.

**मा. सभापती** : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या तक्रारीनुसार कार्यवाही होणे गरजेचे आहे. पुढील स्थायी समितीच्या बैठकीपर्यन्त कार्यवाही होईल किंवा काय याबाबतचा खुलासा करावा.

**मा. उप आयुक्त (म.) :** या आठवडयात काढण्यात येईल.

**मा. सभापती** : पुढील आडवडयापर्यत या बाबतीत कार्यवाही करावी. यापुढे सन्माननीय सदस्यांच्या तक्रारीची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. आता २० मिनिटे सर्वसाधारण चर्चा करावी. नंतर विषय पत्रिकेवरील विषयांना मंजुरी दिली जाईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** शहरात बऱ्याच ठिकाणी अतिक्रमणे होत आहेत. अतिक्रमण काढतांना पोलीस शिपयांची मदत घेतली जात नाही काय? ज्या भागामध्ये पैसे मिळतात त्या ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात येत नाही व ज्या ठिकाणी गोरगरीब रोजचा उदरनिर्वाह भागवितात अशा लोकांच्या टपऱ्या तातडीने काढण्याची कार्यवाही करतात असे दिसून येते. पोलीस विभागावर मनपाचा किती खर्च होतो. तसेच ज्या ठिकाणी कन्स्ट्रक्शन्सची मोठमोठी कामे चालू असतात तेथे जाऊन सन्माननीय सदस्यांची नांवे दाखवून चार ते पाच हजार रुपयांची मागणी करतात अशी माहिती मिळालेली आहे. यामुळे नगरसेवकांची बदनामी होत आहे. मनपाचा पोलीस कर्मचाऱ्यांवर किती खर्च होतो, माहिती द्यावी.

**श्री. गणेश तांबे :** या विभागात जे अधिकारी यांची नेमणूक होते ती प्रशासकीय अधिकारी म्हणून होते. या विभागास नॉन टेक्नीकल अधिकारी कायमस्वरुपी भरण्यात यावे. तसा ठरावही सर्वसाधारण सभेत पास केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : लोकांकडून सन्माननीय सदस्यांची नांवे दाखवून पैसे घेतात असे काही प्रकार आहे काय. संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**प्रभारी प्रशासकीय अधिकारी :** पैसे वैगेरे घेतात असा काही प्रकार निर्दशनास आलेला नाही. मुळातच जी अतिक्रमण आहेत ती काढण्याबाबत कार्यवाही या विभागातर्फे होते. असे केले असेल तर मी चौकशी करतो.

**सौ. विजया रहाटकर :** कोणती अतिक्रमणे झाली, कुठे झाली याबाबतची कार्यवाही करण्याचे काम महानगरपालिकेचे आहे. अशा वेळेस महानगरपालिकेने स्वतःहून तात्काळ कार्यवाही करावयास पाहिजे. विनाकारण कुणाला त्रास देऊन हेतूपुरस्पर अतिक्रमणात नसलेले टपऱ्या काढणे हे योग्य नाही. नगरसेवकांची नांवे सांगतात. लोकप्रतिनिधींना बदनाम करणे योग्य नाही.

संबंधित अधिकारी यांनी वेळीच नियमाप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे त्यांची कर्तव्ये पार पाडली पाहिजे. लोकांमध्ये लोकप्रतिनिधींबाबत गैरसमज करु नये.

**प्रभारी प्रशासकीय अधिकारी :** पैसे घेऊन सन्माननीय नगरसेवकांची नांवे दाखवून कुणी बदनामी करत असेल तर संबंधित कर्मचाऱ्याबाबत चौकशी करुन कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जबिंदा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार टपऱ्या काढण्यात आलेल्या नाही. दुसऱ्या काढण्यात आलेल्या आहे. असा काही प्रकार झाला आहे काय? संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**प्रभारी प्रशासकीय अधिकारी :** प्रशासनाच्या वतीने, ज्या अनाधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत त्या काढण्यात याव्यात असे आदेश होते म्हणून कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. एखाद्या गरीब व्यक्तीची हातगाडी असेल ती काढण्यात येते व एखाद्या व्यक्ती १०' x १०' टपरी टाकून व्यवसाय विनापरवानगीने करतो त्यास आपले अधिकारी हातभार लावलात अशी परिस्थिती असेल तर,मी याविभागावर अतिशय नाराजी व्यक्त करतो.

**उप आयुक्त (म) :** माननीय सर्वसाधारण सभेने मागील काळात एक ठराव करून सन १९९५ च्या अगोदरच्या टपऱ्या काढण्यात येऊ नये व १९९५ नंतरच्या टपऱ्या काढण्यात याव्यात. असा ठराव झाला होता. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करत आहे. हे अतिक्रमण काढतांना एखादा गैरप्रकार झाला असेल तर, तशी सन्माननीय सदस्यांनी तक्रार करावी. त्याबाबतीत दोषी कर्मचाऱ्यांवर चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांची नांवे सांगून गैरव्यवहार होत असेल तर, यापुढे दखल घेण्यात येईल व मनपाच्या जागेवर कुणी अतिक्रमण करत असेल व तशी माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली, ते आम्हाला मदत करतात. त्यांची नांवे अशा प्रकरणामध्ये दाखविली जाणार नाही व यापुढे सर्व कर्मचाऱ्यांना सुध्दा तशी ताकीद देण्यात येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** काही भागात अनाधिकृत बांधकामे चालू आहेत. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार व कधी करणार?

**उपआयुक्त (म) :** जो भाग सन्माननीय सदस्य सांगतात त्या भागात प्रत्यक्ष जाऊन चौकशी करुन कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : उप आयुक्त यांनी अशा भागात प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. सलीम पटेल :** सृष्टीविहार सोसायटीमध्ये तिसरा मजला विना परवानगीने बांधकाम झालेले आहे. तेथे म. न. पा. अधिकारी राहतात.

**मा. सभापती** : शहरातील काही भाग असा आहे की, त्या ठिकाणी बांधकामास परवानगी मिळत नाही. उदा. भानुदासनगर, उत्तमनगर, शिवशंकर कॉलनी, बौध्दनगर व बागशेरजंगचा भाग इ. अनाधिकृत बांधकामे कुणी रस्त्यावर बांधकामे करत असेल ती नियमाने तात्काळ तोडावे असे आदेश आपण दिलेले आहेत. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** अनाधिकृत बांधकामासंबंधी लोकांकडून पैसा जमा करतात त्याबाबतीत मी आपणांस पुरावा देऊ शकतो. त्यामुळे विना परवानगीने

अतिक्रमण तसेच बांधकामे होत आहे. यासाठी एक चौकशी समिती नेमावी. आम्ही प्रतिज्ञापत्र द्यायला लावतो.

**मा. सभापती** : पैसे घेवुन अनाधिकृत बांधकामे होऊन देत आहे. ही बाब सत्य असेल तर स. सदस्यांनी निर्दशनास आणुन दयावे. त्या कर्मचाऱ्यांवर तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच वैयक्तिकरित्या कुण्या कर्मचाऱ्यांनी पैसे घेतल्याची तक्रार कुणी आणुन दिली तर संबंधित कर्मचाऱ्यांवर कार्यवाही होईल. याच संदर्भाने माझ्याकडे एक पत्र आलेले आहे. (ते पत्र वाचुन दाखवितात) यात असे नमुद केलेले आहे की, ०४-०७-२००० रोजी उस्मानपुरा भागात गुरुद्वारासमोर विना परवानगीने बसलेल्या टपऱ्या संबंधित अधिकाऱ्याने उठवलेल्या नाही या टपरी धारकाकडून प्रत्येकी एक हजार रुपये घेवुन तेथील टपऱ्या तशाच ठेवल्या व ज्यांनी एक एक हजार रुपये दिले नाही. त्यांच्या टपऱ्या काढण्यात आलेल्या आहे. संबंधित अर्जदाराने मनपा अधिकारी श्री. गायकवाड हप्ते जमा करतात. अशी तक्रार दिली व या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करावी. अशी मागणी केलेली आहे. हा आरोप त्यांनी श्री. गायकवाड प्रशासकीय अधिकारी यांच्यावर केलेला आहे. याबाबती त्यांनी खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी** : या ठिकाणच्या अनाधिकृत टपऱ्या काढण्यात आलेल्या असून मालमत्ता विभागाची अगोदर परवानगी घेतो. नंतर पुढील कार्यवाही होते.

**मा. सभापती** : या भागातील अतिक्रमणासंदर्भात सर्व माहिती घेण्यासाठी एक चौकशी समिती नेमण्यात येते व यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. चौकशी समितीत खालील स. सदस्यांची नियुक्ती करण्यात येते.

१) स. स. श्री. दलबीरसिंग जबिंदा
२) स. स. श्री. सलीम पटेल
३) स. स. श्री. गणेश तांबे
४) स. स. श्री. जगदीश सिंध्द

**श्री. नारायण सुरगोणीवार** : आविष्कार कॉलनीतील म्हाडाची जागा मनपाच्या मालकीची असून, त्या ठिकाणी बरेच लोक अतिक्रमण करीत आहे. अतिक्रमण होणार नाही. यासाठी मनपाने या जागेस तारकुंपण करावे व जे अतिक्रमण झालेले आहे. ते तात्काळ काढण्यात यावे.

**मा. सभापती** : मनपाची जागा असेल व अतिक्रमणे झालेले असेल तर, तात्काळ काढण्यात यावे. व संरक्षण म्हणुन भारकुंपनाची कार्यवाही करावी. व अतिक्रमण काढल्याबाबतचा पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी मला आढावा दयावा.

**सौ. विजया रहाटकर** : मनपाच्या बऱ्याच प्रभागामध्ये खुल्या आरक्षित जागा आहेत. याची किंमत कोटयावधी रुपयापर्यंत असु शकते. या आरक्षित जागेवर बऱ्याच व्यावसायिकांनी अतिक्रमण केलेली दिसुन येईल. उदा. दयावयाचे झाल्यास माझ्या वार्डातील जुनी एस. बी. एच. कॉलनीमध्ये मनपाच्या एका खुल्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. व ते लोक एकत्र आले व त्या ठिकाणी शेती करुन उत्पन्न काढण्याचा प्रयत्न होत आहे.

व यासंबंधी सर्व माहिती महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी यांना माहीत असतांना सुध्दा का कार्यवाही करत नाही.

**मा. सभापती** : शहरातील महानगरपालिकेच्या खुल्या असलेल्या जागेवर ज्या ठिकाणी अतिक्रमण झालेली आहेत. अशी अतिक्रमण येत्या ८ दिवसांत म्हणजे पुढील स्थायी समितीच्या बैठकीपर्यंत अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी व येत्या बैठकीत किती खुल्या जागांवरील अतिक्रमणे प्रशासनाच्या माध्यमाने काढण्यात आली याची माहिती दयावी.

**मा.उपआयुक्त (म) :** महानगरपालिकेच्या खुल्या जागा संदर्भात मा. आयुक्तांनी गेल्या १५ दिवसांपूर्वी झोन अधिकारी व झोन आयुक्त यांनी बैठक घेतले असून, मालमत्ता विभागाकडून प्रत्येक झोन अंतर्गत किती खुल्या जागा मनपाच्या मालकीच्या आहेत. याची यादी तयार करण्याचे काम चालु असून या यादया झोन अधिकारी व विभाग आयुक्त यांचेकडे तपासणीसाठी देणार आहोत. जागेचे पी. आर. कार्ड तयार करण्यात आले असेल तर, ते कसे करण्यात आले याचीही चौकशी करण्यात येईल. ज्या मनपाच्या जागा आहेत. त्या संरक्षित करण्याचा प्रयत्न प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

**श्री. भरत लकडे :** माझ्या वार्डामध्ये ४ महीन्यापासून लाईट नाही. उप अभियंता (विद्युत) यांना विचारणा केली असता विदयुत साहीत्य नाही. सांगण्यात आले व माझ्यानंतर २० ते २५ मिनीटांनी संबंधित अधिकाऱ्यांनी दुसरे स. सदस्य विदयुत साहित्यासाठी मागणी करावयास गेले असता त्यांना साहीत्य देण्यात आले.

**उपअभियंता (वि.) :** २ दिवसापुर्वी बल्ब आलेले आहे. स. सदस्यांनी मागणी केली त्यावेळी नव्हते. दुपारीच साहीत्य आले.

**मा. सभापती** : कोणत्याही पक्षाचे नगरसेवक विदयुत साहीत्याची मागणी केल्यास असेल तर ताडीने पुरवठा करावा. दुजाभाव करण्यात येवु नये यापुढे अशी तक्रार येणार नाही याची संबंधित अधिकारी यांनी दखल घ्यावी.

**श्री. तुळशीबागवाले :** एखाद्या कामास मंजुरी मिळाल्यानंतर स्वत: नगरसेवकांना संबंधित विभागास कार्यवाही होण्याबाबत सुचना कराव्या लागतात व संचिका घेऊन इस्टिमेंट तयार करण्यास १०-१० दिवस लागतात. कर्मचारी हे नाममात्र कामे करतात. असे दिसुन येते. जर कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल तर मागील काही दिवसापुर्वी १२ जे. ई. यांची भरती केली होती. त्यांना प्रशासनाने कामावरुन कमी केले. त्यांना कामावर घेण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती** : यासंबंधी प्रशासनाकडून सविस्तर माहिती घेऊन पुढील बैठकीत आपणास योग्य खुलासा देण्यात येईल.

**श्री. अशरफ मोतीवाला :** संजयनगर स्मशान मारोती रोड लगत एका भाजी मार्केटचे बांधकाम चालु होते. ६ महिन्यापुर्वी ते बांधकाम बंद पडलेले आहे. याबाबत खुलासा करावा.

**शहर अभियंता** : ६ महिन्यापुर्वी पासुन नसुन २ ते २ महिन्यापासुन काम बंद आहे. झालेले काम हे जुन्या डिझाईन नुसार चालू होते. यापुढील कामासाठी नविन डिझाईन मागविलेली असून त्यानुसार उर्वरीत बांधकामे करावे लागेल.

**मा. सभापती** : नविन डिझाईन मागवुन लवकरात लवकर काम चालु करावे.

**श्री. भरत लकडे :** काचीवाडा येथील धोबीघाट तसेच तेथे होणारा पाणी पुरवठा कर एकत्र लावण्यात येतो काय? तेथे एकच रुम आहे. त्याचे भाडे भरायला ते लोक तयार आहेत.

**मालमत्ता अधिकारी :** पाण्याचे बिल वेगळे आकारण्यात येते. फक्त सिध्दार्थ उद्यान येथील असलेला पाण्याचा हौद व एक खोली व तेथील पाणीपट्टी एकत्र आकारण्यात येते.

**श्री. दलबिरसिंग जबिंदा :** पीरबाजार चिकलठाणा, शहागंज येथील आठवडी बाजाराची जाहीर लिलावाने बोली बोजण्यात येते. किती वसुली होते. संबंधित ठेकेदाराकडुन मनपाने किती वसुली केलेली आहे. थकबाकीदार कोण? पुढील सभेत माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : मालमत्ता अधिकारी यांनी माहिती दयावी.

**मालमत्ता अधिकारी :** संबंधित गुत्तेदाराकडे १ लाख रुपये बाकी होते. त्यांना चेक दिला होता परंतु सदर चेक बँकेत वटवु शकला नाही. त्यामुळे संबंधितांना नोटीस दिलेली आहे व त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : संबंधिताकडे रक्कम बाकी होती. त्यांनी बोगस चेक दिला असेल तर, नियमाने त्यांच्यावर पोलीस गुन्हा दाखल करावयास पाहिजे. अशी जेवढीही प्रकरणे असेल, त्या संबंधित ठेकेदारावर कार्यवाही करण्यात यावी. व त्यांचे ॲग्रीमेंट रद्द करण्यात येवुन दुसऱ्या ठेकेदारास ते काम देण्याची कार्यवाही व्हावी. यास उशीर होऊ देवु नये. व अशा ठेकेदारास काळया यादीत त्यांचे नाव समावेश करण्यात यावे.

**अशरफ मोतीवाला :** मनपाच्या आवक-जावक विभागात काही कामानिमित्त पत्र दिल्या संबंधित विभागापर्यंत पोहचण्यास ८ ते १० दिवसाचा कालावधी का लागतो. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : पत्र दिल्याची पोच पावती आपण यापुढे घ्यावी व त्यानुसार सभागृहात तशी सुचना करावी.

**श्री. मधुकर सावंत :** १५ दिवसापुर्वी रमानगर येथे बालवाडी चालू करण्यासंदर्भात पत्र दिलेले होते. अदयापपर्यंत खुलासा मिळालेला नाही.

**शिक्षणाधिकारी :** स. सदस्य यांचे पत्र मी संचिका करुन सादर केलेले होते. त्यावर मा. आयुक्तांनी शासनाचे जे डायरेक्शन आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी असे सुचविले आहे.

**श्री. मधुकर सावंत :** आतापर्यंत या भागात मनपाची एकही शाळा नाही.

**शिक्षणाधिकारी :** बालवाडी संदर्भात प्रस्ताव पाठविला आहे व नविन बालवाडया सुरु करण्यासाठी शासनाची मंजुरी घ्यावी. असा अभिप्राय आहे. त्यामुळे शासनाची परवानगी घेतल्यानंतर कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती** : शासनाकडे तसे कळविण्यात यावे व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

**श्री. मोतीराम जगताप :** माझ्या वार्डामध्ये दोन मनपाच्या शाळा असून, एका शाळेला ५ फुटाची व दुसऱ्या शाळेला १ १/२ फुटाची उंच संरक्षित भिंत आहे. ज्या शाळेची १ फुटाची संरक्षित भिंत आहे. ती ५ फुट उंच करण्याची कार्यवाही व्हाी. जेणेकरुन त्या भिंतीवरुन बाहेरील लोकांना मध्ये सहजरित्या जाता येणार नाही व कचरा व इतर घाण होणार नाही. तसेच त्या भिंतीवर लोकांना बसता येणार नाही.

**शहर अभियंता :** या कामाबाबत संबंधित विभागाला पत्र गेले आहे. लवकरच कार्यवाही होईल.

**श्री. मधुकर सावंत :** माझा वार्ड स्लम असून, मनपाची एकही शाळा कार्यान्वित नाही.

**श्री. सलीम पटेल :** मनपातील शालेय विदयार्थ्यांना स्वेच्छा निधीतुन पुस्तके देता येतील काय?

**मा. सभापती** : वार्डामध्ये शाळा नसेल परंतु आजुबाजूच्या प्रभागात संस्थेच्या शाळा आहेत. आपण संस्थेच्या शाळेला परवानगी देतो. याचा अर्थ आसपास भाग त्यात समावेश होतो. व तेथील मुले त्या शाळेत येऊ शकतात.

**सौ. विजया रहाटकर :** या अगोदरच्या बैठकीमध्ये चर्चा झाली पीरबाजार येथील जागा वादात आहे. पार्कींग साठी अडचण होते. रस्ता लहान आहे. पर्यायी जागा द्यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी मागील बैठकीत उपस्थित नव्हते. स. सदस्य यांची सुचना विचारात घेता नगररचना विभागाने कुठे जागा उपलब्ध होऊ शकते काय? असल्यास त्याची पाहणी करुन त्या संबंधिचा अहवाल येत्या १५ दिवसात सादर करावा. त्यानंतर पुढील कार्यवाही करता येईल.

**सौ. विजया रहाटकर :** विदयुत विभागातील कामे होण्याबाबत सुधारणा करण्यात याव्यात वार्डातील एखाद्या कामासाठी या विभागाशी संपर्क साधला असता लाईनमन येतात. अर्धवट कामे करतात. व काम झाले असे सांगतात व पुन्हा तोच प्रकार काही दिवसानंतर होतो. पुन्हा असे सांगण्यात येते की, हे काम आपल्या विभागांशी संबंधित नाही. एम. एस. ई. बी. चे आहे. यासाठी एम. एस. ई. बी. व मनपातील संबंधित विभागांचा समन्वय असला पाहिजे.

**मा. सभापती** : एम. एस. ई. बी. चे अधिकारी व मनपातील संबंधित अधिकारी यांची एक विशेष बैठक बोलाविण्यात येईल. त्यात विदयुत विभागासंबंधी चर्चा करता येईल.

**सौ. कुसुमाबाई खरात :** माझ्या वार्डामध्ये योग्य प्रकारे साफ सफाई होत नाही हा भाग स्लम आहे. तसेच गटार नालीतील घाण (माती व कचरा) काढला जात नाही. व साफ सफाई करुन जमा झालेला कचरा तसेच कचरा कुंडयामध्ये टाकलेला कचरा व गटारातील बाहेर काढलेल्या कचऱ्यांची घाण वेळोवेळी उचलेल्या जात नाही. व वार्डात बऱ्याच ठिकाणी लाईट नाही. साफसफाई करण्यास मजुर कमी आहेत. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी साफसफाईच्या संदर्भात योग्य ती काळजी घ्यावी. जेणेकरुन जनतेचे आरोग्य धोक्यात येणार नाही.

**विषय क्र. १५/१ :**

दिनांक २९-०६-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**शहर अभियंता :** दिनांक २९-०६-२००० रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र. ८/३ मध्ये दरसूची सन ९८-९९ नुसारचे अंदाजपत्र्यक र. रु. १,४५,६९५/- केलेले आहे. ते मंजूर करण्यात यावे, अशी दुरुस्ती व्हावी.

**मा. सभापती** : विषय क्रमांक १ दुरुस्तीसह मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक २९-०६-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील ठराव क्रमांक ८/३ मध्ये दरसुची सन ९८-९९ नुसार तयार केलेले र. रु. १,४५,६९५/- च्या अंदाजपत्रकास

मंजुरी देण्याच्या दुरुस्तीसह २९-०६-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे यांचे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बेगमपुरा (पहाडसिंगपुरा) येथे व्यायाम शाळा बांधणे करीता सा. बा. खात्याचे सन ९८-९९ चे जिल्हा दरसुची नुसार र. रु. ५,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. २३-१२-९९ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी आदेश क्र. नियोजन/खाविका/२९-२०००/प्रमा/८६/दिनांक ०४-०२-२००० चे सहपत्रान्वये प्रशासकीय मान्यता रु. ४.५२ ला दिलेली आहे. व उर्वरीत खर्च रु. ०.४८ लक्ष हा मनपा फंडातून होणार आहे. मंजुरीनुसार कार्यालयीन निविदा सूचना जा. क्र. मनपा/लेखा/नि/२/२००० दिनांक १०-०५-२००० अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण ११ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३१-०५-२००० रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | राणा कन्स्ट्रक्शन | ५% जास्त दराने |
| २. | विपुल कन्स्ट्रक्शन | ५% जास्त दराने |
| ३. | मुबारक पठाण | ०.१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ०.१% कमी दराने श्री. मुबारक पठाण यांची निविदा प्राप्त झालेली होती. तथापी दिनांक २९-०६-२००० रोजी मा. आयुक्त महोदय यांच्या दालनात झालेल्या दराबाबतच्या वाटाघाटी अन्वये मा. आयुक्त महोदर यांनी अं. प. दरापेक्षा ५% कमी दराने मान्यता दिलेली आहे. त्यास संबंधित गुत्तेदाराने लेखी संमती दिलेली आहे. त्यानुसार मुबारक पठाण यांची ०.१% कमी दराऐवजी ५% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** माझ्या वार्डामध्ये ४ वर्षापुर्वी आमदार निधीतून खाराकुआ व्यायामशाळा करण्यात आली. परंतु त्या ठिकाणी व्यायाम शाळेचे कोणतेही सामान नाही. सद्यस्थितीत तेथे जनावरे तसेच गुंड प्रवृत्तीच्या लोकांचे स्थानक झालेले आहे.

**शहर अभियंता :** शाळा झालेली आहे. परंतु ते चालविण्याच्या बाबतीत कोर्ट मॅटर झालेले होते. म्हणून पुढील कार्यवाही थांबलेली आहे.

**शिक्षणाधिकारी :** त्या ठिकाणी शाळा आहे. त्याच बिल्डींगमध्ये खालच्या मजल्यामध्ये मनपाचे वाचनालय आहे.

**मा.सभापती** : संबंधित अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन साहित्य देता येत असेल तर, तशी कार्यवाही करावी. आतापर्यंत बजेटमध्ये याची तरतुद केलेली नव्हती. यापुढील बजेटमध्ये व्यायाम शाळेच्या साहित्यासाठी तरतुद करावी. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे यांचे स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बेगमपुरा (पहाडसिंगपुरा) येथे व्यायाम शाळा बांधणेच्या कामा करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. मुबारक पठाण यांचेशी झालेल्या वाटाघाटीत त्यांनी संमती दिल्यानुसार सदरील काम श्री. मुबारक पठाण यांचेकडून अं. प. दरापेक्षा ०.१% कमी दराऐवजी ५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टाटा कंपनीच्या सर्व मॉडेल्सच्या वाहनांसाठी लागणाऱ्या स्पेअर पार्टसचा सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात पुरवठा करण्यासाठी वर्तमानपत्रात टेंडर नोटीस देऊन टाटा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून निविदा बोलाविल्या असता फक्त एकच निविदा विक्री झाली व प्राप्त झाली. मे. सतिश मोटार्स लि., औरंगाबाद हे टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते असून, त्यांचे दरपत्रक प्राप्त झाले आहे. प्राप्त दरपत्रकामध्ये खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| पुणे/ठाणेहून पुरवठा होणाऱ्या पार्टस करीता | | जमशेदपुरहुन पुरवठा होणाऱ्या पाटर्स करीता | |
|---|---|---|---|
| कंपनी प्राईजलिस्ट | | कंपनी प्राईजलिस्ट | |
| महाराष्ट्र सेल्स टॅक्स | १२% | महाराष्ट्र सेल्स टॅक्स | १२% |
| जकात | २.५% | सी. एस. टी. | ४% |
| बँकींग चार्जेस | २% | जकात | २.५% |
| फ्रेट | ३% | बँकींग चार्जेस | २% |
| | | फ्रेट | ४% |
| एकूण | १९.५% | एकूण | २४.५% |

तरी मे. सतीश मोर्टास लि. औरंगाबाद यांचेकडून वार्षिक करार करण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रस्तावात स्पेअर पार्टसचा पुरवठा होण्यासाठी किती खर्च येणार आहे ती रक्कम दर्शविलेली नाही. अंदाजित किती बजेट लागणार हे नमुद करावयास पाहिजे. मागील वर्षीही अर्थसंकल्पीय तरतुदीची रक्कम न दर्शविता प्रस्ताव या विभागातर्फे सभागृहात मांडण्यात आले होते.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** कोणाकडून हा साहित्य पुरवठा होणार सविस्तर माहिती द्यावी. वाहनासाठी साहित्य मागवितो व काही वाहनांची देखभाल दुरुस्ती बाहेरुन केली जाते याचे पर्चेसिंग कशा पध्दतीने करतात.

**उप. अभि (यां) :** गेल्यावर्षी यासाठी ८५ लाख बजेट होते. स्पेअर पार्टससाठी ४ ते ५.२५ लाख रुपयांपर्यंत खर्च करतो.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बऱ्याच वेळा अधिकारी यांच्या गाडया बाहेरील खाजगी गॅरेजकडून कामे केली जातात. बजेटमध्ये तरतुद करुन काय फायदा.

**उप अभि. (यां) :** तातडीचे असेल तर बाहेरुन गाडयांची दुरुस्ती करण्यात येते.

**मा. सभापती** : एखादी गाडी दुरुस्तीला असेल, किती सामान लागेल व काय सामान लागेल हे सांगणे कठीण आहे. जसे सामान लागेल त्यानुसार वापरता येत असेल. त्यामुळे निश्चित किती रक्कम लागेल हे नमुद केलेले दिसत नाही.

**उप अभि. (यां)** : जसे साहित्य लागेल त्यानुसार मागणी करतो त्यामुळे निश्चित रक्कम आता सांगणे शक्य नाही.

**श्री. भरत लकडे** : एवढे मोठया प्रमाणात साहित्य गाडयांसाठी मागविण्यात येते. यात सवलतीच्या दरात किंमत लावत नाही काय?

**उप अभि. (यां)** : सवलत (डिस्काऊंट) दिलेले नाही.

**मा. सभापती** : ८० लाखाचे बजेट ठेवल्यास कमीत कमी ५० लाख रुपये स्पेअर पार्टसवर खर्च करण्यात यावे. येणाऱ्या बजेटमध्ये फक्त ५० लाखांचीच तरतुद करावी.

**श्री. मोतीलाल जगताप** : गाडयांचे जुने पार्टस काय करतो याची माहिती द्यावी.

**उप अभि. (यां)** : सदर साहित्य २-३ वर्षापर्यंत जमा करतो व नंतर त्यांचे हर्राशी करण्यात येते. आतापर्यंत ४०-४० हजार रुपयापर्यंत रक्कम मिळालेली आहे.

**मा. सभापती** : जसे साहित्य वापरात येते. त्यानुसार पार्टस मागविण्यात येतात. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाटा कंपनीच्या सर्व मॉडेल्सच्या वाहनासाठी लागणाऱ्या स्पेअर पार्टसचा सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेल्या नविदानुसार टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांनी दिलेल्या पुणे/ठाणे हुन पुरवठा होणाऱ्या पार्टसकरीता कंपनी प्राईजलिस्ट सेल्स टॅकस, जकात बँकींज चार्जेस, फ्रेट असे एकूण १९.५% तसेच जमशेदपूरहून पुरवठा होणाऱ्या पार्टसकरीता प्राईज लिस्ट+सेल्स टॅक्स, सी. एस. टी, जकात, बँकींग चार्जेस, फ्रेट असे एकूण २४.५% या दराची निविदा स्विकारण्यास तसेच या कामाकरीता मे. सतिश मोटार्स लि., औरंगाबाद यांचेशी वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांना लागणाऱ्या पेट्रोल, ब्रेक ऑईल, ग्रीस, डिस्टील वॉटर, पिवळा कपरा इ. ॲटमसाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात करार करण्यासाठी वर्तमानपत्रातून जाहीरात देऊन निविदा मागविल्या असता एकच निविदा विक्री व एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त झालेली निविदा मे. कैलास एजन्सीज प्रा. लि., औरंगाबाद यांची असून त्यांनी भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तपशील | नग | दर |
|---|---|---|---|
| १. | पेट्रोल | प्रति लिटर | रुपये २८-११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | | | कॅस्ट्रॉल | बीसीसीएल |
| २. | ब्रेक ऑईल | १/४ लि. | ५०-०० | ५०-०० |
| | | १/२ लि. | ९६-०० | ९३-०० |
| ३. | व्हील बिअरींग ग्रीस | १/२ लि. | ४६-५० | ४६-०० |
| | | १ कि. | ८५-०० | ८३-०० |
| | | २ कि. | १८७-०० | १७४-०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | इंजिन ऑईल २० डब्ल्यू ४० | १ लि. | ८५-०० | ७८-०० |
| | | ५ लि. | ३८५-०० | ३६०-०० |
| ५. | चेसीस ग्रीस | १/२ कि. | ५०-५० | ४६-०० |
| | | १ कि. | ८७-०० | ८३-०० |
| ६. | एपी-३ ग्रीस | १/२ कि. | -- | ४६-५० |
| | | १ कि. | -- | ८५-०० |
| ७. | पिवळा कपडा | १ नग | ७-०० | -- |
| ८. | डिस्टील वॉटर | १ लि. | १०-०० | -- |

कंपनीच्या किंमतीत फरक झाल्यास त्याप्रमाणे दरामध्ये कमी जास्त होईल अशी त्यांची अट आहे. सध्या दि. १७-०१-२००० रोजी अस्तित्वात असलेले दर त्यांनी भरले आहे. तरी वरील प्रमाणे सन २०००-२००१ मध्ये ॲटम खरेदीसाठी मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद यांचेशी वार्षिक करार करण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** हा प्रस्ताव वरीलप्रमाणेच आहे. यात एकूण खर्चाची रक्कम दाखविलेली नाही. लॉगबुकनुसार गाडयांना महिन्याला व त्यानुसार वर्षाला किती पेट्रोल लागेल याचा अंदाज काढता येऊ शकतो. त्यानुसार किती खर्च येऊल हे दर्शवावयास पाहिजे होते.

**उप अभि. (यां) :** जास्तीत जास्त महिन्याला ३०० लिटर पर्यंत पेट्रोल खर्च करण्याची अट घातलेली आहे.

**सौ. विजया रहाटकर :** वार्षिक किती साठा लागेल याचा अंदाज काढून अंदाजपत्रक रक्कम देता येऊ शकते.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** प्रस्तावातील मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. यांनी करार पध्दती साहित्याचे रेटस वाढवून दिलेले आहे. (याच वेळी वैयक्तीक खाजगीरित्या खरेदी व प्रस्तावातील नमुद केलेल्या साहित्याच्या किंमतीचे कोटेशन असल्याची पावती सभागृहात दाखवतात.)

**मा. सभापती :** वेळोवेळी साहित्याची किंमत कमी झाल्यास खर्च कमी होऊ शकेल काय याची माहिती द्यावी.

**उप अभि. (यां) :** प्रस्तावातील साहित्याची किंमत कमी झाल्यास मे. कैलास एजन्सीज त्या त्या साहित्याची किंमत कमी करु शकेल.

**श्री. किशोर तुळशीबागवाले, श्री. दलबीरसिंग जबिंदा :** हा प्रस्ताव सविस्तर अंदाजपत्रकासह पुढील बैठकीत मंजुरीसाठी सादर करावा. आजच्या बैठकीत मंजूर न करता रिकॉल करण्यात यावा. अशा प्रस्तावासंबंधी पाच स्थानिक दैनिकातून जाहीरात देऊन निविदा मागवाव्या. तीन मराठी व दोन उर्दू पेपरला जाहीरात द्यावी.

**मा. सभापती :** सदर प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा. दोन-तीन स्थानिक पेपरला जाहीरात देऊन निविदा मागवाव्या.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध वाहनांना लागणाऱ्या पेट्रोल, ब्रेक ऑईल, ग्रीस, डिस्टील वॉटर, पिवळा कपडा इत्यादी ॲटमसाठी दोन-तीन स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन पुन्हा निविदा मागवाव्यात असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांच्या मायको कपंनीचे वॉशपंप, ॲटोमायझर आदीचे स्पेअर पार्टस रिपेअरींग करण्याच्या कामासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी वार्षिक करार करण्यासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना देऊन अधिकृत विक्रेते व सर्व्हिस डिलर्सकडून निविदा मागविली असता एक निविदा विक्री झाली व एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदामध्ये भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | स्पेअर पार्टससाठीचे दर | जॉबवर्कसाठीचे दर |
|---|---|---|---|
| १. | मे. नवजीवन ॲटो सर्व्हीस सेंटर, औरंगाबाद | एम. आर. पी. प्राईज लिस्टपेक्षा ६.५% ने कमी | प्राईज लिस्टपेक्षा १३% ने कमी |

तरी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात एक वर्षासाठी वॉशपंप, ॲटोमायझरचे स्पेअर पार्टसह रिपेअरींग करण्याच्या कामासाठी मे.नवजीवन ॲटो सर्व्हीस सेंटर, औरंगाबाद यांची निविदा मंजुर करुन वार्षिक करार करण्यासाठी मंजुरी मिळावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध वाहनांच्या मायक्रो कंपनीचे वॉशपंप, ॲटोमायझर आदींचे स्पेअर पार्टस् रिपेअरींग करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली मे. नवजीवन ॲटो सर्व्हीस सेंटर, औ. बाद.यांची स्पेअरपार्टसाठी एम. आर. पी. प्राईज लिस्टपेक्षा ६.५% ने कमी दराची तसेच जॉबवर्कसाठी प्राईजलिस्टपेक्षा १३% कमी दराची निविदा स्विकारण्यास त्याच प्रमाणे सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी मे. नवजीवन ॲटो सर्व्हीस सेंटर, औरंगाबाद यांचेशी करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांच्या ॲटो इलेक्ट्रीकल्सच्या कामासाठी लागणारे स्पेअर पार्टस् पुरवठा करण्यासाठी व जॉबवर्कच्या कामासाठी जा. क्र. मनपा/मुलेअ/५३/९९ दि. २४-१२-९९ प्रमाणे विविध वर्तमानपत्रात जाहीर निविदा सूचना देवून लुकास कंपनीचे अधिकृत विक्रेते व सर्व्हीस डिलरकडून निविदा मागविण्यात आल्या असता दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दरासह प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांमध्ये विविध एजन्सीजने भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | एजन्सीजचे नांव | ॲटो इलेक्ट्रीकल्ससाठीचे जॉबवर्कचे दर | लुकास/टिव्हीएस एसपीआर पार्टस्चे दर | लिसपार्टसाठीचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस, औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४०% ने कमी | एमआरपी प्राईज लिस्ट पेक्षा १५% ने कमी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी |
| २. | मे. युनायटेड इलेक्ट्रो डिझेल, औरंगाबाद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% ने कमी | एमआरपी प्राईज लिस्ट पेक्षा २३% ने कमी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५% कमी |

वरील प्रमाणे लुकास टिव्हीएस स्पेअर पार्टस् साठीचे दर मे. युनायटेड इलेक्ट्रो डिझेल, औरंगाबाद यांचे कमी म्हणजेच एम. आर. पी. प्राईजलिस्ट पेक्षा २३% कमी असे आहेत व इतर दोन आयटमसाठी मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस यांचे दर कमी आहेत. सर्व काम एकाच एजन्सीज कडून करुन घेणे सोयीस्कर असते. त्यासाठी मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस यांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता त्यांनी लुकास टिव्हीएसचे स्पेअरपार्ट आलेल्या कमी दरात म्हणजेच एम. आर. पी. प्राईजलिस्टपेक्षा २३% ने कमी मध्ये पुरवठा करण्यास तयारी दर्शविली आहे. त्यामुळे वरील दर्शविल्याप्रमाणे मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचे सर्व आयटमसाठीचे दर कमी आहेत. तरी त्यांच्याशी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात वार्षिक करार करण्यास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध वाहनांच्या ॲटो इलेक्ट्रीकल्सच्या कामासाठी लागणारे स्पेअर पार्टस् पुरवठा करण्याकरीता प्राप्त झालेल्या दोन निविदांपैकी लुकास/टीव्हीएस स्पेअर पार्टकरीता मे. युनायटेड इलेक्ट्रो डिझेल यांचे दर कमी असले तरी सर्व काम एकाच एजन्सीजकडून करुन घेणे सोयीस्कर असल्यामुळे मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिझेल सर्व्हीसेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ॲटो इलेक्ट्रीकल्ससाठी जॉबवर्कचे दर अं. प. दरापेक्षा ४०% ने कमी, लुकास/टीव्हीएस स्पेअर पार्टसचे दर एम. आर. पी. प्राईजलिस्ट पेक्षा २३% ने कमी व लिस पार्टसाठीचे दर अं. प. दरापेक्षा २०% ने कमी या दराची निविदा मान्य करण्यास तसेच या कामासाठी त्यांच्याशी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षा करार करण्यासाठी जा. क्र. मनपा/लेखा/नि/५३/९९ दिनांक २४-१२-९९ प्रमाणे विविध वर्तमानपत्रातून निविदा सूचना

देऊन निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विक्री झाल्या व चार निविदा दरासह प्राप्त झाल्या. प्राप्त निविदामध्ये विविध एजन्सीजने भरलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| १. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | ६ व्ही x १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ६१०-०० | १२ महिने |
| २. | १२ व्ही x १४ -//- | -//- | ९२०-०० | -//- |
| ३. | १२ व्ही x १४ प्लेट | -//- | ३१५०-०० | १८ महिने |
| ४. | १२ व्ही x १३ प्लेट | -//- | ४११०-०० | -//- |
| ५. | १२ व्ही x १५ प्लेट | -//- | ४७००-०० | १८ महिने |
| ६. | १२ व्ही x १७ प्लेट | -//- | ५१००-०० | -//- |
| ७. | १२ व्ही x १९ प्लेट | -//- | ५६५०-०० | -//- |
| ८. | १२ व्ही x २१ प्लेट | -//- | ६८५०-०० | -//- |
| ९. | १२ व्ही x २५ प्लेट | -//- | ७५००-०० | -//- |

२. मे. पंकज ट्रेडर्स, औरंगाबाद (ॲमको, प्रिस्टोलिट बॅटरी)

| १. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | ६ व्ही x १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ७२४-०० | कंपनीच्या नियमाप्रमाणे वॉरंटी देण्यात येईल. |
| २. | १२ व्ही x १४ ॲम्पीअर | -//- | -- | -//- |
| ३. | १२ व्ही x ११ प्लेट | -//- | ४३०१-०० ॲमको | -//- |
| | | | ४६५५-०० प्रिस्टोलिट | |
| ४. | १२ व्ही x १३ प्लेट | -//- | ४८६२-०० ॲमको | -//- |
| | | | ५४०५-०० प्रिस्टोलिट | -//- |
| ५. | १२ व्ही x १५ प्लेट | -//- | ५४३९-०० ॲमको | -//- |
| | | | ६४१०-०० प्रिस्टोलिट | |
| ६. | १२ व्ही x १७ प्लेट | -//- | ७०९०-०० ॲमको | -//- |
| | | | ७१४०-०० प्रिस्टोलिट | -//- |
| ७. | १२ व्ही x १९ प्लेट | -//- | ७५२५-०० ॲमको | -//- |
| | | | ८०९४-०० प्रिस्टोलिट | -//- |
| ८. | १२ व्ही x २१ प्लेट | -//- | ७९२५-०० ॲमको | -//- |
| | | | ८३९०-०० प्रिस्टोलिट | -//- |
| ९. | १२ व्ही x २५ प्लेट | -//- | ८२५५-०० प्रिस्टोलिट | -//- |

३. मार्लबोरा शॉप, औरंगाबाद (इक्साईड बॅटरी) :

| १. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | ६ व्ही x १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ६८०-०० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | १२ व्ही x १४ ॲम्पीअर | -//- | १६८२-०० | |
| ३. | १२ व्ही x ११ प्लेट | -//- | ४३१३-०० | |
| ४. | १२ व्ही x १३ प्लेट | -//- | ४९२५-०० | |
| ५. | १२ व्ही x १५ प्लेट | -//- | ५४९५-०० | |
| ६. | १२ व्ही x १७ प्लेट | -//- | ६५२४-०० | |
| ७. | १२ व्ही x १९ प्लेट | -//- | ७२१३-०० | |
| ८. | १२ व्ही x २१ प्लेट | -//- | ८०६७-०० | |
| ९. | १२ व्ही x २५ प्लेट | -//- | ५४०८-०० | |

४. जे. जे. एजन्सीज, औरंगाबाद (एस. एफ इक्साईड बॅटरी) :

| १. | बॅटरीचा प्रकार | नग | दर | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | ६ व्ही x १४ ॲम्पीअर | प्रतिनग | ९४५-०० | १२ महिने |
| २. | १२ व्ही x १४ ॲम्पीअर | -//- | ९८५-०० | -//- |
| ३. | १२ व्ही x ११ ॲम्पीअर | -//- | २२८०-०० | -//- |
| ४. | १२ व्ही x १३ प्लेट | -//- | ३७३५-०० एस. एफ | -//- |
| | | | २९७५-०० ट्रॅक्टर | |
| ५. | १२ व्ही x १५ प्लेट | -//- | ४०९५-०० एस. एफ. ईक्साईड | |
| | | | ३२५५-०० ट्रॅक्टर | |
| ६. | १२ व्ही x १७ प्लेट | -//- | ३७०५-०० ब्लॅक बॅटरी | |
| ७. | १२ व्ही x १९ प्लेट | -//- | ४०१०-०० इक्साईड ब्लॅक बॅटरी | |
| ८. | १२ व्ही x २१ प्लेट | -//- | ५९१५-०० ब्लॅक बॅटरी | |
| ९. | १२ व्ही x २५ प्लेट | -//- | ६६८०-०० ब्लॅक बॅटरी | |

वरील चार निविदापैकी खालील दोन निविदाधारकांचे दर कमी असून, ते खालील प्रमाणे आहेत.

१. मे. व्हेस्पा ॲक्युम्युलेटर्स ॲक्सेसरीज ॲन्ड केमिकल्स, औरंगाबाद.

| १. | बॅटरीचा प्रकार | मेक | किंमत | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| १. | ६ व्ही x १४ ॲम्पीअर | सुरज | ६१०-०० | १२ महिने |
| २. | १२ व्ही x १४ ॲम्पीअर | सुरज | ९२०-०० | १२ महिने |

२. मे. जे. जे. एजन्सीज, औरंगाबाद

| १. | बॅटरीचा प्रकार | मेक | किंमत | वॉरंटी |
|---|---|---|---|---|
| १. | १२ व्ही x ११ प्लेट | एक्साईड | २२८०-०० | १२ महिने |
| २. | १२ व्ही x १३ प्लेट | एक्साईड | ३७७५-०० | -//- |
| | | टॅक्टर | २९७५-०० | -//- |
| ३. | १२ व्ही x १५ प्लेट | एक्साईड | ४०९५-०० | -//- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ट्रक्टर | ३२५५-०० | |
| ४. | १२ व्ही x १७ प्लेट | एस. एफ-१२० एक्साईड ब्लॅक | ३७०५-०० | -//- |
| ५. | १२ व्ही x १९ प्लेट | एक्साईड एस. एफ ब्लॅक | ४०१०-०० | -//- |
| ६. | १२ व्ही x २१ प्लेट | -//- | ५९१५-०० | -//- |
| ७. | १२ व्ही x २५ प्लेट | -//- | ६६८०-०० | -//- |

वरील प्रमाणे एस. एफ एक्साईड व सुरज या दोन कंपन्यांच्या बॅटरीचे दर कमी आहेत. त्यासाठी त्यांनी १२ महिन्यांची वॉरंटी दिली आहे. गतवर्षी पण सुरज व एस. एफ. एक्साईड बॅटरीचे दर मंजूर झालेले होते. करीता एस. एफ. व सुरज कंपनीच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी व सन २०००-२००१ या वर्षात एका वर्षासाठी वार्षिक करार करण्यासाठी स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान :** जुन्या बॅटरीचे काय करतो. विक्री केल्या जातात काय. आय. एस. आय. दर्जाचे आहेत काय?

**उप अभि. (यां) :** जुन्या पावरस् संपलेल्या बॅटरीज आपण परत करुन त्याची ठरलेली किंमत नविन बॅटरीच्या किंमतीतून वजा करुन नविन बॅटरी मागवितो.

**मा. सभापती** : याच कंपनीच्या बॅटरी वापराव्या असे काही आहे काय

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बॅटरीचे रेटस् जास्त आहेत. (याच वेळी खाजगी गाडयांसाठी बॅटरी खरेदी केलेल्याची पावती सभागृहात दाखवितात.)

**मा. सभापती** : सन्माननीय सदस्य यांनी दिलेल्या पावतीवरील बॅटरीचे रेटस् व प्रस्तावातील त्याच कंपनीच्या बॅटरीचे रेटस् जवळपास सर्वच बॅटरीमध्ये रेटस् वाढवून आहेत. यामुळे मनपाचे नुकसान होते.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** प्रस्ताव रद्द करुन सविस्तर प्रस्ताव सादर करावा. जुन्या बॅटरी जुन्या बॅटरीची किंमत वजा होऊन नविन बॅटरीसाठी किती अंदाजित रक्कम लागेल. त्यानुसार अंदाजपत्रकासहीज प्रस्ताव सादर करावा.

**मा. सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या सुचनेनुसार प्रस्ताव रिकॉल करण्यात येतो. रिकाम्या झालेल्या बॅटरीज देऊन नविन बॅटरीसाठी टेंडर मागवावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध वाहनांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या बॅटरीज खरेदी करण्यासाठी सभागृहात चर्चा झाल्यानुसार या कामाकरीता जुन्या बॅटरीज देऊन नविन बॅटरीजसाठी पुन्हा निविदा मागविण्यात याव्यात, असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या वाहनांच्या विविध आकाराचे टायर्स हॉट व कोल्ड या दोन्ही पध्दतीने रिट्रेडींग करुन घेण्याच्या कामासाठी व सन २००-२००१ या आर्थिक वर्षात करार करण्यासाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना देवुन निविदा मागविण्यात

आल्या असता पाच निविदा विक्री झाल्या व पाच निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदामध्ये विविध एजन्सीजचे भरलेले दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे.

तुलनात्मक तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे खालील ॲटमचे दर त्या त्या एजन्सीजचे कमी आहेत.

१. मे. ए. टू झेड टायर वर्क्स, औरंगाबाद.

| ॲटम क्र. | टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर | हॉट रिमोल्डींग चे दर | कट रिपेअर | | | | बेल्टचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १" | २" | ३" | ४" | |
| ४. | १७५७० एसआर-१३ | ५३०/- | -- | ७५ | १५५ | २२५ | ३१० | टीसन |
| ८. | एफ-७८ X १५ | -- | ७४०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| १४. | ७.०० X १५ | ८००/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |

२. मे. भगवानदास इंडस्ट्रीज, औरंगाबाद

| ॲटम क्र. | टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर | हॉट रिमोल्डींग चे दर | कट रिपेअर | | | | बेल्टचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १" | २" | ३" | ४" | |
| १. | ५.९० X १५ | -- | ३७५/- | १०० | २०० | ३०० | ४०० | एस आर एफ |
| २. | ५.६० X १३१५५० एसआर-१३ | -- | ३७५/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ३. | ५६५ X १२ | ४००/- | ३७०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ६. | ४५० X १२ | ४००/- | ३७०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ७. | १९५ एसआर-१३ | ५७०/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| १०. | ९०० X २० | १३५०/- | १२२५/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ११. | १००० X | १४७५/- | १३२५/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २० | | | | | | | |
| १३. | १२४ x २८ | -- | २५४०/- | १५० | २५० | ३५० | ४५० | -//- |
| १४. | ७०० x १५ | ८००/- | ६४५/- | १०० | २०० | ३०० | ४०० | -//- |

३. मे. टिपटॉप टायर सेंटर, औरंगाबाद :

| ॲटम क्र. | टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर | हॉट रिमोल्डींग चे दर | कट रिपेअर | | | | बेल्टचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १" | २" | ३" | ४" | |
| १. | ५.९० x १५ | ४०० | -- | ११० | १८० | २९० | ३९० | |
| २. | ५.६० x १३१५५० | ४००/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | |
| ५. | ४.५० x १२ | ४००/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | |
| ६. | ६.०० x १६ | ६००/- | ५५०/- | -//- | -//- | -//- | -//- | |
| ९. | ७.५० x १६ | ८००/- | ७५०/- | -//- | -//- | -//- | -//- | |
| १२. | ६.०० x १६ (टीएफ) | ६००/- | ५५०/- | -//- | -//- | -//- | -//- | |
| १४. | ७.०० x १५ | ८०० | -- | | | | | |

८. मे. मारुती टायर्स, औरंगाबाद

| ॲटम क्र. | टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर | हॉट रिमोल्डींग चे दर | कट रिपेअर | | | | बेल्टचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १" | २" | ३" | ४" | |
| ८. | एफ-७८ x १५ | ७२५/- | -- | ९० | १५० | २५० | ३५० | एलजी |

वरील एजन्सीज बरोबर वार्षिक करार करणे शक्य नाही. त्यामुळे जास्तीचे ॲटमसाठी दर कमी असलेल्या एजन्सीज १. मे. भगवानदास इंडस्ट्रीज, २. मे. टिपटॉप टायर सेंटर, औरंगाबाद ह्या दोघांना वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले आहे व कमी आलेल्या दरात ते टायर रिमोल्डींग काम करण्यास तयार आहेत. काय म्हणून विचारणा

केली असता दोन्ही एजन्सीजनी लेखी पत्र देऊन कमी आलेल्या दरात त्यांचे बाकीच्या ॲटमचे दर कमी करुन देण्याचे लेखी पत्र दिले आहे.

आता खालील दर्शविलेल्या तक्त्यात त्या त्या एजन्सीजचे दर कमी दराचे होतात.

(१) मे. भगवानदास इंडस्ट्रीज, औरंगाबाद :

| ॲटम क्र. | टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर | हॉट रिमोल्डींग चे दर | कट रिपेअर | | | | बेल्ट कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १" | २" | ३" | ४" | |
| १. | ५.९० x १५ | -- | ३७५/- | ७५ | १५५ | २२५ | ३१० | एसआर एफ व मिडास |
| २. | ५.६० x १३१५५० | -- | ३७५/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ३. | ५.६५ x १२ | ४००/- | ३७०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ४. | १७५७०-एसआर-१३ | ५३०/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ५. | ४५० x १२ | ४००/- | ३७०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ७. | १९५ एसआर-१३ | ५७०/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | |
| ८. | एफ-७८ x १५ | ७२५/- | ७४०/- | -//- | -//- | -//- | -//- | |
| १०. | ९०० x २० | १३५०/- | १२२५/- | -//- | -//- | -//- | -//- | |
| ११. | १००० x २० | १४७५/- | १३२५/- | -//- | -//- | -//- | -//- | |
| १३. | १२ x ४ x २८ | -- | २५४० | -//- | -//- | -//- | -//- | |
| १४. | ७०० x १५ | ८००/- | ६४५/- | -//- | -//- | -//- | -//- | |

२. मे. टिपटॉप टायर सेंटर, औरंगाबाद :

| ॲटम क्र. | टायर साईज | कोल्ड रिमोल्डींगचे दर | हॉट रिमोल्डींग चे दर | कट रिपेअर | | | | बेल्ट कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १" | २" | ३" | ४" | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५.९० X १५ | ४००/- | -- | ७५ | १५५ | २२५ | ३१० | मिडास |
| २. | ५.६० X १३१५५० एसआर-१३ | ४००/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ४. | १७५७० एसआर-१३ | ५३०/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ५. | ४५० X १२ | ४००/- | -- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ६. | ६०० X १६ | ६००/- | ५५०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ८. | एफ-७८ X १५ | ७२५/- | ७४०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| ९. | ७.५० X १६ | ८००/- | ७५०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| १२. | ६.०० X १६ टीआरएफ | ६००/- | ५५०/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |
| १४. | ७.५० X १५ | ८००/- | ६४५/- | -//- | -//- | -//- | -//- | -//- |

दोन्ही एजन्सीजकडून वाटाघाटीनंतर आलेल्या कमी दरास मंजुरी मिळावी. त्याप्रमाणे वार्षिक करार करुन घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या वाहनांच्या विविध आकाराचे टायर्स हॉट व कोल्ड या दोन्ही पध्दतीने रिट्रेडींग करुन घेण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी वरील दर्शविलेल्या अ. क्र. १ मे. भगवानदास इंडस्ट्रीज यांचे ॲटम क्रमांक १, २, ३, ४, ५, ७, ८, १०, ११, १२ आणि १४ साठीचे त्या त्या ॲटम समोरील वाटाघाटीनंतर कमी केलेल्या दरास त्याच प्रमाणे अ. क्र. २ मे. टिपटॉप टायर सेंटर, औरंगाबाद यांचे ॲटम क्रमांक १, २, ३, ४, ५, ७, ८, ९, १२ आणि १४ साठीचे त्या त्या ॲटम समोरील वाटाघाटीनंतर कमी केलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वरील दोन्ही एजन्सीजबरोबर वार्षिक करार करण्यास मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळी सभागृहातील चर्चा

**संवाद :**

**श्री. गणेश तांबे :** प्रशासकीय अधिकारी पद भरण्याबाबत खुलासा करावा. या पदावर टेक्नीकल असलेले अधिकारी नको आहे असे शासनाचे आदेश आहेत. सध्या या पदावर टेक्नीकल अधिकारी आहेत. या पदावर अतांत्रिक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत ठरावही पारीत झालेला असून, सुध्दा प्रशासनाने आतापर्यंत का कार्यवाही केली नाही.

**उपआयुक्त (महसुल) :** प्रशासकीय अधिकारी पद भरण्याबाबत १५ दिवसांच्या आंत कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** आजच्या सभेतील जे निर्णय घेण्यात आलेले आहेत यासंबंधी उप आयुक्त (महसुल) यांनी कार्यवाही करावी.

याच बरोबर " जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ११.०७.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक ११ जुलै, २००० रोजी सकाळी ११.०० वाजता मा.सभापती श्री.अविनाश कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर" स्थायी समिती सभागृहात विशेष अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकाऱ्यांसह खालील स.सदस्य उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.तांबे गणेश रामचंद्र | - | स.सदस्य |
| २. | श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ | - | स.सदस्य |
| ३. | सौ.विजया किशोर रहाटकर | - | स.सदस्य |
| ४. | श्री.सावंत मधुकर दामोधर | - | स.सदस्य |
| ५. | श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग | - | स.सदस्य |
| ६. | सौ.खरात कुसूमबाई दौलत | - | स.सदस्य |
| ७. | श्री.सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | - | स.सदस्य |
| ८. | श्री.अशरफ मोतीवाला | - | स.सदस्य |
| ९. | श्री.लकडे भरत श्रीपती | - | स.सदस्य |
| १०. | श्री.सलीम पटेल समेशर पटेल | - | स.सदस्य |
| ११. | श्री.कैसर खान बद्रोद्दीनखान | - | स.सदस्य |
| १२. | श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | - | स.सदस्य |
| १३. | श्री.जगदिश कन्हैयालाल सिध्द | - | स.सदस्य |
| १४. | श्री.कावडे साहेबराव राणुबा | - | स.सदस्य |
| १५. | श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव | - | स.सदस्य |

**विषय क्र.२३/१ :**

सन १९९९-२००० चे सुधारित व ३१ जुलै, २००० पर्यंतचे लेखा अनुदान आणि सन २०००-२००१ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :-**

**मुख्य लेखाधिकारी :** आजची सभा ही स्थायी समिती विशेष सभा असून ३१ जुलै, पर्यंतच्या लेखा अनुदान व सन २०००-२००१ या वर्षीच्या अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी ही सभा आयोजित केलेली आहे. या विशेष सभेच्या निमित्ताने मा.सभापती तसेच स.सदस्य यांचे स्वागत करतो. (याचवेळी मा.आयुक्त, मा.सभापती यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात.) तसेच उप.आयुक्त (म.) श्री.दिलीप शिंदे यांनी सर्व स.सदस्या यांचे स्वागत केले. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार मा.आयुक्त यांनी हा अर्थसंकल्प तयार केलेला असून वेळावेळी विभाग प्रमुखांच्या बैठका घेवून अतिशय परिक्षमपूर्वक हा अर्थसंकल्प तयार केला यासाठी सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान लाभले अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी मा.आयुक्तांनी हा अर्थसंकल्प मा.सभापती यांचेकडे अर्थसंकल्प सादर करावे अशी विनंती करण्यांत येते. (मा.आयुक्त हे मा.सभापती यांचेकडे अर्थ

संकल्प सादर करतात. व सभागृहातील सर्व स.सदस्य यांना ही अर्थसंकल्पाचे पुस्तक वितरीत करण्यांत येते) मा.आयुक्त यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी अर्थसंकल्पाबाबत सभागृहास माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :** सन २०००-२००१ या सालचा अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर करता असतांना मला मनस्वी आनंद होत आहे. सर्वप्रथम महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांचे तसेच स्थायी समिती सभासदांचे मी प्रशासनातर्फे स्वागत करतो. सदरचा अर्थसंकल्प हा महानगरपालिकेच्या इतिहासातील १८ वा अर्थसंकल्प आहे. ८ डिसेंबर, १९८२ रोजी स्थापन झालेल्या औरंगाबाद महानगरपालिकेचा कारभार लोक प्रतिनिधींच्या अधिपत्याखाली यशस्वीपणे चालू आहे. १७ वर्षापुर्वी महानगरपालिका स्थापन झाली तेव्हा एकूण रु.८ कोटीचा अर्थसंकल्प होता. तद्नंतर शहराचा झालेला उल्लेखनिय विकास, शहराच्या लोक संख्येत झालेली वाढ, शहराची झालेली भरभराट सर्वांच्या नजरेसमोर आहे. १७ वर्षापुर्वीचा अर्थसंकल्प व या वर्षीचा अर्थसंकल्प यामध्ये मोठ्या प्रमाणावर फरक आहे हे आपणांस दिसून येईल.

गत साली म्हणजे १९९९-२००० साली रु.१०६.८७ कोटीचे मुळ अंदाजपत्रक सादर करण्यांत आले होते. मागील ९ महिन्यांचे उत्पन्न व खर्च लक्षात घेता. १९९९-२००० सालासाठी रु.८८.३३ कोटी जमा खर्चाचे अंदाजपत्रक सादर करण्यांत आले आहे. मुळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक यामध्ये प्रामुख्याने जी तूट दिसून येते. त्यामध्ये जकातीचा अपेक्षित उत्पनाची पूर्तता न होणे, मालमत्ता व पाणीपट्टीची उद्दिष्टानुसार वसूली न होणे या बाबी समाविष्ट आहे. तथापि, जकात करा संदर्भाने न्यायालयात चालू असलेल्या प्रकरणांमध्ये निर्णय न लागणे, शासनाकडून सुधारित जकात दरवाढीस मान्यता प्राप्त न होणे. जागतिक मंदी, बंद असलेले उद्योगधंदे यामुळे जकात उत्पन्नात तुट दिसून येते. मागील वर्षाच्या रु.४० कोटीच्या वसूलीच्या तुलनेत १९९९-२००० वर्षी रु.४४ कोटीच्या वसुली झाल्याने १० टक्के वसुली वाढल्याचे दिसून येईल. तसेच पाणीपट्टी व मालमत्ता कराची वसुली करतांना सप्टेंबर महिन्यांतील लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता, जानेवारी महिन्यापासून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता व निवडणूकीच्या कामामध्ये महानगरपालिकेचा सर्व कर्मचारी वर्ग गुंतल्याने अपेक्षित अशी वसुली होऊ शकली नाही. चालू आर्थिक वर्षात संपूर्ण उद्दीष्ट साध्य करण्यांत येईल. सुधारित अंदाजपत्रकामध्ये ८८.३३ कोटी जमा दर्शविण्यांत आलेली होती. तथापि, ३१ मार्च अखेर प्रत्यक्षात रु.५.८४ कोटी जमा व रु.७९.३५ कोटी खर्च झालेला असून मंजूर झालेली कामे येत्या आर्थिक वर्षात स्पिल ओव्हर स्वरुपात हाती घेण्यांत येणार आहेत.

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका जाहिर झाल्यानंतर निवडणूक आयुक्तांनी त्यांच्या पत्र क्र.एमईसी/एमसी/१९९९/प्र.क्र.५१/का-१०, दि.१७ जानेवारी, २००० नुसार शासनास निर्देश दिले होते की, महानगरपालिकेने तुर्त चार महिन्याच्या खर्चासाठी अंदाजपत्रक तयार करुन लेखा अनुदान सादर करावे. सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ मधील तरतूदीनुसार या महिन्याकरिता जमा व खर्चाचे विवरण पत्र तयार करण्यांत

आले होते. ते मुळ अंदाजपत्रकासोबत अवलोकनास्तव सादर करण्यांत आलेले आहे. २०००-२००१ च्या अंदाजपत्रकामध्ये जकात करापोटी उत्पन्न रु.५३ कोटी अपेक्षित केलेले आहे. तसेच मालमत्ता करापोटी रु.१५ कोटीचे उत्पन्न अपेक्षित केलेले आहे. शासकीय निधी पाणीपट्टी, महानगरपालिकेच्या मिळकतीपासूनचे उत्पन्न व इतर करापोटी मिळणारे उत्पन्न हया सर्व बाबी लक्षात घेवून १३५.६८ कोटी जमा बाजूने उत्पन्न गृहीत धरलेले आहे.

महानगरपालिकेने तिच्या अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे. सदरील आयोगाच्या मंजूरी नुसार कर्मचाऱ्यांना जानेवारी १९९९ ते डिसेंबर १९९९ पर्यंतची थकबाकी देय असून सुमारे ६ कोटी रुपये कर्मचाऱ्यांना देय आहेत. पाचव्या वेतन आयोगामुळे सरासरी २५ टक्के वेतनवाढ प्रत्येक कर्मचाऱ्यांस मिळालेली आहे. त्याचाही अतिरिक्त खर्च चालू वर्षी महानगरपालिकेला करावा लागणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना एकाच वेळेस रु.६ कोटीची थकबाकी देणे महानगरपालिकेस शक्य नसल्याने चालू वर्षी ५० टक्के व पुढील वर्षी ५० टक्के थकबाकी कर्मचाऱ्यांना द्यावी असे प्रशासनाचे मत आहे. महापालिका आस्थापनेवरील पाचव्या वेतन आयोगामुळे वाढलेला खर्च लक्षात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये भरीव वाढ करणे आवश्यक आहे. त्या करिता खालील उत्पन्नाच्या बाबींमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित आहे.

१) पाणीपुरवठा ही अत्यावश्यक बाब असून महानगरपालिका हद्दीतील सुमारे ९ लाख लोकसंख्येस जायकवाडी प्रकल्पातून पाणी पुरवठा केला जातो. जायकवाडी पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेने मागील वर्षी ताब्यात घेतली असल्याने अस्थापना, रसायने, देखभाल दुरुस्ती यावरील खर्च वाढलेला आहे. विद्युत देयकाबाबत महापालिका व शासन यांच्यामध्ये पत्रव्यवहार सुरु आहे. सद्य स्थितीत पाणी पुरवठ्यावर एकूण वार्षिक खर्च सुमारे रु.३२.८० कोटी असून मागणी उत्पन्न फक्त रु.११.७८ कोटी व रु.२१.०२ कोटीचा निव्वळ तोटा महानगरपालिकेस सहन करावा लागत आहे. विद्युत देयक दरमहा रु.२.१० कोटीचे प्राप्त होत असून महानगरपालिका आर्थिक अडचणीत असल्यामुळे दरमहा रु.७५ लाख विद्युत देयकापोटी विद्युत मंडळाकडे भरणा करत आहे. त्यामुळे विद्युत देयकाची थकबाकी वाढतच चाललेली आहे. सद्यस्थितीत विद्युत देयकाची सुमारे ९८ कोटीची थकबाकी आहे. तसेच पाणी पुरवठा मंडळाची पाणी देयकापोटी १९ कोटीची थकबाकी देणे आहे. पाणी पुरवठा ही स्वनिर्धारित (सेल्फ सफिसिएन्ट) होणे हे नितांत आवश्यक आहे. परंतू त्यासाठी पाणी पुरवठ्याचा आकार प्रतिवर्ष रु.३२५० प्रति कनेक्शन करणे नितांत आवश्यक आहे. महानगरपालिकेने सध्याचा पाणी पुरवठ्याचा कमीत कमी दर वार्षीक रु.१००० प्रति कनेक्शन घरगुतीसाठी व रु.४००० प्रति कनेक्शन औद्योगिक नळ कनेक्शनसाठी आहे. पाणी पुरवठ्याचा दर रु.१००० वरुन एकदम प्रति कनेक्शन रु.३२५० करणे म्हणजे २३० टक्के वाढ करणे आवश्यक असले तरी एकदम अशी वाढ करणे प्रशासनास योग्य वाटत नाही. परंतू पाणी पुरवठ्यात होणारा तोटा लक्षात घेता त्यामध्ये काही अंशी वाढ करणे नितांत गरजेचे झालेले आहे. सबब पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव जो प्रशासनाने ठेवलेला आहे तो मान्य करावा व विद्युत मंडळाची थकबाकी कमी

करण्यासाठी प्रति महा किमान रु.१ कोटी विद्युत मंडळास अदा करावे असे प्रशासनाचे मत आहे. यास मान्यता देण्यांत यावी. सदरील दरवाढ मान्य केल्यास पाणीपट्टीमध्ये होणारा काही तोटा कमी होऊन विकास कामांकरिता जास्तीचा निधी उपलब्ध होऊ शकेल.

२) महानगरपालिकेच्या इतर मिळकतीपासून म्हणजेच जलतरण तलाव, अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग यापासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नामध्ये वाढ करणे गरजेचे असल्याने त्यास मान्यता देण्यांत यावी.

३) शहर विकास निधी हा १९९४ पासून वाढविण्यांत आलेला नाही. आजमितीस सर्व बाबींचे दर वाढलेले असून प्रशासनास नागरिकांना सुखसुविधा पुरवितांना चालू वर्षाच्या दर सुचीनुसार काम करावे लागते व वसुली मात्र १९९४ च्या दर सुचीनुसार करण्यांत येते. त्यामध्ये ना नफा ना तोटा तत्वावर सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक व प्रत्यक्षात येणारा खर्च लक्षात घेता विकास निधिमध्ये प्रस्तावित केलेली वाढ मान्य करण्यांत यावी.

चालु वर्षी नवीन कामासोबत पुर्वी हाती घेतलेले प्रकल्प मार्गी कसे लागतील यावर प्रशासनाने भर दिलेला आहे. त्यासाठी निधी कसा उपलब्ध होईल व नागरिकांना मोठ्या प्रमाणावर नागरी मुलभूत सुख सुविधा कशा पुरविल्या जातील हे पाहण्याचा प्रशासनांचा दृष्टीकोन आहे. यामध्ये विशेष करुन प्रशासकीय इमारत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या विकास, छत्रपती श्रीमंत शिवाजी महाराज पुराणावस्तु संग्रहालय योग्य रितीने चालवणे, मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटरची वास्तु पूर्ण करणे, झाल्टा येथील जलनिःसारण ट्रिटमेंट प्लँट मुख्य जलनिःसारण वाहिन्या, रस्त्यांचे डांबरीकरण व मजबूतीकरण इत्यादी कामांचा समावेश आहे. तसेच विविध प्रभागातील लहान मोठी कामे पूर्ण करण्याचा प्रशासनाचा निर्धार आहे यामध्ये रस्ते, विद्युत दिवे, जलनिःसारण वाहिन्या, प्रशासकीय खर्चामध्ये काटकसर इत्यादी बाबींचा समावेश आहे. एकंदर रु.१३५.२३ कोटी चा खर्च लक्षात घेता रु.२१.४० लाख चे शिल्लकी अंदाजपत्रक स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करत असतांना मला आनंद होत आहे.

**<u>ऋणनिर्देश :</u>**

सन १९९९-२००० या आर्थिक वर्षामध्ये माहे जानेवारी २००० मध्ये आयुक्त म्हणून मी सुत्रे हाती घेतल्यानंतर सर्व माजी पदाधिकारी, मा.महापौर, श्री.सुदाम सोनवणे (पाटील), उपमहापौर, श्री.संजय केणेकर, सभापती स्थायी समिती, श्री.नरसिंग ढगे, सभागृह नेता, श्री.महादेव सुर्यवंशी, विरोधी पक्ष नेता श्री.अफसर खान यांनी महापालिका निवडणूकीच्या निकालापर्यंत मला कामामध्ये सहकार्य केले याबाबत मी त्यांचे आभार मानतो. तसेच सर्व नवनिर्वाचित स.पदाधिकारी व स.सदस्य यांचे ही मला नेहमीच सहकार्य व मार्गदर्शन लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

हे अंदाजपत्रक सादर करतांना सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी जे परिक्षम घेतले त्याबद्दल मी त्यांचा गौरवाने उल्लेख करु इच्छितो.

या शहरातील सर्व पत्रकार बंधू, सिटी चॅनल, एसीएन, आकाशवाणी यांनी वेळोवेळी सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी २००० ते २००१ या अर्थसंकल्पा संबंधीचे निवेदन सभागृहात वाचून दाखवले व सहकार्याची भावना व्यक्त केली. त्यानुसार

माझे व सभागृहातील सर्व सन्माननीय सभासदांचे यासाठी योग्य ते सहकार्य लाभेल. या संदर्भात बोलावयाचे झाल्यास महानगरपालिकेला जकातीपासून सर्वात जास्त उत्पन्न मिळते. व जे उद्दीष्ट आपण ठेवले होते. त्यानुसार तेवढे उत्पन्न आपणांस मिळालेले नाही असे दिसून येते. प्रथमतः जकाती संदर्भात चर्चा करु.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** सन १९९८-९९ मध्ये ४८ कोटीचे उद्दीष्ट मनपाने जकातीसाठी ठेवले होते. परंतू पूर्ण वसुली (उद्दीष्ट) झाली नाही. त्या वेळीही असे सांगण्यांत आले होते की, जागतिक मंदी होती व इतर कारणे दाखवण्यांत आली. गेल्या आर्थिक वर्षासाठी जे जकातीचे उद्दीष्ट ठेवले. त्यात ४ कोटी रुपये तूट आली याचे कारण काय? यावेळेस प्रशासनाला काय अडचण आली याची माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :** जकातीच्या तुट संदर्भात मुलतः २-३ बाबी आहेत.
१) जकातीचे दर काही मालावर (वस्तुंवर) वाढवण्या संदर्भात सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यांत आलेले होते. त्यास शासनाची मंजूरी मिळालेली नाही. त्यामुळे करातील वाढ आपणांस मिळू शकली नाही.
२) ट्रान्सपोर्ट असोशिएशनने टोल टॅक्स आकारणी व डिझेल दरवाढ कमी करण्यासाठी देशव्यापी संप पुकारला होता. त्यामुळेही फरक पडलेला आहे.
३) टेलिफोन खात्याचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने या विभागाकडून जकात पोटी मोठी रक्कम वसुल व्हावयाची आहे. न्यायालयाचा निर्णय झालेला नाही. तसेच खाजगी वाहन धारक लहान लहान वस्तु वाहनांतून आणतात. त्यामुळे जकातीची घट होते. १००% लहान वाहनांची तपासणी करणे शक्य होत नाही.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जो खुलासा केला तो योग्य आहे. हे शहर आशिया खंडामध्ये झपाट्याने वाढणारे शहर आहे. प्रत्येक वेळेस मालावर जकात वाढी संदर्भात शासनाकडे दिलेल्या प्रस्तावास मंजूरी मिळाली नाही ही बाब वेगळी आहे. प्रत्येक वर्षात जकातीचे वाढीव उद्दीष्ट ठेऊन वसुली होणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :** १९९८-९९ ला अपेक्षा केली होती. ४८ कोटी जकात यावी. परंतू प्रत्यक्षात ४० कोटी वसुल झाली. गेल्या वर्षी ५० कोटींचे उद्दीष्ट होते. ४४ कोटी वसूल झाले. १९९८-९९ या विचार केल्यास तर मागच्या वर्षी ४ कोटी रुपये जास्त मिळाले याचाच अर्थ आपणांस १०% जकात जास्त मिळाली. अपेक्षेप्रमाणे २० ते २५% वाढ दरवर्षी मिळाली पाहिजे. मागच्या वेळी जकात वाढी संदर्भात व त्यांचे खाजगीकरण संदर्भात चर्चा झालेली होती. खाजगीकरण केल्यास जकातीत वाढ होऊ शकते. जकात चोरीमुळे काही प्रमाणात बुडल्या जातो.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** चोरी कोण करतो, कर्मचारी, अधिकारी की व्यापारी.

**मा.आयुक्त :** १०% जकातीत वाढ झाली याचा अर्थ प्रशासन समाधानी आहे. असे नाही. जकातीच्या खाजगी करणा संबंधी जी कागदपत्रे तयार केलेली आहेत. प्रक्रिया सुरु केली आहे. यासाठी कुठेतरी आळा घातला पाहिजे या दृष्टीने उत्पन्न वाढवणे आपणांस शक्य होईल. यासाठी आधीच मागच्या बॉडीने खाजगीकरणा बाबतचा निर्णय घेतलेला आहे. या संदर्भात विभाग प्रमुखांची बैठक घेतली होती व रात्री बेरात्री काही वाहने जकात न भरता निघुन

जातात. अशा प्रकारची चोरी थांबवण्यासाठी कर्मचाऱ्यांना तपासणी करण्याचे आदेश केलेले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक संघटनेच्या लोकांशी याबाबत चर्चा केली. मनपाचे यात नुकसान होणार नाही. याची खबरदारी घ्यावयास सूचना केली व त्यांचे सहकार्य मिळाले. बऱ्याच वेळा खाजगी वाहनाद्वारे लहान-लहान वस्तु शहरात येतात. त्याची जकात चुकवली जाते ती एक प्रकारची चोरी होते. असे म्हणता येईल. येणाऱ्या वाहनांची संख्या इतकी असते की, ओपन डिलेव्हरी सर्वच वाहनांची १००% आपण करु शकत नाही. मा.आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका यांच्याशी मी खाजगीकरणा संदर्भात चर्चा केली. तेथील जकातीचे खाजगीकरण करण्यांत आले होते. परंतू त्यांना फायदाच झाला असे नाही. परंतू अंमलबजावणी करतांना अडचण निर्माण झाली होती.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** बी-बीयाणेवर जकात माफ केली होती. पुन्हा सभेत निर्णय घेऊन लागू करण्यांत आली. तरी पण जकातीतील तोटा येतो. हे सभागृह व पदाधिकारी जकातीत तुट येऊ नये यासाठी सर्व सतर्क असतांना जकातीत तूट का येते.

**मा.आयुक्त :** आपल्या सूचना योग्य आहेत. त्या संदर्भातच दोन-तीन बाबीवर आपल्याला प्रयत्न करावे लागणार आहेत. खाजगीकरण केले तर आपला फायदाच होईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** जकातीची वसुली होत नाही, कर्मचारी/अधिकारी सक्षम नाही काय? तसेच मोबाईल फोनवर जकात कर कशा प्रकारे बसविला जाईल याचा खुलासा करावा. धनादेशाने जकात भरण्यांत येते. ते धनादेश वटत नाहीत. त्यामुळे वसुलीत तुट येते.

**मा.आयुक्त :** यात दोन-तीन प्रकार आहेत. सीमकार्ड आहे. त्यावर वसुली केलेली आहे. जी आकडेवारी मला दाखविण्यांत आली त्यात ते नमूद केलेले होते. दुसरे असे की, मोबाईलचा जो वापर होतो. त्यावरती जकात आकारणी कशी वाढवता येईल याबाबत अभ्यास चालू आहे. याबाबतीत एक शेर मी आपणांस सांगू इच्छितो.

"लोगोंका अगर मैला किरदार नही होता, हर शहर मे. जिस्म का बाजार नही होता."

जे चोरीचे वातावरण झालेले आहे. त्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल यासाठी जनजागृती करावी लागेल. शहराच्या बाहेरील भागात उदा.वाळुज अशा ठिकाणाहून काही माल शहरात पुरविल्या जातात. तेथे गोडावून बांधतात त्याची तपासणी करावी लागेल. असे ठिकाणी महानगरपालिकेच्या जकातीत घ्यावयाचे का? तेथील काहींचे म्हणणे आहे की, चिकलठाणा येथे ही बरेच कारखाने सिंक झालेले आहेत. वाळूज सारखे ठिकाणी बरेच गोडाऊन आहेत. बाहेरच्या बाहेर माल पुरवठा होतो. तसेच सर्व कर्मचारी चांगले काम करतात असे नाही. त्यांचेही जे नेहमीचे जकात भरणारे आहेत. त्यांचेशी संगनमत झालेले असेल. तशी माहिती मिळाल्यास कर्मचाऱ्यांवर आपण कार्यवाही करु शकतो. खाजगीकरण केल्यावर या सर्व गोष्टी थांबणे शक्य होईल. खाजगीकरण केले म्हणजे सर्वच संबंधित ठेकेदारांकडे सोपवल्या जातील असे नाही. आताच मी उदाहरण दिले कोल्हापूर येथील माहिती दिली. येथील ठेकेदाराने ओपन डिलेवरी सर्वच वाहनांची सुरु केली.

त्यामध्ये ठेकेदार व वाहनधारक, तसेच कर्मचारी यांचे वादविवाद होऊन काही कर्मचाऱ्यांना मारहाण पण झाली. जनतेलाही त्रास झाला. त्यामुळे खाजगीकरणाचा जे निर्णय झालेला होता तो मागे घेण्यांत आला. याचे कारण असे की खाजगीकरण करतांना योग्य ती माहिती घेऊन निर्णय घेतला गेला असता तर असे झाले नसते, असे वाटते. तसेच वाहनांची तपासणी करतांना सामान्य व्यक्तींना सन्मानाची वागणूक मिळावयास पाहिजे. आपण महत्वाच्या कामासाठी आपले मनापातील कर्मचारी यांची टीम तयार करुन प्रत्येक नाक्यावर जाऊन ४-५ वेळेस मालाची तपासणी करु शकतो.

**श्री.दलवीरसिंग जबिंदा :** कोल्हापूर येथेच योग्य प्रकारे काम करु शकले. नांदेड येथे अपयश आले. मालमत्ता कराची वसुली होत नाही. अधिकारी सक्षम नाही असे दिसून येते. मार्वलचे दर निश्चित नाही व जळावू लाकूड व इतर लाकूड यात फरक दाखवत नाहीत. तसेच शेंगा, मार्बल, ग्रेनाईट इ.दर निश्चित केले पाहिजे.

**मा.आयुक्त :** काही मालावर जकात दरवाढ करण्या संदर्भात आपण शासनास प्रस्ताव पाठविला आहे. शासनाची मंजूरी आल्यास निर्णय घेता येईल व त्यानुसार वाढ होऊ शकते. यासाठी जकातीचे शेड्युलमध्येही दुरुस्ती करावी लागेल.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** चिकलठाणा येथील काही कंपन्यांमधून कोट्यावधी रुपयांची दारु बाहेर जाते त्यास जकात का आकारण्यांत येत नाही.

**मा.आयुक्त :** कच्चा माल जेव्हा आयात होतो. त्यावेळेस जकात आकारणी करण्यांत येते व कच्चा मालापासून वस्तू तयार होतात व त्या वस्तू बाहेर निर्यात होतांना जकात आकारु शकत नाही. सोलापूर, अमरावती येथील मनपामध्ये जकाती ऐवजी सरचार्ज घेण्यांत येतो. त्याप्रमाणे कार्यवाही होण्याची प्रयत्न होत आहेत. कशी वाढ करता येईल याचा अभ्यास करत आहोत.

**सौ.विजया रहाटकर :** जकात वसुलीच्या तूट संबंधी मा.आयुक्तांनी जी कारणे सांगितली ती बजेट ठेवतांना हे विचारत घेतले नाही का?

**मा.आयुक्त :** काही घटना उद्‌भवतीलच व त्यामुळे जी वसुली होण्याची अपेक्षा होती त्यात तूट येईल असे अगोदरच माहिती नसते. त्यामुळे आपण जे बजेट तयार करतो अंदाजित तयार करत असतो. की, तेवढी रक्कम अपेक्षित वसूल होईल.

## २) <u>मालमत्ता कर वसूली :</u>

**मा.आयुक्त :** मालमत्ता कराची जी वसुलीचे उद्दीष्ट आहे. त्यानुसार वसुली कमी झालेली आहे. दोन निवडणूका झाल्या. गेल्या एप्रिल ते डिसेंबर मध्ये म्हणावी तशी वसुली झालेली नाही. परंतू जानेवारी २००० मध्ये नक्कीच वाढ झालेली दिसून येते. निवडणूकीचा काळ होता. झोन आयुक्त यांचे बैठका घेतल्या. नळ कनेक्शन तोडण्यांत आले. अपेक्षेप्रमाणे वसुली झाली नाही.

**सौ.विजया रहाटकर :** कर्मचारी सक्षम नाही, माझे स्वतःच्या घरांना मालमत्ता कर लावून द्यावा अशी तीन वर्षापासून मी मागणी करत होते. आमच्या वाटण्या झाल्या. मालमत्ता कर लावून दिला नाही. अशी बरीच उदाहरणे देता येतील. १० ते ११ वर्षापासूनच्या नवीन घरांना कर आकारणी करण्यांत येत नाही. काही

लोक माझ्यासारखे स्वत:हून घरांना कर लावण्या बाबत विनंती करतात. परंतू कर्मचारी त्यांच्या सूचनांची दखल घेत नाही. हे प्रशासनाचे धोरण योग्य वाटत नाही.

**मा.आयुक्त :** शहरात बरीच बांधकामे झाली. त्यांचे मालमत्ता कराची वसुली नाही. त्याचे करयोग्य मूल्य काढलेले नाही. १९९० ला मालमत्ता कराची रिव्हीजन झालेले नाही. ते दर चार वर्षांनी व्हावयास पाहिजे. ९० ला वाढ झाली नागरिक न्यायालयात गेले. रिव्हीजन केले नाही याची भिंती होती. अनधिकृत बांधकामे झालेत. त्यांना मालमत्ता कर आकारणी झाली नाही. नवीन कर भरण्यास नागरिक तयार आहेत. हे विचारात घेऊन मालमत्ता कर आकारणी संदर्भात रिव्हीज ची कार्यवाही करण्यांत येत असून त्यावर सर्व मालमत्तांना आकारणी होईल.

या अगोदर सर्वेक्षण केले. काही लोकांच्या तक्रारी आल्या, सर्वेक्षणवाले कमी जास्त नोंदी करतात. प्रोफेशनल एजन्सीकडून सर्वेक्षण करुन अशा थर्ड पार्टी एजन्सीकडून नोटीसा बजावून कर आकारणी करतील. ज्यांनी वेळीच कर भरला असेल अशांनी सवलतीची योजना अंमलात आणण्यांत येत आहे. ५%, ४%, ३%, १% सुट म्हणून सवलत देण्यांत येईल व वेळेवर जे कर भरणार नाही. त्यांच्यावर दंडनीय कार्यवाही सुध्दा करण्यांत येईल.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** मनपाच्या मालमत्ता भाडेकरुने पोट भाडेकरुंना भाड्याने दिलेल्या आहेत. आणि भाड्याचे नुतनीकरणही होत नाही. क्रांतीचौक येथे मनपाच्या मालमत्तेचे तत्कालीन आयुक्त श्री.गौतम साहेब यांनी प्रकरण सुरु केले होते. त्या प्रकरणात कार्यवाही झाली नाही. नगर रचना विभागाने परवानगी दिली आहे व मालमत्ता कर वसूली नाही अशीही प्रकरणे आहेत.

**मा.आयुक्त :** नगररचना विभागातून सेल्फ डेव्हलपमेंटची परवानगी देण्यांत आलेली आहे अशा प्रकरणात महानगरपालिका फंडातून विकास कामे केली आहे. त्या बाबतीत कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** मनपाच्या मालकीची काही दुकाने जुन्या पध्दतीने भाडे आकारले जाते. तेही पूर्ण वसूल होत नाही. बाजारातील ही वसुली होत नाही. एक विभाग परवानगी देतो. दुसऱ्या विभागतून त्याची वसुली झाली पाहिजे. ती न होता परवानगी अगोदर दिली जाते व बरेच दिवस लोक कर भरत नाहीत.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जुन्या शहरातील रहिवाशांचा मालमत्ता कर वाढवण्यांत येऊ नये. या अगोदरच बरेच लोक न्यायालयात गेलेले आहेत. अशा जवळपास २००० केसेस आहेत. त्यामुळे मनपाचे ४० कोटी रुपये येणे बाकी आहे. माझ्या मते एक कमिटी केलेली होती. त्यात झोन आयुक्त, उप आयुक्त व अर्जदार यांची एकत्रित चर्चा करुन प्रकरण निकाली काढण्यांत येईल असे ठरले होते. अद्याप पर्यंत काहीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. सिडकोचा व्याप १० पटींनी वाढला आहे. सन १९९२ पासून तेथील मालमत्तांवर कर लावण्यांत यावे. जुन्या शहरातील लोकांवरच अन्याय का?

**मा.आयुक्त :** सिडको हस्तांतरण मनपाकडे करण्या बाबतचा सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला असून तेथे ज्या सेवा सुविधा मनपा पुरविते त्याबद्दलचा कर आपण वसूल करतो. उदा.पाणी पुरवठा, इतर विकास कामे सिडको पुरविते म्हणून सिडको इतर कर वसूल करते. आपण फक्त पाणी पुरवठा करतो. विकास

खर्च सिडको वसुल करते. कारण की महानगरपालिका या भागासाठी नियोजन प्राधिकरण नाही. ज्यावेळेस सिडको हस्तांतर मनपाकडे होईल तेव्हापासून मालमत्ता कर वसूल करण्यांत येईल असा सर्वसाधारण सभेनेच निर्णय घेतलेला आहे. नियमानुसार ९२ पासूनही आकारणी करता येऊ शकते. जुने शहरातील लोकांवर याचा भार पडणार नाही याची काळजी प्रशासन घेईल.

**मा.सभापती :** सिडकोतील नागरिकांच्या मालमत्तेवर सध्या टॅक्स लावता येणार नाही. सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे की, सिडको हस्तांतरणापासून मालमत्ता कर आकारण्यांत येईल. सिडकोला पाणी पुरविल्या जाते. त्यामुळे पाणीपट्टी आपण वसूल करतो.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** सिडको मनपाकडे हस्तांतरणाच्या वादामुळे एकूण १८ कोटींची तुट येत आहे. सिडकोच्या मालमत्तेला कर लावण्यांत यावयास पाहिजे. तेथील पाणी, ड्रेनेजची कामे मनपातर्फे झालेली आहेत.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** सिडकोतील काही घरे लहान असून त्या घरांमध्ये २ ते ३ व्यक्ती राहतात. त्यांनाही १०००/- पाणी पट्टी भरावी लागते. व जेथे पाण्याचा वापर हास्त होतो. घरातील व्यक्तींची संख्या जास्त आहे. अशांनाही १०००/- रुपयेच भरावे लागतात. त्यामुळे काही लोकांवर अन्याय होतो हे प्रशासनाने विचारात घेतले पाहिजे. पाण्याचा वापर किती होतो याचा विचार करावा व काहींना महिन्याला एकूण २०० लिटर पाणी मिळत नाही.

**मा.आयुक्त :** ठराविक इंचीचे पाईपलाईन आपण परवानगी देतो. काहींनी १", २", ३" अशा प्रकारची परवानगी घेतली असेल. त्या प्रमाणे पाणी पुरवठा होतो. जर चुकीच्या मार्गाने कुणी पाणी पुरवठा करुन घेत असेल तर तशी चौकशी करुन कार्यवाही करता येईल. तसेच जे लोक वेळेवर कर भरत नाही अशा लोकांना बँक थकीत रकमेवर ज्याप्रमाणे व्याज आकारते त्याप्रमाणे आपणालाही तशी भूमिका घ्यावी लागणार आहे. व संबंधिताचे ड्रेनेज व पाणी लाईन बंद करावी लागेल. असे केल्याने वसुलीत नक्कीच वाढ होईल यात शंका नाही.

**श्री.गणेश तांबे :** एका पत्राचे घरास १० वर्षाचा एकूण ३६ हजार रुपये कर लावला जातो व त्या घराच्याच बाजूने असलेले सिमेंट कॉंक्रीटचे घरास वर्षाला एकूण ९००/- रुपये कर आकारला जातो. हे योग्य वाटत नाही.

**मा.आयुक्त :** यात दोन तीन बाबी नमूद करावयाशा वाटतात. यासाठी प्रत्येक स्ट्रक्चरची पाहणी करुनच किती कर योग्य मूल्य हे काढावे लागेल. अशा प्रकरणाची एक केस पुणे महानगरपालिकेने संबंधिताविरुध्द पार्टीने उच्च न्यायालयात दाखल केलेली होती. नंतर ती केस सुप्रीम कोर्टमध्ये गेलेली होती. तेथे लागलेल्या निकालाची प्रत माझ्याकडे आहे. त्यात असे नमूद केलेले होते की, एखाद्या व्यक्तीचे व्ही.आय.पी.रस्त्यावरील ५०० मीटरचे घर यांना सारख्याच पध्दतीने जर कर आकारला गेल्यास ती चुकीची पध्दत आहे. त्याचे कारण असे की, जे निवास व्ही.आय.पी.रस्त्यावर आहे. त्याचे महत्व, व्हॅल्यु जास्त आहे. म्हणून त्यास जास्त कर लावणे योग्य होईल. या केसेसमध्ये मेन रोडवरील स्ट्रक्चरचे ग्रेड-१, ग्रेड-२, ग्रेड-३ असे भागपाडून ग्रेड-३ मध्ये ज्याची कच्च्या मातीची दुकान आहे, ज्याची घरे कच्च्या मातीची आहे अशांना कमी कर आकारला जाईल. मालमत्ता कराचे रिव्हीजन

करण्यांत येईल व याबाबत जाहीर सूचना वृत्तपत्रात देण्यांत येईल. जे गरीब लोक आहेत. त्यांच्यावर अन्याय होणार नाही.

**श्री.गणेश तांबे :** ३६ हजार रुपये भरण्याची नोटीस दिली योग्य आहे काय? तसेच श्रेयनगर मधील एक अपंग व्यक्ती ५ वर्षापासून कार्यालयात कर कमी करण्या बाबत येतो आहे व त्याच्याच बाजुला असलेल्या व्यक्तीची मालमत्ता कर कमी करण्यांत येतो.

**मा.आयुक्त :** सध्याचा आकारण्यांत आलेला मालमत्ता कर संबंधितास भरावा लागेल. व्यक्तीगत केसेस आपण माझ्याकडे घेऊन यावेत. त्यावर योग्य ती चौकशी करुन कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** १३३ कोटीचे बजेट प्रशासनाच्या वतीने दाखविण्यांत येते. परंतू मागील थकबाकी व चालू रक्कम वसूल झाली नाही तर अंदाजपत्रक किती कोटीचे होते. याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** एकूण १५ कोटीचे उद्दीष्ट ठेवण्यांत आलेले आहे. जास्तीत जास्त वसुली करण्याचे प्रशासनाचे प्रयत्न राहणार आहेत.

**मा.सभापती :** प्रत्येक झोनमध्ये लक्ष वेधले तर बरीचशी मालमत्ता कराची थकबाकी आहे. यासाठी काय प्रयत्न करता येतील.

**मा.आयुक्त :** उद्दीष्ट जरी १५ कोटीचे असेल तरी जास्तीत जासत वसुली करण्याचे प्रयत्न राहील. कदाचित १५ कोटीपेक्षा जास्त वसुली होऊ शकेल. त्यासाठी आपले सहकार्याची गरज आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** ५३ घोषित झोपडपट्ट्या आहेत. बऱ्याच ठिकाणी २०X३० चे प्लॉट पाडून लोकांनी घरांचे बांधकाम केलेली आहेत.

**श्री.गणेश तांबे :** स्लम कोणते घोषित करणार याची माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :** जे विकास योजना आराखड्यामध्ये निवास भागात येतात. अशांवर कर लावणे योग्य होईल. परंतू जे विविध कारणासाठी आरक्षणे ठेवलेली आहेत. ती नियमित करता येणार नाही. विकास योजनांच्या वापरात अनुज्ञेय होणारे अनधिकृत बांधकाम दंड आकारुन नियमित करता येतील.

२. ना विकास क्षेत्रात बांधकाम करता येणार नाही. जर कुणी बांधकाम केले तर नियमाने ते तोडावेच लागेल.

३. वाणिज्य वापरासाठी असलेल्या भागात त्या ठिकाणी निवासही घरेही असू शकतात. रिव्हीजन कमिटी होईल त्यांना या सर्व बाबींची माहिती देण्यांत येईल.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** ३१.०३.१९९७ ची थकबाकी कशा पध्दतीने वसूल करणार. बरेचशे लोक न्यायालयात गेलेले असून केसेस तशाच पेडींग आहेत. काही लोक कर भरण्यास तयार आहेत. परंतू प्रशासनाच्या वतीने योग्य मार्गदर्शन मिळत नाही. मागे या संदर्भात एक कमिटी नेमण्यांत आली होती. व प्रत्येक झोन आयुक्त व उपआयुक्त तसेच अर्जदार यांनी एकत्र येऊन चर्चा करुन कार्यवाही करण्याचे ठरले होते. अशा किती केसेस निकाली काढल्या.

**मा.सभापती :** सन्माननीय सदस्यांच्या वार्डात अशा प्रकारच्या किती केसेस आहेत. अशा लोकांना घेऊन मा.आयुक्तांशी प्रत्यक्ष चर्चा करुन कार्यवाही करता येईल.

**मा.आयुक्त :** संबंधित अशा लोकांशी माझे चर्चा करण्यास दुमत नाही. परंतू कायदेशीर बाबी बघूनच कार्यवाही करावी लागेल.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** ज्या भागात दुकाने, लाईट आहे, पाणी दिलेले आहे. त्या त्या भागात पूर्णतः टॅक्स वसूल करावा.

**मा.आयुक्त :** डी.पी.प्लॅन मध्ये वसाहती झालेल्या असून त्या ठिकाणी गार्डन दाखविण्यांत आले. अशाही काही वसाहती आहेत. त्या साठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये आरक्षण वगळेची कार्यवाही करावी लागेल. व तसा ठराव घेवू शासनाची मंजूरी घेणे किंवा तोडणे.

**श्री.गणेश तांबे :** भावसिंगपुरा भागात १०० ते १५० फुटाच्या रस्त्यावर घरे बांधलेली आहेत.

**मा.आयुक्त :** अशी घरे विकास योजनेच्या रस्त्यामध्ये येत असतील तर ती तोडण्यांत येतील.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी १५ कोटींचे उद्दीष्ट ठेवलेले आहे. अपेक्षा अशी आहे की, १५ कोटींच्या वर वसुली झाली पाहिजे. तसे प्रयत्न प्रशासनाने करावे. त्यास आमचे सर्वांचे सहकार्य राहील.

**मा.सभापती :** पाणीपट्टी संदर्भात सन्माननीय सदस्यांनी पुस्तकातील माहिती वाचून घ्यावी व त्यावर चर्चा करावी. पाणीपट्टी संदर्भातील जी तूट आहे. त्यासाठी नवीन असे काय पर्याय करता येतील.

**मा.आयुक्त :** पाणी पुरवठ्यावर साधारणतः दरवर्षी रु.३२.८० कोटी एवढा खर्च येतो. दरडोई लोकसंख्येच्या मानाने विचार केल्यास प्रत्येक व्यक्तीमागे ४९० रुपये खर्च होतो असे दिसून येईल. सध्या जी वसूली निवास वापराच्य पाण्याची करतो ती १०००/- रुपये आहे. त्यात काही प्रमाणात वाढ करावी लागेल. परंतू वाढ किती करावयाची हे ठरवावे. ना नफा ना तोटा या तत्वावर योजना राबवावयाची असेल तर एकूण ३२५०/- रुपये प्रत्येक नळ कनेक्शनला पाणीपट्टी लावावी लागेल. परंतू हे योग्य वाटत नाही. रु.१०००/- वरुन रु.१९००/- पर्यंत घ्यावी.

**श्री.गणेश तांबे :** पाणीपट्टीमध्ये जी वाढ दाखविली आहे ती वाढ न करता प्रत्येक वार्डात किती अनधिकृतपणे नळ कनेक्शन्स घेतलेले आहेत. कुणाकडे किती थकबाकी आहे ती वसुली केल्यास जी वाढ करावयाची आहे. त्याची तुट यात भरुन निघू शकते.

**मा.आयुक्त :** शहरात जे अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. त्या संबंधी सर्व्हे करण्याची सूचना केली. जी थकबाकी आहेत ती वसूल होऊन सुध्दा जी तूट पाणीपट्टीमध्ये येत आहेत ती भरुन निघू शकत नाही. करिता पाणीपट्टीत वाढ करणे गरजेचे आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** निवडणूकीच्या कालावधीमध्ये बरेच नळ कनेक्शन अनधिकृतपणे घेण्यांत आले आहेत. अशा लोकांकडून वसूली केली पाहिजे. काही लोक नळ कनेक्शनची परवानगी घेण्यासाठी येतात. परंतू कर्मचारी यांचेकडून प्रतिसाद मिळत नाही. अशा लोकांना नळ कनेक्शनची परवानगी द्यावी म्हणजे वसुलीत वाढ होईल व यासाठी मनपाने ठराविक नमुन्याचा फॉर्म पुरवावा व एक महिन्याचा कालावधी ठेवून येणाऱ्या सर्व लोकांना नळ कनेक्शन देण्याची नियमाने कार्यवाही करावी. त्यामुळे शहरात किती अधिकृत नळ कनेक्शन आहेत तेही दिसून येईल.

**श्री.गणेश तांबे :** १०००/- रुपये हे एका कुटूंबासाठी जास्त होतात. आता पुन्हा पाणीपट्टी वाढविणे योग्य होणार नाही. वाढ केल्यास जनता पाणीपट्टी भरणार नाही.

**श्री.सलीम पटेल :** ज्यांनी विना परवानगी नळ कनेक्शन घेतलेले आहे. त्यांना कायम करण्यांत येऊन परवानगी द्यावी. त्यामुळे पाणीपट्टीत वसूल होऊ शकेल.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मोठमोठे हॉटेल मालकांकडे थकबाकी असून अर्धा इंची नळ कनेक्शन परवानगी घेतली असेल तर त्यांचेकडे १" नळ कनेक्शन दिसेल. अशा लोकांवर दंडात्मक कार्यवाही करुन आलेली तूट भरुन निघू शकेल.

**सौ.विजया रहाटकर :** अनधिकृत नळ कनेक्शन शोधून किती वसूली होऊ शकेल याची चौकशी करुन कार्यवाही व्हावी. प्रत्येक वार्डात कमीत कमी २०० अनधिकृत कनेक्शन असतील असे माझे मत आहे.

**मा.आयुक्त :** प्रती नळ कनेक्शन रु.३२५०/- लावणे योग्य वाटत नाही. तथापि १०००/- वरुन रु.१९००/- पर्यंत वाढ करणेत आली आहे. जी वाढ करण्यांत आली ती दरडोई किती खर्च येतो. त्यानुसार काढलेली आहे. मागील सहा महिन्यांत अनधिकृत नळ कनेक्शन तपासणीत सापडलेले आहेत. ते धरुनच वाढ केलेले आहे. त्यामुळे नळपट्टीच्या वसुलीत फार जास्त फरक पडत नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** प्रत्येक वॉर्डात २०० नळ कनेक्शन अनधिकृत धरल्यास एकूण १६६०० नळ कनेक्शन होतात. त्यांना परवानगी दिल्यास एकूण १ कोटी ६६ लाख रुपये जमा होतात. परंतू जो तोटा आलेला आहे तो २१ कोटींचा आहे.

**श्री.कैसर खान बद्रोदीन खान :** १९९६ ला तांत्रिक कमिटी स्थापन करुन तलाव बांधता येईल किंवा कसे याबद्दल सर्वेक्षण करण्याचे ठरले होते व त्यासाठी तरतूद ठेवली होती व बाहेरुन तज्ञांना बोलावून त्यांचा अभिप्राय घेण्याच्या संदर्भात काय कार्यवाही केली.

**मुख्य लेखाधिकारी :** यासाठी १९९६ ला ५ लाखांची तरतूद करण्यांत आलेली होती.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** जायकवाडी धरणातील रॉ वॉटर वर ४५ पैसे प्रती १०,००० लिटर्स दर असून सप्टेंबर, १९९९ पासून ते ९० पैसे प्रति १०,००० लिटर्स इतके करण्यांत आले आहे. २०१६ पर्यंत १६ लाख लोकसंख्या होइल. अग्युमेन्टेशन स्कीम सुरु केली आहे.

**सौ.विजय रहाटकर :** पाणीपट्टी वाढ केल्यास ती जनतेला मान्य असली पाहिजे व वेळेवर जनतेने पाणीपट्टी भरली पाहिजे. ज्या भागातून पाणीपट्टी किंवा इतर कर वेळेवर भरल्यास तेथील जनतेला मनपातर्फे काय सुविधा देण्यांत येतील.

**श्री.मधुकर सावंत :** रु.१०००/- रुपयांवरुन १९००/- रुपयांपर्यंत वाढ केल्यास जनता पाणीपट्टी भरणार नाही. व्यावसायिकांसाठी फक्त वाढ करण्यांत यावी.

**मा.सभापती :** या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. ३० मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यांत येते. (वेळ दुपारी १.०० ते सभेला सुरुवात १.३० वाजता.)

**मा.सभापती :** पाणीपट्टी वाढ करण्या संदर्भात चर्चा चालू आहे.

**श्री.कैसर खान बद्रोदीन खान :** पाणी पट्टीत वाढ करण्यांत येऊ नये.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** २००-३०० रुपयांची वाढ करण्यांत यावी.

**श्री.साहेबराव कावडे, श्री.सलीम पटेल :** १९००/- रुपयेच पाणीपट्टी राहू द्यावी. सर्वसाधारण सभेत निर्णय घेता येईल.

**श्री.भरत लकडे, श्री.गणेश तांबे :** एकूण वर्षाला १५००/- रुपये करण्यास हरकत नाही.

**मा.सभापती :** खुलताबाद नगर परिषदेला दरमहा रु.१५००/- पाणीपट्टी आहे. पाणीपट्टी वाढी संदर्भात प्रशासनाने ठेवलेली रकमे बाबत सर्वसाधारण सभेत निर्णय घेता येईल.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** पाणीपट्टीची तरतूद भरुन काढण्यासाठी दुसऱ्या एखाद्या ॲटमवर वाढ करावी. याबाबत निर्णय घेण्यासाठी सर्वसाधारण सभेपुढे मांडावे.
१० ते १५ वर्षापासून लोकांना सुविधा मिळत नाहीत व विकास निधी जमा करण्यांत येतो. सुविधा दिल्या नाहीत चटई क्षेत्र निर्देशांक वाढवण्यात यावा.

**मा.सभापती :** ज्या ठिकाणी सेल्फ डेव्हलपमेंटची कामे झालेली आहे व मनपातर्फे विकास करण्यांत आलेला असेल तर बेटरमेंट चार्जेस वसूल करावेत व अशी किती प्रकरणे आहेत त्याची चौकशी करावी.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** सेल्फ डेव्हलपमेंट मध्ये खरे काम होत नाही. विकास खर्च भरुन घ्यावा.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** जे.सी.बी.मशीन भाड्याने देण्यांत येऊ नये.

**मा.आयुक्त :** जेव्हा आपणांकडे काम नाही तेव्हा भाड्याने देण्यांत येईल व आता दर मंजूर करावे.

**मा.सभापती :** मंजूर करण्यांत येते.

**<u>सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात काही महत्वाच्या बाबींवर होणाऱ्या खर्चाचा तपशिल</u>**

**<u>प्रशासकीय खर्च :</u>**

**मा.आयुक्त :** पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणी थकबाकी रुपये ६ कोटी देय असून आर्थिक वर्षात त्यासाठी ३ कोटींची स्वतंत्र तरतूद केलेली आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** प्रशासकीय खर्चात काय काटकसर करणार आहात. खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग वेतनापोटी या वर्षी ५०% पुढील वर्षी ५०% रक्कम देण्यांत येणार आहे. तसेच पान क्र.६६ वर गणवेश व फर्निचरसाठी कमी खर्च करण्यांत येणार आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** महापौर बंगल्यावरील साहित्य (फर्निचर) सध्या स्थितीत पुर्ण आहे काय?

**श्री.मधुकर सावंत :** झोन क्रमाक ४ मध्ये फर्निचर नाही. कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी खुर्ची तसेच टेबलही व्यवस्थीत नाही. या अगोदर किती फर्निचर खरेदी केले होते.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** प्रशासकीय दौरे, यासाठी प्रत्येक गाडीसाठी लॉगबुक असते.

**मा.आयुक्त :** आपण मांडलेल्या सुचनांची दखल घेतली जाईल.

**मा.सभापती :** विद्युत बिलापोटी म.रा.वि.मंडळाला ७५ लाख रुपये सध्या भरतो आहोत. १ कोटी ऐवजी ७५ लाख रुपये दरमहा भरण्यांत यावेत. यात वाढ होऊ नये.

**मा.आयुक्त :** विद्युत मंडळाची थकबाकी मनपाकडे ९८ कोटींची असून प्रत्येक महिन्यांत विद्युत बिलापोटी २.२५ कोटी बिल येते. ७५ लाख ऐवजी १ कोटी यासाठी भरावयाचे की, मागील थकीत बिलावर जास्तीची दंड आकारणी होणार नाही. १ कोटी रुपये दर मासिक रक्कम भरणे योग्य राहील.

**मा.सभापती :** मासिक १ कोटी रुपये भरण्याऐवजी ९० लक्ष रुपये म.रा.वि.मंडळाकडे भरण्यांत यावेत.

**मा.सभापती :** खुल्या गटारी बंद पडलेल्या आढळून येतात. त्यात माती साचलेली दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचा पैसा वाया जातो. असे माझे मत आहे.

**मा.आयुक्त :** या संदर्भात सर्वेक्षण झाले असून ज्या ठिकाणी नैसर्गिक उतार आहे. अशा ठिकाणी आणि इतर ठिकाणी लेव्हल घेऊन काम करण्यांत येईल.

**श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान :** १-२ महिन्याला साफसफाई केल्यास काहीही अडचण येत नाही.

**मा.आयुक्त :** १० वर्षानंतर तरी तांत्रिक अडचण निर्माण होऊ शकेल. या संदर्भात सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली होती.

**मा.सभापती :** यासाठी शासनाकडून विशेष अनुदान मिळेल काय?

**मा.आयुक्त :** शासन यासाठी अनुदान देऊ शकेल. तसे प्रशासनाच्या वतीने शासनास कळविण्यांत येईल व या कामासाठी रक्कम शासनाकडून मिळेल अशी अपेक्षा करु शकतो.

**श्री.सलीम पटेल :** कैसर कॉलनी मध्ये ३ इंची लाईन टाकलेली आहे. सध्या चांगल्या स्थितीत नाहीत.

**श्री.गणेश तांबे :** कुतूबपुऱ्यामध्ये १० इंची पाईपलाईन टाकलेली आहे. सध्या फुटलेली असून त्यातून पाणी गळते.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** शहरात कार्यरत असलेल्या जलनिःसारण वाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीसाठी होणारा खर्च अपेक्षित धरुनच यात तरतूद केलेली आहे.

**मा.सभापती :** या संदर्भात सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जाईल.

<u>**मेमारीयल व संशोधन केंद्र :**</u>

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेता येईल.

<u>रस्ते :</u>

**श्री.नारायण सुरगोणीवार :** खांडकी ऐवजी सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते व्हावेत. खांडकी पेक्षा कॉंक्रीटचे रस्ते करण्यासाठी खर्च जास्त येतो काय? खुलासा व्हावा.

**प्र.कार्य.अभि. (स्लम) :** सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते कमी प्रमाणात आहेत. लहान लहान रस्त्यामध्ये खांडकी टाकणेच योग्य होईल. सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करण्याची आवश्यकता भासल्यास तशी संचिका मा.आयुक्तांच्या मंजूरीला देण्यांत येऊन कार्यवाही करता येईल.

**श्री.सलीम पटेल :** १० फुटांच्या गल्ल्यामध्ये खांडकीच बसविण्यांत यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** रस्त्यामध्ये खांडकी किंवा सिमेंट कॉंक्रीटची कामे करतांना जर रस्त्याच्या खाली ड्रेनेज लाईन असेल त्यांचा विचार करुन कार्यवाही करावयास पाहिजे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** ज्या रस्त्याखालून ४ इंची ड्रेनेज लाईन जातात त्या रस्त्यामध्ये सिमेंट कॉंक्रीट न करता खांडकी बसवावी. शहरात काही ठिकाणी ड्रेनेज लाईन असलेल्या रस्त्यामध्ये मोठमोठ्या इमारती झालेल्या आहेत. याबाबत प्रशासन काय कार्यवाही करणार.

**मा.आयुक्त :** रस्त्याचे रुंदीप्रमाणेच रस्त्याचे कामात बदल होणे जरुरीचे वाटते. एकाच ठिकाणी दोन वेळेस काम होऊ नये. रस्त्याचे रुंदीवर ते डांबरीकरण करावे, खडीरस्ता करावा की फरशी करावी इ.रस्त्याचे वर्गीकरण करुन ठरविण्यांत येणे योग्य राहील.

**विद्युत :**

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** विद्युत,रस्ते, यांत्रिकी कामे एकाच अधिकाऱ्यांकडे दिली असून कोणतेच काम वेळेवर होत नाही. यासाठी वेगवेगळे अधिकारी नेमावेत.

**मा.आयुक्त :** महानगरपालिकेमध्ये दोन कार्यकारी अभियंता पदे भरण्या बाबत सार्वजनिक बांधकाम खात्याचे निकषाप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

**मा.सभापती :** विद्युत विभागाचे अधिकारी हे चांगल्या प्रकारे कामे करत नाही. अशी बऱ्याच लोकांच्या तक्रारी आहेत. म.रा.विद्युत मंडळास आपण पैसे देतो. त्यांनी पोल दिले नाही काय? माहिती द्यावी. जी.आय.पोलची तरतूद नवीन पोलमध्ये समावेश करता येईल काय?

**मा.आयुक्त :** सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार प्रशासन कार्यवाही करेल. आपण आपल्या सूचना मांडाव्या.

**मा.सभापती :** मागच्या वेळेस महानगरपालिकाचे पोल होते. त्यावर एम.एस.ई.बी.ने दोनच तारा ओढलेल्या होत्या. विद्युत विभागाच्या संदर्भात आपल्या सर्वांच्या संमत्तीने एक स्पेशल बैठक घेऊन निर्णय घेता येईल.

**इतर अस्थायी अग्रीम (साठा खरेदी)**

**मा.आयुक्त :** शेड्युल "अे" मधून कमी करुन हे साहित्य ठेकेदाराने स्वतः खरेदी करावे. काही वेळा असे होते की, सिमेंट, स्टील हे वेळेवर देवू शकत नाही.

**मा.सभापती :** २ कोटी ऐवजी २५ लाखांची तरतूद करण्यास मंजूरी देण्यांत येते.

**सुलभ शौचालय आणि स्त्री पुरुषांकरिता मुताऱ्या बांधणे :**

**मा.सभापती :** सुलभ शौचालय कुठे करण्यांत येतील. जागा उपलब्ध आहेत काय?

**मा.आयुक्त :** सुलभ शौचालय हे ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होतील त्या ठिकाणी बांधण्यांत येईल.

**नवीन उद्याने :**

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** तत्कालीन आयुक्त श्री.भोगे साहेब यांनी ज्याप्रमाणे उद्याने विकसीत केले होते. त्याप्रमाणे उद्याने विकसीत करावीत. आणखी यात वाढीव निधिंचा समावेश करावा.

**उपआयुक्त (म.) :** महाराष्ट्र शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिकेला "वृक्षमित्र पुरस्कार" मिळालेला आहे.

**मा.सभापती :** २० लाख ऐवजी आणखी १० लाख म्हणजेच एकूण ३० लाखांची नवीन उद्याने विकसीत करण्यासाठी तरतूद करण्यांत येते.

**इतर विकास इमारती :**

**मा.सभापती :** अद्ययावत कत्तलखाना कुठे करण्यात येणार आहे, माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :** पडेगांव येथे करणार आहेत. यासाठी सेंट्रल गव्हर्नमेंट खर्च करणार आहे. त्यासाठी आपणाला प्रशासकीय कार्यवाही करावी लागणार आहे.

**पशुधन विकास अधिकारी :** अद्ययावत कत्तलखान्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता. ३.७४ कोटी पैकी २.८४ कोटी मंजूर झाले आहे. त्यापैकी १० लाख पहिला हप्ता मंजूर होऊन आलेले आहे. पडेगांव येथेच लहान व मोठे जनावरांसाठी कत्तलखाना याच ठिकाणी राहील.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** हे स्थलांतर झालेले नाही.

**मा.आयुक्त :** अधिसूचना काढायची कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.गणेश तांबे :** पडेगांव येथील कत्तलखाना भावसिंगपुरा लगत येतो. येथील लोकांना घाण वास येतो. ज्या पध्दतीने साफसफाई ठेवावयास पाहिजे. तशी होत नाही. लोकांना जाण्या-येण्यास रस्ता नाही. रस्त्यावरच सर्व घाण पडलेली असते. हा कत्तलखाना शहरापासून दूर पाहिजे होता. पडेगांव हे शहरा लगतच येते. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या बाबत प्रशासनाने दखल घ्यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** ज्यावेळेस कत्तल होते, जी घाण साचते ती रस्त्यावर किंवा त्यापासून वास नागरिकांना येणार नाही याची काळजी घेण्यांत येते.

**श्री.गणेश तांबे :** हाडाच्या कारखान्यामुळे वास येतो.

**श्री.भरत लकडे, श्री.मधुकर सावंत :** हाडाचा कारखाना बंद करावा.

**श्री.जगदिश सिध्द :** बारुदगरनाला येथे रस्त्यावर लोक अनधिकृत दुकाने करुन मटन व बीफची विक्री करतात. रस्त्यावर घाण दिसून येते. त्याच रस्त्यावरुन काही लोक मंदिरात वगैरे जातात. स्वच्छतेबाबत काळजी घेण्यांत यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** संबंधित लोकांनी परवानगी घेतलेली असून त्यांच्याकडे लायसन्स पण आहे. त्यांनी जर अनधिकृत जागेवर बांधकाम करुन दुकाने केली असतील तर चौकशी करण्यासाठी आपल्याकडे एक फिरते वाहन आहे. माहिती घेऊन कार्यवाही करता येईल.

**मा.आयुक्त :** ज्यांनी परवानगी घेतली आहे ती कशा प्रकारे देण्यांत आली याची चौकशी होईल. प्रोव्हेंशनल अँड फुड ॲडल्ट्रेशन ॲक्टच्या तरतूदीनुसार कार्यवाही करावी व ज्यांनी अनधिकृतपणे दुकाने टाकलेली आहे ती बंद करण्यांत येईल.

**श्री.भरत लकडे :** भाजी मंडई जवळ मच्छ विक्रेते व्यवस्थीत विक्री करत नसून स्वच्छता ठेवत नाही.

**श्री.मधुकर सावंत :** शहरातील मुख्य रस्त्यावर विक्री करण्यास अशा लोकांना परवानगी देण्यांत येऊ नये.

**मा.आयुक्त :** ज्यांच्याकडे परवानगी नाही त्यांचे टपरी दुकाने काढण्या बाबत कार्यवाही होईल. वजे विक्रेते चांगल्या प्रकारे म्हणजेच स्वच्छता ठेवून विक्री करत नाही अशांवर कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.जगदिश सिध्द :** याबाबत संपूर्ण शहरात सर्व्हे केला तर बरेचशे विक्रेते आपणांस रस्त्यावर विक्री करतांना दिसून येतील. ज्यांना परवानगी दिलेली आहे. त्याच्यासाठी कुठे तरी दुसरीकडे जागा पाहून कार्यवाही व्हावी.

**सौ.विजया रहाटकर :** वाचनालयासाठी १५ लाखांपेक्षा जास्त तरतूद करावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** व्यापारी संकुल करावे व महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल यासाठी योग्य अशा ठोस उपाय योजना करण्यांत याव्यात. जे नियम अटी ठेवण्यांत आलेल्या आहेत. त्यांचे वेळेवर पाहन होत नाही. जे जुने आहेत त्याचाही विकास करावा.

**मा.आयुक्त :** बोल्ट ( ) पध्दतीने विकास करता येईल. पुणे महानगरपालिकेकडून माहिती घेण्यांत येत आहे. महानगरपालिकेच्या जागांचा सर्वेक्षण करुन ही योजना कार्यान्वित करता येईल.

**श्री.कैसर खान बद्रोद्दीन :** क्रांतीचौक येथील स्मशानभूमीचा विकास करणार आहे किंवा नाही याबाबत खुलासा करावा.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** कचरा उचलण्यासाठी वाहने खरेदी करण्यांत यावीत.

**श्री.मधुकर सावंत :** लहान-लहान गल्ल्यांमधील कचरा उचलण्यासाठी रिक्षा खरेदी केल्यास योग्य होईल.

**मा.सभापती :** वाहन खरेदीसाठी २० लाख ऐवजी ३० लाखांची तरतूद करण्यांत येते.

**श्री.सलीम पटेल :** किती गाड्या व कोणत्या खरेदी करणार यांचा उल्लेख असावयास पाहिजे. पाणी वाटपासाठी लागणाऱ्या गाड्या किती खरेदी करणार.

**मा.आयुक्त :** कचरा व पाणी वाटपासाठी लागणाऱ्या गाड्या खरेदीसाठी २० लाख व १० लाखांमध्ये अधिकारी यांच्या गाड्या खरेदी करण्यासाठी कार्यवाही करता येईल.

**श्री.मधुकर सावंत :** वार्डातील विविध प्रकारची विकास कामे करावी लागतात. त्यामुळे जी तरतूद करण्यांत आली ती कमी असून यात वाढ करावी. नांदेड मनपामध्ये पाच-पाच लाखांची तरतूद केलेली आहे.

**श्री.सलीम पटेल :** वार्डात ऐनवेळी विकासाची कामे उद्‌भवतात. करिता २.२० कोटी पेक्षा जास्त तरतूद करावी व हे संगणक केंद्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात न ठेवता मनपाच्या इमारतीमध्ये ठेवावे.

**मा.आयुक्त :** यात कोणत्याही प्रकारची काटकसर केलेली नाही. यासंबंधी काही सन्माननीय सदस्यांशी माझी चर्चाही झालेली आहे. तसेच स्वेच्छा निधीतून प्रत्येक सन्माननीय सदस्यांचे निधीमधून २५ हजार रुपये जमा करुन संगणक प्रशिक्षण केंद्राची उभारणी करावयाची असून यात हार्डवेअर व सॉफ्टवेअर असे दोन प्रकारे प्रशिक्षण देणार आहोत.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** ज्यांनी अतिक्रमण करुन घरे बांधलेली आहेत ती काढण्याबाबत प्रशासन का कार्यवाही करत नाही. पावसाळ्यांत पाण्याच्या प्रवाहामुळे अडचण निर्माण होते.

**मा.आयुक्त :** बऱ्याचशा लोकांनी पाण्याचा प्रवाह बंद करुन घरे बांधलेली दिसून येतात. ती अतिक्रमणातच येत असेल तर तात्काळ कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** शिवशंकर कॉलनी, चेतनानगर येथील नाल्याच्या बाजुला लोकांनी घरे केलेली आहेत ती नियमाने तात्काळ काढावीत.

**मा.आयुक्त :** शिवशंकर कॉलनी व इतर ठिकाणचे मोठे नाल्यांच्या प्रवाहास अडथळा होत असेल तर कायदेशीर कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** महापालिका फेस्टीवल सात दिवस चालेल.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** क्रिडा स्पर्धेत हॉकीचा समावेश करावा.

**मा.सभापती :** दुरुस्ती करण्यांत यावी.

**सौ.विजया रहाटकर :** पुणे, मुंबई प्रमाणे औरंगाबाद मध्येही सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यांत यावे. यात १८ लाखांपेक्षा जास्तीची तरतूद करण्यांत यावी.

**मा.सभापती :** पुणे, मुंबई प्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**श्री.जगदिश सिध्द :** महानगरपालिकेच्या शिक्षणाचा दर्जा सुधारावा. शिक्षणाचा दर्जा अत्यंत खालावलेला आहे.

**श्री.मोतीलाल जगताप :** डिसीप्लीन ठेवत नाही, त्यांना मोमो दिले आहे का?

**मा.आयुक्त :** सध्या मनपाकडे शिक्षणाधिकारी पद रिक्त असून प्रभारी शिक्षणाधिकारी म्हणून चार्ज दिलेला आहे. शिक्षणाधिकारी मिळावा यासाठी मी मागणी केलेली आहे. शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी जे शिक्षक कर्मचारी आहेत. त्यांच्यात सुधारणा करणे अत्यंत आवश्यक आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** शिक्षणाचा दर्जा खरोखरच खालावलेला असून शिक्षणाधिकारी येतील तेव्हा येतील. तोपर्यंत जे शिक्षक आहेत. त्यांना सक्त ताकीद देऊन मुलांच्या शिक्षणात सुधारणा कशा पध्दतीने करता येतील तशा सूचना कराव्यात. काही शाळांमध्ये शिक्षकच गैरहजर असतात. मुले कुठेही फिरतांना दिसतात. यासाठी कुणाचा तरी वचक शिक्षकांवर असला पाहिजे. काही शाळांमध्ये मुलांना साहित्य उपलब्ध होत नाही.

**श्री.गणेश तांबे :** काही शाळांमध्ये शिक्षक नाहीत. एकाच शिक्षकाकडे दोन-दोन वर्ग देण्यांत आलेले असून मुलांना शिकवितांना, समजावून सांगतांना त्यांचे इतरत्र दुर्लक्ष होते. जेथे शिक्षक कमी आहेत. तेथे शिक्षक देण्यांत यावेत.

**श्री.मोतीलाल जगताप :** शिक्षकांकडून चुका झाल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही न झाल्यास शाळेचा दर्जा सुधारण्यास मदत होणार नाही.

**मा.आयुक्त :** काही शाळांमध्ये मी स्वत: जाऊन पाहणी केलेली आहे. शिक्षकांना साधा-सोपा प्रश्न विचारल्यास त्याचे उत्तर देता येत नाही. यासाठी वार्ड कमेटी नेमून त्या कमिटीमध्ये २ ते ३ सन्माननीय सभासद असतील. कमिटीने वेळावेळी पाहणी करुन लक्ष ठेवल्यास शाळेचा दर्जा आपोआपच सुधारेल असे वाटते.

**श्री.मोतीलाल जगताप :** मुकूंदवाडी येथील शाळेत एक शिक्षक अवेळी येऊन फक्त सही करतात व शाळेच्या वेळेपर्यंत थांबून निघून जातात. मुलांना काहीही शिकवत नाही व तेथील मुख्याध्यापकांचाही संबंधित शिक्षकांवर काहीही वचक नाही.

**मा.सभापती :** असे शिक्षक कर्मचारी कुणी आढळून आल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** मागच्या वेळेस शालेय मुलांना वेळेवर गणवेश मिळाले नव्हते. यावेळेस तसे होता काम नये. वेळेवर कपडे देण्यांत यावेत. कपड्याची क्वॉलिटी चांगली पाहिजे.

**मा.आयुक्त :** यासाठी स्थायी समितीचे सभासदांपैकी एक कमिटी नेमण्यांत यावी.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** मालमत्ता संपादन करण्यासाठी मागील वर्षी ४ कोटींची तरतूद केलेली होती. यावेळेस कमी ठेवण्यांत आली आहे. खुलासा करावा.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** रु.२.२५ कोटी रुपयामध्ये शहराचा विकास होणार नाही. ५ कोटीची तरतूद करावी.

**मा.आयुक्त :** यात २.२५ कोटी दिलेले आहे. आणखी १ कोटी वाढवू शकतो.

**मा.सभापती :** मालमत्ता संपादन करणेसाठी २.२५ कोटी तरतूदीत १ कोटीची वाढ करण्यांत येऊन ३.२५ कोटी करण्यांत येते.

**मा.सभापती :** क्रमांक १ ते १० च्या संदर्भात मा.आयुक्त यांचेशी चर्चा झालेली आहे. ११ स्वेच्छानिधीमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात संगणक केंद्र उभारणे.

**श्री.सलीम पटेल :** स्वेच्छा निधीमधून संगणक प्रशिक्षण द्यावयाचे असे या अगोदरच ठरलेले होते काय?

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** संगणक प्रशिक्षण तेथे ठेवू नये. तेथील विद्यार्थ्यांसाठीच आहे असे वाटते. यात स्थानिक मुलांना सुध्दा लाभ मिळावा अशी अपेक्षा आहे.

**मा.आयुक्त :** प्रशिक्षण केंद्र निश्चित करण्याचे कारण म्हणजे काही सन्माननीय सदस्यांनी तशा सूचना केलेल्या होत्या व ते प्रशासन व त्यांनाही मान्य होते. त्यानुसार यात तरतूद केलेली आहे.

**श्री.सलीम पटेल :** शहरात एकूण चार ठिकाणी हे प्रशिक्षण देण्यांत यावे अशी विनंती. इमारतीचे बांधकाम लवकरच पूर्ण होणार आहे. टाऊन हॉल येथील इमारतीमध्ये हे प्रशिक्षण केंद्र उघडावे.

**मा.सभापती :** सभागृहाच्या सम्मतीने संगणक प्रशिक्षण हे टाऊन हॉल येथील इमारतीमध्येच चालू करण्यांत यावे.

**मा.आयुक्त :** यात दोन प्रकार असणार. हार्डवेअर, सॉफ्टवेअर, कर्मचारी नेमतांना टेंडर काढून ठेकेदारी पध्दतीने कार्यवाही करावी लागणार आहे.

**श्री.जगदिश सिध्द :** मनपाचे जनसंपर्क कार्यालय लहान असून त्या ठिकाणी बसण्यासाठी येणाऱ्यांना जागा अपुरी पडते. ते मनपाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ कार्यान्वित करावे. औरंगाबादचे स्थानिक दैनिक वृत्तपत्र हे जवळ-जवळ २७ ते २८ आहेत. या वृत्तपत्रात मनपा संदर्भात विविध प्रकारच्या बातम्या छापून येतात. त्याचा खुलासा जनसंपर्क अधिकारी यांच्या विभागांकडून व्हावयास पाहिजे. काही बातम्या मनपाच्या विरोधात असतात. त्यामुळे मनपाची बदनामी होत आहे.

**मा.आयुक्त :** सध्या जागा आपणाकडे अपुरी असून नवीन इमारतीचे बांधकाम चालू आहे. तेथे जनसंपर्क कार्यालयासाठी जागा देण्यांत येणार आहे.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी सर्वच मुद्दयांवर सुचविलेल्या सर्व बाबींची प्रशासनामार्फत अंमलबजावणी व्हावी व आजच्या या सभेस सर्वांनी सहभाग घेऊन चांगल्या रितीने सभा कामकाज पार पाडल्याबद्दल अभिनंदन करतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्या नुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यांत आलेले सन १९९९-२००० चे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु.८८ कोटी ३३ लाख ५४ हजार जमा व ८८ कोटी २२ लाख ६५ हजार खर्चाचे अंदाजपत्रकास तसेच ३१ जुलै, २००० पर्यंत चे लेखाअनुदान २९ कोटी १० लाख ६९ हजार जमा व २८ कोटी ४६ लाख ९५ हजार खर्चाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच प्रशासनातर्फे सन २०००-२००१ वर्षाकरिता सभागृहासमोर सादर करण्यांत आलेल्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे फेरफार व दुरुस्ती करण्यांत येते.

**<u>जमा बाजू</u>**

(आकडे हजारात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ अंदाजपत्रकीय तरतूद | स्थायी समितीने सुचविलेली तरतूद |
|---|---|---|---|
| १. | <u>पोट विभाग - ह</u><br>१) इतर अस्थायी अग्रीम | १९००० | १५०० |

**खर्च बाजू**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | पोट विभाग - ह<br>१) इतर अस्थायी अग्रीम | २०००० | २५०० |
| २. | इतर भांडवली कामे<br>१) नवीन वाहन खरेदी<br>२) नवीन उद्याने<br>३) विकास आराखड्याच्या अंमलबजावणी साठी जमीन आणि इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे. | <br>२०००<br>२०००<br>२२५०० | <br>३०००<br>३०००<br>३२५०० |
| ३. | पाणी पुरवठा महसुली खर्च<br>१) म.रा.वि.मंडळ विद्युत देयक | <br>१४०००० | <br>१२८००० |

**दुरुस्ती व निर्णय :**

१. सिमेंट व लोखंड साठा खरेदी न करता गुत्तेदाराने मार्केटमधून खरेदी करावे. त्यांचे थर्ड पार्टी इन्स्पेक्शन ठेवण्यांत यावे. साठा खरेदी करु नये.
२. खांडकी रस्ते हे आवश्यक त्या ठिकाणीच सर्व्हे करुन तयार करावे व अरुंद गल्लीमध्ये फक्त कॉंक्रीट रस्ते यापुढे तयार करावेत.
३. देखभाल/दुरुस्ती करिता फक्त रु.१५ लाखापर्यंत पाईप खरेदी करण्यात येऊन ते देखभाल व दुरुस्ती करिता ते वापरावे. मोठ्या कामासाठी गुत्तेदाराने खरेदी करावी. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन त्यामध्ये असावे.
४. स्वेच्छा निधीतून सुरु करण्यांत येणार संगणक प्रशिक्षण केंद्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राऐवजी टाऊन हॉल येथे सुरु करावे.
५. शहरात खुल्या गटारी हया, ज्या ठिकाणी नैसर्गिक उतार आहे. अशा ठिकाणीच बांधण्यांत याव्यात व नाल्याची दुरुस्ती करण्यांत यावी.
६. क्रिडा स्पर्धेमध्ये हॉकी या खेळाचा समावेश करावा.
७. शिक्षणाधिकारी हे पद कायमस्वरुपी तात्काळ भरण्यांत यावे. रस्ते/ड्रेनेज/मेकॅनिक/विद्युत या विभागाकरिता स्वतंत्र दोन कार्यकारी अभियंता पदाच्या निर्मितीची कार्यवाही करण्यांत यावी.
८. मनपा शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढविण्या बाबत प्रशासनाने जास्त प्रयत्न करावेत.
९. १५ ऑगस्ट पुर्वी विद्यार्थ्यांना गणवेश देण्यांत यावे.
१०. जकातीचे खाजगीकरण प्रक्रिया ही तात्काळ करण्यांत यावी.

उपरोक्त दुरुस्ती व फेरफारासह सन २०००-२००१ चे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.१३३ कोटी ७० लाख ३५ हजारचे जमा व १३३ कोटी ४८ लाख ९५ हजार खर्चाच्या आणि २१.४० लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यांत येवून सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ३-०८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दि. ०३-०८-२००० रोजी मा. सभापती अविनाश लक्ष्मण कुमावत यांच्या अध्यक्षेतखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३-३० वा. "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) श्री. अशरफ मोतीवाल | सदस्य |
| २) श्री. कावडे साहेब राणुबा | --//-- |
| ३) श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ४) श्री. गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ५) श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | --//-- |
| ६) श्री. जगदीश कन्हैयालाल सिध्द | --//-- |
| ७) श्री. जाबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | --//-- |
| ८) श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुराव | --//-- |
| ९) श्री. लकडे भरत श्रीपती | --//-- |
| १०) श्री. वाघ भाऊसाहेब बाबुलाल | --//-- |
| ११) सौ. विजया किशोर रहाटकर | --//-- |
| १२) श्री. सलीम पटेल शमशेर पटेल | --//-- |
| १३) श्री. सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १४) श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

**संवाद :**

**सौ. विजया रहाटकर :** गेल्या दोन-तीन दिवसांपुर्वीच घटनेत अमरनाथ झालेल्या हल्ल्यात काही यात्रकरुंचा मृत्यु झाला. अशा निष्पाप लोकांवर हल्ला झाला त्याबद्दल सभागृहात निषेधाचा ठराव पास करावा व जे लोक यात मृत्युमुखी पडले अशांना ०२ मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** थोर साहित्यीक सरदार अली जाफरी यांचे निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे. निषेधाचा ठराव पास करण्यात येतो. या घटनेत जे लोक मृत्युमुखी पडले अशांना व सरदार अली जाफरी यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(याच वेळी सभागृहात सर्वजण उभे राहुन ०२ मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**मा. सभापती :** अगोदर विषयपत्रिकेवरील विषय मंजुर करण्यात येतील व त्यानंतर चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

**विषय क्र. २४/१ :**

दिनांक ६-७-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे व दिनांक ११-७-२००० रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती :** मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक ६-७-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे व दिनांक ११-७-२००० रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फत्तेसिंगपुरा व नेहरुनगर किराडपुरा येथे १००,१५० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. ८,४३,७५०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च "भांडवली कामे" या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. करिता अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फत्तेसिंगपुरा व नेहरुनगर किरडपुरा येथे १००,१५० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ८,४३,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद : (चर्चा)**

**श्री. मधुकर सावंत :** पत्रकार कक्षात योग्य सुविधा देण्यात येत नाही. तसेच इतिवृत्ताच्या प्रती देण्यात आलेल्या नाही अशी त्यांनी सुचना केली आहे.

**मा. सभापती :** पत्रकारांसाठी जनसंपर्क अधिकारी यांचेकडे इतिवृत्ताच्या प्रती देण्यांत आलेल्या होत्या. त्यांनी का दिल्या नाही याचा खुलासा तेच करु शकतील व ते सध्या उपस्थित नाहीत. यापुढे असे होऊ देऊ नये.

**विषय क्र. २६/३ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी पंपगृह येथील मुख्य पॅनल बोर्ड दुरुस्तीच्या कामासाठीचे अंदाजपत्रक र.रु. २,२०,७२३/- ला मा. आयुक्त यांनी दि. २५-३-२००० रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

या कामासाठी वर्तमापत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील तीन एजन्सीजनी निविदा सादर केल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. अभिरुध्द इलेक्ट्रीकल औ.बाद | रु. २,२०,७२३/- (अं.प. दराने) |
| २. | मे. लुना इलेक्ट्रीकल, औरंगाबाद. | रु. २,५३,८३१/- (१५% जास्त दराने) |
| ३. | मे. रेणुका इलेक्ट्रीकल, औरंगाबाद. | रु. २,३१,७५९/-(५% जास्त दराने) |

वरीलप्रमाणे सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. अभिरुध्द इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांची निविदा प्राप्त दरामध्ये ५% दर कमी करुन मा. आयुक्त यांनी मंजुर

केलेली आहे. त्यामुळे निविदेची किंमत रु. २,०९,६८७/- एवढी येते. तरी प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**श्री. दलबीरसिंग जाबिंदा :** पॅनल बोर्ड दुरुस्ती संदर्भात टेंडर दुसऱ्यांला देतो आहे. मनपा तर्फे करावयास पाहिजे. १० वर्षापासुन गरज पडली नाही.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** मटेरीयल सहीत दुरुस्तीची कामे यातुन करण्यात येणार असुन एकदा दुरुस्ती केल्यानंतर १० वर्षे दुरुस्ती करण्याची गरज पडत नाही.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी पंपगृह येथील मुख्य पॅनल बोर्ड दुरुस्तीच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराची निविदाधारक मे. अभिरुध्द इलेक्ट्रीकल औरंगाबाद यांची अं.प. दरामध्ये ५% दर कमी करुन र.रु. २,०९,६८७/- एवढया किंमतीच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७/४ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मोतीकारंजा नाईकवाडा येथे दगडी अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता सा.बां. खाते यांच्या ९८-९९ च्या दरसुचीनुसार र.रु. १,५४,७०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. १४-७-२००० रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करिता सदरील कामासठी तयार करण्यात आलेले र.रु. १,५४,७०५/- च्या अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** दगडी अर्धगोलाकार गटार करण्याऐवजी भुमीगत गटार करावे.

**प्र.कार्य.अभि. (स्लम) :** भुमीगत गटार करणे योग्य होणार नाही. जे विद्यमान काम केलेले आहे ते तोडावे लागेल व खर्चही वाढेल. त्यासाठी अर्धगोलाकार गटारच करणे फायदेशीर राहील. हे काम विद्यमान गटारीची वाढ करणे बाबतचे आहे.

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी विभागीय कार्यालये मेलेरिया विभाग व इतर कार्यालये यांना लागणारे किटकनाशक खरेदीसाठी खाली नमुद केलेल्या वर्तमानपत्रात जाहिर निविदा सुचना करण्यात येऊन निविदा दरपत्रके मागविण्यात आले.

१. दै. लोकमत, २) दै. लोकमत समाचार, ३) दै. लोकविजय, ४) दै. विश्वमित्र.

वरील प्रमाणे एकुण चार वर्तमापत्रात निविदा सुचना प्रसिध्द झाले नुसार चार निविदा दरपत्रके या विभागास प्राप्त झाली. प्राप्त निविदा दरपत्रकानुसार प्राप्त झालेले दर खालील प्रमाणे असुन रेखांकीत:अधोरेखीत केलेले दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असुन त्या दरास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | इन्शा ट्रेडिंग कं. | एस.बी. सर्व्हीसेस | सल्वा इंटरप्रायजेस | रोशन सेल्स कॉर्पोरेशन |
|---|---|---|---|---|---|
| १ | काळे फिनेल आरडब्युसी | १९.५० प्र.लि. | २०.९० प्र.लि. | २०.५० प्र.लि. | १९.५० प्र.लि. |
| २. | नुव्हान सिबाका | ३९५.०० प्र.लि. | ३९१.९० प्र.लि. | ३८५.०० प्र.लि. | ३८०.०० प्र.लि. |
| ३. | बॅक्टीरिनो कार्वोलिक पावडर | १८.०० प्र.लि. | १७.९० प्र.लि. | १७.६० प्र.लि. | १८.२० प्र.लि. |

वरील प्रमाणे आधोरेखित केलेले दर त्या त्या एजन्सीचे असुन ज्या ठिकाणी समान दर आहेत ते साहित्य विभागून देण्यात येईल. किटकनाशके खरेदी साठी अंदाजे रुपये १०,००,०००/- खर्च येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** एक वर्षासाठी किती लिटर फिनेल लागते त्याचा खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** एक वर्षासाठी फिनेल २५ हजार लिटर तर नुव्हान सिबाका ३० हजार लिटर व २० हजार किलो कार्वोलिक पावडर लागते.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या अगोदरचे घेतलेले फिनेलचा किती वापर करण्यात आला. झोनमध्ये तर ५-५ लिटर डब्बे सरळ १०-२० रुपये लिटरने विकले जातात. कर्मचारी कुठेही फवारणी करतांना दिसत नाही.

**श्री. मधुकर सावंत :** किती वेळेस फवारणी केल्या जाते व आतापर्यंत कुठे करण्यात आली त्याची माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** या संदर्भात झोनमधून माहिती घ्यावी लागेल. झोनच्या मागणीनुसार पुरवठा होतो. आता फक्त दर मंजुर करुन घेतो आहे हा वार्षिक करार आहे.

**मा. सभापती :** याचा अहवाल झोनकडुन मागवावा. माहिती घ्यावी. आपण दर मंजुर करत आहोत.

**श्री. सुरगोणीवार :** १० वर्षात माझ्या वार्डात फवारणी नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** योग्य पध्दतीने याचा वापर होत नाही. मलेरिया होत असुन जास्तीचे पाणी टाकुन फवारणी होते आहे. यात जनतेचा पैसा जातो आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** फवारणी करतांना अगोदर तपासणी करण्यात येऊनच कार्यवाही करण्यात येते.

**मा. सभापती :** किती फिनेल लागते, किती खर्च होऊ शकेल, याची सविस्तर माहिती झोन वाईज पुढच्या बैठकीमध्ये देण्यात यावी. हा प्रस्ताव स्विकृतीसह मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी विभागीय कार्यालये, मलेरिया विभाग व इतर कार्यालयांना लागणारे किटकनाशके खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार काळे फिनेल आर.डब्ल्यु.सी. साठी ईन्शा ट्रेडिंग कं. रोशन सेल्स कॉर्पोरेशन यांच्या र.रु. ३८०-०० प्रति लिटर या दरास, नुव्हान सिबाका साठी मे. रोशन

सेल्स कॉर्पोरेशन यांच्या र.रु. ३८०-०० प्रति लिटर या दरास व बॅक्टीरिनो कार्बोलिक पावडर साठी सल्वा इंटरप्रायजेस यांच्या १७-६० प्रति किलो या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. तसेच ज्या एजन्सीजचे दर समान असतील त्यांना साहित्य विभागून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९/६ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी विभागीय कार्यालये, मलेरिया विभाग व इतर कार्यालये यांना लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी खालील वर्तमापत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा दरपत्रके मागविण्यात आली.

१. दै. लोकमत, २) दै. लोकमत समाचार, ३) दै. लोकविजय, ४) दै. विश्वमित्र.

वरील प्रमाणे एकुण सहा निविदा प्राप्त झाल्या. तथापी कागदपत्रा अभावी फक्त चार निविदा दरपत्रके उघडण्यात आली. प्राप्त निविदा दरपत्रकानुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे ॲटम क्रमांक त्या त्या एजन्सीच्या नांवा समोर खालील प्रमाणे दर्शविलेले आहेत. सदरील प्राप्त दरास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. इन्शा ट्रेडिंग कं. | ॲटम क्र. २ ते १७,१९,२१ ते २६,२८ ते ३२,३४ ते ४५,४७ ते ५१ (एकुण ४५ ॲटम्) |
| २. | मे. भारत स्टोअर्स. | ॲटम क्र. १,१८,१९,२७,३३ व ४६ (एकुण ६ ॲटम्) |
| ३. | मे. एस.बी. सर्व्हीसेस. | ॲटम क्र. २० फक्त |

सोबत तुलनात्मक दराचा तक्ता जोडलेला आहे. सन २०००-२००१ या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी अंदाजे रुपये ३.७५ लक्ष खर्च येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी विभागीय कार्यालये, मलेरिया विभाग व इतर कार्यालये यांना लागणारे स्वच्छता साहित्य खरेदीसाठी मागविण्यात आलेल्या निविदानुसार प्राप्त झालेल्या निविदा दरपत्रकाप्रमाणे खालील दर्शविल्यानुसार त्या त्या एजन्सीजच्या नांवासमोर दर्शविलेल्या ॲटमकरिता दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. इन्शा ट्रेडिंग कं. | ॲटम क्र. २ ते १७,१९,२१ ते २६,२८ ते ३२,३४ ते ४५,४७ ते ५१ (एकुण ४५ ॲटम्) |
| २. | मे. भारत स्टोअर्स. | ॲटम क्र. १,१८,१९,२७,३३ व ४६ (एकुण ६ ॲटम्) |
| ३. | मे. एस.बी. सर्व्हीसेस. | ॲटम क्र. २० फक्त |

या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/७ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारी स्टेशनरी कॉम्प्युटर खरेदीसाठी खालील वर्तमान पत्रात जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येवुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली.

१. दै. लोकमत, २) दै. लोकमत समाचार, ३) दै. लोकविजय, ४) दै. विश्वमित्र.

वरील प्रमाणे एकुण १० निविदा प्राप्त झाल्या. पैकी कागदपत्रा अभावी दोन निविदा उघडण्यात आल्या नाहीत. एकुण आठ निविदा दरपत्रकानुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे ॲटम क्रमांक खालीलप्रमाणे त्या त्या एजन्सीच्या नांवासमोर दर्शविण्यात आले आहेत. सदरील प्राप्त कमी दरास मा. आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विजय जनरल स्टोअर्स | ॲटम क्र. २, ५, ११, १२, १४, २२, २५, २७, ४५, ५३, ५४, ६०, ७१, ७२, ७३, ७६, ८४, ९९ व ११७ (एकुण १९ ॲटम्) |
| २. | मे.एम.जे.ट्रडिंग कं. | ॲटम क्र. ३, ९,१०,१३ (अ), (ब), १४,१९,२२ (अ), २३,२६,२७,२९,३६,५४,५६,५९,६०,६९,७२,७३,८४,९१ ,९५ ते ९९, (एकुण २७ ॲटम) |
| ३. | मे. मुरली स्टेशनर्स | ॲटम क्र. १, ८, १३, (अ), (ब), १४, १५, १६, १८, २०, २१, २२ (अ), २४, २६, २७, २८, ३१, ३४, ३९, ४२, ४५, ५९, ६०, ६१, ६९, ७१, ७२, ८१, ८६, ८७, ८८, ८९, ९४, १०१, व ११८. (एकुण ६५ ॲटम) |
| ४. | मे. प्रियंका ट्रेडर्स. | ॲटम क्र. ४,६ (एकुण २ ॲटम) |
| ५. | मे.आर.एल. दौलताबादकर | ॲटम क्र. ७, १७, ४०, ४१, ४४, ५२, ६३, ६४, ६६, ७५, ७८, ९२, १०४, १०५, १२३, १२९, १३२, १३३, १३४, १३६, १३८, १४०, १४२. (एकुण २३ ॲटम) |
| ६. | मे. न्यु भारत स्टोअर्स | ॲटम क्र. २२ (ब), ३२, ३३, ३५, ३९, ४५, ४७, ४८, ४९, ५०, ५५, ६२, ६५, ७०, ७७, ८२, ८३, ८६, ९३, १००, १०२, ११०, १११, ११२, ११४, ११५, ११९, १२०, १२१, ते १२८, १३०, १३१, १३९, १४१. (एकुण ६५ ॲटम) |
| ७. | मे.एस.एस. इंटरप्रायजेस | ॲटम क्र. १३ (क) (ड), ३०,५१,५७ (एकुण ५ ॲटम) |
| ८. | महिला अर्थिक विकास महामंडळ. | ॲटम क्र. ३७, ३८, ४३, ४६, ५८, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७४, ७९, ८०, ८२, ८५, ९०, १०३, १०६, १०७, १०८, १०९, ११३, ११६, १३५, १३७ (एकुण २५ ॲटम) |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे ॲटम दर दर्शविण्यात येऊन कामधेनु योजने अंतर्गत जे ॲटम देय असतील अशा ॲटममध्ये कमी आलेल्या दरानुसार ५०% खरेदी महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेकडुन करण्यात येईल. सोबत तुलनात्मकदराचा तक्ता जोडलेला आहे. सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी रुपये १२,००,०००/- अंदाजे खर्च येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारी स्टेशनरी/कॉम्युटर स्टेशनरी खरेदीसाठी प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे त्या त्या एजन्सीजच्या नांवासमोर दर्शविलेल्या ॲटमकरिता दरास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विजय जनरल | ॲटम क्र. २, ५, ११, १२, १४, २२, २५, २७, ४५, |

| | | |
|---|---|---|
| | स्टोअर्स | ५३, ५४, ६०, ७१, ७२, ७३, ७६, ८४, ९९ व ११७ (एकुण १९ ॲटम्) |
| २. | मे.एम.जे.ट्रडिंग कं. | ॲटम क्र. ३, ९,१०,१३ (अ), (ब), १४,१९,२२ (अ), २३,२६,२७,२९,३६,५४,५६,५९,६०,६९,७२,७३,८४,९१ ,९५ ते ९९, (एकुण २७ ॲटम) |
| ३. | मे. मुरली स्टेशनर्स | ॲटम क्र. १, ८, १३, (अ), (ब), १४, १५, १६, १८, २०, २१, २२ (अ), २४, २६, २७, २८, ३१, ३४, ३९, ४२, ४५, ५९, ६०, ६१, ६९, ७१, ७२, ८१, ८६, ८७, ८८, ८९, ९४, १०१, व ११८. (एकुण ६५ ॲटम) |
| ४. | मे. प्रियंका ट्रेडर्स. | ॲटम क्र. ४,६ (एकुण २ ॲटम) |
| ५. | मे. आर.एल. दौलताबादकर | ॲटम क्र. ७, १७, ४०, ४१, ४४, ५२, ६३, ६४, ६६, ७५, ७८, ९२, १०४, १०५, १२३, १२९, १३२, १३३, १३४, १३६, १३८, १४०, १४२. (एकुण २३ ॲटम) |
| ६. | मे. न्यु भारत स्टोअर्स | ॲटम क्र. २२ (ब), ३२, ३३, ३५, ३९, ४५, ४७, ४८, ४९, ५०, ५५, ६२, ६५, ७०, ७७, ८२, ८३, ८६, ९३, १००, १०२, ११०, १११, ११२, ११४, ११५, ११९, १२०, १२१, ते १२८, १३०, १३१, १३९, १४१. (एकुण ६५ ॲटम) |
| ७. | मे.एस.एस. इंटरप्रायजेस | ॲटम क्र. १३ (क) (ड), ३०,५१,५७ (एकुण ५ ॲटम) |
| ८. | महिला अर्थिक विकास महामंडळ. | ॲटम क्र. ३७, ३८, ४३, ४६, ५८, ६७, ६८, ६९, ७०, ७१, ७४, ७९, ८०, ८२, ८५, ९०, १०३, १०६, १०७, १०८, १०९, ११३, ११६, १३५, १३७ (एकुण २५ ॲटम) |

वरीलप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दर्शविण्यात आलेल्या ॲटमनुसार कामधेनू योजने अंतर्गत जे ॲटम देय असतील अशा ॲटमसमध्ये कमी आलेल्या दरानुसार ५०% खरेदी महिला आर्थिक विकास महामंडळाकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालयीन आदेश जा.क्र. मनपा/अस्था-१/८४७२/८२ दि. ७-१२-८२ अन्वये श्री. सिद्यीकी मोहंमद माहीयोद्यीन काझी अब्दुल रहेमान यांची बिल कलेक्टर या पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्री. सिद्यीकी काझी हे महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागात वसुली लिपीक म्हणुन कार्यरत असताना कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/१९७३/९२ दि. २९-५-९२ (दुरुस्ती आदेश क्र. मनपा/अस्था-१/५८२/९३ दि. २२-२-९३) अन्वये अर्जित रजेनंतर ते कामावर हजर झालेले नाही. तसेच रजेवर जातेवळी कुणालाही चार्ज दिलेला नव्हता, वास्तविक रजेवर जाण्यापुर्वी अन्य कर्मचाऱ्यास चार्ज हस्तांतरीत करुन जाणे आवश्यक होते. तथापी त्यांनी तसे न केल्यामुळे लेखा परिक्षण काम प्रलंबित झाले होते. तसेच पुढील कालावधीच्या

रजा मंजुरीच्या अर्जाच्या उत्तरी, अर्जित रजेचा हक्क शिल्लक नसल्याबद्दल व कामावर रुजु होणेबाबत त्यांना कळविण्यात आलेले होते. मात्र त्यांनी त्यांच्या दि. १२-१०-९२ च्या अर्जानुसार रजा मंजुर करण्यास किंवा रजा मंजुर होत नसल्यास त्यांचा राजीनामा समजण्यास कळविले. यावरुन त्यांना नोकरीत स्वारस्य नसल्याचे दिसुन येते.

सन १९९०-९१ मधील वसुली पोटी प्राप्त झालेल्या धनादेशापैकी न वाटलेल्या धनादेशाची एकुण र.रु. ३२,०७६/- बाबत विधी विभागास माहिती द्यावयाची होती. मात्र या कालावधीत वसुली रेकॉर्ड त्यांनी कार्यालयात जमा केलेले नसल्यामुळे प्रकरणात पुढील कार्यवाही होऊ शकलेली नाही.

उक्त सर्व बाबीवरुन श्री. सिद्दीकी काझी यांचे विरुध्द खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी श्री. सिद्दीकी काझी यांना मुळ पगारावर आणण्यात यावे. त्यांचा गैरहजर काळ विनापगारी करण्यात यावा व त्यांना कामावर रुजु करुन घेण्यात यावे अशी शिफारस केलेली होती.

तथापी संबंधीत कर्मचारी सतत गैरहजर असल्यामुळे तसेच त्यांनी कार्यालयीन अभिलेख सादर केलेले नाही. तसेच त्यास सेवेची आवश्यकता असल्याचेही दिसुन आलेले नाही. करिता चौकशी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची असहमती दर्शवुन त्यास कायमचे बडतर्फ करण्यात यावे. या निष्टकर्षास आयुक्त आल्यावरुन त्या संबंधाने खुलासा सादर करण्यासाठी श्री. सिद्दीकी यांस दि. ५-१२-९७ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तथापी या नोटीसच्या उत्तरी त्यांनी खुलासा सादर न केल्यामुळे पुन्हा दि. ७-३-९८ रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. या नोटीसच्या उत्तरी त्यांनी १७-३-९८ च्या अर्जान्वये खुलासा सादर केला. सदरचा खुलासा असमाधनकारक असल्याचे व त्यांना नोकरीची गरज नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

वरील सर्व परिस्थितीवरुन संबंधीत श्री. सिद्दीकी काझी मोहम्मद मोहीयोद्दीन अब्दुल रहेमान यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ चे नियम ३ चा भंग केलेला असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदीनुसार त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक आहे.

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपक्रम २(ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे नगरपालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

**सौ. विजय रहाटकर :** परिच्छेद क्र. ३ मध्ये दिले आहे सन ९०-९१ चे प्रकरण असुन रुपये ३२०७६/- रकमेची माहिती द्यावयाची होती. मात्र या कालावधीचे वसुली रेकॉर्ड त्यांनी कार्यालयात जमा केलेले नसल्यामुळे या प्रकरणात कार्यवाही होऊ शकली नाही. असे नमुद केलेले आहे. तर रेकॉर्ड गेले कुठे? यास कोण जबाबदार आहे. व केवळ रेकॉर्ड नाही म्हणुन कार्यवाही करणार नाही काय? या संदर्भात एक खाते चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करण्यात आलेली होती. एवढया मोठया रकमेचा अपहार झालेला असतांना चौकशी अधिकारी यांनी त्यांना कामावर मुळ पगारावर घेण्यात यावे अशी शिफारस केली असुन ज्याला मा. आयुक्तांनी नकार दिला आहे. आयुक्त नकार देतात परंतु चौकशी अधिकारी यांनी त्यांना कामावर घेण्याची

शिफारस केली तर चौकशी अधिकारी कोण होते त्यांचे नांवासहीत उल्लेख करावा.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** ९२-९३ चे प्रकरण असुन लेखा परिक्षण झाले त्याचा रिपोर्ट आलेला असेल. चौकशी मध्ये सविस्तर दिलेले असेल. माहिती द्यावी.

**सौ. विजया रहाटकर :** संबंधित कर्मचारी यांनी रक्कम हडप केलेली असून चौकशी करुन त्यांना बडतर्फ करुन प्रकरण संपेल का? यापुढे आणखी कुणी कर्मचारी ५० लाखापर्यंत अपहार करु शकेल. तर अशा कर्मचाऱ्यांना निलंबनच करुन चालेल काय? चौकशी करुन रक्कम त्यांचेकडुन वसुल करणार नाही का?

**उप आयुक्त (म) :** प्रशासनाने सविस्तर प्रस्ताव ठेवलेला असून त्यांना सेवेतून काढावे असे प्रशासनाचे मत आहे.

**श्री. मधुकर सावंत :** एखाद्या कर्मचाऱ्याकडे जास्तीची रक्कम असेल व ती रक्कम त्याने मनपामध्ये भरलीच नाही तर अशा कर्मचाऱ्यांना फक्त कामावरुन काढणार काय? असे होत असेल तर मनपाचे यात नुकसान होते.

**श्री. मोतीवाला जगताप श्री. दलबीरसिंग जबिंदा :** संबंधीताकडुन नुकसान भरपाई वसुल करावी. तसेच संबंधीत कर्मचाऱ्यांकडे कोणते पावती बुक देण्यात आले होते. त्यांचीही चौकशी करावी.

**मा. सभापती :** या प्रकरणात चौकशी अधिकारी कोण होते?

**सहा. आयुक्त-१ :** श्री. जी.एम.अंभोरे या प्रकरणात चौकशी अधिकारी होते.

**मा. सभापती :** या प्रकरणाचा चौकशी अहवाल वाचुन दाखववावा. पुढील सभेत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा सौ. विजया रहाटकर :** पुढील बैठकीत माहिती नको. याच बैठकीत संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. या प्रकरणात अधिकारी यांना अभ्यास नव्हता तर प्रस्ताव का ठेवण्यात आला.

**श्री. मधुकर सावंत :** एकुण ३२,०७६/- रक्कम कोण देईल. सभागृहात प्रस्ताव ठेवल्या नंतर संबंधीत अधिकाऱ्यांना त्याचा संपुर्ण अभ्यास पाहिजे. सभागृहात चर्चा होते. त्यावेळी अधिकारी सभागृहात संचिका पाहतात व सभागृहात वेळ वाया घालवतातत. बेजबाबदारपणे अधिकारी वागतात.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** प्रस्तावासंबंधी माहिती नव्हती तर प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवला कसा. यात अधिकारी यांचा दोष दिसुन येतो. त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी.

**श्री. सुरगोणीवार नारायण :** अधिकाऱ्यांना सविस्तर काहीच माहिती नसते. असे यावरुन दिसुन येते.

**मा. सभापती** : अहवाल वाचुन समाधान होत नसेल, तर सविस्तर अहवालाची प्रत देण्यात यावी. हा विषय पुढच्या सभेत घ्यावयाचा काय सन्माननीय सभासदांनी ठरवावे. या प्रस्तावाविषयी अधिकारी यांना माहिती नव्हती तर प्रस्ताव का ठेवण्यात आला. ही प्रशासनाची पध्दत चुकीची आहे. यापुढे कोणताही प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीसाठी आणतांना माहिती विचारल्यास ती पुरविण्यात आली पाहिजे. या संबंधीची सविस्तर माहिती पुढील बैठकीत द्यावी. या प्रकरणात जे दोषी असतील अशांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. या प्रस्तावावर पुढील सभेत सविस्तर माहिती द्यावी. पुढील यावर निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत प्रस्ताव स्थागित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, या प्रस्तावासंबंधी प्रशासनाने सविस्तर माहिती आगामी बैठकीत सादर करावी. तोपर्यंत सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येतो.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ३२/१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलशुध्दीकरण केंद्र फारोळा व हर्सुल येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत ब्लिचिंग पावडरचा उपयोग केला जातो. ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी (१५० मे. टन) र.रु. २२,२३,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ५/१ दिनांक २०-५-२००० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार दैनिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देण्यात येवुन "डी" फार्मवर उत्पादक अथवा अधिकृत विक्रेते यांच्याकडुन दर मागविण्यात आलेल. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ (सात) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस सिलबंद निविदा एकुण ६ (सहा) प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शिव केमिकल्स | रु. ११,९६०/- प्र. मे.टन |
| २. | मे. क्लोरोकेम इंडस्ट्रीज | रु. १२,६००/- प्र. मे.टन |
| ३. | मे. निधी असोशिएटस | रु. १३,३५०/- प्र. मे.टन |
| ४. | मे. शिरीष इंटरप्रायजेस | निविदा उघडण्यात आली नाही. |
| ५. | मे. फोनिक्स केमिकलस | रु. १२,२५९-९०/- प्र. मे.टन |
| ६. | श्री. ए.एम. फारुकी | रु. १४,४६०/- प्र. मे.टन |

पाच (५) सिलबंद निविदा वरीलप्रमाणे आलेल्या निविदामध्ये सर्वात कमी दर हा मे. शिव केमिकल्स यांचा आहे. म्हणजेच रु. ११,९६०/- प्र.मे.टन असा दर दिलेला आहे. महानगरपालिकेतर्फे नेहमी दर्जेदार कंपनीचे उत्पादित ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात येते. यात ग्रासीम व डी.सी.एस. यांचा समावेश आहे. त्यामुळे दर्जेदार उत्पादन खरेदी करण्यासाठी दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक मे. फोनिक्स केनिकल्स हे ग्रासीम कंपनीचे अधिकृत विक्रेते असुन ही कंपनी जागातिक पातळीवर नावाजलेली आहे. गेल्या पाच वर्षात मनपा ने ग्रासीम कंपनी उत्पादीतच ब्लिचिंग पावडर खरेदी केलेली आहे.

त्यामुळे मे. फोनिक्स केमिकल यांना कमी प्राप्त झालेल्या दरामध्ये म्हणजेच रु. ११,९६०/- प्र.मे.टन या दरात आपण ग्रासीम कंपनी उत्पादीत ब्लिचिंग पावडर पुरवठा करण्यास तयार आहात काय याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यास लेखी संमती दिली असुन त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी मे. फेनिक्स केमिकल्स यांनी लेखी सम्मती दिल्याप्रमाणे म्हणजेच रु. ११,९६०/- प्र.मे.टन दरात (सर्व करांसह) ग्रासीम कंपनी उत्पादीत ब्लिचिंग पावडर आवश्यकतेनुसार खरेदी करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या प्रस्तावा संबंधी सविस्तर माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** मनपातर्फे शहराला जो पाणी पुरवठा केला जातो त्याचे जलशुध्दीकरण करावे लागते. त्यासाठी वार्षिक १५० मे.टन ब्लिचिंग पावडर लागते. मे. मोदी कंपनीचे फोनिक्स केमिकल १० वर्षापासुन भारतात व इतर ठिकाणी प्रसिध्द असुन या अगोदर मनपाने याच कंपनीचे ब्लिचिंग पावडर

खरेदी केलेले आहे. यासाठी ६ निविदा होत्या त्या पैकी सर्वात कमी दराची मे. शिव केमिकल्स यांची निविदा असुन त्यांचे विनंतीवरुन निविदा भरण्यास सम्मती दिली होती. दोन नंबरवर मे. फोनिक्स केमिकल यांची निविदा असुन मे फोनिक्स केमिकल हे डिलर असुन शिव केमिकल यांचे दरात ब्लिचिंग पावडर देण्यास तयार आहात काय, याबाबत विचारणा केली असता त्यांनी संमती दर्शविली आहे. त्यानुसार प्रशासनाचे असे मत आहे की, याच कंपनीकडुन पावडर खरेदी करावे.

**मा. सभापती :** मे. शिव केमिकल्स यांनी निविदा भरलेली होती व त्यांचे निविदाचे दर सर्वात कमी आहेत. त्यानुसार त्यांच्याकडुनच ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याबाबत कार्यवाही व्हावी. व त्यांचेकडुन ब्लिचिंग पावडर चांगल्या प्रतीचे पुरवठा करण्याबाबत लेखी घ्यावे. चांगल्या प्रतीचे ब्लिचिंग पावडर न दिल्यास त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही प्रस्तावित करावी. मे शिव केमिकल्स यांची निविदा मान्य करण्यात येते. या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलशुध्दीकरण केंद्र फारोळा व हर्सुल येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेसाठी लागणारे ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असलेली मे. शिव केमिकल्स यांची रक्कम रु. ११,९६०/- प्रति मेट्रीक टन या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. त्याच प्रमाणे मे. शिव केमिकल्स यांचेकडुन करारनामा करतांना चांगल्या प्रतीचे ब्लिचिंग पावडरचा पुरवठा करण्यात येईल असे लेखी घेण्यात यावे अन्यथा त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. याची जाणीव संबंधित पुरवठाधारकास द्यावी. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *सभागृहातील चर्चा*

**मा. सभापती :** चर्चेसाठी ३० मिनिटांचा अवधी देण्यात येईल.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** नगर रचना विभागातील संचिका बऱ्याच दिवसांपासुन प्रलंबित आहेत. या विभागात अधिकारी नाही. जे नविन अधिकारी यांची नियुक्ती झाली ते ही ३ महिनेच राहणार असुन सेवा निवृत्त होणार आहेत. या कालावधीत ते चांगले प्रकारे कामे करतील असे नाही. त्यासाठी कायम स्वरुपी अधिकारी या विभागासाठी मागवावा. श्री. कुलकर्णी यांना निलंबीत केले. किती दिवस कामावर घेणार नाही.

**मा. सभापती :** नगर रचनाचे जे अधिकारी यांची शासनाने नियुक्ती केली आहे ते तीनच माहिने राहणार असुन तीन महिन्यासाठी असणारे अधिकारी नको आहे. तीन वर्षासाठी राहणार अधिकाऱ्यांची या मनपामध्ये नियुक्ती करावी. अशी मागणी करण्यात येईल. श्री. के.आर. कुलकर्णी शाखा अभियंता नगर रचना विभाग मनपा यांचे अपील माझ्याकडे दिनांक २३-६-२००० रोजी प्राप्त झालेले होते. प्रशासनाकडे अभिप्रायासाठी पाठविले आहे. त्यानुसार अद्याप कार्यवाही केलेली नाही. संबंधितास निलंबित ठेऊन पगार देणे योग्य नाही म्हणुन

त्यांना कामावर घेण्यात यावे अशी शिफारस स्थायी समितीतर्फे करण्यात येते. व त्यांचे स्थायी समितीकडे दाखल केलेले अपिल मंजुर करण्यात येते.

**विषय क्र. ३३/२ :**

श्री. के.आर. कुलकर्णी शाखा अभियंता, नगर रचना विभाग यांचे जा.क्र. मनपा/मआ/आस्था-१/२०००/१०७४/१०७४ दि. १२-५-२००० या निलंबन आदेशा विरुध्दचे अपीलावर विचार निनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन अधिकारी/कर्मचारी यांना निलंबन कालावधीमध्ये अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम ही नागरिकांकडुन जमा झालेल्या करामधून देण्यात येत असते. त्यामुळे कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांस निलंबीत ठेऊन कामे करुन न घेता पन्नास टक्के/पंच्चाहत्तर टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही. तसेच प्रशासनाने सदर प्रकरणात चौकशी करण्याचे ठरविलेले असल्यामुळे श्री. के.आर. कुलकर्णी, शाखा अभियंता नगर रचना विभाग यांचे जा.क्र. मनपा/आस्था-१/२०००/१०७४ दिनांक १२-५-२००० अन्वये काढण्यात आलेला निलंबन आदेश रद्द करण्यात येत असून त्यांना त्वरीत कामावर रुजु करुन घेण्यात यावे. खाते चौकशीच्या अधिन राहुन त्यांना कामावर रुजु करुन घेण्याबाबतचे अपिल मंजुर करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

**श्री. जगदिश सिध्द :** न्यायालयातील प्रकरणे हाताळण्यासाठी एका अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

**मा. सभापती :** अर्थसंकल्पीय बैठकीत न्यायालयीन कामासाठी अधिकारी व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाबाबत तरतुद केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री. सुरगोणीवार नारायण :** धनराज गॅस एजन्सीजने दि. १८-१०-२००० रोजी शहरात १४ लाख रुपये किंमतीचे गॅस साहित्य आणले. परंतु डुप्लीकेट पावत्या दाखवून जकात भरण्यात आलेली नाही.

**मा. सभापती :** या संबंधी संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती घेऊन कार्यवाही करावी.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** श्री. के.एस.नवले, लघुटंकलेखक हे सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेचे इतिवृत्त घेण्याचे काम करतात. ते तीन वर्षापासुन काम करतात. त्यांचे ठराविक वेतनात वाढ करावी त्यांना दरमहा रुपये ४०००/- वेतन द्यावे.

**उप आयुक्त (प्र.) :** ठरविक वेतनवाढ करण्यासंबंधी सर्वसाधारण सभेत मुद्दा उपस्थित करावा. त्यानुसार कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** सर्वसाधारण सभेत सुचना करण्यात यावी. पदनिर्मितीचा ठराव सर्वसाधारण सभेत घेण्यात यावा.

**श्री. मधुकर सावंत :** उप आयुक्त यांचेकडे तक्रार दिलेली आहे. एक कर्मचारी काम करत नसतांना त्यांना कायम नोकरीचे आदेश देण्यात आले. काहीही खुलासा केलेला नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** पुंडलिक राजाराम नावाचे सफाई कामगार १९८२ पासुन काम कररतात. सदर कर्मचारी एके दिवशी कुणीतरी नातेवाईक मृत झाल्यामुळे कामावार येऊ शकले नाही व त्याच वेळात उपआयुक्त (प्र.) हे साईटवर येऊन गेले व सदर कर्मचारी गैरहजर असल्याने त्यांना नियुक्ती देण्यात

आली नाही असा निकष लावला. दुसरा कर्मचारी विष्णु नारायण हे पण बऱ्याच दिवसापासुन काम कर्मचारी त्यांना आदेश दिलेले नाही.

**श्री. गणेश तांबे :** सौ. कमलाबाई अशोक काळे यांचा यादीतील क्रमांक ८६ होता. तो बदलण्यात आला व त्यांचे जागेवर कमल गौतम काळे यांचे नांव देण्यात आले. त्यांचा मुळ यादीत कोठेही उल्लेख नाही. कायमस्वरुपी आदेश दिले.

**उप आयुक्त (प्र.) :** या संदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या असून चौकशी अंती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** बरेच प्रस्ताव मंजुर झालेले असून नविन वर्षाचे विकास कामांना कधीपासुन सुरुवात करणार. टेंडरचे प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीला येत नाही.

**मा. सभापती** : सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी जे प्रस्ताव मंजुर झालेले आहे व इस्टीमेटसला मंजुरी घ्यावयाची आहे असे सर्व विकास कामाबाबतचे प्रस्ताव तात्काळ मंजुरीसाठी आणावेत.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** दुपारी मनपा कार्यालयात वेगवेगळया कामासाठी सन्माननीय सभासद तसेच सामान्य नागरिक अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येतात. परंतु मा. आयुक्त कार्यालयात उपस्थित नसतात. त्यामुळे कामे होण्यास विलंब होत असून संचिका थांबून आहेत. मा. आयुक्तांनी दुपारी ३ ते ६ या वेळात कार्यालयात थांबावे अशी मागणी आहे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त व जिल्हाधिकारी क्रांतीचौक येथील रस्त्यांच्या संदर्भात न्यायलयात गेलेले आहेत.

**श्री. भरत लकडे :** सेंट्रल नाका येथे मच्छी मार्केटचे रस्त्यावर अतिक्रमण असून ते रोडवर येतात. ते अतिक्रमण काढावे.

**मा. सभापती :** मनपाच्या हद्दीत येत असले तर कार्यवाही करावी.

**श्री. मधुकर सावंत :** ३०-९-९२ च्या बैठकीमध्ये एक ठराव होऊन ४ सुरक्षा रक्षकांना वेतनश्रेणी रु. ८२५-१२०० प्रमाणे करावी व सदर वेतनश्रेणीची अंमलबजावणी १९८६ पासुन करण्यात यावी असा ठराव झालेला असतांना अद्याप कार्यवाही केली नाही. खुलासा करावा.

**उप आयुक्त (प्र.) :** येणाऱ्या बैठकीमध्ये या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात येईल.

**श्री. गणेश तांबे :** प्रशासकीय अधिकारी पद भरण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. काहीच कार्यवाही केली नाही. (याच वेळी सन्माननीय सभासद श्री. तांबे खुर्चीवरुन खाली बसतात) अधिकारी मनमानी पणाने काम करत असतील तर योग्य नाही.

**मा. सभापती :** आपणास विनंती की, आपण खुर्चीवर बसून आपली सुचना मांडावी. कार्यवाहीचे आदेश देण्यात येतील. (या वेळी सन्माननीय सभासद श्री. तांबे खुर्चीवर येऊन बसतात.)

**श्री. दलबीरसिंग जाबिंदा :** चार सदस्यीय कमेटी नेमली होती. निर्णय घेण्यासाठी प्रशासनाकडुन उप आयुक्त (म.) उप आयुक्त (प्र.) यांना मदतीला देण्यात यावे. चौकशी सुरु करता येईल.

**श्री. गणेश तांबे :** नागेश्वरवाडी येथील रहिवाशी असलेले श्री. डोंगरदिवे यांची स्वत:ची जागा असतांना व महानगरपालिकेची त्यांचेकडे परवानगी असतांना प्रभारी प्रशासकीय अधिकारी यांनी त्यांची टपरी मोडून-तोडून टाकली आहे. त्यांनी

ती जागा ९९ वर्षाच्या करार करुन घेतली आहे. परवानगी असतांना का तोडण्यात आले. खुलासा करावा.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. तांबे यांनी मांडलेल्या सुचनेनुसार जर त्यांची टपरी त्याचे मालकीचे जागेवर होती व तशी परवानगी त्यांचे कडे असेल व यास अधिकारी जबाबदार असेल तर त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. गणेश तांबे :** प्रशासकीय अधिकारी सन्माननीय सदस्यांची नांवे सांगून पैसे उकळतात. सभापती, स. सदस्य अधिकारी यांना हप्ते द्यावे लागतात असे सांगितले जाते. यात सन्माननीय सदस्यांची बदनामी होत आहे. त्यांना त्वरीत त्या पदावरुन काढावे.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी कोणत्या सन्माननीय सभासदांना हप्ते देतात किंवा स. सभासद मागतात याची संपुर्ण चौकशी करावी.

**उप आयुक्त (प्र.) :** प्रशासकीय अधिकारी हे पद भरण्याबाबत अंतिम टप्प्यात कार्यवाही आलेली असुन येत्या ८ दिवसात कार्यवाही होईल. वर्तमानपत्रात छापून आले त्याची चौकशी चालु आहे. समक्ष बोलावून चौकशी करु.

**मा. सभापती :** टपरी संदर्भात जी कमिटी नेमण्यात आली होती त्यासंबंधी उप आयुक्त (प्र.) यांनी चौकशी करुन पुढील बैठकीत त्यासंबंधी माहिती द्यावी. या कमिटीमध्ये उप आयुक्त (प्र.) यांचाही समावेश करण्यात येत आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** कोतवालपुरा येथील निलावती अशोक बोबले नावाच्या व्यक्तीची जागा मनपाने घेतली असून सदर व्यक्तीची ती जागा विकास रस्त्यामध्ये गेली आहे. संबंधितास त्या जागेचा काहीही मोबदला अद्याप दिलेला नाही.

**उप अभि. (न.र.) :** याबाबतची माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

**सौ. विजया रहाटकर :** नागेश्वरवाडी येथीलही काही लोकांचे जागा रस्त्यामध्ये मनपाने भुसंपादन केलेली असुन त्यांनाही मोबदला अद्याप दिला गेला नाही.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सुचनाची संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी.

**श्री. मोतीलाल जगताप :** रस्त्यावर खांडकी बसवण्याऐवजी सिमेंट कॉक्रीटचे रस्ते केल्यास योग्य राहील. मुंकंदवाडी येथील २-३ वर्षापुर्वी खांडकी चे काम झालेले आहे. निकृष्ट दर्जाचे झाले आहे. कॉक्रीट रस्ते करावे.

**मा. सभापती :** आपण खांडकी रस्ते करण्या संदर्भात निर्णय घेतलेला असून जर खांडकी निघालेल्या ठिकाणीच सिमेंट कॉक्रीट करण्यात येईल.

**श्री. सुरगोणीवार नारायण :** सिडकोतील म्हाडाच्या काही वसाहतीचे १९८५ ला मनपाकडे हस्तांतरण झाल्यापासुन काहीही सुविधा पुरविण्यात येत नाही. स्वच्छता होत नाही, झाडे नाही, विद्युत व्यवस्था नाही.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सिडकोतील म्हाडा कॉलनी ज्या वसाहती मनपाकडे हस्तांतर झालेल्या आहेत तेथे पाणी पुरवठा व जलनिःसारणची कामे केलेली आहेत. काही रस्त्याचीही कामे झालेली आहेत.

**अति. शहर अभियंता :** अविष्कार कॉलनी येथीलच रस्त्याचे काम बाकी असून लाईट खांब इ. मेन्टेनन्सची कामे केलेली आहेत. या वसाहतीमध्ये आतापर्यंत १५ लाखापर्यंत कामे केलेली आहे.

**मा सभापती :** म्हाडाच्या कॉलनीमध्ये ज्या ज्या सुविधा देण्यात आलेल्या नाही त्याची संबंधित अधिकारी यांनी स. सदस्य सुरगोणीवार यांचे समवेत पाहणी करुन तेथील नागरी समस्या सोडवण्याबाबत कार्यवाही करावी.

**श्री. गणेश तांबे :** १६-११-९० ला संजय याचे टाकीवरुन पडुन अपघात झाला आहे. आपण आता जागा भरतो. २६ जागा रिक्त आहेत. एक अपंगास द्यावी.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** सदर कामाचा महानगरपालिकेने ठेका दिला होता. ठेकेदाराचा माणूस होता. आपण सहानुभूती म्हणुन दैनिक वेतनावर घेतले आहे.

**सौ. विजया रहाटकर :** शहरात स्वच्छता असावी या संदर्भात मा. महापौर यांनी सुचना करुन स्वच्छता अभियान मोहीम राबविण्याचे ठरले. असतांनाही काही भागात स्वच्छता दिसून येत नाही. माझ्या वार्डामध्ये ८ दिवसातून एकदा स्वच्छता करण्यात येते. वार्डातील कचरा उचलून रोजच्या रोज कुंडयांमध्ये टाकण्यात येतो. तो उचलण्यात आला पाहिजे. कचरा उचलणाऱ्या गाडया वेळेवर येत नसून गाडी येणार परंतु गाडी चालविण्यासाठी चालक नाही म्हणुन गाडी कचरा उचलण्यासाठी येत नाही. हे काही कारण होऊ शकत नाही. मा. महापौर यांनी स्वच्छतेच्या बाबतीत जे आदेश दिले ते पाळण्यात यावेत.

**अतिरिक्त शहर अभियंता :** वाहन चालक कमी आहेत. संबंधित चालक सुट्टीवर असल्याने गाडी गेलेली नाही.

**मा. सभापती :** सोलापूर नाशिक मनपासारखे वार्डातील घंटा गाडीची मोहिम राबवू शकतो काय? प्रशासनाने याबाबत विचार करावा. यामुळे वेळेवर कचरा उचण्यात येऊ शकेल व तीन वार्डातुन एक घंटा गाडी रोजच्या रोज फिरतीवर राहिली तर कचरा उचलण्याची कार्यवाही होऊ शकेल.

**श्री. जगदीश सिध्द :** नगर भु.क्र. १९६६० मध्ये मा. सुप्रीम कोर्टाचे निर्णयानुसार काय कार्यवाही केली. पदमपुरा येथील जय टॉवर्सचे बांधकामासंबंधी असून अधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. सभापती :** नगर रचनाकार-१ यांनी खुलासा करावा.

**उप अभि. (न.र.) :** मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहे. त्याचा अर्थ बोध लावण्यासाठी मनपाने पॅनल वरील वकील श्री. प्रविण मंडलिक यांचेकडे पाठविले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधीताने एकुण ५३ हजार चौरस फुटाच्या मर्यादेत काम करावयाचे आहे. यापुर्वी दिलेली परवानगी ७५ हजार चौरस फुटाकरिता दिलेली आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** संबंधीत मालकाने ५३ हजार फुट जागेची त्यांचे खरेदी खत असल्याचे लिहून दिले तर ७५ हजार चौरस फुटाची बांधकामास परवानगी कशी देण्यात येते.

**मा. सभापती :** चौकशी करुन बांधकाम थांबवावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या संबंधी अधिकारी यांना सर्व माहिती आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** दिनांक १९-८-९७ च्या सर्वसाधारण सभेत मालक म्हणुन ठराव मंजुर करुन घेतला. जागेचे पी.आर.कार्ड दि. २०-१०-९७ पर्यंत बंद होते. तर ठराव मंजुरीसाठी कसा आला याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** हे काम त्वरीत बंद करावे. संपुर्ण चौकशी करावी. सदर बांधकाम ५३ हजार चौरस फुटपेक्षा जास्त असेल तर त्वरीत तोडण्यात यावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** बांधकाम तोडण्यापुर्वीच संबंधित मालकास माहिती पुरवल्या जाते. उस्मानपुरा येथे संरक्षित भिंतीचे बांधकाम केले. तेथील खांबे समोर लावण्यात आले. अधिकारी यांना माहिती असतांना कार्यवाही होत नाही.

**श्री. जगदीश सिध्द :** नगर भुमापन क्रमांकाचे संदर्भात जागा मालकी क्षेत्र बाबत वाद न्याप्रविष्ट झाला व पुर्ण क्षेत्रावर बांधकाम करण्याऐवजी संबंधीताने तुर्त ५३ हजार चौ. फुटावर बांधकामाची परवानगी बाबत न्यायालयात दिलेले हमीपत्रानुसार दिलेले बांधकाम परवानगी तुर्त स्थगित करावे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ५३ हजार चौरस फुट बांधकामाचे हद्दीपर्यंत सुधारित बांधकाम परवानगी प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा व सुधारित बांधकाम परवानगी प्राप्त झालेनंतरच बांधकाम करावे. नसता नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे संबंधीत विभागाने पत्र दिलेले आहे. हया पत्रानुसार बांधकाम थांबण्यात आले. दुसरे पत्र या विभागातून नंदलाल टकसाळी यांचे नावांने याच जागे संदर्भात बांधकाम परवानगी देण्यात येत आहे असे म्हणुन देण्यात आलेले आहे. त्यात असे नमुद केले की, जे बांधकाम थांबविण्यात आले होते त्यानुसार कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाने व मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय मा. उच्च न्यायालयाचे निर्णयातील मुद्दे, मा. सर्वोच्च न्यायलयाचे निर्णयात जमीन मालकाचे प्रतिज्ञापत्रा संदर्भाने, शासन निर्देशानुसार ५३००० चौ. फुट मर्यादेकरिता समावेशक आरक्षण विकास करिता महापालिकेच्या नियम व अपविधीस अधिन राहून बांधकाम करण्यासाठीच दिलेले निर्देश न्यायालयाचे निर्णयातील निर्देशानुसार जमीन मालकाने खरेदी केलेल्या जमिनीचा त्या खरेदी खता संदर्भाने विचार केलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयातील निर्णयामध्ये बांधकामाकरिता ५३००० चौ. फुटांचा भूखंड वेगळा करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयात झालेल्या बांधकामाची नमुद केलेल्याप्रमाणे स्थिती व त्यामुळे अस्तित्वातील जोत्साचा विचार करणे अनिवार्य आहे. या वरील मुद्दयांचा विचार करुन या प्रकरणी सुधारीत बांधकाम परवानगी देण्यांत आली आहे. सध्या या जागेत २५% भाजी मंडईसाठी ठेवण्यात यावी असे असतांना सुध्दा संपुर्ण जागेवर बांधकाम झालेले दिसून येते. सुरुवातीपासून जसे आहे तसेच चालू आहे. २५% भूखंड शिल्लक नाही.

**नगर रचनाकार-१ :** आकोमोडेशन रिझर्वेशनच्या नियमाप्रमाणे बांधकाम परवानगी दिली आहे. २५% क्षेत्राचे बांधकाम वेगळया भूखंडावर बांधून देणार आहेत. सध्या बांधकाम चालू आहे.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी यांनी स्वतः त्या ठिकाणी जाऊन व काही सन्माननीय सदस्यांनाही बरोबर घेऊन गेले तरी चालेल. त्या जागेची पाहणी करावी. ५२% जागा सोडलेली नसेल तर कार्यवाही करावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** शहानुरवाडी येथील धोबी घाट सध्या बंद आहे.

**शहर अभियंता :** सदरची कार्यवाही मालमत्ता विभागाकडुन करण्यात येईल. त्या कामासंबंधीचे अंदाजपत्रक तयार केले असून बजेट नव्हते म्हणून काम थांबून आहे. मालमत्ता अधिकारी यांचे अंतर्गत ते कामे असून त्या विभागाने पुढील काम करावयाचे आहे.

**श्री. मोतीलाल जगताप :** सिडको भागात काही भूखंडावर अतिक्रमण होत आहे. त्यास मनपाने तार कुंपण केले तर बरे होईल.

**मा. सभापती :** सिडको हस्तांतर होईपर्यंत आपण तेथे तार कुंपण करु शकत नाही. ज्या जागा शासनाने आपल्या ताब्यात दिलेल्या आहेत त्यावर कार्यवाही होऊ

शकेल. सध्या त्या जागा मा. जिल्हाधिकारी यांचे अंतर्गत येतात. या संदर्भात मा. जिल्हाधिकारी यांना तसे आपण पत्र दिल्यास कार्यवाही होऊ शकेल

**श्री. मोतीलाल जगताप :** मुकुंदवाडी भागात मुख्य रस्त्यापासून अर्धा किलोमीटर अंतरापासून आतमध्ये चांगल्या प्रतीचे रस्ते असून मुख्य रस्त्यापासून जो रस्ता जातो तो सध्या नादुरुस्त असून दुरुस्त करण्यासाठी सिडकोकडे मागणी केली होती. काही कार्यवाही केली नाही. तर सिडको मनपाकडे हस्तांतरण होणारच आहे या अटीवर मनपाकडे सदर रस्त्याचे हस्तांतरण दुरुस्तीचे काम करु शकतो. काय?

**अति. शहर अभियंता :** सदर रस्त्याची सिडकोची असल्याने सिडकोतर्फे रस्ता दुरुस्तीचे काम व्हावयास पाहिजे. जेव्हा मनपाकडे सिडकोचे हस्तांतरण होईल त्यावेळी निर्णय घेता येईल.

**श्री. जगदीश सिध्द :** अविष्कार कॉलनी येथील मनपातर्फे करण्यात येणारे शॉपिंग सेंटरचे काम तुर्त थांबवावे. त्यामुळे पावसाचे पाणी अडवून तेथेच थांबून आहे ते काढण्यात यावे नसता काम बंद करावे.

**मा. सभापती :** पाणी साचत असेल तर तशी कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. सुरगोणीवार नारायण :** पावसामुळे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. त्याचे पॅचवर्कचे काम कधी करणार आहे. बऱ्याच रस्त्यावर अपघात होण्याची शक्यता टाळता येत नाही. ताबडतोब पॅचवर्क करावे.

**मा. सभापती :** शिवशंकर कॉलनी येथील मुख्य रस्त्यावर गतीरोधकाचे काम करण्यात यावे. अपघात होणारी नाही. तसेच रस्त्यावरील सर्व खड्डे बुलविण्यात यावेत.

**श्री. मधुकर सावंत :** रमानगर येथे मनपाच्या मालकीची १५% जागा सोडलेली असून या मोकळया जागेला तारकुंपण करण्यात यावे.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्यांनी केलेली सुचना विचारात घेता संबंधीत अधिकारी यांनी सदर जागेवर तार कुंपण करुन घ्यावे.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १८-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक १८-८-२००० रोजी तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १८-८-२००० रोजी मा.सभापती श्री.अविनाश लक्ष्मण कुमावत यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३-३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) श्री.अशरफ मोतीवाला | सदस्य |
| २) श्री.कावडे साहेबराव राणुबा | --//-- |
| ३) श्री.कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ४) सौ.खरात कुसुमबाई दौलत | --//-- |
| ५) श्री.गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ६) श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ | --//-- |
| ७) श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द | --//-- |
| ८) श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | --//-- |
| ९) श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| १०) श्री.लकडे भरत श्रीपती | --//-- |
| ११) श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव | --//-- |
| १२) सौ.विजया किशोर रहाटकर | --//-- |
| १३) श्री.सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १४) श्री.सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

**संवाद :**

**मा.आयुक्त :** मा.विभागीय आयुक्त कार्यालयात एका महत्वाच्या बैठकीस मला जायचे असल्याने त्या अगोदर शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्यासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा करुन हा प्रस्ताव आजच्या बैठकीत ठेवणार होतो. परंतु ठेवता आला नाही. यासंदर्भात काल माझे दालनात कमेटीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व पदाधिकारी, संबंधित अधिकारी व मी स्वत: उपस्थित होतो. पुरवठा धारकांकडून कपडयाचा नमुना मागवला व त्याचे दर पण मागवले होते. यात सात पुरवठा धारकांनी भाग घेतला. कपडयाची प्रत बघितली, मान्य केले. ज्यांचे दर सर्वात कमी आहेत अशाच एजन्सीकडून कपडा घ्यावा असे ठरले व त्यानुसार वाटाघाटीसाठी सर्वात कमी दराने पुरवठा करणाऱ्या तीन पुरवठा धारकांना बोलावले व कमी दराने पुरवठा करण्यास सुचविले असता त्यांनी नकार दिला व तसे लेखी कळविले. त्यामुळे उर्वरीत ४ पुरवठा धारकांना वाटाघाटीसाठी बोलावयाचे की,पुन्हा अल्प मुदतीची निविदा मागविण्याचा निर्णय घेण्यासाठी ही सूचना सभागृहात मांडली आहे.सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** कपडयाचा नमुना पडताळणी केली. कंपनी कोणती, वाटाघाटी कुणाबरोबर केल्या याबाबतचा सविस्तर खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** चांगल्या प्रतीच्या कपडयामध्ये ४-५ एजन्सीज आहेत. शासन नियमानुसार चांगल्या प्रतीचा कपडा खरेदी करावा यादृष्टीने ३३.६७% पॉलीस्टर-कॉटन हवेत. स्टँडर्ड कंपनीचे असावेत. नमुना निवडण्यात आला. त्याचे दर सर्वात कमी नाही.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** रेडीमेड गणवेश घेतल्यास चांगल्या प्रतीचा कपडा मिळणार नाही. जे सॅम्पल निश्चित केले तेच खरेदी करावे व ८ नमुन्यात शिलाई करुन घ्यावे.

**मा.आयुक्त :** कंपनी कोणतीही असू शकते. कमीत कमी टेक्नीकल स्पेसिफिकेशन ३३-६७% पॉलीस्टर-कॉटन पाहिजे.प्रत्येक नमुन्यात कपडा आला. सॅम्पल निश्चित केले. कंपनी कोणतीही असू शकते.जसे एस.कुमार, ग्वॉलीअर इ. प्रत्येक ॲटममध्ये ज्या त्या एजन्सीचे रेटस् वेगवेगळे होते. योग्य दराचा कपडा आला. नमुना निश्चित करण्यात आला. यापैकी सर्वात कमी दराने व जास्त ॲटममध्ये एम.एस.एस.आय.डी.सी., वासवानी ड्रेसेस व दिपलक्ष्मी यांचे रेटस् कमी आहेत. त्यांचेसह बोलणी होऊन निर्णय झाला व सॅम्पल दाखवले व वेळ दिला. त्यांनी एवढया कमी रेटस्ने चांगल्या प्रतीचा कपडा पुरवठा करणेस परवडत नाही म्हणून सांगितले. तसे लेखी कळविले.

**सौ.विजया रहाटकर :** ज्या प्रतीच्या कपडयाचा गणवेश घेणार व गणवेश तयार झाल्यानंतर कपडा चांगल्या प्रतीचा आहे हे कसे समजणार. या समितीमध्ये अधिकारी , पदाधिकारी आहेत. असे असतांना दरवर्षी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश १५ ऑगस्टपुर्वी द्यावे असे ठरते. परंतु प्रशासनाकडून काहीना काही अडचणी दाखवण्यात येतात. १५ ऑगस्टपुर्वी का देण्यात आले नाही. शोकांतिका आहे.

**मा.आयुक्त :** अर्थसंकल्प मंजूर नव्हते. स्थायी समितीने मंजूरी दिल्यानंतर सर्वसाधारण सभेत निर्णय झाल्यानंतर याची कार्यवाही सुरु झालेली आहे व नियमाने निविदा काढण्याची कार्यवाही करण्यास वेळ लागेलच, अशा प्रस्तावाच्या बाबतीत त्यांची क्वलीटी,नमुना प्रत (सॅम्पल) प्रमाणेच योग्य आहे किंवा काय हे सर्व बघूनच कार्यवाही करणे सोयीस्कर होते. कपडयाचा दर्जा कसा आहे हे पाहणी महत्वाचे आहे. नमुन्या प्रमाणेच कपडा आहे किंवा नाही त्यासाठी नमुना (सॅम्पल) सोबत ठाणचा कपडा मागविला त्याचे तुकडे करुन झोन विभाग,शिक्षण विभागाकडे देवून तपासणी करु. कमेटीकडे प्रत आहे. प्रयोगशाळेत (लॅबमध्ये) चाचणी करता येईल. रॅण्डामचेकींग करता येईल.नमुने निवडून प्रयोगशाळेत तपासणीला पाठवता येईल व क्वालीटी मेटेंन करता येईल.परंतु तीन पुरवठा धारकांकडून जे किमान दर आले त्या दरात पुरवठा करण्यास ते तयार नाहीत. प्रत्येकाचे कपडयाच्या नगामध्ये वेगवेगळे रेटस् आहेत त्याची लिस्ट केली व तुलनामध्ये ज्या नगाचे दर उर्वरीत पुरवठा धारकाचे कमी आहेत त्यासंबंधी चर्चा करण्यासाठी त्यांना बोलावयाचे काय?

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** रेडीमेड कपडयांत काही तपासणी करता येणार नाही. कमी दर दाखवणार व उल्हासनगरचे कपडयाचा वापर करणार. टेंडरमध्ये रेडीमेड कपडे घ्यावे असे आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांचे दालनात काल झालेल्या बैठकीत सर्वांचे दर व क्वालीटी बघितली. यात एम.एस.एस.आय.डी.सी. यांचे काही ॲटममध्ये दर कमी

आहेत. परंतु क्वालीटी बरोबर नाही वासवानी व दिपलक्ष्मी यांना बोलावण्याचे व त्यांचेशी चर्चा करण्याचे ठरले. एम.एस.एस.आय.डी.सी.चे रेटस् कमी आहेत, परंतु ते ज्या प्रतीचा कपडा देणार त्यात ३३-६७% कॉटन आहे काय?

**मा.आयुक्त :** यासंबंधी लॅब टेस्ट केल्यास कळू शकेल. कपडयाचे सॅम्पल मागवल्यावर त्यामधील ६५.३५% , ३३.६७% प्रमाणे बसते कि नाही. आपल्या मागणीनुसार फरक आढळून आल्यास त्याच्या तुलनेत दर कमी होतील. शासनाने काही अटी टाकल्या आहेत.आपण आपल्या मनाने घेत नाही. स्थायी समितीने हा निर्णय घ्यावयाचा की तीन पुरवठा धारकांना वाटाघाटीसाठी बोलवायचे की नाही,की पुन्हा निविदा काढवयाच्या याचा निर्णय घ्यावयाचा आहे.

**श्री.गणेश तांबे :** किती वेळा निविदाच काढत राहणार. डॉ.बाबासाहेबांच्या नावाने मनपातर्फे मुलांना ड्रेस वाटप होतात ही कार्यवाही या अगोदर व्हावयास पाहिजे होती.

**मा.सभापती :** मा.आयुक्तांच्या दालनात झालेल्या निर्णयानुसार पदाधिकारी यांनी ठरवले होते वासवानी व दिपलक्ष्मी यांना देण्याबाबत त्यांना पुन्हा बोलावून आणखी दर कमी करता येते काय? तशी त्यांचेशी चर्चा करावी व निर्णय घ्यावा व तसा प्रस्ताव मंजुरीस आणावा.

**श्री.साहेबराव कावडे :** जी एजन्सीज कमी दराने व चांगल्या प्रतीचा कपडा वापरेल अशांना देण्यात यावे.

**मा.आयुक्त :** कोणत्या दराने घ्यावे, कोणाकडून घ्यावे हा प्रश्न निर्माण होत नाही. प्रत्येक कंपनीने सर्वात कमी दर हे वेगवेगळया ॲटममध्ये येते. वाटाघाटी करून मनपाच्या नियमाप्रमाणे एजन्सीला रेटस् मान्य होत नसेल तर फेरनिविदा काढण्यात येतील.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** एखादी एजन्सीज क्वालीटी चांगली देत असेल व रेटस् वाढवून घेत असेल तर घेण्यास हरकत नसावी. मुलांना गणवेश मिळण्यास उशिर होऊ देऊ नये.

**सौ.विजया रहाटकर :** प्रत्येक वर्षी मुलांना गणवेश वेळेवर मिळत नाही. यापुढे असे होऊ नये याची दखल घेण्यात यावी.

**मा.आयुक्त :** कोणत्या दरावर व कोणाकडून घ्यावे हा प्रश्न नाही. वेगवेगळया कंपनीचे , वेगवेगळया लोकांचे दर कमी आहेत. यात मनपाचा फायदा ही बघावा लागतो. मुलांना चांगले गणवेश मिळावे. नुकसान होत असेल तर ते प्रशासनातर्फे दाखवणे माझे कर्तव्य आहे. त्यानंतरही आपण निर्णय घेत असाल तर ती आपली जबाबदारी राहील. कमेटीने मंजूर केले ते ३३-६७% आहे.

**श्री.मोतीलाल जगताप :** कमिटीने जे मंजूर केले ते मान्य करावे व त्यात ३३-६७% कॉटन आहे का ते पहावे.

**मा.सभापती :** खरे तर विषय येथे चर्चेचा नाही. मा.आयुक्तांनी सभागृहावर जबाबदारी टाकली. मा.आयुक्त यांनी यासंबंधीचा निर्णय घ्यावयास पाहिजे. एम.एस.एस.आय.डी.सी. पुणे यांचे का घेऊ नये. कमी दर व चांगले नसेल तरी तोही निर्णय आयुक्तांनीच घ्यावयाचा आहे.

**मा.आयुक्त :** निर्णय सभागृहाने घ्यायचा असतो. त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मा.आयुक्त यांचे दालनात कमिटीने घेतलेल्या निर्णयाचा खुलासा करावा.

**मा.सभापती :** १७-८-२००० च्या मा.आयुक्त याचें दालनात झालेल्या गणवेश संबंधी चर्चेचे इतिवृत्त वाचून दाखवावे.

**उप आयुक्त (म.) :** (दिनांक १७-८-२००० च्या मा.आयुक्त यांचे दालनात झालेल्या गणवेश संबंधीचे कमिटीने घेतलेला निर्णय वाचून दाखवतात.)

Categarywise Lowest Rates Should be Negotiated.

Samples of Vaswani Dresses Pune are selected Total No.of Samples-०८.

महिला औद्योगिक संस्था तुलनात्मकदृष्टया कमी असलेल्या दरांवर काम करण्यास तयार असल्यास त्यांना आदेश देणेस हरकत नाही असे मत सदस्यांनी व्यक्त केले.

गणवेशांची क्वालीटी मेन्टेन होणे आवश्यक.

वासवानी ड्रेसेस यांचे निवडलेले नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावे. प्राप्त तपासणी अहवालात निविदेतील अटींचे पालन न झाल्याचे निदर्शनास आल्यास दर कमी करणेत यावेत.असे मत व्यक्त करणेत आले.

पुरवठा एक महिन्याच्या आंत करणे बंधनकारक आहे. पुरवठयात १० (दहा) दिवसांचे वर विलंब झाल्यास १ ते १० टक्के दंड आदेशातील एकूण रकमेवर आणि विलंबावर अवलंबून असेल.

पुरवठा धारकाचे देयक देतांना वेळेवरील पुरवठा,दंडात्मक कार्यवाही आणि गुणवत्ता अहवाल या बाबी तपासून अदा करणेत यावे.

पुर्णतः पुरवठा झाल्यानंतरच ५०% देयक अदा करावे व उर्वरीत देयक लॅब टेस्ट प्राप्त झाल्यानंतर अदा करणेत येईल.

सर्व समिती सदस्यांनी नमुना तपासावेत.

पुरवठा मालातून रॅण्डम सलेक्शन करुन नमुने निवडून लॅबोरेटरी रिपोर्ट मागविणेत यावा.

निवडलेल्या नमुन्यानुसार तथापी तुलनात्मकदृष्टया कमी असलेल्या दरानुसार काम करण्यास्तव महिला आर्थिक, वासवानी ड्रेसेस व दीपलक्ष्मी महिला औद्योगिक संस्था यांना वाटाघाटीसाठी बोलाविणेत यावे.

वाटाघाटीअंती मान्य झालेल्या दरानुसार घ्यावयाच्या गणवेश खरेदीचा प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी स्थायी समिती समोर सादर करावा, असे ठरले.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** वाटाघाटीसाठी सर्वांना बोलावले. इतरांचे रेटस् काय आहेत ते बघावे.

**मा.सभापती :** अशा पध्दतीने या अगोदर कार्यवाही झालेली नाही. हा विषय आता या स्थितीत सभागृहाच्या चर्चेचा नव्हता. सदर एजन्सीज बरोबर प्रशासनाने वाटाघाटी करावयाचे असते व नंतर सभेत मंजुरीला विषय येतात. विषय मंजुरीला आणतांना सातही कंपन्यांचे रेटस् व वाटाघाटीचे रेटस् व कपडयाचा नमुना प्रत पण द्यावयास पाहिजे अशी पध्दत आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** प्रत्येक टेंडरच्या वेळेस प्रशासन अशाच पध्दतीचा वापर करणार का?

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** प्रत्येकाचे रेटस् काय त्याचा तक्ता वाचून दाखवावा.

**मा.आयुक्त :** सर्व सदस्यांना विचारण्याचा अधिकार असतो. आपणांस कोणतीही शंका दाखवण्याचे माझे कर्तव्य आहे.वाटाघाटीनुसार झालेल्या कार्यवाहीची माहिती सभागृहात अवगत केली. संबंधीत एजन्सीज आपणास मान्य असलेल्या रेटस् प्रमाणे पुरवठा करण्यास तयार नाही. उर्वरीत ४ पुरवठा धारकांना बोलवायचे की ज्याचेशी वाटाघाटी करुन त्यानुसार निर्णय घ्यावयाचा. मनपावर आर्थिक बोजा पडू नये असे प्रशासनाचे धोरण आहे. जे रेटस् आले ते लेखाधिकारी वाचून दाखवतील.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** कपडा घेऊन गणवेश शिलाई करावेत. रेटस्चा तक्ता वाचण्याची गरज नाही.

(मा.मुख्यलेखाधिकारी सातही पुरवठा धारक एजन्सीजच्या दरांची माहिती वाचून दाखवत असतांनाच....)

**मा.आयुक्त :** हे सर्व वाचून दाखवण्यास वेळ जाईल व वाचून दाखवण्यापेक्षा निर्णय घेण्यास आपण सक्षम आहात. यावर बरीच चर्चा झाली. सभागृहाने निर्णय द्यावा. त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मा.आयुक्त यांनी वाटाघाटी करुन प्रस्ताव पाठवावा. त्यानुसार सभागृह निर्णय घेईल.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** दर निश्चित करण्यासाठी चर्चा करुन नंतर प्रस्ताव येणार ही पध्दत चुकीची असून चुकीचा पायंडा पडतो आहे. याचा मा.आयुक्त यांनी निर्णय घ्यावयाचा, नंतर सभागृह निर्णय घेईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** सात ही पुरवठा धारकांना पुन्हा बोलावून वाटाघाटी कराव्यात.

**मा.आयुक्त :** सात ही पुरवठा धारकांचे वेगवेगळया ॲटमचे दरात तफावत येते. वेगवेगळे दर आहेत.

**श्री.कैसरखान, श्री. सुरगोणीवार, श्री.दलबीरसिंग जबिंदा :** सातही पुरवठा धारकांना वाटाघाटीसाठी बोलवावे. आयटम प्रमाणे ज्याचे दर कमी व चांगल्या प्रतीचा कपडा असेल अशा पध्दतीची कार्यवाही व्हावी व तसा प्रस्ताव सादर करावा.

**मा.आयुक्त :** कमी दराने व चांगल्या प्रतीचे देण्यास तयार असेल तर कार्यवाही करता येईल. यात मनपाचे नुकसान होणार नाही.

**मा.सभापती :** पदाधिकाऱ्यांच्या निर्णयाप्रमाणे दोन पुरवठा धारकांकडून घ्यावे असे ठरले, त्यांनी क्वालीटी चांगली दिली तर तशी कार्यवाही करावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** सात पुरवठा धारकांमधून चांगले प्रतीचा कपडा पुरवठा करण्यास तयार असेल तर त्याचा विचार करावा. निर्णय प्रशासनाने घ्यावा व तसा ठराव आणावा.

**मा.सभापती :** वासवानी व दीपलक्ष्मी या दोन एजन्सीचे सॅम्पल पाहिले, रेटस् पाहिले. या कंपनीकडून घ्यावे असे पदाधिकारी यांचे बैठकीत मान्य झाले.

**श्री.कैसरखान बद्रोदीन खान :** दोन कंपनी धारकांना व बोलवता सातही पुरवठा धारकांना वाटाघाटीसाठी बोलवावे व अंतिम निर्णय घेऊन तसा ठराव आणावा.

**मा.आयुक्त :** पुन्हा वाटाघाटी होऊ शकते. प्रत्येक आयटम्सचे सर्वात कमी दराचे मान्य करु.परंतु क्वालीटी मिळणार नाही. वेळ जाणार ते म्हणणार आम्हाला परवडत नाही. त्यासाठीच आपण वाटाघाटी करुन वासवानी व दीपलक्ष्मी या एजन्सीला सांगितले. परवडत नाही म्हणून नकार दिला. यांचेकडून कपडा (ड्रेस) गणवेश घेतले तर खर्च जास्त येईल. काही ॲटममध्ये वासवानी यांचे रेटस् जास्त आहेत.

**मा.सभापती :** वासवानी व दीपलक्ष्मी यांना पुन्हा बोलावून कमी दर करता येत असेल तर निर्णय घेण्यात यावा व तसा प्रस्ताव मंजुरीस सादर करावा.

**श्री.कैसरखान,श्री.दलबीरसिंग जबिंदा, श्री.सुरगोणीवार :** दोन एजन्सीला न बोलावता सातही एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलवावे. कमी दराचे व चांगल्या दर्जाच्या कंपनीची निवड करावी. मनपाचे नुकसान होणार नाही हे पहावे.

**मा.सभापती :** ठीक आहे. दोन कंपनी धारकांना न बोलावता सर्वच्या सर्व सातही पुरवठा धारकांना वाटाघाटीसाठी बोलवावे व निर्णय घ्यावा व स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवावा. आता या विषयावर चर्चा करु नये.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मागील बैठकीत जय टॉवर्सचे जास्तीचे बांधकाम झालेसंबंधी सन्माननीय सदस्य श्री.सिध्द यांनी चर्चा केली होती. सदर ठिकाणचे बांधकाम अद्याप थांबलेले नाही. मा.आयुक्त यांनी संबंधीत अधिकारी यांना तसा रिपोर्ट करुन कार्यवाही करावी. काम थांबवावे.

**श्री.जगदीश सिध्द :** १५ दिवसांपासून बांधकाम थांबवले नाही. अधिकारी यांनी कोणतीही चौकशी केली नाही. १९-८-९७ च्या सर्वसाधारण सभेत ठराव घेतला त्यावेळी त्या जागेचे पी.आर.कार्ड त्यावेळी बंद होते.

**मा.आयुक्त :** यासंबंधी मी चौकशी केली. रिपोर्ट देणार असून जर यात अधिकारी जबाबदार असतील तर कार्यवाही करण्यात येईल.,

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी आतापर्यंत काय कार्यवाही केली,खुलासा करावा.

**श्री.जगदीश सिध्द :** १९-८-९७ च्या सर्वसाधारण सभेत मालक म्हणून ठराव मंजूर करुन घेतला. पी.आर.कार्ड १०-१०-९७ पर्यंत बंद होते,तर ठराव कसा घेतला.

**नगररचनाकार :** मा.सुप्रिम कोर्टाचे आदेश आहे. यासंबंधी मनपा पॅनल वरील वकील श्री.मुंडलीक यांच्याशी चर्चा केली. संबंधिताने न्यायालयाच्या आदेशानुसार ५३ हजार चौरस फुटाच्या आतमध्ये काम केले आहे. तेथील बांधकाम झालेले मोजले ३६०० स्क्वेअर मीटर्स आहे. महानगरपालिकेला ११५७ चौ.मी. बांधुन देणार नाही.

**श्री.जगदीश सिध्द :** सुप्रिम कोर्टात लिहून देण्यात आले की, ५३ हजार स्क्वेअर फुटावर बांधकाम करत आहे.५३ हजार चौ.फुटावर सेल डीड आहे. त्यामुळे ५३,००० चौ.फुटावर बांधकाम परवानगी द्यावी.

**मा.आयुक्त :** यासंबंधी अधिकारी यांचे समवेत कमिटी नेमली होती. पुन्हा एकवेळ जाऊन त्या ठिकाणी पाहणी करावी.

**श्री.जगदीश सिध्द :** जय टॉवर्स संबंधीत संचिका या सभागृहात सिल करावी. या जागेचे पी.आर.कार्ड बोगस आहे.श्री.खन्ना यांचेकडे या संबंधीची संचिका काढून घेऊन दुसऱ्या अधिकाऱ्याकडे द्यावी.

**सौ.विजया रहाटकर :** नियमाने कार्यवाही करावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** कमिटी स्थापन केली, त्यानंतर सदरील बांधकाम थांबवावयास पाहिजे होते.

**मा.आयुक्त :** जी कमिटी झाली त्यांनी तात्काळ त्या ठिकाणची जाऊन मोजणी करावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा, श्री.जगदीश सिध्द :** जय टॉवर्सची संचिका श्री.खन्ना यांचेकडे ठेऊ नये.त्यांच्याकडून संचिका काढून इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे द्यावी.

**श्री.जगदीश सिध्द :** दि.१९-८-९७ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर केला व सदरील न.भू.क्र.१९६६० मंजूर विकास योजनेनुसार निवासी क्षेत्रात तर प्रारुप विकास योजना नुसार आरक्षण क्र. ३२३ भाजी मार्केट, दुकान केंद्र व मल्टीपर्पज

हॉल करीता आरक्षित आहे. यातून भाजी मार्केट, दुकान केंद्र वेगळे करण्यात येऊन तीन भाग करण्यात आले व तुकडे झाल्यानंतर एफ.एस.आय.देण्यात येतो का? इतिवृत्त मंजूर झाले त्यावेळी पी.आर.कार्ड बंद होते.तर ठराव मंजूर कसा होतो.

**मा.सभापती :** उप अभियंता श्री. काझी यांनी स.सदस्य श्री.सिध्द, श्री.जगताप, श्री.मोतीवाला,सौ.रहाटकर,श्री.तुळशीबागवाले यांना वर वर घेऊन पाच सदस्यांनी श्री.काझी यांचे नेतृत्वाखाली जय टॉवर्सच्या बांधकामाची उद्याच मोजणी करुन घ्यावी व तसा रिपोर्ट मा.आयुक्तांकडे सादर करावा.

**विषय क्र. ३४/१ :**

दिनांक ३-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**मा.सभापती :** १) इतिवृत्तातील पान क्र. १५ वर श्री.के.एस.नवले, लघुटंकलेखक हे सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेचे इतिवृत्त घेण्याचे काम करतात. ते तीन वर्षापासून काम करतात. त्यांच ठराविक वेतनात वाढ करावी व त्यांना रुपये ४०००/- प्रतिमहा वेतन द्यावे असा श्री. तुळशीबागवाले यांचा विषय होता व मी अशी रुलींग दिली की, सर्वसाधारण सभेत सूचना करण्यात यावी. परंतु पद निर्मितीचा ठराव घेण्यात यावा असे मी बोललो नसून पदनिर्मितीचा ठराव यापुर्वीच झालेला आहे. शासनाच्या मंजुरीला पाठवलेला आहे. दुरुस्ती करण्यात यावी.

२) इतिवृत्तातील पान क्र. १३ वर चर्चा होऊन श्री. के.आर.कुलकर्णी, शाखा अभियंता यांना कामावर घेण्याचे ठरवले होते, परंतु हा विषय विषयपत्रिकेवर नव्हता. प्रशासनामार्फत आल्यास योग्य होईल.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** प्रशासनाने हरकत घेतली नाही. जसाच्या तसा मंजूर करावा.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** धनराज एजन्सीच्या बाबतीत काय चौकशी केली, खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** रक्कम रु. ४,४१,९००/- चा माल आला होता. तो ७ लाखांचा आहे असे आपण सुचविले. दुसरे ११ लाख ७९ हजारांचा माल होता त्याचे २९ हजार वसुल केले. ४ लाख ४१ हजाराचे मालाचे ओरीजनल बील इन्कम टॅक्ससाठी गेले असे सांगितले व नंतर बील दाखवतो म्हणून सांगितले. त्यानुसार संबंधितास ११ तारखेला पत्र दिले.

**मा.सभापती :** जकात अधिक्षक यांनी नियमाने जकात वसूल करावी.

**मा.उप आयुक्त (म) :** विषय क्र. ३३/२ नुसार श्री.के.आर.कुलकर्णी यांचा घेतलेल्या निर्णया संदर्भात प्रशासनाचे मत लक्षात घ्यावे व प्रशासनामार्फत तो प्रस्ताव येऊ द्यावा व नंतरच निर्णय व्हावा. अशी विनंती आहे.

**मा.सभापती :** श्री.के.आर.कुलकर्णी यांचा प्रस्ताव मागे घेण्यात येतो व प्रशासनाची बाजू ऐकून घेतली जाईल व तसा प्रस्ताव प्रशासन ठेवील व त्यानुसार निर्णय घेण्यात येईल.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** म्हाडाच्या कॉलनीत बांधकाम झाले. पावसाचे पाणी जाण्यासाठी नाली काढली नाही. त्या ठिकाणी मा.आयुक्तांनी सुध्दा भेट दिली आहे. मागील बैठकीत चर्चा केली होती. आतापर्यंत कार्यवाही नाही.

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी स्वतः सन्माननीय सदस्य यांचे बरोबर पाहणी करून कार्यवाही करावी.

**सौ.विजया रहाटकर :** मागील बैठकीत श्री.सिध्दीकी मोहंमद काझी यांच्या बडतर्फी बाबतचा प्रस्ताव होता. खुलासा मागवला होता. सहाय्यक आयुक्त-१ यांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :** श्री.काझी यांचे बाबतीत संबंधीत अधिकारी यांनी एकूण रक्कम किती,पावती बुक कोणते व कधीचे याचे सर्व माहिती सन्मानीय सदस्यांना लेखी स्वरुपात द्यावयास पाहिजे. पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

**सौ.विजया रहाटकर :** मागील बैठकीत सांगण्यात आले या बैठकीत माहिती देणार होते का माहिती पुरवू शकले नाही. जेव्हा संबंधीताने रेकॉर्ड दाखल केले नाही त्यावेळी प्रशासनाचे लक्ष नव्हते असे दिसते.

**सहाय्यक आयुक्त-१ :** संबंधिताने ९०-९१ या एक वर्षाचे रेकॉर्ड जमा केले नाही. वसुली झाली. परंतु रेकॉर्ड नाही. ऑडीटमध्ये निघाले, म्हणून प्रकरण उघडकीस आले.मालमत्ता विभागाकडे सुध्दा माहिती उपलब्ध नाही. यात एकूण ३७ पुस्तके वापरल्याचे भांडार विभागाने सांगितले.

**मालमत्ता अधिकारी :** सदर कर्मचाऱ्यास वारंवार पत्रव्यवहार करुन सुध्दा रेकॉर्ड सादर केले नाही व मालमत्ता विभागात सर्व पाहणी केली. कुठे रेकॉर्ड दिसून येत नाही. नेमकी किती रक्कम गहाळ केली हे सांगता येणार नाही.

**सौ.विजया रहाटकर :** जे टेंडर देण्यात येते. त्याची वसुली योग्य होत नाही. मालमत्ता अधिकारी यांना सक्त ताकीद द्यावी.रेकॉर्ड नाही म्हणता हे योग्य नाही. उद्या जास्त रकमेची अफरातफर होऊ शकेल. चौकशी करून माहिती द्यावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** मालमत्तेची थकबाकी किती आहे. संबंधित अधिकारी यांना विचारणा करावी.

**मा.सभापती :** मागील बैठकीच्या वेळेस माहिती मागविली होती का देण्यात आली नाही.

**मा.उप आयुक्त (म) :** मागील बैठकीत झालेल्या चर्चेनुसार या बैठकीत माहिती मागविली होती. न दिल्यास जबाबदारी निश्चित केली जाईल असे ठरले. याची पुढील बैठकीपर्यंत संपूर्ण माहिती सन्माननीय सदस्यांना लेखी स्वरुपात पुरविली जाईल. हे प्रकरण ९१ मधील असून मागे जाऊन मागील चौकशी आपणास करणे शक्य होणार नाही. या प्रकरणाच्या चौकशीसाठी चौकशी अधिकारी नेमले होते. त्यांनी चौकशी अहवाल दिला. ते चौकशी अधिकारी सध्या येथे नाहीत. यापुढे असा प्रकार होणार नाही याची दखल घेतली जाईल व दोषींवर कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** विषय मंजूर करण्यात येतो. यापुढे असे प्रकरण होऊ नये याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**श्री.मधुकर सावंत :** पान क्र. १६ वर, ४ सुरक्षा रक्षक यांना ३०-९-९२ च्या स्थायी समितीच्या ठरावानुसार वेतनश्रेणी लागू करावी अशी चर्चा झाली होती. खुलासा देणार होते.

**मा.सभापती :** स्थायी समितीच्या ठराव क्रमांक २८८/८ दिनांक ३०-९-९२ मध्ये जी तारीख टाकण्यात आली होती त्या तारखेपासून त्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत दुरुस्ती करण्यात येते. तशी कार्यवाही व्हावी. विषय क्रमांक १ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

१) स्थायी समिती सभा दिनांक ३-८-२००० मधील -

स्थायी समिती ठराव क्रमांक ३३/२ नुसार श्री.के.आर.कुलकर्णी शाखा अभियंता यांना कामावर घेण्याबाबत मंजूर करण्यात आलेला ठराव मागे घेण्यात येतो. याप्रकरणी प्रशासनाने आपला अभिप्राय देऊन प्रशासनामार्फत हा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठवावा. या व इतर दुरुस्त्यांसह दिनांक ३-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, जायकवाडी (जुनी) येथील १५०० केव्हीए ११/०४३३ के.व्ही.ट्रान्सफार्मरची ओव्हरऑईलिंग साठीच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. १,०१,९६०/- एवढया किंमतीचे तयार करण्यात आले असून या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतुदीतून केला जाईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रु.१,०१,९६०/- मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,जायकवाडी (जुनी) येथील १५०० केव्हीए ११/०४३३ के.व्ही.ट्रान्सफार्मरची ओव्हरऑईलिंग करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,०१,९६०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६/३ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ३००/३५० अश्वशक्ती मोटारसाठी बिअरींग क्र. २९३३० बी चा पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेकडून यापुर्वीच्या मंजूर दरानुसार रक्कम पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेकडून यापुर्वीच्या मंजूर दरानुसार रक्कम रु. १,१३,६४०/- एवढया किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदरील खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीच्या आर्थिक तरतुदीमधून केला जाईल. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,१३,६४०/- ला मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ३००/३५० अश्वशक्ती मोटरसाठी बिअरींग क्र. २९३३० बी चा पुरवठा करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१३,६४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यववाही व्हावी.

**विषय क्र. ३७/४ :**

प्र.कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.हमालवाडा स्लम येथे नाल्यालगत रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामाकरीता सा.बां.खातेच्या वर्ष ९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. ११,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील काम "खुली गटार व संरक्षित भिंत बांधणे." या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेत दि. २०-९-९९ रोजी मान्यता मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकूण १६ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ (तीन) मोहोरबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.हयात कन्स्ट्रक्शन | ४% जास्त दराने |
| २) | सै.शफीयोद्दीन | ५% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ३) | एस.ए.मंडोरे | ५.९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची निविदा मे.हयात कस्ट्रक्शन यांची आहे. परंतु दराच्या वाटाघाटीबाबत मा.आयुक्त यांच्या दालनात तडजोड झाल्यानंतर संबंधीत ठेकेदाराने हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास लेखी संमती दिलेली आहे.करीता अं.प.दराची असलेली मे.हयात कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.हमालवाडा स्लम येथे नाल्यालगत रिटेनिंग वॉल बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदाधारक मे. हयात कन्स्ट्रक्शन यांनी लेखी संमती दिल्यानुसार सदरील काम त्यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८ ऑगस्ट २००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**-:दुरुस्ती :-**

**दिनांक १८-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामधील पृष्ठ क्रमांक ११ वर ठराव क्रमांक ३४/१ मध्ये अनुकमांक (१) या परिच्छेदापुढे क्रमांक (२) वर खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

---

२) दिनांक ३-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्रमांक ३१/८ नुसार श्री.सिद्दीकी मोहंमद मोहीयोद्दीन काझी यांच्या बडतर्फीचा स्थगित करण्यात आलेला ठराव मंजूर करण्यात येतो. त्यानुसार प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.सिद्दीकी मोहंमद मोहीयोद्दीन काझी अब्दुल रहेमान,बील कलेक्टर हे दिनांक २९-५-९२ च्या आदेश क्रमांक मनपा/अस्था-१/१९७३/९२ (दुरुस्ती आदेश क्र. मनपा/लेखा/अस्था-१/५८२/९३ दि. २२-२-९३) अन्वये अर्जित रजेनंतर कामावर हजर झालेले नाहीत. त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे नियम भंग केलेला असल्याचे निष्पन्न झालेले आहे.करीता मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदीनुसार त्यांचेवर शास्ती लावणे आवश्यक असल्याने-

श्री. सिद्दीकी मो.मोहीयोद्दीन काझी यंना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २(ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे नगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. ३८/१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, आरोग्य विभागातील सर्व आरोग्य केंद्रातून एन-७ येथील आरोग्याच्या गोडाऊनमध्ये निकामी झालेले साहित्य ज्याची यादी यासोबत आहे असे रुग्णालय व आरोग्य केंद्र औषधी भांडारमध्ये वापरण्यात आलेले साहित्य निकामी असून उपयुक्त नाही. म्हणून त्यांची विक्री लिलाव पध्दतीने करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. या निकामी साहित्याची अंदाजे किंमत रु. २,२६,१२०/- इतकी आहे. तरी जाहीर प्रगटनाद्वारे सुचना देऊन वरील निकामी साहित्याचा लिलाव पध्दतीने विक्री करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरोग्य विभागातील सर्व आरोग्य केंद्रातून एन-७ येथील आरोग्याच्या गोडाऊनमध्ये रुग्णालय व आरोग्य केंद्र औषधी भांडारमध्ये वापरण्यात आलेले निकामी साहित्याचा जाहिर प्रगटनाद्वारे सूचना देऊन लिलाव पध्दतीने विक्री करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता,मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरीता "महिंद्रा जीप" साठी लागणाऱ्या स्पेअर पार्टस् करीता वार्षिक करार करण्यासाठी महिंद्रा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून "डी" फॉर्मवर बोलावण्यात आल्या होत्या.

१) दै.सामना, २) लोकमत टाईम्स, ३) शासन सम्राट हया वर्तमानपत्रातून टेंडर नोटीस क्र.मनपा/लेखा/नि/५३/९९ दि. २४-१२-९९ प्रमाणे टेंडर नोटीस देण्यात आली. एकूण दोन निविदा विक्री झाल्या व २ प्राप्त झाल्या.दोन्ही एजन्सीचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.रत्नप्रभा मोटार्स,औरंगाबाद | प्राईजलिस्ट + १४% |
| २) | मे.भारत ॲटो स्टोअर्स,औरंगाबाद | प्राईजलिस्ट + १७% |

मा.आयुक्त यांचे आदेशानुसार दोन्ही एजन्सीजना पत्र देवून दर कमी करण्यासाठी कळविले असता दोन्ही एजन्सीजनी प्राईजलिस्ट + १३% असे दर दिले. परत एकदा दर कमी करण्यासाठी पत्र दिले असता फक्त मे.भारत ऑटो स्टोअर्स, औरंगाबाद यांनी कंपनी प्राईजलिस्ट + १२ १/२ % टॅक्सेस/लिव्हीज असे दर दिले आहेत.

वर्षभरात जीपसाठी अंदाजे २.२५ लाख रुपयांचे स्पेअर पार्टस् खरेदी अपेक्षित आहे.तरी कमी दराचे मे.भारत ऑटो स्टोअर्स,औरंगाबाद यांचे प्राईजलिस्ट + १२ १/२ दराने वार्षिक करार करण्यास मा.आयुक्तांनी दिनांक ८-८-२००० रोजी मंजुरी दिली आहे. हया दराने वार्षिक करार करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाकरीता "महिंद्रा जीप" साठी लागणाऱ्या स्पेअर पार्टस करीता वार्षिक करार करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदापैकी वाटाघाटीत ठरल्यानुसार मे.भारत ऑटो स्टोअर्स,औरंगाबाद यांचे कंपनी प्राईजलिस्ट + १२ १/२% या दराने वार्षिक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/३ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पाणी पुरवठा-१ साठी लागणारे विविध व्यासाचे स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. ९,९७,०५०/- चे तयार करण्यात आले. त्यास मा.आयुक्त यांनी दि. ११-६-१९९९ अन्वये मान्यता दिली असून मा.स्थायी समितीने ठराव क्र. १९५/६ दि. ६-७-१९९९ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

कार्यालयीन निविदा सूचना क्र. ४३/९९ अन्वये दै.वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन "डी" फॉर्मवर मागविण्यात आल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेस एकूण तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| प्रशासनाने मान्य केलेले अंदाजपत्रकीय दर | | | गुत्तेदारांचे दर |
|---|---|---|---|
| १) | ८० मी.मी. | २३८३X १६=३८,१२८/- | ४५,३६०/- |
| २) | १०० मी.मी. | ३१७७X४८=१,५२,४९६/- | १,७६,४००/- |
| ३) | १५० मी.मी. | ४७६५X४५=२,१४,४२५/- | २,६८,८७५/- |
| ४) | २०० मी.मी. | ८४३८X१६=१,३५,००८/- | १,४२,८००/- |
| ५) | २५० मी.मी. | १२६३४X१०=१,२६,३४०/- | १,१५,५००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६) | ३०० मी.मी. | १४६२०x०५=७३,१००/- | ७३,५००/- |
| ७) | ३५० मी.मी. | २५९००x०५=१,२९,५००/- | १,१०,२५०/- |
| ८) | ४०० मी.मी. | ३१९८२x०४=१,२७,९२८/- | १,१३,४००/- |
| | | ९,९६,९२५/- | १०,४६,०८५/- |

१) ४.९१ % अं.प.दरापेक्षा जास्त दराने
२) ८.३१% अं.प.दरापेक्षा जास्त दराने
३) ८.३७% अं.प.दरापेक्षा जास्त दराने

वरील तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९१% जास्त दराची निविदा ही सुरज इंटरप्रायजेस यांची आहे. सदर दर जास्त असल्याने गुत्तेदाराशी वाटाघाटी केल्या. त्या अंती असे ठरले की, गुत्तेदाराने ८०,१००,१५०,२००,३०० मी.मी. व्यासासाठी जे जास्त दर दिले ते अंदाजपत्रकीय दराने पुरवठा करावे व २५०,३५० व ४०० मी.मी. व्यासासाठी दिलेले दर कमी दर स्विकारण्यात येतील त्यानुसार ९,५२,३६७/- ची रकमेची निविदा येते.(अं.प.दरापेक्षा ४.४७% कमी दराने) त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी सुरज इंटरप्रायजेस यांची ४.४७% कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा-१ साठी लागणारे विविध व्यासाचे स्लुस व्हॉल्व खरेदी करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदानुसार प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सुरज इंटरप्रायजेस यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ८०,१००,१५०,२०० व ३०० मी.मी. व्यासासाठी दिलेल्या जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने तसेच २५०,३५० व ४०० मी.मी. व्यासासाठी दिलेले अं.प.दरापेक्षा ४.४७% कमी दराची म्हणजेच रक्कम रु. ९,५२,३६७/- या रकमेची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.श्याम राघु बावस्कर,मजुर,झोन क्र. २ हे दिनांक २८-१-९८ पासून कामावरुन विना परवानगी सतत गैरहजर आहे. त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/अस्था-२/२३१९/९९ दिनांक २८-५-९९ अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती व त्यांच्याकडून गैरहजेरी संबंधाने लेखी स्पष्टीकरण १४ दिवसात मागविण्यात आले होते.उक्त कारणे दाखवा नोटीसचे त्यांनी दिलेल्या मुदतीत स्पष्टीकरण सादर केले नाही. त्यांना कामावर हजर होण्यास योग्य संधी प्राप्त व्हावी म्हणून कार्यालयीन पत्र क्र.मनपा/अस्था-२/४३७३/९९ दि. १३-१२-९९ अन्वये स्थानिक दै.लोकमत,दै.तरुण भारत या दैनिकात जाहीर प्रसिध्दी देवून एक महिन्याची मुदत देवून स्पष्टीकरणासह कामावर उपस्थित होण्याची सूचना देण्यात आली होती, परंतु त्यांनी कार्यालयात कोणत्याच प्रकारचे लेखी स्पष्टीकरण सादर केले नाही, त्यामुळे श्री.श्याम राघु बावस्कर,सफाई मजूर,झोन क्र.२ यांना महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्याची प्रशासनाची धारणा झालेली आहे.

करीता श्री.श्याम राघु बावस्कर,सफाई मजूर,झोन क्र. २ यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्री.श्याम राघु बावस्कर,मजुर,झोन क्र.२ हे दि. २८-१-९८ पासून कामावरुन विना परवानगी सतत गैरहजर असल्याने तसेच त्यांना कामावर रुजू होण्यासाठी योग्य संधी प्राप्त करून दिल्यानंतरही ते कामावर हजर न झाल्यामुळे त्यांना मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) अन्वये महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता मर्क्युरी व्हेपर पथदिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी सन १९९९-२००० वर्षाच्या दरसुचीनुसार रक्कम रु. ९,८४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी रक्कम रु. ९,८४,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पथदिव्यांची देखभाव दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता मर्क्युरी व्हेपर पथदिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,८४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३/६:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता २५० वॅट सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता सन १९९९-२००० वर्षाच्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,९९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी रक्कम रु. ९,९९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता २५० वॅट सोडीयम व्हेपर दिव्याचे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,९९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता टयुब,स्टार्टर व चोक हे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता सन १९९९-२००० वर्षाच्या दरसुचीनुसार रक्कम रु.९,५४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी रक्कम रु. ९,५४,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता टयुब,स्टार्टर व चोक हे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.९,५४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/८:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता १५० वॅट सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता सन १९९९-२००० वर्षाच्या दरसुचीनुसार रक्कम रु. ९,९७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी रक्कम रु. ९,९७,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शहरातील पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाकरीता १५० वॅट सोडीयम व्हेपर दिव्यांचे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,९७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६/९:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चिश्तिया कॉलनी चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता मा.स्थायी समितीने रक्कम रु. ३,८८,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.फर्रानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब | ५.१०% जास्त दराने |
| २) | मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादीत (एम.एस.एस.आय.डी.सी.) | अंदाजपत्रकीय दराने. |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादीत (एम.एस.एस.आय.डी.सी.) यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दराएवढी होती, परंतु वरील दोन्ही एजन्सीमध्ये स्पर्धा झालेली दिसत नसल्याने मा.आयुक्त यांनी सदर कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात म्हणून आदेशित केले. त्यानुसार दुसऱ्या वेळेस सदर कामाकरीता फेरनिविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे.न्युक्लीऑनिक्स, पुणे | २२.९०% | कमी दराने |
| २) | मे.सी.एम.एस.ट्राफिक सिस्टम लि.मुंबई. | १५.१५.% | कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.न्युक्लीऑनिक्स, पुर्ण यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २२.९०% कमी आहेत. मा.आयुक्त यांनी प्रथम क्रमांकाचे एजन्सीचे दरास खालील अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता दिलेली आहे.

**<u>अटी व शर्ती :</u>**

१) प्रथम क्रमांकाचे दर कमी असलेल्या एजन्सीकडून संकेतांकासाठी आवश्यक असलेले मायक्रोप्रोसियन बेस्ट ट्राफिक कंट्रोलर यांच्याकडे उपलब्ध आहे काय? याबाबतची माहिती एजन्सीकडून कार्यादेश देण्यापुर्वी घेण्यात येईल.

२) जर त्यांच्याकडे वरील प्रमाणे कंट्रोलर उपलब्ध असल्यास संकेतांकामध्ये काम करण्यापुर्वी सदर कंट्रोलर मायक्रोपीसीयन बेस्ट आहेत काय? याबाबत तज्ञांकडून तपासणी करुनच कंट्रोलर बसविण्यात यावेत.

३) तज्ञांकडून तपासणी झाल्यानंतर ते बसविणार असणारे कंट्रोलर जर मायक्रोप्रोसीयन बेस्ट नसल्याचे आढळून आल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

तरी वरील अटी व शर्तीचे अधिन राहून मे.न्युक्लीऑनिक्स, पुणे यांचे अं.प. दरापेक्षा २२.९०% कमी दराचे निविदापत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिश्तिया कॉलनी चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अं.प.दरापेक्षा २२.९०% कमी दराची मे. न्युक्लिऑनिक्स, पुणे यांची निविदा प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ च्या अटी व शर्तीच्या अधीन राहून स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/१०:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, गजानन महाराज मंदीराजवळील चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता मा.स्थायी समितीने रक्कम रु. ३,९८,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे, त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता फक्त दोन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.फर्रानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब | ५.८०% जास्त दराने |
| २) | मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादीत (एमएसएसआयडीसी) | अंदाजपत्रकीय दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादीत (एमएसएसआयडीसी) यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची होती. परंतु वरील दोन्ही एजन्सीमध्ये स्पर्धा झालेली दिसत नसल्याने मा.आयुक्त यांनी सदर कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात म्हणून आदेशित केले. त्यानुसार दुसऱ्या वेळेस सदर कामाकरीता फेरनिविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीचया अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. न्युक्लिऑनिक्स, पुणे | २३.१०% कमी दराने |
| २) | मे.सी.एम.एस.ट्राफिक सिस्टम लि.मुंबई. | १५.१५% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. न्युक्लिऑनिक्स ,पुणे यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २३.१०% कमी आहेत.

मा.आयुक्त यांनी प्रथम क्रमांकाचे एजन्सीचे दरास खालील अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता दिलेली आहे.

१) प्रथम क्रमांकाचे दर कमी असलेल्या एजन्सीकडून संकेतांकासाठी आवश्यक असलेले मायक्रोप्रेसियन बेस्ट ट्राफीक कंट्रोलर यांच्याकडे उपलब्ध आहे काय याबाबतची माहिती एजन्सीकडून कार्यादेश देण्यापुर्वी घेण्यात येईल.
२) जर त्यांच्याकडे वरील प्रमाणे कंट्रोलर उपलब्ध असल्यास संकेतांकाचे काम करण्यापुर्वी सदर कंट्रोलर मायक्रोप्रोसियन बेस्ट आहेत काय याबाबत तज्ञांकडून तपासणी करुनच कंट्रोलर बसविण्यात यावेत.
३) तज्ञांकडून तपासणी झाल्यानंतर ते बसविणार असणारे कंट्रोलर जर मायक्रोप्रोसियन बेस्ट नसल्याचे आढळून आल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.
तरी वरील अटी व शर्तीचे अधिन राहून मे. न्युक्लिऑनिक्स, पुणे यांचे अं.प.दरापेक्षा २३.१०% कमी दराचे निविदापत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गजानन महाराज मंदीरा जवळील चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.१०% कमी दराची मे. न्युक्लीऑनिकस,पुणे यांची निविदा प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ च्या अटी व शर्तीच्या अधिन राहून स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८/११:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की,सिडको मुख्य कार्यालयाजवळील स्टेट बँक ऑफ इंडिया चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता मा.स्थायी समितीने रक्कम रु. ३,८८,०००/- च्या अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविली असता फक्त दोन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.फर्रानी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब | ७.६०% जास्त दराने |
| २) | मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादीत (एमएसएसआयडीसी) | अंदाजपत्रकीय दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादीत (एमएसएसआयडीसी) यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दराएवढी होती. परंतु वरील दोन्ही एजन्सीमध्ये स्पर्धा झालेली दिसत नसल्याने मा.आयुक्त यांनी सदर

कामासाठी फेरिनिविदा मागविण्यात याव्यात म्हणून आदेशित केले. त्यानुसार दुसऱ्या वेळेस सदर कामाकरीता फेरनिविदा मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत तीन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त दोन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे | २३.४०% कमी दराने |
| २) | मे.सी.एम.एस.ट्राफिक सिस्टम लि.मुंबई | १५.१५% कमी दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे यांचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा२३.४०% कमी आहेत. मा.आयुक्त यांनी प्रथम क्रमांकाचे एजन्सीचे दरास खालील अटी व शर्तीचे अधिन राहून मान्यता दिलेली आहे.
अटी व शर्ती :
१) प्रथम क्रमांकाचे दर कमी असलेल्या एजन्सीकडून संकेतांकासाठी आवश्यक असलेले मायक्रोप्रोसियन बेस्ट ट्राफिक कंट्रोलर यांच्याकडे उपलब्ध आहे काय? याबाबतची माहिती एजन्सीकडून कार्यादेश देण्यापुर्वी घेण्यात येईल.
२) जर त्यांच्याकडे वरील प्रमाणे कंट्रोलर मायक्रोप्रोसियन बेस्ट आहेत काय याबाबत तज्ञांकडून तपासणी करुनच कंट्रोलर बसविण्यात यावेत.
३) तज्ञांकडून तपासणी झाल्यानंतर ते बसविणार असणारे कंट्रोलर जर मायक्रोप्रोसियन बेस्ट नसल्याचे आढळून आल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.
तरी वरील अटी व शर्तीच्या अधिन राहून मे. न्युक्लिऑनिक्स, पुणे यांचे अं.प.दरापेक्षा २३.४०% कमी दराचे निविदापत्रक मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको मुख्य कार्यालयाजवळील स्टेट बँक ऑफ इंडिया चौकात वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्ष्ज्ञा २३.४०% कमी दराची मे.न्युक्लिऑनिक्स, पुणे यांची निविदा प्रस्तावातील अ.क्र. १ ते ३ च्या अटी व शर्तीच्या अधिन राहून स्विकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/१२:**

कार्यकारी अभियंता (पापु व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, भूमी अभिलेख प्रशिक्षण संस्था दमडी महल येथील होस्टेल बिल्डींग प्रशिक्षण संस्था व इतर इमारतींना पाणी पुरवठा करण्यासाठी म.जि.प्रा.च्या १९९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,९७,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून मा.आयुक्त यांनी दि. १८-८-२००० अन्वये प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

सदर काम हे डिपॉझिट वर्क अंतर्गत प्रस्तावित असून कार्यकारी अभियंता (सिडको) यांनी दि.९-५-२००० अन्वये धनादेशद्वारे रक्कम रु. २,३३,६००/- मनपा कोषागारात जमा केलेली आहे. सदर जलवाहिनी ही मनपाच्या मालकीची राहील. त्याबाबत संस्थेकडून करारनामा करुन घेण्यात येईल. तरी रक्कम रु. १,९७,१००/- प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भूमि अभिलेख प्रशिक्षण संस्था, दमडी महल येथील होस्टेल बिल्डींग, प्रशिक्षण संस्था व इतर इमारतींना पाणी पुरवठा करण्यासाठी १०० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,९७,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## -:सभागृहातील ऐनवेळची चर्चा :-

**श्री.भरत लकडे :** माझ्या वार्डात पाच फुट गल्ल्या आहेत.कचरा साचला, गाळ काढत नाही. माझ्या वार्डात नाल्या साफसफाई कराव्यात. पावसामुळे कचरा वाहून येतो. कचरा साचतो व वास येतो. त्यामुळे गॅस्ट्रोची लागण होते.माझ्या मुलीचा मुलीचा मृत्यू गॅस्ट्रोची लागण झाल्यानेच झाला. यासंबंधी तीन वेळेस पत्र दिले. कार्यवाही नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** ज्या गल्ल्यांतील नाल्यात कचरा सचलेला होता, पाच मजूर लावून साफसफाईचे काम चालू केले.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** नाला सफाईचे काम सुरु केले म्हणता परंतु असे निदर्शनास येते की, ५० मजूर कामावरुन कमी करण्यात आले. का कमी केले आवश्यकता असेल तर ठेवावे. काढून टाकू नये.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** कर्मचारी कमी केले नाही. ५-५ लोकांचे ग्रुप करुन साफसफाई करीता आहोत.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** अधिकारी दिशाभूल करतात. कामगार कमी केलेले आहे. स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून १० लाखांचे टेंडर काढले. कर्मचारी घरी पाठवतात.

**श्री.जगदीश सिध्द :** एका सन्माननीय सदस्यांना संबंधित अधिकारी मोठमोठयाने बोलतात ही काही पध्दत आहे काय?

**मा.सभापती :** सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर अधिकारी यांनी राग मानू नये. मोठमोठयाने बोलणे योग्य नाही.सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** डॉ. देशपांडे प्रत्येक वेळेस दमदाटी पणाने बोलतात. ही शिस्त योग्य नाही.

**श्री.साहेबराव कावडे :** नारेगांवकडे एका दुसऱ्या माणसाच्या शेतात मनपाच्या गाडीने वाहून नेणारा कचरा टाकण्यात येतो. मनपाच्या गाडयाने नेऊन कचरा दुसऱ्याच्या शेतात कसा टाकण्यात येतो. जागा ठरवून दिली नाही का? या संबंधी मा.महापौर यांना पत्रही दिले. त्यांनी सांगितले उचलून घ्यावे. संबंधित अधिकारी यांना सुध्दा बोलावून सांगितले. कार्यवाही होत नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** जो कचरा आहे तो ५-६- वर्षापुर्वीचा असून तो दुसऱ्याच्या शेतात टाकलेला आहे. तो उचलण्यास जास्त खर्च येईल. मनपाने टाकला की, मालकाने टाकून घेतला चौकशी करावी लागेल. उचलावयाचा असेल तर खर्च मंजूर करावे. उचलण्यात येईल.

(याचवेळी सन्माननीय सभासद श्री.तुळशीबागवाले डॉ.देशपांडे नेहमीच अरेरावीची भाषा करतात, उध्दटपणे बोलतात म्हणून विषयपत्रिका सभागृहात फाडून सभात्याग करुन बाहेर जातात.)

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** टाकतानाच थांबवावयास पाहिजे होता. त्यावेळी का रोखला नाही.

**मा.सभापती :** कचरा की मटेरीयल माहिती द्यावी. कसा टाकला, लेखी पत्र दिले का?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** कचरा टाकलेला नसून बिल्डींग मटेरीयल आहे. संबंधित मालकाची कचरा टाका किंवा टाकू नये अशी कोणतीही हरकत नाही.

**श्री.गणेश तांबे :** मनपाची जागा नसतांना लोकांच्या जागेत कचरा कसा टाकला जातो. तेथे राखणदार नाही.

**मा.सभापती :** सर्व पदाधिकारी यांनी चर्चा केलेली आहे. येत्या दोन दिवसांत त्यांची बदली होणार आहे.

**श्री.जगदीश सिध्द :** १६ ऑगस्टच्या पेपरमध्ये आले ले-आऊट न होताच महानगरपालिका २०X३० च्या जागेवर होणारे प्लॉटच्या बाबतीत कार्यवाही करु शकत नाही काय? याच पेपरमध्ये दुसऱ्या बाजुने बातमी आली २०X३० व ३०X४० च्या भूखंड विक्रीची जाहीरात आली. मनपाचे कोटयवधीचे नुकसान होण्याबाबत, प्रशासकीय अधिकारी काय कार्यवाही करतात. शहरात जवळपास १० हजार अनधिकृत कन्स्ट्रक्शन चालू आहेत. याची चौकशीसाठी कमेटी नेमावी. कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** यासंबंधी चर्चा झाली. २०X३० प्लॉटसंबंधी जी सूचना केली पुंडलिकनगरमधील नोटीफाईड एरिया सिडकोचा येतो. मनपाचा काही संबंधी नाही. नियमात बसत नसेल तर अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

**श्री.गणेश तांबे :** सुरेवाडी, जाधववाडी येथे २०० कामे चालू आहेत.

**मा.सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी अनधिकृत बांधकामे थांबवावी. नुसते थांबवून चालणार नाही तर चालू होणार नाही याची दक्षता घ्यावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | स्थायी समिती |
| | महानगरपालिका औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ५.०९.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मंगळवार दि. ५.०९.२००० रोजी मा. सभापती श्री अशरफ युनुस मोतीवाला यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ३.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा | सदस्य |
| २) | स. स. श्री कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ३) | स. स. श्री गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ४) | स. स. श्री जगताप मोतीलाल रघूनाथ | --//-- |
| ५) | स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीत सिंग | --//-- |
| ६) | स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ७) | स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | --//-- |
| ८) | स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव | --//-- |
| ९) | स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | --//-- |
| १०) | स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल | --//-- |
| ११) | स. स. श्री सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १२) | स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

(सभेच्या सुरुवातीस मा. सभापती श्री अशरफ मोतीवाला यांची नव्यानेच सभापती पदावर निवड झाल्याने व आजची सभा त्यांच्या अध्यक्षतेखाली प्रथमच होत असल्याने मनपाचे उपआयुक्त (महसुल) श्री शिंदे साहेब यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करुन अभिनंदन केले.)

**संवाद :**

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** शालेय विद्यार्थ्यांना गणेवश देण्याबाबत काय निर्णय झाला खुलासा करावा.

**उप आयुक्त (म) :** मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे सात पुरवठा धारकांना बोलावण्यात आले होते. त्यांना वेळ देऊन त्यांच्याशी चर्चा केली. सर्वात कमी दराने पुरवठा देऊन त्यांच्याशी चर्चा केली. सर्वात कमी दराने पुरवठा करण्यास शक्य आहे का ? विचारण्यात आले. फक्त एम. एस.एस. आय. डी. सी. या कंपनीने संम्मती दर्शविली. बाकीचे पुरवठाधारकांनी नकार दिलेला आहे. सदर एम. एस. एस. आय. डी. सी. या एजन्सीचे सॅम्पल मागवले. स्पेसिफिकेशन प्रमाणे देणार का, विचारण्यात आले. सॅम्पल प्राप्त नाही. आज संध्याकाळपर्यंत येणार असुन सॅम्पल पाहिल्यानंतर लगेचच निर्णय घेण्यात येऊन कार्यवाही करता येईल.

**श्री मधुकर सांवत :** मुलांना गणवेश केव्हा देणार याचा नेमका खुलासा प्रशासनाने करावा. नुकताच संत एकनाथ रंग मंदीरमध्ये हे कार्यक्रम झाला. मुलांच्या अंगात व्यवस्थित कपडे नव्हते. हे प्रशासनाने स्वत: बघितले आहे. लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा.

**श्री साहेबराव कावडे :** पुढील बैठकीपर्यंत निर्णय घेण्यात यावा. कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** प्रशासनाने शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्या संदर्भात पुढील बैठकीपर्यन्त निर्णय घ्यावा व तशी कार्यवाही करावी. आता विषय क्र. १ वर चर्चा करावी. नंतरच चर्चेसाठी वेळ देण्यात येईल.

**विषय क्र. ५०/१ :**

दिनांक १८-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**नगर सचिव :** दिनांक ३-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. ३१/८ नुसार श्री सिद्यीकी मोहमंद मोहीयोद्यीन काझी यांच्या बडतर्फीच्या प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता व त्यास दि. १८-८-२००० च्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. परंतु इतिवृत्तांत ठराव घेण्यात न आल्याने इतिवृत्तावरील पृष्ठ क्र. ११ वर ठराव क्र. ३५/१ मध्ये अनुक्रमांक (१) या परिच्छेदापुढे अ. क्र. (२) वर दुरुस्ती पत्रकात नमुद केल्याप्रमाणे ठरावाची नोंद घेण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री भरत लकडे :** श्री काझी सिद्यीकी मोहमंद यांचे संदर्भात लेखी माहिती सन्माननीय सदस्यांना देणार होते. माहिती दिली नाही.

**मालमत्ता अधिकारी :** सन ९०-९१ चे रेकॉर्ड सापडले असुन संबंधिताने ३७ बुकपैकी २५ बुक जमा केले. आज संध्याकाळपर्यन्त सन्माननीय सदस्यांना लेखी स्वरुपात त्या संबंधात माहिती पुरवण्यात येईल.

**मा. सभापती :** विषय क्र. १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक १८-८-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५१/२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी योजनेसाठी ट्रान्स्फार्मर ऑईलचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या यांत्रिकी विभागाच्या दरसुचीनुसार र. रु. १,१७,२६०/- एवढया किमंतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

या कामासाठी खर्च पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती च्या आर्थिक तरतुदीतुन केला जाईल. तरी अंदाजपत्रक रक्कम रु. १,१७,२६०/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे जायकवाडी योजनेसाठी ट्रान्सफॉर्मर ऑईलचा पुरवठा करण्याचे कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१७,२६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वेस्टेशन ते प्रिन्स्ट्रॅव्हल रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,९०,८९८/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त १० (दहा) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. हयात कन्सट्रक्शन | ३६.०७% | कमी दराने |
| २. | श्री जी. के. पवार | ३५.३५% | कमी दराने |
| ३. | मे. इंडियन कन्सट्रक्शन | ३१.७८६% | कमी दराने |
| ४. | मे. हरीओम कन्स्ट्र. | १५.००% | कमी दराने |
| ५. | मे. सुंदर कन्स्ट्रक्शन | २२.४०% | कमी दराने |
| ६. | मे. एम.एस.एस.आय.डी.सी. | दर दिलेले नाही | |
| ७. | मे. एस. एच असोसिएट | २२.५२% | कमी दराने |
| ८. | श्री एम. एम. काझी | २८.२८% | कमी दराने |
| ९. | श्री अब्दुल कलीम | ३०.३३% | कमी दराने |
| १०. | मो. सिराजउद्दीन सिद्दीकी | २१.२१% | कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. हयात कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अं. प. दरापेक्षा ३६.०७% कमी आहेत. परंतु मे. हयात कन्स्ट्रक्शन यांनी सदरील काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे तिसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार मे. इंडियन कन्स्ट्रक्शन यांच्या निविदाचे दर अं. प. दरापेक्षा ३१.७८६% कमी असुन त्यांच्याकडुन वरील दरात काम करुन घेण्यास मा. आयुक्तांनी दि. ११-८-२००० रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी मे. इंडियन कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन सदरील काम अं. प. दरापेक्षा ३१.७८६६% कमी दराने करु घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**सौ. विजया रहाटकर :** ज्या निविदा खुपच कमी दराने भरुन येतात अशा निविदा मान्य करावयाच्या नाही असे ठरले होते. प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे एवढया कमी दराने काम करण्यास ठेकेदारास कसे परवडते. यात कामाची प्रत चांगली नसते व व्यवस्थित काम न झाल्यास नुकसान होते. अशा निविदा मान्य करुन नये.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** रस्ता दुभाजक किती रनिंग मीटर बांधणार याचा प्रस्तावात सविस्तर उल्लेख केलेला नाही. सविस्तर माहिती द्यावयास पाहिजे. ज्यांनी निविदा सर्वात कमी दराची भरली त्यांनी काम करण्यास नकार का दिली व दुसऱ्या क्रमांकाची निविदा धारकास न देता तिसऱ्या क्रमांकाचे निविदा भरुन दिलेल्यांना हे कामास मंजुरी दिलेली आहे. याचा सविस्तर खुलासा व्हावा.

**अति. शहर अभि. :** निविदा मागविण्यात आल्या होत्या. सर्वात कमी दराची मे. हयात कन्स्ट्रक्शन यांची ३६.०७% कमी ने निविदा भरुल आलेली होती व पुढील निवडणुकीचा कालावधी आल्याने आचार संहितेमुळे बराच कालावधी

आल्याने आचार संहितेमुळे बराच कालावधी गेला. नंतर हया कन्स्ट्र. यांना पत्र देऊन कळविल्यास त्यांनी ९० दिवसांचा कालावधी उलटुन गेल्याने काम करण्यास नकार दिला व याच कामासाठी दुसऱ्या क्रमांकावर असलेले श्री जी. के. पवार यांनाही विचारण्यात आले. त्यांनीही नकार दिला. त्यांनी नकार दिल्याने तिसऱ्या मे. इंडियन कन्स्ट्रक्शन हे काम करण्यास तयार असल्याने त्यानुसार मान्यता दिलेली आहे. रस्ता दुभाजकाची उंची १ फुट करण्यात येणार आहे.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** रस्ता दुभाजक केल्यानंतर डांबरीकरण होते व त्यामुळे उंची कमी होते. नियोजन करुन काम करावे. नुकासान होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**श्री भाऊसाहेब वाघ, सौ. विजया रहाटकर :** प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा. संबधीत ठेकेदार चांगल्या प्रती काम करुन देणार नाही.

**अति. शहर अभि. :** जिल्हा दरसुचीनुसार रेटस तयार करण्यात येतात. त्यात जे दर दिले आहेत त्यानुसारच अंदाजपत्रकीय दर ठेवण्यात येतात.

**मुख्य लेखाधिकारी :** कमी दराची निविदा सादर झाली म्हणुन असे प्रस्ताव रिकॉल करता येणार नाही. संबंधित ठेकेदाराने स्पेसिफिकेशन प्रमाणे काम केले नाही तर त्यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल. काळया यादीत नाव समाविष्ट करता येईल. जे इस्टीमेट तयार करण्यात येतात ते स्टँडर्ड पध्दतीने होते. आताच काम चांगले होणार नाही म्हणुन प्रस्ताव रिकॉल करणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी सदर ठेकेदाराकडुन चांगल्या प्रतीचे काम करुन घ्यावे. याची जबाबदारी त्यांचेवर राहील. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वेस्टेशन ते प्रिन्ट्रॅव्हल रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी प्रथम व द्वितीय क्रमांकाचे सर्वात कमी दराचे निविदाधारकांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सदरील काम तिसरे कमी दराचे ठेकेदार मे. इंडियन यांचेकडुन अं. प. दरापेक्षा ३१.७८६६% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>चर्चा</u>

**संवाद :**

**श्री सुरगोणीवार नारायण, श्री भरत लकडे :** सध्या गणेश उत्सव सुरु असुन शहरात बऱ्याच ठिकाणी अंधाराचे साम्राज्य दिसुन येते. गणपती पाहण्यासाठी सध्या रात्री महिला व लहान-लहान मुले फिरतात. लाईट लावण्याबाबत संबधित अधिकाऱ्यांना सुचना करुनही कार्यवाही होत नाही. उप अभियंता श्री बनसोडे यांचेकडे गेल्यावर लाईटचे साहित्य नाही असे सांगतात. एकमेकांवर चालढकल करतात.

**श्री गणेश तांबे :** गणपतीचा उत्सव चांगला साजरा होत असतांनाच शहरामध्ये मुख्य रस्त्यावर लाईट बंद असल्याचे दिसुन येते. लाईट लावावे म्हणनु सन्माननीय सदस्य संबंधीत विभागात चकरा मारतात. अधिकारी सुचना करतात.

लाईटचे साहित्य नाही असे अधिकाऱ्यांकडुन उत्तरे मिळतात. हे बरोबर नाही. जवळपास बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी लाईट संदर्भात मागणी केलेली असतांना कार्यवाही नाव दाखवुन वेळकाढुपणा करतात असे दिसुन येते. जेथे लाईटची व्यवस्था नाही तेथे लाईटची व्यवस्था तात्काळ करावी.

**श्री भरत लकडे :** परवाच्या गेलेल्या ३ तारखेपर्यंन्त लाईटची सर्व व्यवस्था करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. कार्यवाही केली नाही.

**अति. शहर अभि. :** लाईटच्या संदर्भात बऱ्याच तक्रारी प्राप्त आहेत. मध्यंतरी एम.एस. ई.बी.चे व मनपाचे काही तांत्रिक अडचणींमुळे लाईट बंद होते व साहित्यही नव्हते. साहित्याची मागणीनुसार कार्यवाही झाली आहे. जेथे आवश्यकता आहे अशा ठिकाणी लाईट बसवण्याची कार्यवाही होईल.

**श्री भरत लकडे :** लाईट विभागावर चर्चेसाठी स्वतंत्र बैठक बोलवावी.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** विद्युत दिवे लावताना काळजी घ्यावी व जेथे अंधार आहे अशाच ठिकाणी फोकस दिवे लावावे. विद्युत मंडळा अंतर्गत असलेल्या पोलवर लावु नये व ज्या ठिकाणचे दिवे इतर कारणाने बंद आहेत ते चालु करावे.

**मा. सभापती :** विद्युत दिवे लावण्या संदर्भात स. सदस्यांच्या भावना व्यक्त केल्यानुसार संबधीत अधिकारी यांनी आवश्यक त्या ठिकाणी दिवे बसवण्याची तात्काळ कार्यवाही करावी व जे दिवे बंद अवस्थेत आहेत ते चालु करण्याचीही व्यवस्था करावी.

**सौ. विजया रहाटकर :** गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्यात येते. महिला बारबाला संदर्भात कार्यवाही चालु आहे. शहरात या संदर्भात सगळीकडे चर्चा झाली. चौकशी झाल्यास त्याचे वाईट परिणाम होतील असे वाटते. अशा प्रकरणात मनपाचे दुर्लक्ष होते आहे हे दिसुन येते. याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास चिंतामणी हौसिंग सोसायटी तेथे पेशवा पार्क नावाचे परमीट रुमचे बांधकाम चालु आहे. संबंधीताने मनपाकडुन परवानगी घ्यावयास पाहिजे. ती घेतलेली दिसत नाही. व सदरचे बांधकाम स्वत:चे घर पाडुन सुरु केले आहे. प्रतिष्ठत लोक, रहिवाशी असलेल्या या कॉलनीमध्ये बियर-बारचे दुकान सुरु होते. हे योग्य नाही. संबंधीताने ना हरकत प्रमाणपत्र घेण्या संदर्भात नगर रचना विभागाकडे मागणी केली ती दिलेली आहे का? जर परवानगी नसतांना बांधकाम केले कसे याचा अर्थ मनपाचे डोळे बंद आहे. यामुळे महिलांना त्रास होतो आहे. त्यांचेवर होत असलेले अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. एक्साईज डिपार्टमेंटला अर्ज देताना बांधकाम परवानगी आहे का, हे पाहण्याची काळजी घेतली पाहिजे.

**मा. सभापती :** मा. महापौर यांनी मा. जिल्हाधिकारी व मा. पोलीस आयुक्त यांना निवेदन सादर केलेले आहे. सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे.

**सौ. विजया रहाटकर :** अशा दुकानास परवानगी मिळाल्याने महिलावरचे अत्याचार वाढत आहेत.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** सदरचे बांधकाम संबंधीताच्या स्वत:च्या मालकीच्या जागेत कंपाऊंड वॉलचे आतमध्ये होत असेल तर असे दुकान होण्यास तेथील नागरीकांच्या तक्रारी असेल तर कार्यवाही करता येईल. नगररचना विभागाने खुलासा करावा.

**उप अभियंता (नगर रचना) :** पुढच्या सभेत खुलासा करण्यात येईल.

**श्री कैसरखान :** संबंधीताने अतिक्रमण करुन बांधकाम केले असेल तर काढण्याची कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** सदर बांधकाम अनधिकृत असेल तर तोडण्याची कार्यवाही करावी.

**उप आयुक्त (म):** संबंधीत जो कुणी बियर बारचे दुकान उघडतो त्यांनी विना परवानगी बांधकाम केलेले असेल तर नियमाने त्या बाबत कार्यवाही होईल. याची चौकशी आजच करायला सांगतो.

**श्री साहेबराव कावडे :** अशी दुकाने उघडण्यास ना हरकत प्रमाणपत्र देऊन बांधकामास परवानगी देणार काय?

**श्री सलीम पटेल :** प्रभारी शिक्षणाधिकारी सभेस उपस्थित नाही. युनिफॉर्म कसे घेतले. कसे घेणार याचा खुलासा व्हावा.

**श्री गणेश तांबे :** माझ्या वार्डात श्री सायन्ना महापौर असतांना एक रस्ता करण्यात आला व पुलाचे बांधकाम केले गेले. तसेच रस्त्यावर खडीकरण केले. अशा सुवीधा करण्यात आल्याने तेथ् आजुबाजूला रस्त्यालगत आता जवळपास १० हजार लोकांची वसाहत झाली व आता तेथील रस्ता बंद करण्यात आला. नागरीकांना जाण्यास रस्ता नाही. या संदर्भात आर्मी विभाग व मनपामध्ये चर्चा झाली होती. त्यात असे ठरले जमिनीचा मोबदला आर्मी विभागास द्यावे किंवा मनपाने कंपाऊंड वॉल बांधुन द्यावे. परंतु यास तत्कालीन आयुक्त यांनी मंजुरी देण्याऐवजी रद्द केले.

**अति. शहर अभि. :** कॅन्टोनमेंटची जागा होती. सात-आठ वर्षापुर्वी एक रस्ता करुन खडीकरण करण्यात आले होते. कल्व्हर्टचे बांधकाम केले. या रस्त्याचे डांबरीकरण करण्या सदंर्भात तेथील लोकांची मागणी होती. या रस्त्यासाठी येणाऱ्या खर्चा संदर्भात मा. आयुक्त व आर्मी विभागाचे अधिकारी यांचेत चर्चा होऊन या रस्त्यावर एकुण १४.५० लाख रुपये खर्च होऊ शकतात व त्यास आर्मीचे विभागाने संम्मती दर्शवली व त्यानुसार मा. आयुक्त यांचे समोर सर्व माहिती सादर केली होती. मा. आयुक्त यांनी अनधिकृत ठिकाणी खर्च करण्यास नकार दिला.

**श्री गणेश तांबे :** या अगोदरचे मा. आयुक्त यांनी सदर आर्मीचे विभागाशी चर्चा करुन काम करण्यास संम्मती दर्शविली व दुसरे आयुक्त काम करण्यास असमर्थता दर्शवितात हे बरोबर नाही.

**उप आयुक्त (म) :** मा. आयुक्त यांनी जो निर्णय घेतला त्या संदर्भात नियमाने कार्यवाही करण्याचे बाबतीत घेतला होता. अनधिकृत वसाहती मध्ये रस्ता तयार करण्यास खर्च करु शकतो? हे पहावे लागेल.

**श्री गणेश तांबे :** रस्त्यावर पुल केला. खडीकरणाचे काम केले असे पाहुन आजुबाजूला १० हजार लोकांची वसाहत झाली. रस्ता बंद झाल्यावर तेथील नागरीकांनी कोठुन जायचे. आर्मी विभागाने पत्र देऊन कळविले ८ दिवसात मनपाने कार्यवाही केली नाही तर रस्ता बंद करण्यात येईल.

**मा. सभापती :** प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**श्री सुरणोणीवार नारायण :** सिडकोतील मनपाच्या अंतर्गत असलेल्या म्हाडा कॉलनीत मनपातर्फे योग्य सुविधा पुरविण्यात येत नाही.

**कार्य. अभि. (पा. पु.) :** म्हाडा कॉलनीत पाहणी केली असुन सुविधा पुरवण्या संदर्भात त्या त्या कामांचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर केलेले आहे.

**श्री गणेश तांबे :** माझ्या वार्डात संपुर्ण भाग स्लम घोषित असताना विकास कामे करण्याचे वेळी अधिकारी चुकीच्या पध्दतीने माहिती संचिकेत लिहुन देतात. स्लम असताना हा भाग अनधिकृत असल्याने सुविधा पुरवण्यात येत नाही असे लिहिण्यात येते. अगोदर सुविधा दिल्या व आता हेतुपुरस्सर त्या भागात सुविधा दिल्या जात नाही. मग अगोदर सुविधा कोणत्या निकषावर करण्यात आल्या.

**प्रकल्प संचालक :** स्लम घोषित म्हणुन जयभीमनगर- भावसिंगपुरा हे संपुर्ण घोषित आहेत. मनपातर्फे झोपडपट्टीच्या चतु:सिमा अंतिम केलेल्या आहेत. त्यानुसारच कार्यवाही करण्यात येते.

**श्री गणेश तांबे :** अधिकारी कामे व्यवस्थित करत नसल्यास व सभागृहात चुकीची माहिती पुरवित असल्यास प्रशासनाने अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.

**उप अभि. (स्लम) :** घोषित स्लम असेल तर नक्कीच तेथे सुविधा देण्याबाबत कार्यवाही होईल.

**श्री गणेश तांबे :** प्रशासकीय अधिकारी पदावर टेक्नीकल अधिकारी नको असा निर्णय झालेला असतांना पुन्हा टेक्नीकल अधिकारी यांची नियुक्ती केली.

**श्री सलीम पटेल :** मटन, बीफ विक्री करण्यासाठी पोलीस विभागाची परवानगी असल्यास तरीसुध्दा मनपाकडुन परवानगी देण्यात येत नाही.

**श्री गणेश तांबे :** ज्या भागात नागरीकांच्या तक्रारी असतील अशा ठिकाणी परवानगी देऊ नये. तसेच मनपाच्या ट्रकखाली अपघात होऊन एका गरीब कुटूंबातील व्यक्तीची दोन मुले त्यात एक मुलगा ठार व एका मुलास अपंगत्व आले. मनपा काय मदत करणार खुलासा करावा. त्यांचे कुटूंबातील एका व्यक्तीस नोकरी द्यावी.

**उप आयुक्त (म):** अपघात झालेली बालके मनपाचे कर्मचारी नव्हते. बाहेरील होते. या अपघातात कोमल व सचिन या बालकांना मोठी इजा झाली त्यात एक बालकास मृत्यु आला. अपघात झाला त्या ठिकाणी प्रशासनाने भेट दिली. त्यावेळी काही सन्माननीय सदस्य व पदाधिकारी सुध्दा उपस्थित होते. ज्यांचा मृत्यु झाला त्या बालकाच्या अंत्यसंस्कारासाठी तातडीची मदत म्हणुन मनपातर्फे २०००/- रुपये देण्यात आले व एका बालकावर औषधोपचार चालु असून त्याचे खर्चाची ही सर्व जबाबदारी मनपा घेणार आहे.

**श्री गणेश तांबे :** गरीब कुटूंबातील मुले जखमी होऊन एकास मृत्यु आला. त्या कुटूंबातील एका व्यक्तीस मनपा सेवेत घ्यावे अशी विनंती आहे.

**श्री मोतीलाल जगताप :** नारेगाव येथे अपघात झालेला होता. त्याचेही कुटूंबातील एका व्यक्तीस मनपा सेवेत घ्यावे.

**उप आयुक्त (म) :** जी मदत द्यावयाची होती त्याची पुर्तता आपण करत आहोत. मनपा सेवेत त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस समावेश करुन घ्यावे अशी पध्दत सुरु केल्यास प्रशासनास अडचण निर्माण होईल. हा अपघात झालेला आहे. तो मुद्दामहुन झालेला नाही. संबंधित वाहन चालकावर पोलीस गुन्हा नोंद झाला. कार्यवाही होईल. जे सन्माननीय सदस्य व पदाधिकारी अपघात स्थळी उपस्थित होते त्यांनी सांगितल्यानुसार त्यांचे स्वेच्छा निधीतुन संबंधीत कुटूंबास आर्थिक मदत करता येईल का हे पाहण्यात येईल.

**श्री साहेबराव कावडे :** मागील बैठकीत चर्चा केली. मनपाचा कचरा आपल्या गाडयाने वाहतुक करुन दुसऱ्या शेतात विना परवानगी टाकण्यात आला होता.

संबंधीत मालकांनी तशी तक्रार दि. १५-०५-२००० रोजी मा. आयुक्त यांचेकडे दिलेली आहे. संबंधित अधिकारी यांनी अद्याप काहीही कार्यवाही केली नाही.

**मा. सभापती :** आजच्या सभेस संबंधीत अधिकारी उपस्थित नाहीत. पुढील बैठकीत खुलासा घेण्यात येईल.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २४-१०-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक २४-१०-२००० रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक २४-१०-२००० रोजी मा. सभापती श्री.अशरफ युनुस मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली " मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी ३.३० वाजता " वंदेमातरम् " या गीताने सुरू झाली अधिकारी वर्ग यांचेसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१ स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२ स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
३ स.स.श्री.कैसरखान बद्रोद्यीन खान
४ स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
५ स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
६ स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
७ स.स.श्री.सिध्द जगदीश कन्हैय्यालाल
८ स.स.श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
९ स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर
१० स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
११ स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२ स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
१३ स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल
१४ स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
१५ स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**मा.सभापती :** विषय क्र.१ वर चर्चा करावी.

**विषय क्र.५६/१:**

दिनांक १९.९.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**सौ.विजया रहाटकर :** इतिवृत्तातील पान क्र.८ वर विषय क्र.५५/३ स्थगित ठेवण्यांत आला आहे. तो मंजूर करण्यात यावा. चांगले काम होईल या संबंधित अधिकारी यांनी लक्ष द्यावे.

**श्री.अविनाश कुमावत:** इतिवृत्तातील पृष्ठ क्र.५ वर शहरातील किती हॉटेल व हॉस्पीटल आहेत त्यावर किती टॅक्स आकारला जातो याची माहिती या बैठकीत देणार होते ती माहिती देण्यांत यावी.

**उप आयुक्त (म):** या संबंधिची माहिती देण्यासाठी प्रशासनास १ महिन्याची मुदत दिलेली होती व त्या संबंधीची माहिती घेण्यास वेळ लागणार आहे. संपूर्ण

शहराचा सर्व्हे करावा लागणार असून पुढील बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती :** पुढील बैठकीत या संबंधीची माहिती देण्याची कार्यवाही करीावी. आणखी १५ दिवसाचा कालावधी देण्यात येतो.

**श्री.नारायण सुरगोनीवार :** मे.धनराज एजन्सीज बाबत मागील बैठकीत मुदद् उपस्थित केला होता. त्याबाबत व्यवस्थीत उत्तर मिळाले नाही. संबंधिताकडून जकात वसुल केली की नाही. या बाबत माहिती देण्यांत यावी.

**जकात अधिक्षक :** संबंधितांकडून जकात वसूल केलेली आहे. परंतू स.सदस्यांचे म्हणणे असे की बिल कमी दाखवून जकात कमी आकारण्यात आली. धनराज एजन्सीज यांना मुळ कागदपत्र सादर करावे म्हणून पत्र दिलेले आहे. प्रत्यक्ष चर्चा की केली मे.धनराज एजन्सी यांनी सदर कागदपत्र इन्कम टॅक्ससाठी दिले असल्यामुळे इन्कम टॅक्स विभागाकडून कागदपत्र मिळाल्यानंतर दाखल करू असे सांगितले यानंतर पुन्हा २/३ वेळेस पत्र देवूनही बिला संबंधिचे कागदपत्र न मिळाल्याने या विभागातर्फे यापुढे धनराज एजन्सीचा आयात होणारा माल अडवून ठेवून पाहिल्या मालाच्या बिलाची मागणी करून घ्यावी व नंतरच माल सोडवावा असे परिपत्रक काढले. परंतु परीपत्रक काढल्यापासून धनराज एजन्सीची एक ही गाडी आलेली नाही. याशिवाय सर्वे सहाय्यक जात अधिक्षक यांना पत्र देवून मे.धनराज एजन्सीजची कागदपत्रे आल्यास ती ताबडतोब कार्यालयात देण्यात यावी असे कळविले आहे.

**श्री.सुरगोणीवार नारायण:** ६ महिन्यापासून सतत मी या प्रश्नासंबंधी सुचना करतो आहे. पण अधिकारी कार्यवाही करण्याचे टाळाटाळ करतात. कार्यवाही का होत नाही याचा खुलासा व्हावा.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** गेल्या महिन्यापासून मे. धनराज एजन्सीच्या गाडयाच आल्या नाही असे म्हणणे चुकीचे वाटते. सदर मालक संपूर्ण कागदपत्राच्या सत्यप्रती देतील काय याचा खुलासा व्हावा.

**मा.आयुक्त :** मी सहाय्यक आयुक्त सेलटॅक्स म्हणून काम केलेले आहे ज्या वेळेस कर चुकवेगीरीपणा होतो मग तो कोणत्याची प्रकारचा कर असो कोणत्याही प्रकारची करचवुकवेपणा टाळण्याच्या दृष्टीने जी काही खबरदारीची उपाय योजना म्हणून जी काही कार्यवाही संबंधित संस्था करेल त्यास प्रत्येक डिपार्टमेंट सहकार्य करले. मला माहिती आहे सेलटॅक्स विभागाकडे सेंट्रल एक्साईज डिपार्टमेंट कर्मचारी येत होते. इनकम टॅक्स विभाग सुध्दा पत्र व्यवहार करत होते. दोन्ही डिपार्टमेंट स्टेट किंवा सेंट्रलचे असून आपली मनपा ही कायदयाने प्रस्तावित झालेली स्वायत्त संस्था आहे. म्हणून महानगरपालिकेला सुध्दा घटनेनुसार काही अधिकार आहेत.व घटना दुरूस्ती मी पाहिलेली आहे. त्यामुळे आपण फक्त त्या विभागाशी कार्यालयामार्फत ॲप्रोच झाले पाहिजे. मी स्वतः या बाबतीत कार्यवाही करील.

**श्री.जबिंदा दलबीरसिंग :** स्वत: मा. आयुक्त यांनी या संबंधि लक्ष देवून कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी जकातीच्या उत्पन्नाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. या बाबत मा. आयुक्त यांनी स्वत: जातीने लक्ष देवून तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** जकात अधिक्षक यांनी मे.धनराज एजन्सीजला पत्र देवून कळविले त्या पत्राची छायाप्रत संचिकेत आहे काय ? जकात कराबाबत वसुली पाहिजे तशी होत नाही यास जबाबदार कोण ?

**श्री.कैसर खॉन:** महानगरपालिकेच्या मालकीचे काही निवासस्थाने रिकामे असून कर्मचाऱ्यांची मागणी असतांना का देण्यांत येत नाही रिकामे निवासस्थान कर्मचाऱ्यांना दिल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होवू शकेल.

**मा.आयुक्त :** जकात अधिक्षक यांनी सांगितले कि, संबंधित व्यक्तीकडे कागद पत्राची मागणी करण्यासाठी कर्मचारी पाठवल ही चुकीची पध्दत असून आयुक्तांच्या सहिनुसार इन्कमटॅक्स कार्यालयाकडून त्या कागदपत्राची मागणी करावयास पाहिजे होती. एवढा उशीर पण झाला नसता त्यास विलंब झालेला आहे हे मी मान्य करतो. व यापुढी माझ्या सहिने पत्र जाईल व कार्यवाही होईल.

**श्री.गणेश तांबे :** इतिवृत्तावरील पान क्र.६ वर छावणी येथे एका रस्त्याच्या संदर्भात चर्चा झाली. या संदर्भात प्रशासनाच्या माध्यमातून काय कार्यवाही झाली.

**श्री.अविनाश कुमावत :** छावणी बोर्डाच्या हददीत रस्ता झाला व त्या मोबदल्यात संरक्षित भिंत बांधून देण्यात येईल असे तत्कालीन आयुक्त यांनी सांगितले होते. पण प्रत्यक्षात तशी कार्यवाही प्रशासनाकडून न झाल्याने रस्ता बंद करणार असे छावणी बोर्डाने सुचविले आहे. मध्यंतरीच्या काळात मा. आयुक्तांच्या सतत बदल्या होत होत्या. त्यामुळे कार्यवाही झाली नाही तेव्हा या प्रकरणी लवकरात लवकर कार्यवाही केल्यास बरे होईल.

**श्री.गणेश तांबे :** येत्या ३० तारखेपर्यंत तेथील रस्ता चालू राहणार असून त्यानंतर छावणी बोर्ड रस्ता बंद करणार आहे. तेव्हा त्या अगोदर संबंधीत विभागाकडून पत्र देवून कळवावे जेणे करून रस्ता बंद होवून नागरीकांना जाण्या येण्यास अडचण निमार्ण होणार नाही.

**मा.सभापती :** मा. आयुक्त खुलासा करतील.

**मा. आयुक्त :** स.सदस्य श्री.गणेश तांबे यांनी केलेल्या सुचनेनुसार छावणी बोर्डाला पत्र देवून मुदत वाढवून घेता येईल व नंतर हा प्रश्न कसा सोडवता येईल ते पाहावे लागेल तो रस्ता कसा झाला, करता येत होता का हे वेगवेगळे

प्रश्न आहे. माझ्या माहिती प्रमाणे ज्या संरक्षित भितीचे काम करावयाचे त्या कामासाठी लागणाऱ्या १४ लाख रू. खर्चासाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेतलेली नाही. तत्कालीन आयुक्त वैद्य साहेब यांनीफक्त मंजुर केले. खर्चाची मंजुरी घेणे जरूरी आहे. तसा ठराव झालेला नाही असे माझे मत आहे. छावणी बोर्डाच्या जागेवर रस्ता केला व त्या बदल्यात छावणी बोर्डाला संरक्षित भिंत बांधून दयावयाची असा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर व्हावयास पाहिजे यासाठी तसे पत्र पाठवून वेळ घेण्यात येईलव खर्चाबाबतचा ठराव सभेत मंजुर करून कायदेशीर बाबी तपासूनच हा प्रश्न कसा सोडवता येईल हे पहावे लागेल.

**श्री.कैसर खॉन :** इतिवृत्तांवरील पान क्र.५ वर दिल्लीगेट येथील निवासस्थाना बाबत मी सुचना केली होती त्या बाबत खुलासा व्हावा.

**मा.सभापती :** उप आयुक्त (म) यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त (म):** मा. स्थायी समितीच्या आदेशान्वये भाडे समितीची बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला कि, वर्ग-२ चे निवासस्थान वर्ग -२ याच अधिकाऱ्यांना दयावे व वर्ग -३ चे निवासस्थान वर्ग -३ च्याच कर्मचाऱ्यांना दयावे. स.सदस्य व सभागृहाच्या भावना लक्षात घेवू शकतो. सभागृहाने असे मत व्यक्त केले कि, सदर निवासस्थान वर्ग -३ च्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावे परंतू पाचव्या वेतन आयोगानुसार निवासी भाडयात वाढ झालेली असून वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना वर्ग-१ अथवा वर्ग-२ चे निवासस्थान देणे परवडणारे नाही वर्ग-३ चे कर्मचारी ज्याप्रमाणे भाडेवाढ केली त्याप्रमाणे भाडे भरण्यास तयार असतील तर तशी कार्यवाही करता येईल.

**श्री.गणेश तांबे :** काही कर्मचारी सेवेत नसतांना त्यांनी अद्याप निवासस्थान सोडलेले नाही. त्यांचे बाबतीत प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. नियमानुसार एखादा कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी १ महिन्याच्या आत शासकीय निवासिाान रिकामे करून दयावयास पाहिजे. परंतू तशी कार्यवाही महानगरपालिका प्रशासनाकडून होत नाही.

**उप आयुक्त (म):** तशा कर्मचाऱ्यांना नोटीस दिल्या आहेत लवकरच कार्यवाही होईल.

**श्री.अविनाश कुमावत :** निवासस्थाने महानगरपालिकाच्या मालकीचे आहेत मा. आयुक्त यांनी लक्ष घालून शासकीय मालमत्ता हस्तगत करण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** मा. आयुक्त यांनी महानगरपालिकेच्या मालमत्तेचे संरक्षण करावे. सेवानिवृत्त किंवा इतर ज्यांचा संबंध नाही अशी निवासस्थाने त्वरीत रिकामी करून घेण्याची कार्यवाही करावी.

**श्री.तुळशीबागवाले किशोर :** इतिवृत्तातील पान क्र.५ जालना रोड वरील सेंट फ्रांन्सीस हायस्कुल जवळील अपना बाजार येथील दुकानांना टॅक्स कमी करण्यात आला. ती कोणत्या नियमाने कमी केला याबाबत माहिती विचारण्यात आली होती व तशी माहिती या बैठकीत माहिती देणार होते. दुसरी बाब अशी ज्यांनी टॅक्स आकारणी कमी केली त्या कर्मचाऱ्यांचा त्या भागात काही संबध नसतांना टॅक्स कमी करून महानगरपालिकाचे ४-५ लाख रूपयाचे नुकसान केले या बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती :** सध्या अधिकारी यांचेकडे माहिती नाही जनरल चर्चा करते वेळी अधिकारी माहिती देतील स्थगित ठराव क्र.५५/३ स्थगित ठेवण्यात आलेला होता त्यासह विषय क्र.१ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक १९.९.२००० च्या इतिवृत्तातील.......

१) ठराव क्र.५५/३ अन्वये स्थगित केलेल्या प्रस्तावा ऐवजी बिजलीनगर उस्मानपूरा (दशमेशनगर) येथे रस्ते व कल्व्हर्ट तयार करणेच्या कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.८६२% कमी व तुलनात्मकदृष्या सर्वात कमी दराची न्यु स्टार कंन्स्ट्रक्शन यांची निविदा पत्रकाम सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या दुरूस्तीसह दिनांक १९.९.२००० च्या संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या इतिवृत्तास कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र.५७/२:**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, ५६ एम.एल.डी. जलशुध्दीकरण केंद्रावरील क्लॉरिफायर ब्रिजला नवीन टायर पुरविणे व बसविणे यासाठी मे.डॉट ऑलिव्हर कंपनीकडून प्राप्त दरानुसार अंदाजपत्रक र.रू.१,९०,११७/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा देखभाल दुरूस्तीच्या आर्थिक तरतुदीमधूनकेला जाईल. तरी अंदापजत्रक र.रू.१,९०,११७/- स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती :** विषय क्र.२ ते ७ मधील निविदा व अंदापजत्रक १० लाखाच्या आत असून शासन परिपत्रकानुसार १० लाखापर्यंतचे अधिकार मा. आयुक्तांना असल्याने सदर प्रस्ताव मा. आयुक्तांच्या अधिकारात येतात. त्यानुसार विषय क्र.२ ते ७ पर्यंतचे प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे वर्ग करण्यात येतात. मा. आयुक्त त्या बाबत निर्णय घेतील.

**ठराव :** शासनाच्या आदेशानुसार प्रस्तूत प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अधिकारात येत असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे वर्ग करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५८/३:** कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, जुना फारोळा पंपगृह येथे २००० ॲम्पीयर क्षमतेचे एअर सर्कीट ब्रॅकेट

पुरविणे व बसविणे बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीनुसार र.रू.२,२८,६३५/-एवढया किंमतीचे अंदापजत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील अंदापजत्रकास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च पाणी पुरवठा देखीााल व दुरूस्तीच्या तरतुदीमधून केला जाईल . करीता अंदापजत्रक र.रू.२,२८,६३५/- स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

शासनाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अधिकारात येत असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे वर्ग करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.५९/४:**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला जालना रोड रस्ता रूंदीकरणाच्या कामामध्ये येणाऱ्या १४००,७५०,७०० व ४०० मी मी व्यासाच्या मुख्य गुरूत्व वाहिनी, उध्दरण वाहिनीवरील एअर व्हॉल्व बाधीत होतात. सदरचे एअर व्हॉल्व हे स्थलांतरीत करावयाचे आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार रक्कम रू. ३,६२,८७५/- एवढया अंदापजत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा देखीााल व दुरूस्ती (पापु) या लेखा शिर्षकाच्या तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २.८.२००० रोजीच्या विकास कामासंबंधिच्या विविध विषयावरील आढावा बैठकीच्या इतिवृत्तामधील विषय क्र.२/२ नुसार जालना रोड रस्ता रूंदीकरणाच्या कामात बाधीत होणारे एअर व्हॉल्व त्वरीत स्थलांतरीत करून घेण्यास सूचीत केले आहे.

मा. आयुक्त यांनी दिनांक २१.९.२००० रोजी जालना रोड रस्ता रूंदीकरणाच्या कामावर प्रत्यक्ष पाहणी अंती बाधीत होणार एअर व्हॉल्व स्थलांतरीत करण्याबाबत आदेशित करून सदरचे काम हे उपलब्ध ठेकेदारामार्फत त्वरीत हाती घेण्यास आदेशित केले. सदरचे काम हे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ६७ सी (३)अन्वये मान्यता दिली असून स्थायी समितीच्या अंतिम मंजूरीस ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सदरचे काम ठेकेदार श्री.सुरेश बी. साधवानी यांच्यातर्फे सुरू करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

शासनाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अधिकारात येत असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे वर्ग करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.६०/५:**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे कि, जलशुध्दीकरण केंद्राला आवश्यक असणारी तुरटी खरेदी करण्याकरीता दैनिक वर्तमानपत्रातून निविदा सूचना प्रसिध्द करून (दरपत्रक निविदा) मागविले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | |
|---|---|
| | |
| िकल्स,औरंगाबाद | |
| रप्रायजेस | ा आली नाही |
| ाय.डी.सी. | |

वरील पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर मे. फोनिक्स केमिकल्स यांचा असून तो रू.२२३४-०० प्रति मे.टन एवढा आहे. एकूण ७०० मे.टन वार्षिक पुरवठा अपेक्षित आहे. तरी मे.फोनिक्स केमिकल्स यांची सर्वात कमी दराची म्हणजेच प्रति मे.टन रू.२२३४-०० या दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

शासनाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अधिकारात येत असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. आयुक्त याचंकडे वर्ग करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६१/६:**

पाणी पुरवठा विभाग क्र.२ च्या अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्याची  देखभाल व दुरूस्तीसाठी ए.सी.पाईप व सी.आय.डी. जाईंटस् खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक र.रू. ६,२२,८७९/- चे तयार करण्यात आले असून सदर अंदापजत्रकास स्थायी समिती विषय क्र.१ दिनांक २१.६.२००० अन्वये मंजुरी मिळाली . त्यानुसार निविदा मागविली असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एकूण दोन निविदा प्राप्त झालया त्या खालील प्रमाणे.

१ मे.अर्थ मोव्हर्स १.६१% कमी दराने
२ मे.सुरज एंन्टरप्रायझेस ३.७४% कमी दराने

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा मे. सुरज एन्टरप्रायजेस यांची असून अंदापजत्रकीय दरापेक्षा ३.७४% कमी दराची आहे. तरी अं.पं. दरापेक्षा ३.७४% कमी दराची मे.सुरज एंन्टरप्रायजेस यांची निविदा स्विकृतीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

शासनाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अधिकारात येत असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे वर्ग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.६२/७:**

एन -७ येथील जलकुंभ क्र.१ च्या दुरूस्तीसाठी सिमेंट सॅड गनायटींग ट्रिटमेंट करण्यासाठीच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे यांचय सन १९९८-९९ च्या दरसुचीनुसार अंदापजत्रक र.रू.५,७८,६४४/- चे तयार करण्यात आले होते. त्यानुसार त्यास स्थायी समिती विषय क्र.२ दिनांक २१.६.२००० अन्वये मंजुरी मिळाली. त्यानुसार वर्तमानपत्रात निविदा मागविलया त्या पुढील प्रमाणे
निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण १२ निविदा विक्री झाल्या आणि स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एकूण ३(तीन) निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| | ८२% कमी दराने |
| डेले | बाबत निविदा उघडली नाही |
| न दस्तगीर | बाबत निविदा उघडली नाही |

वरील प्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा श्री.शेख मसूद यांची असून अंदापजपत्रकीय दरापेक्षा १७.८२% कमी दराची आहे. तरी श्री.शेख मसुद यांची अंदापजत्रकीय दरापेक्षा १७.८२% कमी दराची निविदा स्विकृती बाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

शासनाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अधिकारात येत असल्यामुळे सदर प्रस्ताव मा. आयुक्त यांचेकडे वर्ग करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद:**

**श्री.अविनाश कुमावत :** विद्युत विभागात ३० लाखाचे एका कामाचे ३ तुकडे करून मंजुरी घेण्यात आली तर स्थायी समिती सभेचे अधिकार काय राहीले. एका प्रस्तावाचे तीन-तीन तुकडे प्रशासन करत असेल तर स्थायी समितीला यापुढे कोणते विषय येणार आहे . (एका कामाचे तीन अंदापजत्रक केलेले प्रत सभागृहास दाखवतात) हा प्रस्ताव स्थायी समितीला यावयास पाहिजे होता.

**मा.सभापती :** शासनाचे आदेश त्यानुसार १० लाखांचे अधिकार आयुक्तांना आहेत.

**श्री.जबिंदा दलबिरसिंग :** आयुक्त म्हणजे काही बॉडी नाही. कलम ७३ (डी) नुसार अंदापजत्रकास स्थायी समिती सभेची मंजुरी घ्यावी व मा. आयुक्त फक्त एजन्सी फिक्स करू शकतील.त्याप्रमाणे मा. आयुकत यांचे बंगल्यावरील ९५ हजाराचे इस्टिमेटचे काम होते. त्या कामाचे टेंडर केले का ? ते स्थायी समितीच्या मंजुरीस्तव आहे नाही.

**मा.आयुक्त :** ९५ हजाराचे इस्टीमेंट होते टेंडर ही झाले होते. त्यावेळी मी नुकताच रूजू झालेला होतो. तत्कालीन आयुक्तापासून त्या संबंधीची कार्यवाहीचालू होती. ज्यावेळेस माझ्या असे लक्षात आले कि, आता पावसाळा संपलेला आहे व या टेंडरमध्ये काही वाटरप्रुफच्चा मेजर ॲटर खर्च दाखवलेला होता म्हणून वॉटरप्रुफ साठी लागणारा खर्च कमी होता कामा नये मी करू नये इतरांनी सुध्दा विचार करावा माझ्या पासूनच मी सुरूवात केलेली आहे. तेव्हा मला दुसऱ्यास सांगण्यास उत्सुकता निर्माण होईल. ७ महिने बंगला रिकामा होता. या वर्षीच्या पावसाळयात बंगला अत्यंत खराब झालेला होता तेथे फक्त रंग वगैरे देणे व इतर लहान लहान कामासाठी खर्च केला आहे. ९५ हजार खर्च केले नाही. पावसाळा कामासाठी खर्च केला आहे. ९५ हजार खर्च केले नाही. पावसाळा संपला म्हणून हा उर्वरित खर्च पुढच्या वर्षी करता येईल या उददेशाने ते टेंडर कॅन्सल केले. दुसरा काहीही उददेश नाही.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांनी बंगल्यावरील कामा संदर्भात खुलासा केलेला आहे. नजीकच्या काळात दिवाळीचा रूग्ण आलेला आहे. या कालावधीत लाईटची गैरसोय होणारच नाही चीी प्रशासनाने काळजी घ्यावी. विद्युत साहित्य खरेदी बाबत ताबडतोब काळजी घ्यावी. विद्युत साहित्य खरेदी बाबत ताबडतोब शॅार्टटेंडर नोटीस काढून कार्यवाही करावी. व बंद पडलेले विद्युत दिवे पुर्ववत चालू करावेत.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा:** वेदांन्त हॉटेल लगत जाणाऱ्या रस्त्यावर लाईट बंद अवस्थेत आहेत . या रस्त्यावरून महाविद्यालयीन तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थी ये/ जा करतात लुटमार होते. रात्री-बेरात्री विद्यार्थ्यांना व इतर रहिवाश्यांना जाण्या येण्याची भिती वाटते. या रस्त्यावर अनेकदा चोऱ्या वगैरे होण्याचे प्रकार घडतात तेव्हा तातडीने लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री.सलीम पटेल:** लाईट खरेदी करण्याचे टेंडर निघाले त्यानुसार लाईट लावण्याची कार्यवाही का होत नाही. आता दिपावलीचा सण आलेला आहे मार्केट मध्ये लोक खरेदीसाठी ये/ जा करणार आहे अशावेळी रस्त्यावर प्रकाश असणे आवश्यक आहे.

**मा. आयुक्त :** जे टेंडर निघाले आहे. त्याची मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे या सभागृहाचा आता तसा निर्णय असेल नवीन प्रोसीजर नुसार कार्यवाही करता येईल. साहित्य नाही अशी चर्चा झाली बरेच स.सदस्य माझ्याकडे समस्या घेवून येतात. साहित्याची मागणी नोंदवावी त्यानंतर १०-१५ दिवसापर्यंत साहित्य मिळण्यास वेळ लागेल तोपर्यंत तरी आपणास त्रास सहन करावा लागेल. तातडीच्या व्यवस्थेसाठी थोडया फार रक्कमेचे साहित्य मागवता येईल.

**श्री.सुरगोणीवार नारायण:** वार्डात लाईटची छोटी मोठी कामे केली जातात. या बाबत संबंधीत वार्डातील नगरसेवकांना माहिती देण्यात येत नाही.

**मा.सभापती :** लाईट बाबत तातडीची व्यवस्था होण्यासाठी ५ लाखा पर्यंतचे विद्युत साहित्य मा. आयुक्त यांनी त्यांच्या अधिकारात खरेदी करण्यास मान्यता देण्यात यते. त्यानुसार कार्यवाही करावी.

**श्री.भरत लकडे :** माझ्या वार्डामध्ये लाईट बंद आहेत कधी दुरूस्त करणार या भागासाठी असलेल्या वाघ नावाचा लाईनमन कधी येतो व कधी जातो हे माहिती होत नाही. विचारणा केली असता लाईट दुरूस्त कले असे सांगितले जाते. कर्मचारी खोटे बोलतात अधिकाऱ्यांकडे विद्युत साहित्याची मागणी केल्यास मटेरियल नाही असे सांगतात. लाईटची कोणतीच कामे वेळेवर होत नाही.

**श्री.जबिंदा दलबिरसिंग :** वेदांन्त हॉटेल लगत रस्त्यावर लाईटची व्यवस्था व्हावी. या संबंधी बऱ्याचदा संबधित अधिकाऱ्याकडे तक्रारी आलेल्या आहेत. चेलीपुरा हायस्कुल जवळील रस्त्यावर २५० वॅटचे दिवे लावण्यात आले खरे सर त्याठिकाणी आवश्यकता नसतांना लाईट लावण्यात आले जेथे गरज आहे तेथे लाईट लावण्यात येत नाही. अधिकारी मनमानी पणाने कामे करतात हे बरोबर नाही.

**उप अभियंता (वि.):** वेदांन्त हॉटल लगत रस्त्यावर लाईट लावण्यासाठी जास्ती मटेरियल पाहिजे. सध्या मटेरियल कमी मागवलेले ओ. या रस्त्यावंर १५० वॅटचे दिवे लावण्यात आले होते. जे मटेरियल मागवले होते त्यातील नवरात्र मोहत्सवाच्या वेळी काही मटेरियलचा वापर केलेला आहे. आता सध्या पुरेसे मटेरियल नाही.

**श्री.भरत लकडे :** लाईट दुरूस्तीची गाडी बंद असून कधी दुरूस्त करणार.

**उप अभियंता (वि):** लाईट दुरूस्तीसाठी वापरण्यात येणारी गाडी दुरूस्त करण्या बाबतची संचिका मंजुरीसाठी सादर केली असून मंजुरी आल्या नंतर कार्यवाही होईल.

**श्री.कैसर खॉन:** वार्डात विद्युत लाईटची कामे केलीजातात याबाबत नगरसेवकांना माहिती होत नाही. कार्यालयात विचारणा केल्यानंतर काम केले असे उत्तर मिळते. कुठे व कधी काम केले काही समजून येत नाही. यापूढे संबंधित वार्डातील नगरसेवकांना माहिती देवून तेथील काम करण्याची कार्यवाही व्हावी अशी सुचना दयाव्यात.

**श्री.जबिंदा :** विद्युत विभागात जे जूने (भंगार) साहित्य असते ते विक्री बाबत टेंडर (विक्री) कधी काढले जाते माहिती होत नाही.

**श्री.कैसरखान:** एकाच व्यक्तीला विद्युत विभागचे जुने साहित्य विकले जाते अशी माहिती मिळाली आहे. या भंगार साहित्यात चालू स्थितीत असलेले विद्युत साहित्य (चोक,बल्ब इ.) पडलेले असतात. दोन वर्षात विद्युतचे किती साहित्य घेतले व जूने विद्युत साहित्य किती विकले त्याची माहिती दयावी.

**मा.सभापती :** ज्या ज्या वार्डात लाईटची कामे करावयाची आहेत त्यावेळी विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांनी संबंधीत वार्डातील स.सदस्यांना त्याबाबत माहिती दयावी. तसेच विद्युत विभागातील खराब (भंगार) झालेले साहित्य कोणास दिले जाते. ते एकाच व्यक्तीस दिले जाते काय ? याची मा. आयुक्त यांनी चौकशी करून कार्यवाही करावी.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २४ ऑक्टोबर २००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दि. २४.१०.२००० रोजी दुपारी ४.०० वाजता मा. सभापती श्री अशरफ युनुस मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालीलप्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

१) स. स. श्री कुमावत अविनाश लक्ष्मण
२) स. स. श्री कावडे साहेबराव राणुबा
३) स. स. श्री कैसरखान बद्रोद्दीन खान
४) स. स. सौ. खरात कुसूमबाई दौलत
५) स. स. श्री गणेश रामचंद्र तांबे
६) स. स. श्री जगताप मोतीलाल रघूनाथ
७) स. स. श्री सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
८) स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजीत सिंग
९) स. स. श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
१०) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती
११) स. स. श्री वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स. स. सौ. विजया किशोर रहाटकर
१३) स. स. श्री सलीम पटेल शमशेर पटेल
१४) स. स. श्री सावंत मधुकर दामोधर
१५) स. स. श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**विषय क्र. ६३/१ :**

दिनांक १०.१०.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती :** विषय क्र. १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक १०.१०.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ६४/२ :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २०००-०१ साठी स्थानिक व राज्यस्तरीय वृत्तपत्रातुन तयार गणवेश पुरवठयाबाबत निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या अखेरच्या दिनांकापर्यंत १५ निविदा प्राप्त झाल्या. द्विपाकीट पध्दतीने मागविण्यात आलेल्या या निविदामध्ये निविदेतील अटी व शर्ती याची पुर्तता करणाऱ्या निविदा खालील प्रमाणे.

१) एम. एस. आय.डी.सी., औरंगाबाद

२) मे. वासवाणी ड्रेनेसे पुणे
३) महिला आर्थिक विकास महामंडळ, औरंगाबाद
४) सोनाली क्लॉथींग, पुणे
५) समती सर्विसेस, औरंगाबाद
६) दिपलक्ष्मी महिला औद्योगिक संस्था औरंगाबाद
७) रेणुका गारमेंन्टस औरंगाबाद

गणवेश निवडीसाठी गठीत केलेल्या समितीने सातही निविदा धारकांनी सादर केलेल्या नमुन्यांची पाहणी केली व दिनांक १७-८-२००० रोजी नमुन्यांची निवड केली. निवडलेले नमुने व तुलनात्म्कदृष्टया कमी असलेले दर या बाबत मा. आयुक्तांनी दि. १८.८.२००० रोजी मे. वासवाणी ड्रेसेस, मे. महिला आर्थिक महामंडळ आणि मे. दिपलक्ष्मी महिला औद्योगिक महामंडळ यांना चर्चेसाठी बोलविले. तुलनात्मकदृष्टया कमी असलेल्या पण निवडलेल्या नमुन्यानुसार पुरवठा करण्यास तीनही निविदा धारकांनी सहमती दर्शविली नाही. या बाबतचा अहवाल मा. आयुक्त यांनी दि. १८-८-२००० रोजीच्या स्थायी समिती समोर ठेवला. तुलनात्मकदृष्टया व कमी असलेले काही दर एम. एस.एस.आय.डी. सी. यांचे होते. स्थायी समितीने सातही निविदाधारकांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा असे निर्देश दिले. त्यानुसार सातही निविदा धारकांना दिनांक २८-८-२००० रोजी मा. उप आयुक्त (म) यांचे दालनात चर्चेसाठी बोलविण्यात आले. या चर्चेचे वेळी मुख्य लेखाधिकारी व शिक्षणाधिकारी उपस्थित होते. निवडलेले नमुन्यांची सर्व निविदाधारकांनी पाहणी केली. तुलनात्मकदृष्टया कमी असलेले दर विशद करणेत आले व या दरानुसार व निवडलेल्या नमुन्यानुसार निविदेतील अटी व शर्ती यांचेशी अधिन राहुन गणवेश पुरवठा करु शकतात किंवा कसे ? याबाबत लेखी संमतीपत्र दिनांक २९-८-२००० पर्यन्त देण्याबाबत सुचीत करणेत आले. मे. एम. एस.एस.आय.डी.सी. यांनी तुलनात्मकदृष्टया कमी दरात व निवडलेल्या नमुन्यानुसार काम करणेचे संमतीपत्र दिले. त्यानुसार ही बाब निवड समितीचे निर्देशनास आणुन देणेत आली. सर्वानुमते एम. एस. एस आय. डी. सी. यांनी नमुने सादर करणे बाबत सुचित करावे असे ठरले. त्यानुसार मे. एम. एस. एस. आय. डी. सी. यांनी दिनांक ११-९-२००० पर्यन्त सादर केलेले नमुने निवड समितीचे निदर्शनास आणुन देणेत आले. दिनांक १४-९-२००० रोजी मा. आयुक्त यांचे दालनात निवड समितीच्या बैठकीत निर्णय घेतल्यानुसार हे नमुने प्रयोग शाळेत तपासणीस्तव पाठविण्यात यावे असे ठरल्यामुळे समितीने साक्षांकित केलेले नमुने सेंट्रल इन्स्टिटयुट ऑफ रिसर्च ऑन कॉटन टेक्नॉलॉजी, मुंबई यांचेकडे दिनांक १४-९-२००० रोजी विशेष दुतामार्फत पाठविण्यात आले. या नमुन्यांचा प्रयोग शाळेतुन आलेला चाचणी अहवाल दिनांक १०-१०-२००० रोजी निवड समिती सदस्यांसमोर ठेवणेत आला. निविदेतील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करणारा हा अहवाल असल्यामुळे पुढील कार्यवाही करावी असे निवड समितीने सुचित केले.

पुढील नमुद केलेल्या तक्त्यातील वयोगटानुसार घ्यावयाच्या गणवेशाचा तपशील नोदविण्यात आला आहे. त्यानुसार मुलां मुलींचे वाढते वय लक्षात घेऊन वर्ग निहाय निविदेतील प्रस्तावित वयोगट ऐवजी पुढील वयोगटाची निवड करणेत आली आहे. बालवाडी ते ५ वी च्या विद्यार्थ्यांना हाफ पॅन्ट व शर्ट आणि ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांना फुलपॅन्ट व शर्ट तर इ. बालवाडी ते ३ री च्या विद्यार्थीनींना स्कर्ट ब्लाऊज व ४ थी ते ७ वी च्या विद्यार्थीनीना सलवार कमीज अशी निवड केलेली आहे. त्यानुसार एकुण खर्च र. रु. ३२,२७,०२८/- इतका प्रस्तावित आहे.

त्यानुसार संपुर्ण गणवेश पुरवठयाचे काम एम.एस.एस.आय.डी.सी. यांना द्यावे असा निर्णय झाला. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत पुरवावयाच्या गणवेश पुरविण्याचा प्रस्ताव मान्तेस्तव सादर करणेत येत आहे.

| अ. क्र. | तपशील | वयोगट | दर | नग/संख्या | खर्च रक्कम रुपये - पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| (अ) खाकी हाफ पॅन्ट | | | | | |
| १. | इयत्ता बालवाडी | ६-७ | २२.०३ | ३४०० | ७४,९०२.०० |
| २. | इयत्ता १ ली | ७-८ | २३.९५ | २४०० | ५७,४८०.०० |
| ३. | इयत्ता २ री | ८-९ | २३.९५ | २५०० | ५९,८७५.०० |
| ४. | इयत्ता ३ री | ९-१० | २६.०० | २५०० | ६५,०००.०० |
| ५. | इयत्ता ४ थी | १०-११ | २७.९० | २३०० | ६४,१७०.०० |
| ६. | इयत्ता ५ वी | ११-१२ | ३२.०० | २००० | ६४,०००.०० |
| खाकी फुल पॅन्ट | | | | | |
| ७. | इयत्ता ६ वी व ७ वी | १२-१४ | ९०.१० | २८०० | २,५२,२८०.०० |
| | | | | (अ) - एकुण | ६,३७,७०७.०० |
| (ब) पांढरे हाफ शर्ट | | | | | |
| १. | इयत्ता बालवाडी | ६-७ | २६.०० | ३४०० | ८८,४००.०० |
| २. | इयत्ता १ ली | ७-८ | २९.०० | २४०० | ६९,६००.०० |
| ३. | इयत्ता २ री | ८-९ | ३१.०० | २५०० | ७७,५००.०० |
| ४. | इयत्ता ३ री | ९-१० | ३६.०० | २५०० | ९०,०००.०० |
| ५. | इयत्ता ४ थी | १०-११ | ४२.०० | २३०० | ९६,६००.०० |
| ६. | इयत्ता ५ वी | ११-१२ | ४८.०० | २००० | ९६,०००.०० |
| ७. | इयत्ता ६ वी व ७ वी | १२-१४ | ५५.६६ | २८०० | १,४४,६४८.०० |
| | | | | (ब) - एकुण | ६,६२,७४८.०० |

१. (अ+ब) = १३,००,४५५.००

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (क) निळा स्कर्ट (मुलींचे) | | | | | |
| १. | इयत्ता बालवाडी | ६-७ | ४७.८५ | ३१०० | १,४८,३३५.०० |
| २. | इयत्ता १ ली | ७-८ | ५४.८५ | २४०० | १,३१,६४०.०० |
| ३. | इयत्ता २ री | ८-९ | ५७.०० | २४०० | १,३६,८००.०० |
| ४. | इयत्ता ३ री | ९-१० | ५९.०० | २६०० | १,५३,४००.०० |

| | |
|---|---|
| (क) - एकुण | ५,७०,१७५.०० |

| अ. क्र. | तपशील | वयोगट | दर | नग/संख्या | खर्च रक्कम रुपये - पैसे |
|---|---|---|---|---|---|
| (ड) पांढरे ब्लाऊज | | | | | |
| १. | इयत्ता बालवाडी | ६-७ | २६.०० | ३१०० | ८०,६००.०० |
| २. | इयत्ता १ ली | ७-८ | २८.५६ | २४०० | ६८,५४४.०० |
| ३. | इयत्ता २ री | ८-९ | २९.७९ | २४०० | ७१,४९६.०० |
| ४. | इयत्ता ३ री | ९-१० | ३१.६४ | २६०० | ८२,२६४.०० |
| | | | | (ड) एकुण | ३,०२,९०४.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (इ) | निळा सलवार | | | | |
| १. | इयत्ता ४ थी | १०-११ | ७०.०० | २५०० | १,७५,०००.०० |
| २. | इयत्ता ५ वी | ११-१२ | ७५.०० | १९०० | १,४२,५००.०० |
| ३. | इयत्ता ६ वी व ७ वी | १२-१४ | ८०.०० | २८०० | २,२४,०००.०० |
| | | | | (इ) एकूण | ५,४१,५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (ई) | पांढरे पंजाबी शर्ट | | | | |
| १. | इयत्ता ४ थी | १०-११ | ६५.०० | २५०० | १,६२,५००.०० |
| २. | इयत्ता ५ वी | ११-१२ | ७०.०० | १९०० | १,३३,०००.०० |
| ३. | इयत्ता ६ वी व ७ वी | १२-१४ | ७५.०० | २८०० | २,१०,०००.०० |
| | | | | (ई) एकूण | ५,०५,५००.०० |

२. (क+ड+इ+ई) = १९,२०,०७९.००

एकुण .. (१+२) = ३२,२०,५३४.००

उपरोक्त नुसार या योजने अंतर्गत खर्च एकुण रक्कम रुपये ३२,२०,५३४.०० इतका आहे. या योजनेसाठी सन २०००-०१ शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये रुपये ३५ लाख इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

उपरोक्त तरतुदीचे अधिन राहुन वस्तुनिष्ट विद्यार्थी संख्येच्या आधारे मे. एम.एस.एस. आय.डी. सी. यांना पुरवठा आदेश देण्याचा व रु. ३२,२०,५३४.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री जगदीश सिध्द : महानगरपालिकेच्या शाळा किती, विद्यार्थी संख्या किती ? काही शाळामध्ये १०-१० विद्यार्थी एका वर्गात असतात व विद्यर्थ्याची संख्या ११०

पर्यंत दाखवली जाते. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जेवढी कपडयाची (ड्रेस) नग संख्या दाखवली तेवढे प्रमाणात विद्यार्थी आहेत काय?

श्री सलीम पटेल : शाळेतील मुलांना तांदुळ वगैरे वाटप होतात त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या वाढवुन दाखवली आहे असे वाटते यासाठी एक समिती नेमावी व त्यानुसारच विद्यार्थ्यांना गणवेश वाटप व्हावेत.

मा. सभापती : संपुर्ण चौकशी करुनच विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात यावेत. संबंधीत अधिकारी यांनी या संबंधीची दखल घ्यावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २०००-०१ या आर्थिक वर्षात बालवाडी ते ७ वी पर्यंन्तच्या महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या पांढरा शर्ट, खाकी हाफ पॅन्ट, निळा स्कर्ट व पांढरा ब्लाऊज व निळा सलवार व पांढरा पंजाबी गणवेश पुरविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. एम. एस. एस. आय. डी. सी. यांनी तुलनात्मकदृष्टया कमी दरात व निवडलेल्या नमुन्यानुसार काम करण्यास संमतीपत्र दिल्याप्रमाणे मे. एस. एस. एस. आय. डी. सी. यांचेकडुन प्रस्तावित तक्त्यात दर्शविलेल्या दराने तयार गणवेश खरेदी करुन वाटप करण्यास व त्यासाठी रक्कम रुपये ३२,२०,५३४/- (बत्तीस लक्ष वीस हजार पाचशे चौतीस) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५/३ :**

श्री के. आर. कुलकर्णी, शाखा अभियंता, नगर रचना विभाग यांचे जा. क्र. मनपा / प्रआ/अस्था-१/२०००/१०७४ दि. १२/५/२००० या निलंबन आदेशा विरुध्दचे अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**संवाद :**

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** मागील बैठकीत श्री के. आर. कुलकर्णी, शाखा अभियंता यांना कामावर घेण्याबाबत सभागृहाने ठरावास मंजुरी दिली होती. त्यावेळी असे सांगण्यात आले की, प्रशासनाने म्हणणे ऐकून घ्यावे त्यानंतरच त्यांना कामावर घेण्याची कार्यवाही करता येईल. तथापी प्रशासनाने अद्याप त्यांना कामावर घेतले गेले नाही. तेव्हा सभागृहाने संमत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी व्हावी.

**मा. आयुक्त :** स्थायी समिती अपीलावर निर्णय घेऊ शकते. झालेला निर्णय मान्य नसेल तर माझ्या अधिकारात ते प्रकरण शासनाकडे पाठवु शकतो.

**श्री अविनाश कुमावत, श्री दलबीरसिंग जबिंदा :** स्थायी समितीचा झालेला निर्णय आपणांस मान्य नसेल तर शासनाकडे तसा प्रस्ताव पाठवण्यात यावा.

**मा. आयुक्त :** सभागृहाला मला विनम्रपणे सांगावेसे वाटते की, कर्मचारी कुणीही असो त्यांनी गंभीर स्वरुपाच्या चुका केल्या असतील, काम चुकारपणा केला असेल तर अशा कर्मचाऱ्यास कृपा करुन सभागृहाने प्रोटेक्शन देऊ नये अशी माझी विनंती आहे. कायद्यात बसेल असा सभापतींचा निर्णय झालेला असावा. अपीलाबाबत सभापतींनी जे रुलींग दिले सभापती आता सभापती पदावर नाहीत. आता या सभागृहाला काय निर्णय द्यावयाचा तो द्यावा. आयुक्त म्हणुन कायद्याची जाण करुन देणे माझे कर्तव्य आहे.

**श्री अविनाश कुमावत :** श्री के. आर. कुलकर्णी यांना कामावर घेण्याबाबत रुलींग झाले होते. परंतु प्रशासनाचे म्हणणे ऐकुण घ्यावे असे उपआयुक्त (म) यांनी सांगितले. त्यानुसार नंतर ८ दिवसांत कार्यवाही करु असे सांगितले. परंतु अद्याप कामावर घेण्यात आले नाही.

**मा. आयुक्त :** आताचे सभापती नविन आहेत. त्याचप्रमाणे आयुक्त सुध्दा नविन असुन आता सभागृहाला काय निर्णय घ्यावयाचा तो घेण्यात यावा.

**मा. सभापती :** श्री के. आर. कुलकर्णी यांचे अपीलानुसार त्यांना कामावर घेण्याबाबत मागील सभापती यांनी दिलेले आदेश (रुलींग) कायम करण्यात येते व तशी कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असुन अधिकारी/कर्मचारी यांना निलंबन कालावधीमध्ये अनुज्ञेय असलेल्या निवार्ह भत्त्याची रक्कम ही नागरीकांकडुन जमा झालेल्या करामधुन देण्यात येत असते. त्यामुळे कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यास निलंबीत ठेऊन कामे करुन न घेता पन्नास टक्के/पंच्याहत्तर टक्के वेतन देणे योग्य वाटत नाही. तसेच प्रशासनाने सदर प्रकरणात चौकशी करण्याचे ठरविलेले असल्यामुळे श्री के. आर. कुलकर्णी, शाखा अभियंता, नगर रचना विभाग यांचे जा. क्र. मनपा / मआ / आस्था / -१ / २००० / १०७४ दिनांक १२-५-२००० अन्वये काढण्यात आलेला निलंबन आदेश रद्द करण्यात येत असुन त्यांना त्वरीत कामावर रुजु करुन घेण्यात यावे. खाते चौकशीच्या अधिन राहुन त्यांना कामावर रुजु करुन घेण्याबाबतचे अपिल मंजुर करण्यात येते.

वैधानीक कार्यवाही व्हावी.

**संवाद (चर्चा) :**

**श्री मोतीलाल जगताप :** सिडको येथील डी-नोटोफाईड एरिया मध्ये नागरीकांचा सहभाग २५% व महानगरपालिकेचा ७५% याप्रमाणे खर्च करुन विकास कामे केला. त्यातुन ड्रेनेज, रस्ते झालेले आहेत. आज नोटोफाईड एरिया असतांना सुध्दा एका विकास कामाच्या संचिकेवर रिमार्कस येत आहे. त्याबाबत खुलासा करावा. मागील काळात डी-नोटीफाईड भागात स्वेच्छा निधीतुन विकास कामे झालेली आहेत.

**मा. आयुक्त :** सदर डी-नोटीफाईड भाग हस्तांतरण झालेला आहे काय ते अगोदर पहावे लागेल. याशिवाय सिडकोचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे होण्याचे अंतिम टप्प्यात आहे हे आपणांस सर्वांना माहितच आहे. सिडको हस्तांतरण झाल्यानंतर सर्व विकास कामाबाबतचे प्रश्न सुटण्यास मदत होईल.

**श्री अविनाश कुमावत :** नोटीफाईड एरिया मध्ये ५ वर्षात बरेचदा ड्रेनेजची व इतर विकास कामे झाली. आताच का मनाई होत आहे.

**मा. आयुक्त :** या संबधी सविस्तर बाबी तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल.

**श्री सुरगोणीवार :** अविष्कार कॉलनी (म्हाडा कॉलनी) महानगरपालिकेकडे हस्तांतरीत असतांना सुध्दा कचरा तसाच पडुन असतो कुणी कामगार कचरा उचलण्यास येत नाही. त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे. दुसरे कामगार देण्यात यावे.

**मा. उपआयुक्त (प्र.) तथा नगरसचिव :** म्हाडा कॉलनी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्याचे कागदपत्र स. सदस्य यांनी माझे कडे दिली त्याची पाहणी केली त्या

भागामध्ये रस्ते किती, गटार किती, रस्त्याची लांबी किती याची सर्व माहिती घेत आहोत. स. सदस्यांनी सभागृहात या अगोदर सुचना केली आहे व आत सुचना मांडली त्यांचा तगादा लक्षात घेऊन ८ दिवसात दुसरीकडील नियमीत कामगार पाठवुन साफसफाई केली जाईल.

**श्री सलीम पटेल, श्री जगताप मोतीलाल :** नगरसेवक स्वेच्छा निधीतुन ड्रायव्हींग व संगणक प्रशिक्षण देण्यात येणार होते त्यांचे काय झाले २५ हजार रुपये कसे खर्च करावयाचे त्याची माहिती दयावी.

**प्रकल्प संचालक :** ड्रायव्हींग प्रशिक्षण देण्याबाबतचे टेंडर निघालेले आहे दुसरी एक संचिका वरिष्ठाचे मंजुरीसाठी सादर करण्यात आली असुन महानगरपालिकेच्या जुन्या इमारतीत (टाऊन हॉल) मध्ये एक केंद्र व दुसरे सिडको एन-७ येथे महानगपालिकेच्या इमारतीत संगणक प्रशिक्षण केंद्र राहणार आहे. तसा सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहे. या दोन्ही इमारती ताब्यात देण्यास मालमत्ता अधिकारी यांनी मान्य केले आहे व या इमारतीत लाईटची व्यवस्था करणेबाबत अति. शहर अभियंता यांना विनंती केली आहे त्यानुसार लाईटची त्वरीत व्यवस्था केल्यास पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री सुरगोणीवार नारायण :** संगणक केंद्र कधी पासुन सुरु होणार याचा खुलासा व्हावा.

**श्री सलीम पटेल :** सर्वसाधारण सभेत असा निर्णय झाला की विद्यार्थी घेण्यात येतील व पुढील वर्षापासुन केंद्र सुरु केले जातील. २५ हजारामध्ये संगणक प्रशिक्षण देण्यासाठी मुलांना आम्ही पाठवणार आहोत त्या संबधी प्रशासन काय निर्णय घेणार आहे.

**श्री भरत लकडे :** एका स. सदस्यांच्या स्वेच्छा निधी मधुन वर्षाला किती मुलांना प्रशिक्षण दिले जाईल खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** सर्वसाधारण सभेत झालेल्या निर्णयानुसार वर्षातुन प्रत्येक नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन १० विद्यार्थी प्रशिक्षण घेऊ शकतील अति. शहर अभियंता यांनी विद्युत लाईटची व्यवस्था करुन दिल्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

**श्री अविनाश कुमावत :** २५ हजार रु. ड्रायव्हींग प्रशिक्षणासाठी ठेवण्यात आले त्या संदर्भात काय कार्यवाही करणार.

**मा. आयुक्त :** प्रशिक्षण संबंधी बऱ्ययाचशा सुचना प्राप्त झालेल्या आहेत या बाबत येत्या दोन दिवसात निर्णय घेतला जाईल.

**सौ. विजया रहाटकर :** शहरात दिवाळी निमित्त बऱ्याच चैनीच्या वस्तु आयात झाल्या आहेत त्यात कपडा, खेळणी, गृहपउपयोगी इ. वस्तु येतात. सर्व लहान मोठी दुकाने सजलेली आहेत. लोकांची खरेदीसाठी गर्दी होत आहे. कोटयावधी रुपयाची उलाढाल हेत आहे. मोठमोठे सेल लावण्यात आले. पाटीदार हॉल येथे मोठा सेल लागला शहरात आयात झालेल्या मालावर त्या प्रभागात जकात वसुली केली का? यामुळे जकातीत नक्कीच वाढ झालेली असेल. चांगलया प्रकारे जकात वसुली करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्याची ही संधी होती. तेंव्हा गेल्या १५ दिवसामध्ये नेहमीच्या वसुली पेक्षा किती प्रमाणात वसुलीत वाढ झाली याचा सभागृहाला खुलास व्हावा.

**जकात अधिक्षक :** यावर्षी २३ ऑक्टांबर २००० पर्यंत २५ कोटी ८६ लाख जकात वसुली झालेली आहे. १ ऑक्टोबर २००० पासुन ३ कोटी ३३ लाख वसुली झालेली

असुन मागील वर्षी १ ऑक्टोंबर ते २३ ऑक्टोंबर वसुलीचा विचार करता या वर्षीच्या १ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोंबर २००० पर्यंतच्या काळात जवळपास २ कोटी ६४ लाख जास्तीची वसुली झालेली आहे. या महिण्यात प्रत्येक दिवशी १५ ते १६ लाख रु. जकाती पोटी मिळत असुन मागील महीण्यामध्ये १२ ते १३ लाख रु. प्रत्येक दिवशी जकात मिळत होती.

**सौ. विजया रहाटकर :** ३ ते ४ लाख प्रत्येक दिवशी जास्तीची वसुली येत आहे हे बरोबर वाटत नाही यापेक्षाही वाढवुन जकात यावयास पाहिजे कारण शहरामध्ये सणानिमीत्त बरेच साहित्य आलेले आहे. या साहित्यांची वस्तुची योग्य तपासणी न करता व कमी सहित्य समजुन जकात जकात कम आकारुन गाडया सोडण्यात आल्या आहेत असे वाटते. गेल्या १५ दिवसात शहरात किती संगणक यंत्र आले. त्यांचीही माहिती द्यावी.

**मा. उपआयुक्त (प्र) तथा नगरसचिव :** शहरामध्ये दिवाळी निमित्त एकुण ५२ सेल लावण्यात आले होते. काहीचे १० दिवस तर काहींचे १५ दिवसासाठीचे सेल होते. ज्यांनी ज्यांनी सेल लावले त्यांचेकडुन जकात वसुल करण्यात आलेली आहे. त्यांचा माल विक्री होईल किंवा ना होईल तरी सुध्दा त्यांचेकडुन जकात वसुल केलेली आहे पाटीदार यांचे एकाच सेलमध्ये वेगवेगळी दुकाने आहे. वसुली संदर्भात सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

**सौ. विजया रहाटकर :** आता पुढील बैठक केंव्हा होईल सांगता येत नाही पाटीदार यांनी किती ठिकाणी सेल लावले त्यानुसार किती वसुली झाली किती सेल आला याची सविस्तर माहिती मिळावयास पाहिजे. त्याच प्रमाणे उस्मानपुरा येथे ही सेल लावण्यात आला आहे. आलेल्या साहित्याची (वस्तुची) जकात भरलेली नाही असे माझे मत आहे. त्याचा योग्य खुलासा दयावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी चौकशी करुन पुढील बैठकीत माहिती दयावी.

**श्री तुळशीबागवाले किशोर :** जालना रोड वरील अपना बाजार मधील दुकानांचा टॅक्स कमी करण्यात आला. कुणाच्या अधिकारात केला व टॅक्स कमी करता येतो का? खुलासा करावा या संदर्भात मागील बैठकीत ही चर्चा झालेली होती.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी -२ :** अपना बाजार येथील दुकानांना कर कमी लावण्याबाबत सविस्तर खुलासा दिलेला आहे. त्याची एक प्रत मा. सभापती यांना पण दिलेली आहे.

**श्री कुमावत अविनाश, श्री किशोर तुळशीबागवाले :** यासंबंधीची प्रत सर्व सदस्यांना दयावयास पाहिजे होती जो खुलासा सभापतींना दिला तो वाचुन दाखववा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी -२ :** (खुलासा वाचनु दाखवतात)

**श्री कुमावत अविनाश :** कच्चे विटा मातीचे २०x३० च्या प्लॉट मध्ये घर बांधल्यावर आपण टॅक्स घेतो अपना बाजार येथील मार्केअचा विचार करता दुकानांना जो कर लावलेला आहे तो कर कमी करणे योग्य होणार नाही.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** ११.२५ पैसे प्रमाणे कमर्शीयल भागात टॅक्स आकारण्यात येतो. त्याचा विचार न करता कुणाचे नाव आहे, पैसे किती येतात, मोजमाप करुन टॅक्स लावावयास पाहिजे. लावलेला टॅक्स कमी करणे योग्य नाही. ज्यांनी टॅक्स लावला ते अधिकारी त्या विभागा अतंर्गत येत नाही. दुसऱ्या अधिकाऱ्यांने टॅक्स लावला यास कोण जबाबदार करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधीत लोक न्यायालयात जाणार या दृष्टीने टॅक्स

कमी केला. १०-१० वर्षापासुन टॅक्स संदर्भात जवळपास २ हजार केसेस न्यायलयात प्रलंबीत आहेत ती निकाली काढण्याबाबत प्रशासनातर्फे कार्यवाही न करता लावलेला टॅक्स कमी कसा होऊ शकतो, कमी करता येतो का? याप्रमाणे इतरही नागरीक टॅक्स कमी करण्या बाबत मागणी करतील त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न घटण्याचा प्रकार आहे यास सर्वस्वी कोण जबाबदार ? संबंधीतावर कार्यवाही करावी. ४०० ते ५०० स्वे. फुट दुकांनाना १२०० रु. भाडे आकारणे महानगरपालिकेला परवडते का? जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री कैसरखान :** स. सदस्यांनी फार महत्त्वाची सुचना प्रशासनाच्या लक्षात आणुन दिली या संबंधी मा. आयुक्त यांनी चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :** सभागृहात कर कमी लावण्या बाबतची चर्चा चालु आहे. अपना बाजार येथील टॅक्सचे प्रकरण तत्कालीन आयुक्तांचे काळात झाले. करमुल्य निर्धारण अधिकारी यांनी अहवाल वाचला तो मी व्यवस्थीत ऐकला त्यातील एक मुद्दा विचारात घेण्या जोगा आहे की, कागदपत्रे ढोस पुरावे नसल्याने १२५०/- रु. भाडे आकारले. पुरावा देत नसतील तर आसपासच्या दुकानांना काय भाडे आहेत त्यानुसार टॅक्स लावण्या बाबत कार्यवाही व्हावयास पाहिजे होती. तरीपण या प्रकरणी मी जातीने लक्ष घालुन त्या संबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** मा. आयुक्तांनी या संदर्भात चौकशी करुन कार्यवाही करावी.

**श्री कुमावत अविनाश :** जकातीचे खाजगीकरण होणार होते काय निर्णय घेतलेला आहे. येत्या मार्चच्या अगोदर किंवा नंतर, कधी पासुन कार्यवाही होणार खुलासा दयावा.

**मा. आयुक्त :** जकात खाजगीकरणा बाबत टेंडर नोटीस देण्यात येऊन कार्यवाही होणार आहे. पदाधिकारी व प्रशासनाने एकमत करुन, विचारविनीमय होऊन निर्णय घ्यावा लागणार असुन येत्या १५ दिवसाच्या आत येणाऱ्याय आर्थिक वर्षात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणार आहे.

**श्री जगदीश सिध्द :** शहरात किती दारु आयात होते. त्यापोटी मनपाला किती जकात मिळते. शहरात जवळपास १ कोटी रुपयाची दारु दररोज येते. संबंधीत कार्यालयाकडुन तशी माहिती आपल्या विभागाने घेतली काय ? जकात किती घेतली जाते, दररोजची दारु पोटी जकात किती येते. माहिती दयावी.

**मा. उपआयुक्त (प्रशासन) :** सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

**श्री जगदीश सिध्द :** संबंधीत अधिकारी यांना या संबधीची माहिती नसणे, योग्य नाही उपआयुक्तांना या संबधीची माहिती असावयास पाहिजे थोडक्यात माहिती दयावी.

**श्री अविनाश कुमावत :** शहरात दारुच्या किती कंपन्या आहेत. त्यांचेकडुन किती टक्के प्रमाणे आकारण्यात येतो.

**जकात अधिक्षक :** ७% प्रमाणे जकात आकारण्यात येतो.

**मा. उपआयुक्त (प्रशासन) :** शहरात जे अल्कोहल मटेरीयल येते त्यावर ७% प्रमाणे जकात आकारणी होते.

**श्री नारायण सुरगोणीवार :** काही कॉन्ट्रक्टरनी कामे केली परंतु त्यांची बिले मिळाली नाही कधी देणार याबाबत खुलासा व्हावा.

**जबिंदा दलबीरसिंग :** याबाबतीत मी मा. आयुक्त यांचेशी प्रत्यक्ष भेट घेतलेली आहे. माझ्या वार्डात एक चेंबर साफसफाईचे काम होते. कठीण काम होते तरी सुध्दा संबंधीत ठेकेदारांनी ते काम केले. ठेकेदारांना परवडणारे असो किंवा नसो अडीअडचणीच्या वेळी कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यांना कामे करुन दयावीच लागतात. दिवाळी ही जवळ आलेली आहे. सण साजरा करतील ज्यांची बिले देणे बाकी असेल त्या सर्व संचिका मा. आयुक्तांनी निकाली काढाव्यात. भविष्यात महापालिकेला सहकार्य होईल व विकास कामे करण्यास अडचण येणार नाही.

**श्री कैसरखान :** कार्यकारी अभियंता यांना ३ हजाराचे अधिकार आहेत ते बाबतीत निर्णय घेवु शकतील. ३ हजाराचे अधिकार असुन लिमीटेशन वाढवावे.

**मा. सभापती :** लिमीटेशन संदर्भात मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त :** या ठिकाणी चर्चेत दोन मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्यापैकी पहिला मुद्दा कार्यकारी अभियंता यांना ३ हजार खर्चाचे अधिकार आहेत ते वाढवुन दयावे या बाबतीत मी सकारात्म निर्णय घेतलेला आहे किती खर्चा पर्यंत अधिकार दयावयाचे यासाठी इतर महापालिकेमध्ये या संबधी काय परिस्थिती आहे याची माहिती मागवली आहे. येत्या १५ दिवसात निर्णय घेतला जाईल व प्रशासनाने निर्णय घेतला तरी नियमानुसार स्थायी समितीच्या मंजुरीनुसारच कार्यवाही करावी लागणार आहे. त्यामुळे ज्या संचिका २ हजार ३ हजार पर्यंतच्या आहेत त्या माझ्याकडे सहिसाठी येतात ते प्रमाणही कमी होईल. सध्याच्या परिस्थितीमध्ये माझ्याकडे फक्त ७० संचिका सहीसाठी पडुन आहेत व यापुढे १ तारखेनंतर ४८ तासाच्या आत फाईल्स माझ्याकडुन निर्णय होऊन जातील. सभागृहाच्या भावना नुसार लवकरच निर्णय घेण्यात येईल. दुसरा मुद्दा रेट लिस्टची जी कामे आहे त्याबाबत प्रत्येक कार्यकारी अभियंत्यांना माझ्या माहिती प्रमाणे दर महिण्याला ५० हजारापर्यंत खर्चाची मर्यादा दिलेली आहे. म्हणजे ३ कार्यकारी अभियंता यांना ५० हजार प्रमाणे दर महिण्याला असे १.५० लाख रुपया पर्यंतचे काम करण्याचे अधिकार दिले आहे. परंतु काही कार्यकारी अभियंता यांनी ५० लाखाचे वर म्हणजे जवळपास २.५० लाख रु. पर्यंतची कामे करुन घेतलेली आहे. वाढीव कामासाठी आयुक्तांची पुर्व परवानगी न घेतल्याने त्यांना विचारणा केलेली आहे की, ५० हजाराचे वरची कामे कोणत्या निकषाने केली त्याचे विवेचन मागवले आहे. परंतु कुणीही माहिती दिलेली नाही. माहिती दिल्यावर ठेकेदाराची बिले निल करता येतील परंतु तशी माहिती सादर झालेली नाही या संदर्भात बऱ्याच स. सदस्यांनी सुचना केल्या आहे. त्यांना हेच कारण सांगितले संबधीत अधिकाऱ्यांनी मला ५० हजाराचे वरचे कामे केलेची माहिती आलेली नाही जोपर्यंत अधिकाऱ्याचे सयुक्तीक कारण माझ्याकडे येत नाही तोपर्यंत निर्णय घेतला जाणार नाही. कुणीही आयुक्त तातडीचे काम करण्यास मनाई करणार नाही परंतु आयुक्तांची पुर्व परवानगी न घेता कामे केली जातात हे आर्थिक शिस्तीला घातक ठरणारे आहे. अशा संचिका कामे पुर्ण झाल्यानंतर माझ्याकडे २-३ महिण्यांनी येतात तर पुर्व मान्यता कशासाठी असते. हा महत्त्वाचा मुद्दा आहे. आर्थिक शिस्त पाहिजे. बीले ही निघाली पाहिजे, नुसतेच मी बिले मंजुर करत राहिलो तर विकास कामास पैसा राहणार नाही. आता ाच आपण बोनस दिलेला असुन ॲडव्हान्स दिले,

दोन कोटी ३० लाख रुपयाची नोटीस माझ्याकडे आलेली आहे. केवठ ठेकेदाराची बिले दिली नाही म्हणुन आग्रह धरु नये. सगळया गोष्टीचा विचार करावा व मला सहकार्य करावे.

**कार्यकारी अभियंता (पापु) :** मा. आयुक्तांकडे सर्व माहिती देऊन संचिका पाठवण्यात येतील.

**मा. सभापती :** संबंधीत यांनी सविस्तर माहिती मा. आयुक्तांना देऊन ठेकेदाराच्या बिला संदर्भातील संचिका मंजुर करुन घ्याव्यात.

**श्री सलीम पटेल :** एस. ए. कादरी नावाच्या कर्मचारी यांनी मागे अपिल केले होते त्यानुसार कार्यवाही न झाल्याने त्यांनी प्रशासनाकडे विंनती अर्ज सुध्दा दिले आहे. त्याबाबत कार्यवाही का झाली नाही खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** उपआयुक्त (प्र.) खुलासा करतील.

**मा. उपआयुक्त (प्रशासन) तथा नगरसचिव :** एस. ए. कादरी यांनी स्थायी समिती पुढे अपील करुन विनंती केली की, ते वाचुन दाखवण्यात येते. माझे अपील स्थायी समितीने मंजुर केले व मी निर्दोष असल्याने माझे वरील प्रस्तावित कार्यवाही रद्य केली. सदर अपील मंजुर झाल्यानंतर मी प्रशासनाकडे अनेकवेळा अर्ज सादर केले. तरी देखील ३ वर्षापासुन कोणतीही कार्यवाही केली नाही व माझी वेतनवाढ नियमीत करण्यात आलेली नसनु निलंबन काळ सेवा काळ मंजुर केला नाही व माझी गेल्या ५ वर्षापासुन वार्षिक वेतनवाढ ही मंजुर केलेली नाही. तसेच पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती केली नाही. माझ्या निलंबन काळाबध्दल व वेतनवाढी बध्दल सदर अपील मंजुर होण्या अधि मी उच्चन्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. त्याचा रिट क्र. ६९६९४ असा आहे. स्थायी समितीने मंजुर केलेले अपीलाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही केल्यास मी माझी रिट यांचीका मागे घेईल यापुर्वीही या आशयाचा विनंती अर्ज सादर केलेल आहे. यावर अदयाप प्रशासनाने निर्णय घेतलेला नाही. तरी विंनती की , स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयाबाबत प्रशासनाला आदेश करावे ही विनंती.

**श्री कुमावत अविनाश :** संबंधीताने न्ययालयीन प्रकरण मागे घ्यावे त्यानंतर अपीलानुसार कार्यवाही करण्यात येईल काय?

**श्री सलीम पटेल :** १९९८ मध्ये अपील मंजुर केले. अपीलानुसार प्रशासनाने कार्यवाही केली नाही. म्हणुन संबंधीत कर्मचारी न्यायालयात गेलेले आहे.

**मा. आयुक्त :** संबंधीत कर्मचाऱ्यास जरी सांगितले तुम्ही कोर्टातुन मागे घ्यावी तरी सुध्दा आपण कोणत्याही प्रकारचे प्रॉमिस त्यांना देऊ शकत नाही की, तुम्ही केस मागे घ्या, प्रशासन तुमच्या बाजुने निर्णय घेईल अशा प्रकारची कंन्डीशन टाकता येत नाही. त्यांनी त्यांचा स्वत: निर्णय घ्यावयाचा आहे उदया त्यांनी असे म्हणू नये की, प्रशासनाने सांगितल्या नुसार मी केस मागे घेतली.

**श्री जबिंदा दलबीरसिंग :** अपील मंजुर केलेले आहे. संबंधीत कर्मचार केस मागे घेण्यास तयार आहे. त्यांचे वेतनवाढ , निलंबन सेवा काळ धरण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :** या प्रकरणात सविस्तर तपशिल मला माहित नाही तपासणी करुनच कार्यवाही कण्यात येईल दुसरी महत्त्वाची बाब अशी की, दोषी कर्मचाऱ्यांना प्रशासनाने निलंबन केले किंवा इतर कार्यवाही केली त्या बाबतीत सभागृहाने सहकार्य करणे योग्य होणार नाही कारण यामुळे प्रशासनाचा जो वचक आहे तो कर्मचाऱ्यावर राणार नाही. नियमाने प्रशासन कार्यवाही करेल.

**मा. सभापती :** याची चौकशी करुन प्रशासनाने निर्णय घ्यावा स. सदस्य श्री कैसरखान यांनी स्थायी समितीकडे पत्राद्वारे एक निवेदन देऊन निझाम उद्दीन चौक येथे हायमास्ट दिवा लावण्यात यावा म्हणुन विनंती केली आहे.

**श्री कुमावत अविनाश :** असे प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस घ्यावयाचे असतात सर्वसाधारण सभेत ठेवावा नसता इस्टीमेट तयार करण्याबाबत कार्यवाही करावी असे आदेशीत करावे.

**मा. सभापती :** निझाम उद्दीन चौकात हायमास्ट दिवा लावण्या बाबत संबंधीत अधिकारी यांन इस्टिमेंटस तयार करुन पुढील कार्यवाही करावी. नुकताच दिपावलीचा सण आलेला आहे. दिपावली निमित्त सर्वांना सभागृहातर्फे व माझ्या वतीने हार्दीक शुभेच्छा!

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २४.११.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक २४ नोव्हेंबर, २००० रोजी दुपारी ३.३० वाजता मा.सभापती श्री.अशरफ युनूस मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील स.सदस्य उपस्थित होते.**

१. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२. श्री. कावडे साहेबराव राणुबा
३. श्री. कैसर खान बद्रादीन खान
४. सौ. खरात कुसूमबाई दौलत
५. श्री. तांबे गणेश रामचंद्र
६. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
७. श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
८. श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
९. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
१०. श्री. लकडे भरत श्रीपती
११. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२. सौ. रहाटकर विजया किशोर
१३. श्री. सलीम पटेल समशेर पटेल
१४. श्री. सावंत मधुकर दामोधर
१५. श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**विषय क्र.६६/१ :**

दिनांक २४.१०.२००० रोजी "कार्यक्रम पत्रिका क्रमांक ९ व १०" नुसार संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती : विषय क्रमांक १ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक २४.१०.२००० रोजी "कार्यक्रम पत्रिका क्रमांक ९ व १०" नुसार संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.६७/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) यांनी एन-११, एन-१२, एन-१३ व विस्तारीत भागाकरिता सन २०१६ सालची दैनंदिन गरज लक्षात घेता प्रतिदिन १०.०० दशलक्ष लिटर्स वाटप होणेसाठी एक प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव रुपये २०३.४० लाख रुपयांचा असून कामे शासकीय अनुदाना अंतर्गत करण्याचे प्रस्तावित होते. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक १३.१२.१९९९ रोजी प्रशासकीय मान्यता देऊन सर्वसाधारण सभेपुढे

प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे सदर प्रस्तावास सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १३४/६ दिनांक १३.१२.१९९९ अन्वये मान्यता प्राप्त झाली.

या प्रकल्पातील रुपये ८८.७६ लाखांच्या जलवाहिनीच्या कामा संदर्भात (५०८ मी.मी.पोलादी) एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या. यामध्ये खालील वैध निविदा उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.मन्नान खान | - | २५% जास्त |
| २. | मे.व्ही.आर.महाजन | - | २८% जास्त |
| ३. | मे.जाबडेकर | - | ३८.५०% जास्त |

उपरोक्त प्राप्त निविदेमधील मे.मन्नान खान हयांची निविदा कमी दराची होती. परंतू अंदाजपत्रकाच्या तुलनेत दर जास्त होते. हया करिता सदर ठेकेदारास पत्र देऊन वाटाघाटी करुन सदर काम अंदाजपत्रकीय दरात व भाववाढ निर्देशांक देयक मान्य करुन मा.आयुक्त यांनी दि.१४.१०.२००० रोजी मान्यता दिली.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.अविनाश कुमावत :** डी.एस.आर.कोणत्या वर्षाचे आहे. पाणी पुरवठ्याचे डी.एस.आर.काय. आहेत. किती टक्केंनी वाढ झालेली आहे. या कामाची मुदत किती दिवसांची आहे.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** सदर प्रस्तावातील डी.एस.आर.१९९७-९८ च्या दरसुचीनुसार असून यात जवळपास ८% ने वाढ झालेली आहे. या कामाची मुदत किती दिवसांची आहे.

**श्री.मधुकर सावंत :** मा.आयुक्त सभेस उपस्थित नाहीत. रजेवर असतील तर खुलासा करावा. कुणाकडे पदभार दिला खुलासा करावा.

**मा.सभापती :** मा.आयुक्त दोन दिवसांच्या रजेवर गेलेले आहेत. हा विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-११, एन-१२, एन-१३ व विस्तारीत भागाकरिता सन २०१६ सालची दैनंदिन गरज लक्षात घेता प्रतिदिन १०.०० दशलक्ष लिटर्स वाटप होण्याकरिता तयार केलेल्या २०३.४० लाख रुपयांच्या प्रकल्पातील रक्कम रुपये ८८.७६ लाखांच्या जलवाहिनीच्या (५०८ मी.मी.पोलादी) कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.मन्नान खान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे.मन्नान खान यांचेकडून अंदाजपत्रकीय दरात व भाववाढ निर्देशांक देयक मान्य करुन निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.६८/१ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व ज.नि.) विभाग, म.न.पा. यांनी झाल्टा सर्व्हे नं.४९९ मध्ये ५.३८ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या मलनिःसारण केंद्राचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव रु.१३५.०० लाखांचा सादर होता. प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.०७.११.१९९८ रोजी

मान्यता दिली. तसेच प्रस्ताव सर्वसाधारण सभा ठराव क्र.१७१/५, दि.१९.१२.१९९८ अंतर्गत पारित केला गेला.

यानुसार निविदा मागविल्या असता निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेला दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या पुढील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.खर्डीकर कन्स्ट्रक्शन | - | ४४.८९% जास्त दराने |
| २. | मे.एन.आर.घोडेले | - | ४०.९६% जास्त दराने |

वरील प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा मे.एन.आर.घोडेले यांची आहे. त्यानंतर निवडणूका व इतर अडचणींमुळे हया प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्यांत देता आली नाही. वाढीव दराबाबत तांत्रिक छाननी केली गेली व वाटाघाटी नंतर मुळ अंदाजपत्रकीय दरावर (रु.१३५.०० लाख) सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.१४.११.२००० रोजी मान्यता दिली.

पुढील वैधानिक कार्यवाहीसाठी रु.१३५.०० लाखांचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी सादर. सदर काम अंदाजपत्रकीय दरावर (म्हणजेच रुपये १३५.०० लाख) करण्यास मे.एन.आर.घोडेले तयार असल्याने व त्यांची निविदा कमी दराची असल्याने भाववाढ निर्देशांक देयक मान्य करुन निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी व मंजूरीसाठी सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** प्रस्तावात एन.आर.घोडेले यांचा उल्लेख असून एन.आर.घोडेले नगरसेवक आहेत. ही निविदा त्यांना देता येणार नाही.

**मुख्य लेखाधिकारी :** एन.आर.घोडेले सदस्य आहेत. मेसर्स नावाने नोंदणी केलेली आहे. त्यांनी भागीदारी काढून घेतलेली आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मेसर्स एन.आर.घोडेले असे रजिष्ट्रेशन बदल केलेला आहे काय. आयकर खात्यात नावात बदल केला का. त्यांना टेंडर देऊ शकत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जी नोंदणी असेल तेच गृहीत धरावे लागेल.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** एन.आर.घोडेले यांनी मेसर्स एन.आर.घोडेले चे नावाने फर्म दिले आहे. श्री.एन.आर.घोडेले यांना निवडणूक लढवायची होती म्हणून त्यांनी मेसर्स एन.आर.घोडेले या नावाने रजिष्ट्रेशन केले व त्यास निवडणूक आयुक्त यांनी सुध्दा परवानगी दिली. आता मेसर्स संस्थेच्या नावावर व्यवहार होतात.

**मा.सभापती :** मनपाने मेसर्स एन.आर.घोडेलेचे नावाने एन.ओ.सी.दिलेली आहे. आता मेसर्स/कंपनी आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** कायद्याची माहिति घ्यावी. मेसर्स मध्ये नंदु कोण आहे. अध्यक्ष आहे की सचिव आहे. पेपरमध्ये बातम्या छापून येऊ नये असे माझे मत आहे. त्यामुळे याचा योग्य खुलासा होणे आवश्यक आहे.

**श्री.कैसर खान :** मनपाने त्यांना "ना हरकत प्रमाणपत्र" दिले आहे. आपण निविदा थांबवू शकत नाही.

**मा.सभापती :** लेखाधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** सदरची निविदा ही म.न.पा.च्या निवडणूकीच्या पुर्वीची असून त्यावेळी एन.आर.घोडेले हे नगरसेवक नव्हते. निवडणूकीस उमेदवार म्हणून उभे

राहणार म्हणून त्यांनी मेसर्स एन.आर.घोडेले नांवाने भागीदारी फर्म करुन तशी नोंदणी केली आहे. त्यानुसार मनपाने त्यांना "ना हरकत प्रमाणपत्र" ही दिलेले आहे. सदरचे टेंडर निवडणूकीच्या अगोदरचे असून यापुढील जे टेंडर येतील ते मेसर्स एन.आर.घोडेले या नावाने राहील. मेसर्स नांवाने नोंदणी बदली (ट्रान्सफर) करुन मिळते.

**श्री.अविनाश कुमावत :** मेसर्स घोडेले नावाचे टेंडर असेल तर मान्यता देण्यास हरकत नाही.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** या प्रस्तावा संदर्भात सर्वसाधारण सभेत चर्चा झाली होती. असे माझे मत आहे. व तत्कालीन आयुक्त श्री.बलदेवसिंग यांनी हे काम थांबवून ठेवलेले होते. कार्यकारी अभियंता यांना माहिती आहे.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** निविदा अंदाजपत्रकापेक्षा जास्त दराचे आले होते. त्याचे चालू दरसुचीप्रमाणे तुलना करुन ठेवण्यास आदेश होते. त्या नुसार ते ४०% अंदाजपत्रकापेक्षा जास्त दराचे होते. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.कोकाटे यांनी मुद्दा उपस्थित केला होता. परंतू महापौरांनी काही रुलींग दिलेले नाही व नवीन डी.एस.आर.नुसार किती टक्केने वाढ होईल याची माहिती विचारली होती.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** पुढील बैठकीत ठेवावे.

**श्री.मधुकर सावंत :** माझ्या माहिती प्रमाणे प्रत्येक वार्डात (हापसे) हातपंप करण्याचे काम या एजन्सीकडे दिलेले असून ही संस्था बोगस काम करते असा संशय आहे. अद्याप ही एजन्सीज माझ्या वार्डात पाहणीसाठी येणार होते, आली नाही.

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** पावसाळा सुरु होण्याच्या १५-२० दिवस अगोदर २२ हातपंपाचे काम होते. जी.एस.डी.खाते सर्वेक्षण करत नाही. सर्वेक्षणाचे काम १५ ते २० दिवसांत होईल. एक महिन्याच्या आत जवळपास काम पूर्ण होईल. ३० ते ३५ बीअर आहेत.

**श्री.मोतीलाल जगताप :** हातपंप खोदकाम झाल्यानंतर तीन महिन्यांनी पंप बसवल्या जातो. कामास सुरुवात केल्यावर तात्काळ पूर्ण कार्यवाही केली पाहिजे. मनपाचे नुकसान होणार नाही. याकडे बघावे.

**मा.सभापती :** हातपंपाची कामे लवकर करुन घ्यावी व ऐनवेळी ठेवलेला हा प्रस्ताव पुढील बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यांत यावा.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत मंजूरीसाठी ठेवण्यांत यावा असे, सर्वानुमते ठरले.

**संवाद :- (चर्चा)**

**श्री.नारायण सुरगोणीवार :** मा.आयुक्त, उपआयुक्त, कधी कार्यकारी अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता हे अधिकारी रजेवर जातात. प्रत्येक वेळेस त्याच त्या विषयावर सभेत चर्चा होते. प्रत्येक वेळी एक अधिकारी उत्तर देतात. प्रत्येक वेळेस आदल-बदल होऊन अधिकारी उपस्थित असतात. हे बरोबर नाही. कोणी काही बोलत नाही. नगरसेवक दोन दिवस गेले तर ओरड होते. माझ्या वार्डात अविष्कार कॉलनीत एका कामासंदर्भात ८ महिनंपासून सूचना करत आहे. काम कधी सुरु करणार तसेच साफसफाईचे काम सुध्दा झालेले

नाही. म्हाडा कॉलनी मनपाकडे हस्तांतरण झाले. पाच वर्षात ३ वेळा सफाई झाली. प्रशासनास विनंती केली. तर ३ वेळा सफाई झाली. दोन-तीन बैठकीत सफाई बाबत चर्चा केली. कार्यवाही होत नाही.

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता हे अर्जित रजेवर होते. शिंदे साहेब मुंबईला महत्वाच्या बैठकीस गेलेले आहेत.

**अति.शहर अभियंता :** बजेट शिल्लक नव्हते. या कामाचे इस्टीमेटस तयार करुन ६ महिने झ ाले. बजेट उपलब्ध होत असेल तर कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी सन्माननीय सदस्य यांना सविस्तर माहिती द्यावी. कधी काम करणार, इस्टीमेट किती केले, संचिका कोठे आहे.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** ६ महिने इस्टीमेट तयार करुन झालेत. कार्यवाही कशी करणार. म्हाडा कॉलनी मनपाकडे १९९५ मध्ये हस्तांतरण झाले. तेथील साफसफाई होत नाही. ५ वर्षात तीन वेळेस साफसफाई करण्यांत आलेली आहे. प्रशासन काय कार्यवाही करते. यासंबंधी ३ वेळेस चर्चा झाली. परंतू कार्यवाही नाही. एका वार्डात किती वेळेस साफसफाई होऊ शकते याचा खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** सिडकोतील म्हाडा कॉलनी मनपाकडे हस्तांतरणाचे कागदपत्र माझ्याकडे दिले आहेत. मनपाकडे हस्तांतरण झाले परंतू. तेथील मालमत्ता कर मनपाला अद्याप मिळालेला नाही. या संबबंधी मी मा.आयुक्तांशी चर्चा केलेली असून मालमत्ता कराचे डिमांड पाठविण्यांत येणार आहे. आठवड्यांतून एक-दोन वेळेस साफसफाई नियमित होईल. परंतू मालमत्ता कर वसुली नंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** तेथील नागरिक मालमत्ता कर भरतील परंतू प्रशासनाने तशा सूचना दिल्या का? १९९५ पासून हस्तांतरण झाले. प्रशासनाने अद्याप का कार्यवाही केली नाही. म्हाडाने ५० लाख दिलेले आहे. आता म.न.पा.ची जबाबदारी आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** प्रॉपर्टी टॅक्स जोपर्यंत जमा होत नाही तोपर्यंत साफसफाई करणे शक्य नाही. हस्तांतरणा संबंधाचे कागदपत्र आताच प्राप्त झाले. मागील महिन्यांत कागदपत्र प्राप्त झाले. त्या अगोदर कागदपत्र प्राप्त नव्हते. जी वसुली मनपाला मिळावयास पाहिजे ती मिळत नाही. सदरचा भाग सिडकोच्या अंतर्गत येतो, असे सांगितले जाते. वसुलीस अडचण येते. तसेच सर्वसाधारण सभेने स्थगिती दिली असे सांगितले जाते. ही बाब तपासली आहे. या संदर्भात करमूल्य विभागास माहिती विचारलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी वसुली करण्याकरिता मदत केल्यास तात्काळ नेहमीसाठी साफसफाईची कार्यवाही होईल. तरी सुध्दा येत्या दोन दिवसांत साफसफाई करण्यांत येईल.

**मा.सभापती :** मालमत्ता कर वसुली करण्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मदत करावी. तेथील नागरिकांना सूचना द्याव्यात. प्रशासनातर्फे दोन दिवसांत म्हाडाकॉलनीतील साफसफाई करण्यांत यावी.

**श्री.भरत लकडे :** माझ्या वार्डात विद्युत दिवे बंद आहेत. तीन चार वेळेस सभेत मी सूचना केली. तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे सुध्दा लाईटची मागणी केली. आज कर्मचारी लाईट लावण्यास येणार, उद्या येणार असे नेहमीच सांगितले जाते. नेमके कधी येणार व लाईट लावणार आहे की नाही याचा खुलासा द्यावा.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (विद्युत-२) :** लाईटच्या हायड्रोलिक गाड्या बंद आहे. फक्त एकच गाडी चालू आहे.

**अति.शहर अभियंता :** विद्युत हायड्रोलिक गाड्या एक ते दीड महिन्यापासून बंद आहेत. एक गाडी दुरुस्तीसाठी ज्या कंपनीकडे दिले होते ते सुध्दा आले नाही. दोन गाड्या चालू करण्या संदर्भात संचिका मान्यतेसाठी पाठविली आहे. मान्यता मिळाल्यावर कार्यवाही करता येईल.

**श्री.मधुकर सावंत :** लाईट बसवण्या बाबत सन्माननीय सदस्य दोन-तीन बैठकी पासून चर्चा करतात. अद्याप गाड्या चालू करण्यांत आल्या नाहीत. लहान-लहान गल्ल्यांमध्ये या गाड्या जात नाहीत. कामे वेळेवर कशी होतील.

**श्री.भरत लकडे :** संबंधित विभागातून नेहमी आजच गाडी येणार असे आश्वासन दिल्या जाते. नक्की कधी येणार व गाडी आल्यास सन्माननीय सदस्यांना कळविण्यांत यावे. त्यानंतर लाईटची कामे व्हावी. कधी येणार याचा खुलासा द्यावा. नुसते आश्वासन नको आहे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** संबंधित विभागाला तशी ताकीद दिली जाईल व ज्या दिवशी काम करावयाचे त्यावेळेस सन्माननीय सदस्यांना सांगण्यांत यावे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** लाईटच्या गाड्यांची ताबडतोब व्यवस्था करुन लाईट बसविण्याची कार्यवाही करावी. सन्माननीय सदस्यांना नुसती आश्वासने देऊ नयेत. कामे व्हावीत. तशी कार्यवाही करावी.

**श्री.मोतीलाल जगताप :** साफसफाई झाल्यानंतर कचरा उचलण्यासाठी लहान रिक्षा आहेत. २-२ दिवस कचरा उचलण्यासाठी येत नाहीत. याचे कारण काय?

**उपआयुक्त (प्र.) :** येत्या सोमवारी मी प्रत्यक्ष वार्डात येऊन तपासणी करणार आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.अविनाश कुमावत :** संगणक प्रशिक्षण देणार होते. काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** चार चाकी, तीन चाकी (ऑटो) चालकाच्या प्रशिक्षणासाठी निविदा दर निश्चित करण्याची संचिका सादर केली आहे. संगणक प्रशिक्षणाची संचिका मा.आयुक्तांची कालच मंजूरी आली. आज निविदा तयार केली. सदर संचिका लेखा विभागात मंजूरीसाठी आजच पाठविली आहे. तीन महिन्यांचा कोर्स आहे. टाऊन हॉल, सिडको येथे सेंटर उभारण्यांत येणार आहे.

**श्री.अविनाश कुमावत :** मार्चच्या अगोदर प्रशिक्षण सुरु व्हावे, दुसरे पुढील वर्षाचे बजेट येण्याची वेळ आली आहे. त्या अगोदर सुरु व्हावे. आणखी किती कालावधी लागेल, माझ्या मतानुसार एक महिना तरी लागेल.

**मा.सभापती :** संगणक प्रशिक्षण देण्या संदर्भात अल्प मुदतीची निविदा काढून कार्यवाही करावी.

**श्री.जगदिश सिध्द :** मागील बैठकीत शहरात येणाऱ्या दारुपोटी मनपाला दररोज किती जकात वसूल होते याची माहिती विचारली होती. माहिती देणार होते. खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** दिनांक ०१.०४.२००० ते १५.११.२००० पर्यंत दारुवर एकूण जकात ९९ लाख ८ हजार वसुल झालेली आहे. दररोजची जकात रक्कम सारखी येऊ शकत नाही. कमी जास्त होऊ शकते.

**श्री.नारायण सुरगोणीवार,श्री.जगदीश सिध्द :** शहराच्या बाहेर व्यापाऱ्यांनी गोडाऊन केलेले आहे. १० पेट्या भरुन आणतात. एक दाखविली जाते. जी जकात वसूल होते ती योग्य, बरोबर आहे काय? संबंधित दारुबंदी अधिक्षक कार्यालयाकडून सर्व माहिती मिळू शकते. माहिती घेतली का, किती दारु आजपर्यंत आली.

**जकात अधिक्षक :** दिनांक ०१.०४.२००० ते १५.११.२००० या २२० दिवसांत ९९ लाख ८ हजार जकात वसूल झालेली आहे. संबंधित विभागाकडून माहिती विचारलेली आहे. पत्र पाठवले आहे.

**श्री.जगदिश सिध्द :** जे पत्र संबंधित कार्यालयाकडे माहिती घेण्यासाठी पाठवले त्याची दुय्यम प्रत (ओ.सी.) दाखवावी. अधिकारी चुकीची माहिती सभागृहाला पुरवतात. पत्रच पाठवले नाही.

**मा.सभापती :** जे पत्र संबंधित विभागाकडे पाठवले त्याची ओ.सी.सन्माननीय सदस्यांना दाखवावी व संबंधित विभागाकडून माहिती आल्यावर तशी नियमाने दारुवरील जकात आकारण्याची कार्यवाही व्हावी व सभागृहाला पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** धनराज एजन्सीजचा माल आलेला होता. त्याची किती जकात वसूल केली अद्याप योग्य माहिती देण्यांत आली नाही.

**जकात अधिक्षक :** धनराज गॅस एजन्सीचा रु.४,२४,९८०/- चा इन्व्हॉईस होता. त्याऐवजी ७ लक्ष किंमत आकारणी करुन १७,५००/- वसूल केले. हे खरे आहे की कसे याबद्दल कायझन इंजिनिअरींग मुंबई यांना पत्र दिले आहे.

**श्री.जगदिश सिध्द :** होर्डीग्जचे टेंडर निघणार होते. त्याचे काय झाले. योग्य खुलासा करावा. की कुणाला देण्यांत आले. वृत्तपत्रात तशी जाहिरात आली होती. खुलासा करावा.

**मा.सभापती :** या संबंधीची माहिती श्री.शिंदे साहेब देतील. ते आजच बैठकीस नाहीत. पुढील बैठकीत ते माहिती देतील.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** होर्डीग्जचे दर तीन पटीने वाढवून जुन्याच एजन्सीजला देण्यांत यावे असे सर्वसाधारण सभेच्या मिनीटसमध्ये आले. त्यानुसार कार्यवाही करणार काय?

**मुख्य लेखाधिकारी :** निविदा काढावी म्हणून तत्कालीन आयुक्तांचे आदेश होते. प्रशासकीय कार्यवाही होऊन विभागातर्फे सादर करण्यांत येतील. सर्वसाधारण सभेत यासंबंधी नुसती चर्चा झाली होती. ठराव झालेला नाही.

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्र.) माहिती देतील.

**उपआयुक्त (प्र.) :** शाखाप्रमुख श्री.जरारे हे आज उपस्थित नाहीत. आजारी आहेत. उप आयुक्त (म.) कामानिमित्त गेलेले आहेत. या संबंधीची सविस्तर माहिती तेच देऊ शकतील.

**श्री.भाऊसाहेब वाघ :** जकात खाजगी करणाचा प्रस्ताव कोठपर्यंत आला आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** जकात खाजगीकरणाची निविदा काढण्यांत आली असून १६ नोव्हेंबर, २००० पासून निविदा विक्रीची तारीख असून १५ डिसेंबर पर्यंत निविदा भरुन देण्याची शेवटची तारीख आहे. सदर खाजगीकरण हे १ जानेवारी २००१ ते ३१ डिसेंबर २००१ या एक वर्षाचे कालावधीचे राहील.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** ५६ कोटीचे उद्दीष्ट समोर ठेऊन निविदा काढण्यांत आल्या. तत्कालीन मा.आयुक्त श्री.बलदेवसिंग यांनी ६० कोटीचे उद्दीष्ट ठरवले होते.

४ कोटींसाठी महानगरपालिकेची बदनामी व्हावयास नको. निविदा ७० कोटींची काढावयास हवी होती.

**मुख्य लेखाधिकारी :** तत्कालीन आयुक्त श्री.बलदेवसिंग यांनी ५३ कोटीचे उद्दीष्ट (टारगेट) निश्चित केले होते. ६० कोटीपर्यंत निविदा भरुन येऊ शकते असे गृहीत धरले होते. शासनाचे टारगेट संबंधीचे जी.आर.प्रमाणे मागील जकात वसुलीवर २०% नी वाढ व कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ५०% ऑफसेट प्राईज ई.नुसार ५३ कोटीचे होते. ते आता ५६ कोटी २० लाख ठेवले आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** नगर रचना विभागातील कर्मचारी जकात किंवा करमूल्य विभागात व जकात किंवा करमुल्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या नगर रचना विभागामध्येच झाल्याचे आढळून येते. ४-५ वर्षाहून अधिक सेवा केलेले कर्मचारी एकाच जागेवर व बदल्या झाल्या तरी या दोन्ही विभागाशिवाय त्यांच्या बदल्या होत नाही. यांचे कारण काय?

**उपआयुक्त (प्र.) :** कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणार आहोत. परंतू सध्या त्यास शासनाचे स्थगिती आदेश आहेत. स्थगिती आदेश उठल्यावर कार्यवाही करता येईल.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** शासनाच्या जी.आर.ची. मुख्यालयातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यासाठी आवश्यकता नाही. मुख्यालय सोडून जर बदली करावयाची असेल तर शासनाची परवानगी घ्यावी असा शासनाचा जी.आर.आहे. जी.आर.चे कारण दाखवून सभागृहात दिशाभूल होते, असे वाटते. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यावर त्यांचे उत्तर बरोबर मिळावयास पाहिजे.

**मा.सभापती :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी जी.आर.ची प्रत वाचून दाखवावी.

**श्री.जगदिश सिध्द :** जकात विभागात ८-८ वर्षापासून कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या इतर विभागात बदल्या का करण्यांत येत नाही. शासनाचे बदल्या बाबतचा जी.आर.रद्द केला. तसे आदेश आले नाही काय?

**श्री.कैसर खान :** शासनाचे जी.आर.असतांना सुध्दा काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यांत आल्या. कोणत्या नियमाने केल्या. खुलासा द्यावा. ड्रेनेजमधील कनिष्ठ अभियंताची मालमत्ता विभागात बदली कशी झाली.

**उपआयुक्त (प्र.) :** (शासनाचे आदेशाची प्रत वाचून दाखवतात.) शासकीय कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या नियतकालीक बदली संबंधीची मार्गदर्शक तत्वे शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१९९७/एम-२०/९०/बारा, दि.२७ नोव्हेंबर, १९९७ अन्वये विहीत करण्यांत आली आहेत. त्यानुसार करण्यांत येणाऱ्या नियतकालीक बदल्यांना दिनांक

१) जुलै, २००० पासून पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यांत येत आहे.

२) ज्या बदलीमुळे अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मुख्यालयात बदल होत नाही, अशा बदल्या संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्रिमहोदयांच्या मान्यतेने करता येतील.

३) हे आदेश राज्य सेवेतील अधिकारी/कर्मचारी तसेच जिल्हा परिषदा/महानगरपालिका/नगरपालिका/नगर परिषदा/निम-शासकीय कार्यालये/मंडळे व शासकीय अंगीकृत व्यवसाय या सर्वांना लागू राहतील.

**श्री.जगदिश सिध्द :** कचरा उचलण्यासाठी रिक्शा खरेदी करणार होते. काय कार्यवाही केली.

**अति.शहर अभियंता :** रिक्षा खरेदीचे प्रपोजल तयार केलेले असून मंजूरीसाठी पाठवले आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** रस्त्याचे पॅचवर्कचे टेंडर निघाले. पॅचवर्कचे यापुर्वीच काम केलेले आहे. डिपार्टमेंट कडून करुन घेतले. त्यानंतर हे टेंडर का? टेंडर नोटीसमध्ये पीरबाजार ते वेदांत हे अ.क्र.६ व ७ वर दर्शविलेले आहे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** निविदा सुचनेत अ.क्र.६ व ७ वर पिरबाजार ते वेदांत हे रिपीट झाले ते पीरबाजार ते एम.आय.टी.आहे. यांचे शुध्दीपत्रक दिलेले आहे. मा.मुख्यमंत्री आहे व इतर मा.मंत्री महोदय आले त्यावेळी ठेकेदारांकडून त्यावेळी काम करुन घेतले आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** दर्गा लगत रस्त्याचे नुकतेच डांबरीकरण करण्यांत आले. पुन्हा ताबडतोब पॅचवर्कचे कामासाठी टेंडर केले आहे. झालेली कामे बोगस होते काय? त्याचप्रमाणे शहानुरवाडी येथील रस्त्याचे सुध्दा वृत्तपत्रात छापून येते. पॅचवर्कची कामे रेटलिस्ट मधून होते की नवीन ठेकेदारास ही कामे करत आहे. खुलासा द्यावा.

**अति.शहर अभियंता :** ज्या ठेकेदारांनी पहिल्यांदा रस्त्याचे काम केले तेच पॅचवर्कचे काम करुन देणार आहे. कुण्याही ठेकेदाराने काम केल्यानंतर एक वर्षाच्या मुदतीच्या आत खराब झाल्यास ज्यांनी ते काम अगोदर केले त्यांच्याकडून विनामूल्य काम करुन घेण्यांत येते. निविदाच्या अटीत असे नमूद केलेले आहे. त्याचे देयक देण्यांत येणार नाही.

**श्री.अविनाश कुमावत :** मागच्या वेळी ब्लिचिंग पावडर खरेदी केले. यात ३४% पेक्षा कमी प्रमाण क्लोरीनचे आढळले. हे खरे आहे काय?

**कार्य.अभियंता (पा.पु.) :** आय.एस.आय.मार्कसचे चांगल्या प्रतीचे ब्लिचिंग पावडर ज्यात ३० ते ३३% क्लोरीन असावे. ते खरेदी केले आहे. जे घेतले त्या ३ पैकी २ मध्ये ३२.८% क्लोरीन व एकात ३०.८% मात्रा आढळली. ३२.८% चे चांगले होते ते वापरले. ३०.८% मात्रा असलेले परत केले. त्याचा मोबदला दिला नाही.

**श्री.सलीम पटेल :** एस.ए.कादरी यांचे संदर्भात पुढील सभेत माहिती देण्यांत येईल असे सांगितले होते.

**सहाय्यक आयुक्त-१ :** श्री.एस.ए.कादरी यांचे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.

**श्री.मोतीलाल जगताप :** झोन क्र.५ मध्ये साहेबराव धोंडू साबळे नावाचे कर्मचारी सध्या कार्यरत असून त्यांचे नावासारखे दुसरे व्यक्ती साहेबराव साबळे नावांचे तेथे काम करत असल्याचे दाखवण्यांत येत असून यासाठी जेष्ठता यादीत त्यांचे नांव घेण्यासाठी कामगार अधिकारी यांनी पुढाकार घेतला आहे व जे सध्या कार्यरत आहे. त्यांचेकडून जबरदस्तीने मी साहेबराव साबळे येथे काम करत नसल्याचे लिहून घेण्याचा प्रयत्न होत आहे. याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांनी यासंबंधी तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.कैसरखान :** पार्कींगच्या जागेवर कॅन्टीन धारकांना जागा देणार होते. तेथे पार्कींग झाल्यामुळे संबंधितास टाऊन हॉल येथील इमारती लगत कायमस्वरुपी जागा देण्यांत यावी. आता सध्या त्यांना बाजुला तात्पुरती जागा दिली आहे. सल्ला मसलत करुन त्यांना कायमस्वरुपी नवीन होणाऱ्या इमारतीच्या बाजुला देण्यांत यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** संबंधिताने अर्ज दिलेला आहे काय? याची माहिती घ्यावी लागेल. मालमत्ता अधिकारी यांना या संबंधीची विचारणा करण्यांत येऊन पुढील कार्यवाही करता येईल. टेंडर पध्दतीने कार्यवाही करावी लागणार आहे.

**मा.सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

**श्री.नारायण सुरगोणीवार :** वार्डात अनाधिकृत वस्त्या १९९५ च्या अगोदरच्या असून चिश्तीया कॉलनी ही १९९५ पुर्वीची आहे. स्वेच्छा निधीतून विकास कामे करण्यांत येतील काय? खुलासा करावा. सन्माननीय सदस्यांनी पत्र दिल्यावर सुध्दा कार्यवाही होत नाही.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेत या संबंधी सविस्तर चर्चा झालेली आहे. प्रशासनाने निर्णय घेत नसल्याने सभा तहकूब झालेली आहे. सर्वसाधारण सभेत यावर जो निर्णय होईल त्यानुसार प्रशासन कार्यवाही करेल.

याबरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०७-१२-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. गुरुवार दिनांक ०७ डिसेंबर २००० रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. अशरफ युनुस मोतीवाला यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. कावडे साहेबराव राणुबा | स. सदस्य |
| २) स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान | -//- |
| ३) स. स. सौ. कुसुमबाई दौलत खरात | -//- |
| ४) स. स. श्री. गणेश रामचंद्र तांबे | -//- |
| ५) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| ६) स. स. श्री. जगदीश कन्हैयालाल सिध्द | -//- |
| ८) स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | -//- |
| ९) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १०) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ११) स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | -//- |
| १३) स. स. श्री. सलिम पटेल समशेर पटेल | -//- |
| १४) स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| १५) स. स. श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | -//- |

**विषय क्र. ६९/१ :**

दिनांक २४-११-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती** : विषय क्र. १ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

२४-११-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. ७०/२ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) विभाग, महानगरपालिका यांनी झाल्टा सर्व्हे नं. ४९९ मध्ये ५.३८ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या जलनिःसारण केंद्राचा प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव रुपये १३५.०० लाखांचा सादर होता. प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. ०७-११-१९९८ रोजी मान्यता दिली. तसेच प्रस्ताव सर्वसाधारण सभा ठराव क्र. १७१/५ दिनांक १९-१२-१९९८ अंतर्गत पारीत केला गेला.

यानुसार निविदा मागविल्या असता निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेला दोन निविदा प्राप्त झाल्या. त्या पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. खर्डीकर कंन्स्ट्रक्शन | ४४.८९% जास्त दराने |
| २. | मे. एन. आर. घोडेले | ४०.९६% जास्त दराने |

वरील प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा मे. एन.आर. घोडेले यांची आहे. त्यानंतर निवडणूका व इतर अडचणीमुळे ह्या प्रस्तावास अंतिम मंजूरी देता आली नाही. वाढीव दराबाबत तांत्रिक छाननी केली गेली व वाटाघाटीनंतर मुळ अंदाजपत्रकीय दरावर (रु. १३५.०० लाख) सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. १४-११-२००० रोजी मान्यता दिली.

पुढील वैधानिक कार्यवाहीसाठी रु. १३५.०० लाखाचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी सादर. सदर काम अंदाजपत्रकीय दरावर (म्हणजेच रुपये १३५.०० लाख करण्यास मे. एन. आर. घोडेले तयार असल्याने व त्यांची निविदा कमी दराची असल्याने भाववाढ निर्देशांक देयक मान्य करुन निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी व मंजूरीसाठी सादर.

**संवाद :**

**श्री. जगताप मोतीलाल :** प्रस्ताव ०७-११-९८ ला मंजूर झाला त्याप्रमाणे काम करावे. प्रस्तावात भाववाढ निर्देषांक देयक असे नमुद केले आहे ते काय आहे याचा खुलासा करावा.

**मा. सभापती** : कार्यकारी अभियंता (पा. पु.) यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** ज्यावेळेस निविदा ५ लाख किंवा त्यापेक्षा जास्त असेल व कामाचा कालावधी विचारात घेता बी-१ निविदेमध्ये तरतुद आहे. व साहित्याचे दरवाढ विचारात घेता प्राईज वेरीएशन मुळे भाववाढ होते. जसा निर्देशांक वाढेल तशी वाढ द्यावी. यात १% व जास्तीत जास्त १ १/२ वाढ होऊ शकते.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तू संग्राहालयासाठी २८ लाखाचा प्रस्ताव होता. कामात वाढ झाल्याने संपूर्ण काम १ १/२ कोटीपर्यंत गेले असे होता कामा नये. मंजूर करायला हरकत नाही. तथापी खुलासा व्हावा.

**श्री. सलीम पटेल :** कामात जास्त वाढ होऊ नये.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** अशी वाढ जास्तीत जास्त १ १/२% पेक्षा जास्त होऊ शकत नाही. त्यापेक्षा कमी होऊ शकते.

**मा. सभापती** : प्रस्तावास सर्वानुमते मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झाल्टा सर्व्हे नं. ४९९ मध्ये ५.३८ दशलक्ष लिटर्स क्षमतेच्या मलनि:सारण केंद्राच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे. एन. आर. घोडेले यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम मे. एन. आर. घोडेले यांचेकडून निविदेनुसार अनुज्ञेय होणारे भाववाढ निर्देशांक देयक मान्य करुन अंदाजपत्रकीय दरावर (म्हणजेच रुपये १३५.०० लाख) करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विद्युत विभागातील दैनिक वेतनावरील लाईनमनचे काम करणाऱ्या दैनिक वेतनावरील कामगारांचा दैनिक वेतनाचा दर ठरविण्याकरीता समितीने गठण करण्यात आले होते. उक्त समितीने महानगरपालिकेच्या इतर वर्ग-४ संवर्गातील दैनिक वेतनावरील कामगारांना दैनिक वेतनाचा रु. १५/- प्रमाणे दैनिक वेतनाचा

दर वाढवून रु. ५०/- वरुन रु. ६५/- करण्यात आल्यामुळे विद्युत विभागातील दैनिक वेतनावरील लाईनमन जे सेवाभारती नियमातील अर्हता धारण करीत असतील ज्यांना दैनिक वेतनाचा दर रु. ६०/- वरुन रु. ७५/- माहे सप्टेंबर २००० पासून देण्याची समितीने शिफारस केली आहे.

करीता विद्युत विभागातील दैनिक वेतनावरील लाईनमन जे सेवा भरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत. अशा दैनिक वेतनावरील विद्युत लाईनमन यांना दैनिक वेतनाचा दर रु. ७५/- प्रमाणे माहे सप्टेंबर, २००० पासून देण्याचा प्रस्ताव निर्णयास्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. कैसरखान :** प्रस्ताव मंजूर करावा परंतू कर्मचारी यांनी वेळेवर कामे करावी तशी त्यांना ताकीद देण्यात यावी.

**श्री. भरत लकडे :** कर्मचारी कामे व्यवस्थित करत असतील तर दैनिक वेतन वाढवुन देण्यास हरकत नसावी.

**मा. सभापती** : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्युत विभागातील दैनिक वेतनावरील लाईनम जे सेवा भरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत. अशा दैनिक वेतनावरील विद्युत लाईनमन यांना दैनिक वेतनाचा दर रु. ७५/- प्रमाणे माहे सप्टेंबर, २००० पासून देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळी सभागृहात विषय*

**विषय क्र. ७२/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सन २०००-२००१ या वर्षाकरिता लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता दिनांक १८-०८-२००० च्या मा. स्थायी समिती ठराव क्र. ४२/५, ४३/६, ४४/७, ४५/८ अन्वये अनुक्रमे र. रु. ९,८४,०००/- र. रु. ९,९९,०००/-, ९,५४,०००/- व ९,९७०००/- असे एकुण र. रु. ३९,३४,०००.०० च्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली होती. परंतु दिनांक २४-१०-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत विद्युत साहित्य खरेदीच्या सर्व संचिका एकत्रित करुन फेर निविदा मागविण्यात याव्यात असा निर्णय झाला. त्यानुसार विद्युत साहित्य खरेदीकरीता एकत्रित निविदापत्रके मागविण्यत आली असता एकूण सात कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी फक्त सहा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. या सहा निविदापत्रकापैकी मे. महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादीत यांनी कागदपत्रांची पुर्तता न केल्याने त्यांचे निविदापत्रक उघडण्यात आले नाही. उर्वरीत पाच एजन्सीचे निविदापत्रक उघडण्यात आली असून, त्यांनी दिलेले दर खालील तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र. १ :**

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | प्राप्त दर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क्रॉम्प्टन ग्रिव्हीज | बजाज इले | फिक्सो लाईट | श्री. इलेक्ट्रीकल्स | चंद्राकांता ट्रेडर्स |
| १. | २५० वॅट सोडीयम व्हेपर | ५०८=५० | ५४९=०० | -- | ५४०=०० | -- |
| २. | २५० वॅट सोडीयम चोक | ६६६=०० | ५४९=०० | ५९०=०० | -- | ४७७=०० |
| ३. | १५० व्वॅट सोडीयम लॅम्प | ४४६=०० | ४७२=०० | -- | ५१०=०० | -- |
| ४. | १५० वॅट सोडीयम चोक | ४९५=०० | ४४४=०० | ४३०=०० | -- | ३५०=०० |
| ५. | १२५ वॅट मर्क्युरी लॅम्प | १५६=०० | १२५=०० | -- | ११२=०० | -- |
| ६. | २५० वॅट मर्क्युरी लॅम्प | ४२८=०० | ३४५=०० | -- | ३०००=०० | -- |
| ७. | ४०० वॅट मर्क्युरी लॅम्प | ५९०=०० | ४८५=०० | -- | ४७५=०० | -- |
| ८. | १२५ वॅट मर्क्युरी चोक | ३१९=०५ | २८२=०० | २९३=०० | -- | -- |
| ९. | २५० वॅट मर्क्युरी चोक | ४९४=०१ | ४४४=०० | ४३५=०० | -- | -- |
| १०. | ४०० वॅट मर्क्युरी चोक | ७२०=०० | ७१४=०० | ६२०=०० | -- | -- |
| ११. | १००० वॅट हॅलोजन लॅम्प | १३५=०० | १०६=०० | -- | -- | -- |
| १२. | ५०० वॅट हॅलोजन लॅम्प | १०८=०० | ९९=०० | -- | -- | -- |
| १३. | २X२० वॅट टयुब रॉड | ४२=५० | ४०=०० | -- | -- | ४०=०० |
| १४. | ४X४० वॅट टयुब रॉड | ३२=४९ | ३९=०० | -- | -- | ४०=०० |
| १५. | ४० वॅट टयुब वोक | १०३=४१ | ९४=०० | ९४=०० | -- | १००=०० |
| १६. | ४० वॅट टयुब स्टार्टर | ६=४५ | ५=७५ | ५=९० | -- | ४=९० |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे

१. ॲटम क्र. १ व ३ करिता - मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हीज
२. ॲटम क्र. ८, ११, १२, १३, १५ करिता - मे. बजाज इलेक्ट्रीकल्स
३. ॲटम क्र. ९, १०, १५ करिता - मे. फिक्सोलाईट
४. ॲटम क्र. ५, ६, ७ करिता - मे. श्री. इलेक्ट्रीकल्स
५. ॲटम क्र.२, ४, १३, १६ करीता - मे. चंद्राकांता ट्रेडर्स

यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

वरील ॲटम पैकी अ. क्र. ४ मध्ये मे. चंद्रकांता ट्रेडर्स यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी आहेत. परंतु निविदाच्या अटी व शर्तीनुसार त्यांनी साहित्याचे सॅम्पल (नमुना) कार्यालयात दाखल केलेला नाही त्यामुळे त्यांचे या ॲटमचे दर विचारात घेता येणार नाहीत. या ॲटम करीता दुसऱ्या क्रमांकाचे दर मे. फिक्सोलाईट यांचे आहेत. परंतू मे. फिक्सोलाईट यांचा या ॲटम करीता आय. एस. आय. मार्क नसल्याने त्यांचेही दर विचारात घेता येवु शकत नाहीत. म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेल्या मे. बजाज इलेक्ट्रीकल्स यांचे दर मंजूरीची शिफारस करण्यात येते.

ॲटम क्र. १३ मध्ये मे. बजाज इलेक्ट्रीकल्स व मे. चंद्राकांता ट्रेडर्स या दोघांचे दर सारखेच प्राप्त झाले आहेत. व यामध्ये मे. चंद्रकांता ट्रेडर्स यांच्या साहित्यास आय. एस. आय. मार्क नसल्यामुळे त्यांचे दर विचारात घेता येणार नाहीत. या ॲटम करीता दुसऱ्या क्रमांकाचे कमी दर असलेले मे. बजाज इलेक्ट्रीकल्स यांचे (तक्ता क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) दर मंजूरीची शिफारस करण्यात येते.

ॲटम क्र. १५ साठी मे. बजाज इलेक्ट्रीकल्स व मे. फेक्सोलाईट यांचे दर सारखेच प्राप्त झाले आहेत. व मे. फिक्सोलाईट यांचे दर सारखेच प्राप्त झाले आहेत व मे. फिक्सोलाईट यांचे दर सारखेच प्राप्त झाले आहेत व मे. फिक्सोलाईट यांचे साहित्यास आय. एस. आय. मार्क नसल्याने व कामाची तातडी लक्षात घेता जितके साहित्य खरेदी करावयाचे आहे. त्यापैकी अर्धे साहित्य मे. बजाज इलेक्ट्रीकल्स व अर्धे साहित्य मे. फिक्सोलाईट यांच्याकडून तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेल्या दराने खरेदी करण्याची शिफारस करण्यात येते.

उर्वरीत ॲटम क्र. ९ व १० च्या साहित्याकरीता मे. फिक्सोलाईट, ॲटम क्र. ५, ६, ७ करीता मे. श्री. इलेक्ट्रीकल्स व ॲटम क्र. ४ व १६ करीता मे. चंद्राकांता ट्रेडर्स यांच्या साहित्यास आय. एस. आय. मार्क नसल्याने त्यांच्या दराचा विचार न करता सदरील साहित्य दुसऱ्या क्रमांकाचे दर असलेल्या मे. बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून तक्ता क्र. १ मध्ये दिलेल्या दरानुसार खरेदी करण्याची शिफारस करण्यात येते.

वरील सर्व बाबी विचारात घेता खालील दर्शविल्याप्रमाणे विद्युत साहित्य खरेदी करण्याची शिफारस करण्यात येते.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | ॲटम क्रमांक (तक्ता क्रमांक १ नुसार) |
|---|---|---|
| १. | मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हीज | ॲटम क्र. १ व ३ |
| २. | मे. बजाज इलेक्ट्रीकल्स | ॲटम क्र. ४ ते १६ |
| ३. | मे. फिक्सोलाईट | ॲटम क्र. १५ (अर्धे साहित्य) |
| ४. | मे. चंद्राकांता ट्रेडर्स | ॲटम क्र. २ |

तरी वरील तक्ता क्र. २ मध्ये एजन्सीचे नावांसमोर दर्शविलेले ॲटम तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेल्या दराने खरेदी करावयाचे झाल्यास एकुण र. रु. २३, ३६, ६६५=०० इतका खर्च येणार आहे.

तरी तक्ता क्र. २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हीज यांच्याकडून ॲटम क्र. १ व ३, मे. बजाज इलेक्ट्रीकल्स यांच्याकडून ॲटम क्र. ४ ते १६ मे. फिक्सोलाईट यांच्याकडून ॲटम क्र. १५ (अर्धे साहित्य), व मे. चंद्रकांता ट्रेडर्स यांच्याकडून ॲटम क्र. २ हे

विद्युत साहित्य तक्ता क्र. १ मध्ये दर्शविलेल्या दराने खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. जगदीश सिध्द :** प्रस्ताव मंजूर केल्यानंतर वार्डात लाईटची व्यवस्था होण्यास किती अवधी लागेल याचा खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** मटेरीयल आल्यानंतर ताबडतोब कामे करण्यात येतील ज्यांच्या तक्रारी आहेत. त्यास १ ते १ १/२ महिनेचा कालावधी लागेल, कामे तात्काळ व्हावीत म्हणून काही तक्रारी ही प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार तात्काळ कार्यवाही होईल मटेरीयल येण्यास ८ दिवस लागतील.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००-२००१ या वर्षाकरीता लागणारे विद्युत साहित्य खरेदी करण्याकरीता मागविण्यात आलेल्या निविदानुसार प्रस्तावातील तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या कमी दराचे दरपत्रकधारकांकडून तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शविलेले त्या त्या एजन्सीच्या नावांसमोर दर्शविलेले खालील ॲटम क्रमांकाचे साहित्य संबंधिताकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. क्रॉम्प्टन ग्रिव्हीज | ॲटम क्र. १ व ३ चे साहित्य |
| २. | मे. बजाज इलेक्ट्रीकल्स | ॲटम क्र. ४ ते १६ चे साहित्य |
| ३. | मे. फिक्सोलाईट | ॲटम क्र. १५ (अर्धे साहित्य) |
| ४. | मे. चंद्राकांता ट्रेडर्स | ॲटम क्र. २ चे साहित्य |

ॲटम क्र. १५ साठी मे. बजाज इलेक्ट्रीकल्स व मे. फिक्सोलाईट यांचे दर सारखेच प्राप्त झाल्यामुळे प्रत्येक एजन्सीकडुन अर्धे साहित्य खरेदी करण्यास तसेच वरील विद्युत साहित्य खरेदीसाठी येणाऱ्या र. रु. २३,३६,६६५/- च्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

**श्री. गणेश तांबे, श्री. मधुकर सावंत :** १० लाखापर्यंतचे कामाचे अधिकारी मा. आयुक्तांना आहेत. अशा कामासाठी एजन्सी फिक्स केलेल्या नाही. मा. आयुक्त जागेवर नाही कामे होणार की नाही अशी सर्व कामे स्थायी समितीकडे मान्यतेसाठी आणून कार्यवाही करावी.

**श्री. कैसरखान :** १० लाखापर्यंतचे कामाच्या संचिकेवर मा. आयुक्तांनी आणि सह्या केलेल्या नाही असे वाटते अशा सर्व संचिका मागवून एजन्सीज फिक्स करुन कामे करावीत.

**मा. सभापती :** मा. आयुक्त सध्या नाहीत आल्यानंतर त्यांची भेट घेऊन कामासंदर्भात संचिकेवर निर्णय घेण्याची सुचना करण्यात येईल.

**श्री. मधुकर सावंत :** कमीत कमी १० लाखापर्यंतच्या ५० संचिका थांबुन आहेत. आठ दिवसात कामे करुन घ्यावे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** अशा संचिकेबाबत त्वरित एजन्सीज फिक्स करुन वर्कऑर्डर देण्यात येऊन तात्काळ कामे करुन घ्यावेत.

**श्री. कैसर खान :** १० लाखापर्यंतच्या संचिकेवर मा. आयुक्त सध्या करत नसतील तर स्थायी समितीच्या मंजुरीस आणावे व त्यानुसार कार्यवाही व्हावी तसेच ठेकेदारांची बीले अद्याप अदा करण्यात आली नाही कधी देणार खुलासा करावा. कार्यकारी अभियंता याना ७५ हजार पर्यंतच्या रक्कमेचे संचिकेवर निर्णय घेण्याचे अधिकार दयावेत.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** एक कार्यकारी अभियंता यांना दोन-दोन चार्ज आहेत. कामे अशी होतील. जास्तीच्या रक्कमेच्या अधिकार देण्यात यावेत. गणपती उत्सव, तसेच दिपावलीच्या वेळी लहान लहान ड्रेनेजची विकास कामे झाली नाहीत. त्यांचे अधिकारी वाढविण्यात यावे.

**मा. सभापती** : मा. आयुक्त यांनी सर्व विकास कामाच्या संचिकेवर ८ दिवसाच्या आत निर्णय घ्यावेत. या संदर्भात मा. आयुक्त यांना आपण सर्व जण प्रत्यक्ष भेटुन कामे करण्याबाबत सांगण्यात येईल.

**श्री. कैसरखान :** सुचना देऊनही ८ दिवसात मा. आयुक्त यांनी विकास कामाच्या संचिका मंजुर केल्या नाहीतर काय ॲक्शन घेणार याचा खुलासा व्हावा. सध्या आयुक्त जागेवर नाहीत.

**मा.सभापती** : ८ दिवसात सर्व संचिकेवर मा. आयुक्त यांनी निर्णय घेतला नाही तर मा. महापौर यांना विनंती करुन सर्वसाधारणसभेत यासंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही करण्यास सांगण्यात येईल. तसेच ठेकेदारांची थकीत बिला संबंधीही मा. आयुक्त यांचेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** ठेकेदारांची बिले अदा करण्यासंदर्भात मा. महापौर यांचे भेट घेवून मा. आयुक्त यांना सुचना देऊन कार्यवाही करण्यास सांगू.

**श्री. जगदीश सिध्द :** मा. आयुक्त विकास कामाबाबतच्या संचिका मंजूर करत नसतील तर मालमत्ता कर, पाणीपट्टी कर न भरण्याबाबतचा ठराव संमत करावा, आयुक्त जागेवर नसतात. जनतेच्या काय काय सुचना असतात त्या ऐकावयास कुणी जागेवर नसतात. आयुक्त जातात व उपआयुक्तही जातात. सभागृहात माहिती विचारल्या व्यवस्थित उत्तरे मिळत नाही. अधिकारी सभागृह व स. नगर सेवकांना काही महत्व ( किंमत ) देत नाही. प्रशासन कोणत्या पध्दतीने कामकाज करत आहे. समजावयास तयार नाही.

**मा. सभापती** : मा. आयुक्त उद्या येणार आहेत त्यांची भेट घेऊन आठ दिवसाच्या आत कामे सुरु करण्याबाबत सुचना करण्यात येतील.

**श्री. मधुकर सावंत :** मा. आयुक्त दोन दिवसांच्या रजेवर गेले असे मागील बैठकीत सांगितले होते. आतापर्यंत हजर झाले नाहीत.

**मा.सभापती** : मा. आयुक्तांनी रजा वाढवून घेतलेली आहे. श्री. चहल साहेबांकडे चार्ज दिलेला असून, ते उद्या येणार आहे. त्यांचेशी चर्चा करुन विकास कामाच्या संदर्भात संचिकेवर कार्यवाही करण्याचे सांगण्यात येईल.

**श्री. सलीम पटेल :** निविदा काढून २ महिने १० दिवस झाले. अधिकारी का थांबवितात. ३९ लाखाची संचिका १० दिवसात व ४८,०००/- च्या संचिककेमध्ये २-३ महिने कार्यादेश देण्यात येत नाही. काही ठराविक संचिका अधिकारी मागवून सह्या करुन तात्काळ कार्यवाही करतात. कैसर कॉलनी गल्ली नं. १ दोन वर्षापूर्वी

इस्टीमेंट तयार केले आहे. टेंडर बिलोमध्ये गेले म्हणून ती संचिका थांबवून ठेवली जाते. व अंदाजपत्रकीय दराच्या संचिका घेवून जातात. संचिके मागे स. सदस्यांनी चकरा मारायच्या का? अधिकारी मनमानी करतात संचिके बाबत माहिती दयावी.

**श्री. गणेश तांबे :** सुरुवातीपासुन ज्या संचिका तयार झाल्या त्या एकाच विभागात पडुन आहेत. नंतरच्या ठराविक लोकांच्या काही संचिका ताबडतोब लेखा विभागात जातात. मंजुरीही होत आहे. अगोदरच्या ज्या संचिका आहेत. त्या मंजुर कराव्यात.

**कार्यकारी अभियंता :** मेन्टन्संच्या निविदा काढलेल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करणे. एजन्सी फिक्सींगसाठी मा. आयुक्तांकडे संचिका पाठवावे लागतात. आता बऱ्याच संचिका मा. आयुक्तांच्या सहीसाठी गेलेल्या आहेत. आम्ही पाठविलेल्या फाईली परत आल्या नाही. २६ सप्टेंबरला निविदा मंजुर झाली आहे. स. सदस्य सलीम पटेल यांनी ज्या संचिकेबाबत सुचना केली नेमकी ती संचिका कोठे आहे. हे आताच सांगता येणार नाही. संचिका पाहुन माहिती घेण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** मागील काही दिवसापूर्वी राधाप्रेम ट्रॅव्हल्सचे गाडीत यंत्रसामुग्री मशीनरी पार्टस, शहरात आणण्यात आले जकात अधिक्षक यांना यासंबंधी माहिती देऊन सदर माल जप्त करण्यात येऊन पंचनामा करण्यात यावा अशी सुचना देण्यात आल्या यासंबंधी सभापती व मा. महापौर यांनी सुध्दा सुचना दिल्या तरी सुध्दा जकात अधिक्षक यांनी माल जप्त न करता पावती क्र. ५६६ त्यातील बील क्र. ०५६५८२, ०५६५८३ नुसार १३३ व १०० जकात घेण्यात आला. दोन वेगवेगळे मशीनरीचा माल असून एकाची ३ हजार व दुसऱ्या पार्टसची १ हजार किंमत धरली. सर्वसाधारण सभेत मालाची ओपन डिलेवरी करुन जकात आकारावा असा निर्णय झालेला आहे. माल जप्त करण्याबाबत आणि पंचनामा करण्याबाबत सुचना दिलेल्या असून, देखील जप्ती करण्यात आली नाही. दबाव होता, नगरसेवकांचा दबाव येतो, महापौरांनी सांगितले, असे बोलून नगरसेवकांचे नाव बदनाम किंवा स्वतःच्या बचावासाठी असे सांगण्यात येते.

**मा. सभापती** : जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** राधाप्रेम गाडीत आणलेल्या मालावर रु. २२,९९०/- इतका दंड म्हणून जकात वसूल करण्यात आली आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** जकात अधिक्षक व माझी यासंबंधी नगरनाका येथे प्रत्यक्ष बोलणी झाली माल जप्त करण्यात यावा व करण्यात येईल अशी चर्चा झाली, चहापाणीही झाला, त्यावेळी जकात अधिक्षक यांनी मॅटेडोर मागवून माल जप्त करुन आणण्यात येईल असे सांगितले. यानंतर जकात अधिक्षक यांनी निर्णय बदलला व मालाची ओपन डिलेवरी न करता माल जप्त करण्याऐवजी दंड रुपाने जकात आकारण्याचा निर्णय घेतला. या संदर्भात मा. महापौर यांनी फोन करुन माहिती घेतली असता दोन सदस्यांचा माल जप्त करण्यास दबाव येत आहे असे सांगण्यात आले. कुणाचा दबाव होता खुलासा दयावा. मा. सभापती यांनी सुध्दा सुचना केलेली होती मालाची ओपन डिलेवरी करुनच जकात आकारावी असा सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. सभागृहाने घेतलेला निर्णय व स. सदस्यांनी सुचना करुनही

माल जप्त न करता दंड वसुल केला, यंत्रसामुग्री जप्त करण्याची सुचना दिल्या होत्या, का जप्त केला नाही खुलासा करावा.

**जकात अधिक्षक :** माल जप्त करणे जरुरी नाही. १० पट दंड वसूल करणे आवश्यक होते ते केले आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** मा. महापौरांना सांगितले की, नगरसेवकांचा प्रेशर आणले म्हणून जप्ती करुन आणा म्हणून सांगितले पंचनामा केला का?

**जकात अधिक्षक :** पार्टी जागेवर पैसे भरायला तयार होते जकात निरिक्षक सोबत होते. ओरीजनल इनवाईस पाहीले. पंचनामा केलेला नाही परंतू मालाची ओपन डिलेवरील करुन १० पट दंड वसूल केला आहे.

**श्री. गणेश तांबे :** स. सदस्यांची सुचना करुन सुध्दा त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही. यावरुन अधिकारी/कर्मचारी यांचा जकात चोरीला पाठींबा आहे असे दिसून येते. यासाठी जकातीचे खाजगी करण होणे गरजेचे आहे. तात्काळ झाले पाहिजे.

**मा. सभापती :** खाजगीकरण करण्याची प्रोसीजर चालू आहे लवकरच निर्णय होणार आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** यंत्रसामुग्री जप्त करण्याची ऑर्डर, सुचना मिळाली असतांना मालाची ओपन डिलेवरी न करता केवळ दंड वसूल केला गेल. जकात अधिक्षक यांची भेट घेऊन कर्मचाऱ्यांना मॅटॅडोर आणण्यास सांगितले नंतर साहित्य जप्त न करता दंड वसूल केला, ओपन डिलेवरी का केली नाही हा माझा बोलण्याचा उद्देश आहे.

**मा. उपआयुक्त (प्र.) :** या प्रकरणामध्ये जी यंत्रसामुग्री आला असेल व त्याचे किंमतीत वाढ असेल त्याची तपासणी करुन नियमाप्रमाणे जकात वसूल करण्यात येईल. लेखाधिकारी मार्फत कार्यवाही करु व यात जे कर्मचारी/अधिकारी दोषी असेल त्यांचेवर नियमाने कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** राधाप्रेम ट्रॅव्हल्स कंपनीची गाडी शहरात संगनमताने थांबत नाही परंतु व्यापाऱ्यांचा माल शहरात येतांना जकात न भरता पोहच करत आहे. लहान-मोठ्या व्यापाऱ्याचा माल आणण्यात येतो. माल पोहच केल्याचे बदल्यात १% प्रमाणे मालाच्या किंमतीवर संबंधित ट्रॅव्हल्सच्या कंपनी मालाकास रक्कम मिळते. बऱ्याच दिवसांपासुन हे चालत आलेले असून, अधिकारी यांना यासंबंधी सर्व माहिती असून, सुध्दा चोरीचा प्रकार होत असावा व यासंबंधी मा. सभापती यांनी सुध्दा सुचना करुनही माल जप्त न करता दंड वसूल केला गेला. रेड झाली मशीनरीची जकात भरली. बाकीचा माल तसाच घेवून गेला. जकात अधिक्षकांची बदली करावी. चौकशी होत राहील. आमचा महसूल बुडत आहे.

**मा. सभापती :** या प्रकरणाच्या चौकशीसाठी मुख्यलेखाधिकारी, उपआयुक्त (प्र) तसेच मी सुध्दा राहील, समितीने १५ दिवसांच्या आत चौकशी करुन आपला अहवाल सादर करावा.

**श्री. तुळशीबागवाले किशोर :** महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्यादृष्टीने शहागंज येथील महानगरपालिकेच्या मालकीचे गाळे भाजीपाला विक्रेत्यांना बाजारासाठी देण्यात आले होते. प्रत्येक गाडयांना महानगरपालिका र. रु. १००/- भाडे दर महिन्याला आकारते. परंतु संबंधित ज्यांना गाळे दिल्या गेले होते त्यांना जाधववाडी येथे दुसरी जागा देण्यात आली. शहागंज येथील गाळे रिकामे करुन घ्यावे व महानगरपालिकेने ताब्यात घेऊन टेंडर काढून दुसऱ्यांना देण्यात यावे जेणे करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच

सादिया मार्केट येथील दुकाने कुणाला दिली किती बाकी आहे. येणारे उत्पन्न किती त्याचा खुलासा करावा. भोलेश्वर मार्केटचे किती भाडे येते, त्याची पण माहिती दयावी. तसेच नाथ सुपर मार्केट येथे महानगरपालिकेच्या मालकीची दुकाने आहेत, बऱ्याच दिवसापासून भाडयाने दिलेल्या आहेत. जुने भाडे आहेत. आत्ताचे भाडे काय आहे इतर बाजूच्या दुकानाकडून किती भाडे येते त्याप्रमाणा ात भाउे वाढ करुन उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. पीरबाजार येथे दुकाने केलीत ते कधी चालू करणार. मालमत्ता अधिकारी यांनी कार्यवाही करावी व ज्यापासुन महानगरपालिकाला उत्पन्न मिळते अशा इमारती, दुकाने, हॉल याची माहिती घेऊन संपूर्ण चौकशी करुन सभागृहाला माहिती दयावी.

**सौ. रहाटकर विजया :** पीरबाजार येथे दर सोमवारी बाजार भरतो. अनेक लोक बाजारासाठी येतात सर्वांना सोयीस्कर पडेल असा हा बाजार आहे या बाजाराच्या विक्रेत्यांकडुन या अगोदर महानगरपालिकेतर्फे टॅक्स आकारण्यात येत नसे या वर्षी पासून टॅक्स आकारण्यास सुरुवात केली. जवळपास ५,१०,०००/- रु. यापासुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळते. टॅक्स वसूल करण्यात येतो परंतु जे विक्रेते आहे त्यांचेसाठी काही सोयीसुविधा उदा. शौचालये वैगेरे करणे गरजेचे आहे. ते करणार की नाही. बाजाराचा व्याप पीरबाजार ते गुरु तेग तहादूर प्राथमिक शाळे पर्यंत झालेला आहे. त्यामुळे येणारी वाहने (ट्राफिक) कमी वेगाने जातात व ट्राफिक ठप्प होते. एका आजारी व्यक्तीसाठी गाडी बोलाविण्यात आली होती ती गाडी त्या व्यक्तीच्या घरापर्यंत येण्यास इतका वेळ झाला की बाजार विक्रेत्यांना बाजूला करण्यात खुप वेळ गेला व सुदैवाने त्या आजारी व्यक्तीला दवाखान्यात नेऊन त्याचे प्राण वाचला. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. बाजारासाठी वेगळी जागा देण्यात प्रशासन काही पावले उचलणार की नाही, मागे एक जागा भुसंपादन करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला होता परंतु रात्रतीतुन १६ लोकांनी आमची जागा आहे म्हणून दावा केला. यासाठी प्रशासन का भुमिका घेणार खुलासा करावा. ट्रफिक काय व्यवस्था करता येईल ते पहावे.

**मालमत्ता अधिकारी :** ज्यांना दुकाने भाडेतत्वावर दिली ते रितसर करारनामयानुसार भाडे भरत नसतील तर करार संपलेला असेल, त्याच प्रमाणे स्वत:दुकाने चालवत नसतील अशांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. भोलेश्वर मार्केट येथील दुकानाची थकीत रक्कम ज्यांनी भरली नाही त्यांना अंतिम नोटीस दिली आहे. तसचे सादिया मार्केट येथील ९ गाडी ताब्यात देण्यात आलेले आहे. बाकीच्या लोकांनी अंशतः रक्कम भरली आहे. त्यांची अनामत जप्त करण्यासाठी अंतिम नोटीस दिली आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** शहागंज येथील दुकानाचा जो करार केला होता त्यांची मुदत संपलेली आहे अशा दुकानांना आपल्या ताब्यात घ्यावे संबंधितास नोटीसा देण्याची गरज नाही. टेंडर पध्दतीने जे जास्त रक्कम देतील त्यांना दयावे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्यादृष्टीने संबंधित अधिकारी यांनी ठोस निर्णय घ्यावा भोलेश्वर मार्केटची दुकानाबाबतची कार्यवाही तात्काळ करावी अंतिम नोटीस कशासाठी देता. नियमानुसार दुकाने ताब्यात घ्यावी. सादीया मार्केटचे १९९२-९३ ला काम सुरु झाले. अद्याप उत्पन्न वाढविण्याची कोणती

कार्यवाही नाही. भोलेश्वर मार्केटची दुकाने अदयाप कुणाला दिली गेली नाही. खर्च करण्याबाबत चर्चा होते, उत्पन्न येण्यासंबंधी सुध्दा चर्चा होऊन झालेल्या निर्णयाची प्रशासनाने सुध्दा अंमलबजावणी केली पाहिजे. प्रशासनाकडे सध्यस्थितीत नियम, कायदा पोलिस फोर्स आहेत. अशी कार्यवाही तात्काळ का केली जात नाही. प्रशासनास तसे पॉवर्स नाही काय तारीख निश्चित करावी व महानगरपालिकाची मुदत संपलेल्या सर्व दुकाने ताब्यात घ्यावी. यामुळे उत्पन्न वाटेल व विकास कामे होतील.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** टेंडर काढून ज्यांनी पैसे भरले व उर्वरीत रक्कम मुदतीत न भरल्यामुळे पाहिले टेंडर रद्द करुन पुन्हा नविन टेंडर काढुन कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : जे रक्कम भरण्यास तयार असतील त्यांना दयावे व १५ दिवसांत अंतिम करावे.

**सौ. विजया रहाटकर :** पीरबाजार संबंधी उपस्थित केलेल्या प्रशासनाचा खुलासा दयावा. (१) ट्रफिकची काय व्यवस्था करण्यात येईल (२) बाजारासाठी नाल्याजवळ एक जागा निश्चित करण्यात आली होती. माहिती मिळाल्यावर १६ लोक मालकी हक्क म्हणुन दाखवू लागले. त्या जागेचे काय झाले याचा खुलासा करावा. तत्कालिन आयुक्त यांनी यासंबंधी पाठपुरावा केला होता परंतु त्यांची बदली मुळे पुन्हा हे काम रेगांळले, नविन आयुक्त जहागीरदार साहेब आले त्यांना यासंबंधी माहिती दिली. प्रत्यक्ष पाहणी करुन कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले गेले परंतु अदयाप पुढील काही कार्यवाही झाली नाही. योग्य खुलासा करावा.

**मा. सभापती** : उपअभियंता (नगररचना) श्री. खन्ना यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (नगररचना) :** पुढील बैठकीत यासंबंधी सविस्तर माहिती देण्यात येईल.

**सौ. रहाटकर विजया :** प्रत्येक बैठकीत प्रश्न उपस्थित केल्यावर पुढील बैठकीत खुलासा देण्यात येईल असे उत्तर अधिकाऱ्यांकडुन मिळते हे बरोबर नाही.

**उपआयुक्त (प्र) :** कायदयाच्या तरतूदी नुसार सुचना केल्यानंतर, ७ दिवसांच्या आत उत्तर देणे जरुरी आहे. स. सदस्य सभागृहात नेमका कोणता प्रश्न उपस्थित करतील व त्याची माहिती तात्काळ मिळणे अशक्य आहे. कारण चुकीची माहिती प्रशासन देऊ शकत नाही.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी पुढील बैठकीत सविस्तर माहिती सादर करावी.

**श्री. जगदीश सिध्द :** मागील बैठकीत होर्डींग बाबत माहिती मागविली होती होल्डींग बाबत ५ लाखाचा घोटाळा माजी उपआयुकत यांनी केल्याची बातमी कालच्या सामना पेपर मध्ये प्रसिध्द झाली. यानुसार माहिती घेतली असता उपअभियंता (पापू) श्री. रामटेके यांचे भाऊ यांना होर्डींगचे विजन पब्लीसीटी यांचे बरोबर ५ वर्षांचा करारनामा माजी उपआयुक्त यांनी केलेला आहे. जर करारनामा केलेला असेल तो रद्द करावा व नवीन टेंडर कढून कार्यवाही करावी. शहरात दोन प्रकारचे होल्डींग रेटस लावले जातात. सिडकोमध्ये १३.५० चौ. फू. प्रमाणे व महानगरपालिका जुन्या शहरात १.२९ रु. प्रमाणे आकारला जातो.

**मालमत्ता अधिकारी :** सिडकोचे होर्डींग बोर्डचे जे रेटस आहे त्यांची निविदा पध्दती त्यानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन मागील रेटमध्ये ३ पट वाढ करुन पुर्वी ज्यांना देण्यात आलेले आहेत.

त्यांनाच दयावा अशी रुलींग झाली. निर्णय झाला नसुन निर्णयाची कार्यवाही चालू आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** दबाव आणून ५ वर्षाचा करार करण्यात आला सदर करारनामा उपअभियंता (पापू) रामटेके यांचे भाऊ यांना दिला नाममात्र भाडयाने दिले वपैसेही भरले नाही. त्यांना पैसे भरण्याच्या सुचना दिल्या रक्कम भरलेला नाही. अशी माहिती मिळाली. त्यांचेकडे अगोदरचे रक्कम बाकी असून, अशांना हा ठेका देणे योग्य होणार नाही रद्द करुन नविन टेंडर काढावे तशी रुलींग देण्यात यावी.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** होर्डींगच्या रेट बाबत सर्वसाधारण सभेत चर्चा झाली होती. रेट वाढवावे; तीन पट करावे असे स. सदस्य यांनी सुचना केल्यानुसार मा. महापौर यांचे रुलींग झाले. इतिवृत्तांत आलेले असून, मागील सर्वसाधारण सभेत सदर इतिवृत्त कायम करण्यासाठी होते परंतु सभा तहकूब करण्यात आल्याने निर्णय झालेला नाही. येत्या सर्वसाधारण सभेत इतिवृत्त मंजूर होईल त्यानुसार कार्यवाही करावी.

**मा.सभापती** : सर्वसाधारण सभेत चर्चा झाली आहे. तहकूब सभा पूर्ण झाली नाही. त्यात इतिवृत्त कायम करण्याचा विषय आहे. इतिवृत्त कायम झाल्यावर निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. जगदीश सिध्द :** पहिला करारनामा संपलेला आहे. पूर्वीचे सर्व होर्डींग काढण्यात यावे. प्रशासकीय अधिकारी यांना तसे आदेश दयावेत. गिरीष रामटेके विजन पब्लीसिटी यांना ठेका दिला तो रद्द करावा.

**श्री. भरत लकडे :** माजी उपआयुक्त यांचा घोटाळा वृत्तपत्रात छापून आले त्याचा खुलासा करावा.

**श्री. जगदीश सिध्द :** मागील करार केव्हा समाप्त झाला त्याचा खुलास करावा.

**मा. सभापती** : मालमत्त अधिकारी यांनी पुढील बैठकीत यासंबंधी सविस्तर माहिती दयावी.

**श्री. जगदीश सिध्द :** दारुवर किती जकात येते मागील बैठकीत माहिती विचारली होती. अधिक्षक दारुबंदी, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाकडून माहिती घेतली का? खुलासा करावा.

**जकात अधिक्षक** : शहरात किती दारु येते या संदर्भात माहिती घेण्यासाठी दिनांक ०८-११-२००० रोजी अधिक्षक, दारुबंध्दी राज्य उत्पादन शुल्क कार्यालयास पत्र पाठविले त्यानुसार सदर कार्यालयाकडून दिनांक ०२-१२-२००० रोजी पत्र प्राप्त झाले त्यांनी आपल्या विभागाचे कर्मचारी माहिती घेण्यासाठी पाठवावे असे कळविले. या विभागातर्फे सहाय्यक जकात अधिक्षक तसेच क. लिपिक बेग यांना माहिती घेण्याबाबतचे आदेशीत केलेले आहे.

**श्री. जबिंदा दलबीरसिंग :** दारुबंदी कार्यालयास पत्र दिले. कंपनीत किती दारु येते त्याची माहिती घ्यावायास पाहीजे. जे पत्र पाठविले त्याची प्रत दाखवावी. होलसेलचा साठा गोडावून मध्ये राहतो. वाळूज पंढरपूर येथे साठयाच्या ठिकाणी त्यांचा इन्सपेक्टर राहतो.

**जकात अधिक्षक :** संबंधित कार्यालयास पत्र दिले आहे. कंपनीतून दारु गोडाऊनमध्ये जाते शहराच्या बाहेर जे गोडावून तेथे अधिक्षक दारुबंदी कार्यालयाचे इन्सपेक्टर दर्जाचे कर्मचारी तपासणीसाठी असतात. म्हणून या कार्यालयात संपूर्ण माहिती आपणांस मिळू शकेल.

**श्री. जगदीश सिध्द :** पत्र पाठविल्याची प्रत दाखवावी तसेच विदयुत विभागात शहरातील लोक संख्येचा रस्त्याची लांबी याचा विचार करता या विभागात किती कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. १०-१५ किती मीटर शहराची लांबी आहे. किती कर्मचारी असण गरजेचे आहे. सध्या किती कर्मचारी कार्यरत आहे.

**मा. सभापती** : जकात अधिक्षक यांनी संबंधित कार्यालयाकडे पत्र पाठविल्याची प्रत स. सदस्य यांना दाखवावी तसेच उपअभियंता (विदयुत) यांनी किती कर्मचाऱ्यांची विदयुत विभागास आवश्यकता आहे. याची माहिती दयावी.

**उपअभियंता (विदयुत) :** या विभागास सध्या दोन उपअभियंता व ३ कनिष्ठ अभियंता काम करत आहे. कमीत कमी प्रत्येक झोनला १ कनिष्ठ अभियंत्याची आवश्यकता आहे. तसेच १ सुपरवायझर देण्यात यावे.

**मा. सभापती** : विदयुत विभागात कर्मचारी देण्याबाबत सविस्तर प्रस्ताव प्रशासनाच्या माध्यमातून मंजुरीसाठी आणण्यात यावा. त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**श्री. कैसर खान :** नविन इमारतींच्या बाजुला असलेल्या हॉटेल मालकास जागा देण्याबाबतचा विनंती अर्जानुसार कार्यवाही व्हावी. (अर्जाची प्रत सादर करतात.)

**मा. सभापती** : नगर सचिव यांनी अर्जाची माहिती वाचून दाखवावी.

**नगरसचिव** : (अर्जातील माहिती वाचून दाखवितात)

**श्री. मधुकर सावंत :** महानगरपालिका आवारात किती हॉटेलस् आहेत व भाडे किती घेतले जाते खुलासा करावा.

**मालमत्ता अधिकारी :** दोन कॅन्टीन आहेत मुख्य कार्यालयाच्या बाजूला एक व नविन इमारतीचे बांधकाम चालू आहे त्या इमारतीला लगत एक कॅन्टीन आहे. नियमाप्रमाणे भाडे आकारले जाते.

**श्री. मधुकर सावंत :** झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी जागा दिली सध्या तेथे झुणका भाकर देण्यात येत नाही असे वाटते. ती जागा ताब्यात घेऊ शकत नाही काय?

**मालमत्ता अधिकारी :** न्यायालयाच आदेश झालेले असल्याने सध्या झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी दिलेल्या जागा ताब्यात घेता येणार नाही.

**मा. सभापती** : नविन इमारतींच्या बाजूला असलेल्या हॉटेल मालकास त्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांना जागा देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व प्रशासनाच्या वतीने तात्काळ जागा देण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

**श्री. मोतीलाल जगताप :** मुकूंदवाडी येथील महानगरपालिकेच्या दवाखान्यात डॉक्टर पेशंटला हात न लावता व तपासणी न करता व एक हात स्वतःच्या तोंडावर ठेवून पेशंटने तोंडी सांगितल्यानुसार गोळया व इतर औषधी देण्यात येते. त्यामुळे जनतेच्या जीवीतास धोका होऊ शकतो सदर दवाखान्यात असलेल्या डॉक्टरांना सक्त ताकीद देऊन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** मुकूंदवाडी येथील दवाखान्यात डॉ. व्यवहारे असून, स. सदस्यांनी केलेल्या सुचनेनुसार त्यांना ताकीद देऊन कारवाई करण्यात येईल.

या बरोबर " जण गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/- स्वाक्षरित/-

नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक १६-०१-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दि. १६-०२-२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती श्री. अशरफ युनुस मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२) श्री. कावडे साहेब राणुबा
३) श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान
४) सौ. खरात कुसुमबाई दौलत
५) श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
६) श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल
७) श्री. लकडे भरत श्रीपती
८) श्री. वाघ भाऊसाहेब बाबुलाल
९) सौ. रहाटकर विजया किशोर
१०) श्री. सलीम पटेल शमशेर पटेल
११) श्री. सावंत मधुकर दामोधर
१२) श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**संवाद :**

**श्री. अविनाश कुमावत :** सन्माननीय सदस्य श्री. सुरगोणीवार यांच्या मातोश्री कै. यल्लम्मा सुरगोणीवार यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**मा. सभापती :** दोन मिनिटे सर्वांनी उभे राहुन स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करावी.
(याच वेळी सभागृहातर्फे सन्माननीय सदस्य श्री. सुरगोणीवार यांच्या मातोश्री. कै. यल्लम्मा सुरगोणीवार यांचे निधन झाल्याने दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**श्री. मधुकर सावंत :** मनपाचे सन्माननीय सदस्य श्री. तांबे हे त्यांचे योग्य मागणीसाठी विद्यापीठ गेटसमोर उपोषणास बसलेले आहेत. त्यांचे मत जाणून घेऊन त्यांच्या भावना शासनास कळवाव्यात.

**श्री. अविनाश कुमावत :** सभागृहाच्या वतीने मा. सभापती यांनी मुख्यमंत्र्यांशी भेट घेऊन परवानगी मिळवावी. यासंबंधी आवश्यक ते पगटन करण्यात यावे. उपोषणाच्या ठिकाणी स्वत: जावे व भेट घ्यावी.

**सौ. विजया रहाटकर :** मी सहमत आहे. विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले. त्यांचा पुतळा असणे गरजेचे आहे व तीच मागणी सन्माननीय सदस्य श्री. तांबे यांची आहे. महानगर पालिका प्रयत्नशील आहे ही जमेची बाजू आहे. सध्या म्हणावे तसे यश प्राप्त झालेले नाही. स.सदस्य श्री. तांबे यांची भावना लक्षात घेता मा. सभापती मा. आयुक्त व आपण सर्व सदस्य त्यांची भेट घेऊन सभागृहाची सहमती दर्शवावी. आमरण उपोषणास बसले.

वैयक्तिक महानगरपालिकेला परवानगी मिळत नाही म्हणून भेट द्यावी. पाठींबा द्यावा. नगरसेवकांच्या भावना आम जनतेस व शासनास कळवावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता माझ्यासह स्थायी समितीचे सर्व सदस्य श्री. गणेश तांबे याची भेट घेऊन त्यांच्या भावना जाणून घेऊ व त्यांना तशी सहमती दर्शविण्यात येईल. व त्यांच्या भावना वरीष्ठांना कळवण्यात येतील. प्रशासनाने देखील मदतीला यावे.

**विषय क्र. ७३/१ :**

दिनांक ७-१२-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अविनाश कुमावत :** पान क्र. १४ वरील मागील बैठकीत स. सदस्य श्री. सिध्द यांनी प्रश्न उपस्थित करुन कंपन्यात किती दारु येते त्याची माहिती मागितली होती व तसे पत्र प्रशासनाने दारुबंदी कार्यालयास पाठवले आहे व त्याची माहिती आलेली आहे काय? खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त :** प्रयत्न चालु आहे. माहिती येताच कार्यवाही करु.

**श्री. जगदीश सिध्द :** जकात अधिक्षक यांनी खुलासा केला होता की, दारुबंदी कार्यालयास पत्र पाठवले. पाठवलेल्या पत्राची छायाप्रतीची मागणी सुध्दा केली होती व सभापती यांनी सुध्दा आदेश देऊन स. सदस्यांना प्रत द्यावी अशी सुचना केली होती. अद्याप जकात अधिक्षक यांनी त्या पत्राची प्रत मला दिलेली नाही. एक महिन्याच्या वर कालावधी उलटला का प्रत देण्यात आली नाही.

**मा. सभापती :** दारुबंदी कार्यालयाकडे पाठवलेल्या पत्राची छायाप्रत मी सन्माननीय सदस्यांना द्यावयांस सांगितले. का देण्यात आली नाही. खुलासा द्यावा.

**श्री. मधुकर सावंत :** मागील बैठक होऊन दीड महिन्याचा कालावधी उलटत आहे. अद्याप पर्यंत स. सदस्यांना प्रत का दिली गेली नाही.

**उप आयुक्त (प्र.) :** सन्माननीय सदस्य यांना पत्राची प्रत देण्यात येईल.

**जकात अधिक्षक :** दारुबंदी कार्यालयाकडे पाठवलेल्या पत्राची प्रत स. सदस्यांना देण्यांत येईल.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्य यांना एक प्रत देऊन त्याची एक प्रत मला सुध्दा देण्यात यावी.

**श्री. अविनाथ कुमावत :** पान क्र. ११ व १२ वर सन्माननीय सदस्य श्री. तुळशीबागवाले यांनी प्रश्न उपस्थित करुन मनपाचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने शहागंज येथील दुकानाचा करार संपलेला असून दुकाने आपल्या ताब्यात घ्यावी. जाधववाडी येथे नविन बाजारपेठ झालेली आहे. ज्यांना दुकाने दिली त्यांनी जाधववाडी येथे दुकाने घेतलेली आहे. त्यामुळे त्यांना नोटीस देण्याची गरज नाही. करार संपलेला आहे. दुकाने खाली करुन घ्यावी. जागा आपल्या ताब्यात घेऊन उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने काय करता येईल ते करावे. सध्या तेथील दुकाने/जागा कुणाच्या ताब्यात आहेत. मी सभापती असतांना रुलिंग दिलेली आहे.

**मालमत्ता अधिकारी :** पुर्वीची वाटप केलेली दुकाने संबंधितांच्याच ताब्यात असून दुकाने (जागा) आपल्या ताब्यात घेण्यात येतील त्या जागेवर नविन काय प्रस्तावित करावयाचे याची कार्यवाही नगर रचना विभागा मार्फत होईल. मागील भाडे

व चालू वर्षाचे सर्व थकीत भाडे ३१ मार्च २००१ पर्यंत वसून करण्याबाबत कार्यवाही करणार आहोत.

**श्री. अविनाश कुमावत :** काही दुकान धारकांनी दुसऱ्यांना दुकाने विक्री केली व काहींनी भाडयाने दिली असे ऐकावयास येते. त्यासाठी खाली करुन घ्यावी. मनपाच्या ताब्यात घ्यावी. असे होत असेल तर योग्य नाही. तात्काळ कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** संबंधीत दुकानांची जागा तपासणी करुन मनपाच्या ताब्यात घेण्याबाबत नियमाने त्वरीत कार्यवाही व्हावी.

**सौ. विजया रहाटकर :** मागील बैठकीत पीरबाजार येथील भाजीपाला बाजार विक्रेत्यांना सोयी सुविधा व बाजारासाठी जागा उपलब्ध करण्याचा माझा प्रश्न होता व नाल्यावरची जागा, भूमीपुजन झाले. पुढे काय झाले माहिती मिळाली नाही. तसेच पीरबाजार येथील वाहतुकीचे काय नियोजन केले याची माहिती मिळावी.

**मा. सभापती :** नगर रचना अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (नगर रचना) :** पीरबाजार येथील बाजार भरण्यासाठी खाजगी जागे संदर्भात या संबंधीची संचिका या विभागामार्फत चालत नाही व या संबंधी सन्माननीय सदस्य यांचेशी मी चर्चाही केली आहे. मालमत्ता विभागाकडे पत्र पाठवून तशी माहिती घेता येईल. दुसरी एका ठिकाणी जागा आहे व ती जागा घेण्यासाठी संचिका तयार होऊन मा. आयुक्तांकडे मंजुरीसाठी गेलेली आहे. बाजुलाच २४ मीटर मीटर रस्ता सध्या बंद असून मनपाची ती जागा आहे. तुर्त ती जागा बाजारासाठी वापरता येईल. असे सन्माननीय सदस्यांशी चर्चाही केलेली आहे.

**सौ. विजया रहाटकर :** बाजाराच्या दिवशी वाहन रहदारीमुळे खुप त्रास होतो. त्यासाठी काय उपाय योजना करणार? वाहतुक विभागास सांगणार होतो. काय व्यवस्था केली. प्रशासनामार्फत पत्र द्यावे.

**श्री. अविनाथ कुमावत :** या अगोदर पुलाचे काम चालु होते व त्यामुळे सर्वच वाहने इतरत्र रस्त्याने जात असत. त्यामुळे रहदारी जास्त असेल. आता रेल्वेस्टेशन पुलावरुन वाहने जाणे-येणे सुरु झालेले आहे.

**मालमत्ता अधिकारी :** पीरबाजार येथे एकमार्गी वाहुतक केली आहे. मुथीयान कॉर्नरपासून इकडे रहदारी बंद आहे. भाजीवाली बाईचा पुतळा व दर्गाह रोड एकमार्गी वाहतुक केली आहे.

**सौ. विजया रहाटकर :** पुतळयापासून लगतच्या रस्त्यावर १ वर्षापासून बाजार भरतो व चौकातून ज्योतीनगर, दशमेशनगर कडुन येणारी सर्व वाहने बाजार भरतो त्या रस्त्याने येतात व खुप गर्दी होते व लोकांना जाण्या-येणाऱ्यास त्रास होतो.

**मा. सभापती :** उद्या सकाळी मालमत्ता अधिकारी, नगर रचनाकार व सन्माननीय सदस्या यांनी पाहणी करुन मार्ग काढावा.

**सौ. विजया रहाटकर :** या वर्षातील वसुलीचा शेवटचा मार्च महिना जवळ आलेला असून नळ टॅक्स, मालमत्ता टॅक्स व इतर टॅक्स वसूल करण्याची मोहिम सध्या सुरु आहे. जो टॅक्स लावला जातो व ज्यांनी टॅक्स लवकर भरणा केला त्यांना सवलत देण्यात येते. जी सवलत देण्यात येते ती कमी टक्केवारी नुसार देण्यात येते. शहरातील बरेच भाग असे आहेत की, तेथील नागरिक पुर्णपणे टॅक्स भरतात. जे वेळेवर भरणा करणार त्यांना आणखी काय

सवलत देणार या संबंधी प्रशासनाने काही विचार केलेला आहे. काय? कारण कारण सवलत म्हणुन २%,८% रक्कम कमी करुन चालणार नाही. यापेक्षा जास्त सवलत द्यावयास पाहिजे. जे वेळवर टॅक्स भरतात त्यांना काहीच फायदा होत नाही. जे टॅक्स भरत नाही त्यांना सुध्दा सुविधा मिळत आहे. विकास कामांचा फायदा होत आहे. यामुळे जनतेच्या मनात वेगळया प्रकारची भावना निर्माण होत आहे. व आता यापुढील या वर्षाचे वसूलीसाठी दिवस कमी रहिलेले. असून नागरिक टॅक्स भरणार नाही याची दक्षता घ्यावी व जे वेळेवर टॅक्स भरतात त्यांचेसाठी प्रशासन काय करु शकते खुलासा द्यावा. जास्त टक्केवारीनुसार सवलत देण्यांत यावी. अशी आग्रहाची मागणी आहे. कोणत्या वार्डातून जास्त वसूली होते त्यांची सविस्तर माहिती मिळावयास पाहिजे. सामुहीक स्वरुपात त्यांना वेगळे बजेट द्यावे. झोनवाईज बजेट करता येईल. का?

**श्री. अविनाश कुमावत :** वार्ड वाईज वसुलीची माहिती द्यावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यासंबंधी सविस्तर खुलासा करतील.

**मा. आयुक्त :** जे करदाते वेळेवर कर भरतात त्यांचे कौतुक केलेच पाहिजे व ते कोणत्या स्वरुपात करावयाचे हे सर्वसाधारण सभेपुढे आले तर बरे माझे असे मत आहे की, हा प्रश्न व्यापक स्वरुपाचा असून सर्वसाधारण सभेत यावयास पाहिजे. वार्डवाईज कर वसूली करण्याच्या, होण्याच्या स्पर्धा होणे योग्य आहे व ज्या वार्डातुन सन्माननीय सदस्यांमार्फत प्रयत्न होऊन ८०% वर वसुली होत असेल तर संबंधीत नगरसेवकांचा सत्कार करावयास पाहिजे. स. सदस्यांचे सहकार्य जरुरी आहे. सामुहीक योजना आपण केली तर वसुली होईल. वसुली संदर्भात मी पुन्हा आता बैठक घेण्यास सुरुवात केलेली आहे. एक बैठक मी मागील रविवारी घेतलेली होती. जवळपास १५ कोटी रुपयांची मालमत्ता कराची थकबाकी आहे. मागे सिडकोत मी असतांना डी.पी.सी.(डिले पेमेंट चार्जेस) योजना आखणी केली होती. विशिष्ट तारखेपर्यंत रक्कम भरतील त्यांना काही सुट आपणांस देता येईल काय? कारण १५ कोटी थकबाकी म्हणजे मोठी रक्कम देता करंट बिलाचा प्रश्न वेगळा आणि करंट वसुली लोक भरतील व कर्मचाऱ्यांनी सुध्दा ती वसुली केली पाहिजे. आपणांस एकमत करुन जे करवाते अमुक तारखेपर्यंत कर भरतील त्यांचेसाठी काय सवलत द्यावयाची हे ठरवावे लागेल. आता सध्या २% ३% आहे. ते फिक्स नाही. ठरवावे लागेल. कशी कोणती सवलत द्यावयाची यासाठी वृत्तपत्रात आपणांस जाहीर प्रगटन द्यावे लागेल. आम्ही सिडकोमध्ये असतांना डिले पेमेंट चार्जेस (डी.पी.सी.) यासाठी बोडाकडे जाऊन योजनेस मंजुरी घेण्यात आली होती व ज्यांनी एखाद्या विशिष्ट तारखेपर्यंत थकीत रक्कम भरती तर त्यांना सवलत देण्यात येत होती. याचा विचार करवा नगरसेवक नगरसेविका यांचे कौतुक, सन्मान व ज्या वार्डातून किमान ८०% वर वसुली होईल व त्याची एक पातळी ठरवावी की जेणे करुन आपणास त्या वार्डातील जनतेस सुविधा सवलत देता येईल. आता वसुलीसाठी वेळ कमी आहे. फक्त अडीच महिन्याचाच कालावधी बाकी आहे. निश्चित निर्णय घ्यावा लागेल. व घ्यावयाचा असेलच तर सर्वसाधारण सभेत हा विषय उपस्थित करावा. महापौर, सभापती यांचेशी चर्चा करावी. आपली सुचना चांगली असून अशाच विद्यायक कल्पना आल्या तर चांगले

आहे. परंतु वसुतीही त्या प्रमाणेच व्हावयास पाहिजे. जनतेनी नियमाचे पालन केले पाहिजे. त्यामुळे बजेटचा प्रश्न योग्य प्रकारे आपणांस हाताळता येईल.

**श्री. साहेबराव कावडे :** मागे एकदा पत्र देऊन सुचना केली होती. प्रत्येक वार्डात किती प्रमाणात टॅक्स वसूली होते व त्यासंबंधी संबंधित नगरसेवकांना कळवावे. अद्याप माहिती दिलेली नाही.

**मा. आयुक्त :** झोन वाईज किती टॅक्स वसूल होतो याची माहिती तात्काळ मिळेल परंतु वार्डावाईज वसूली किती होते याची माहिती काढण्यास वेळ लागेल.

**श्री. साहेबराव कावडे :** माझ्या वार्डात जवळपास ८५-९०% टॅक्स वसूली होते. त्याच प्रमाणात कर भरण्याऱ्यांना सवलती सुध्दा मिळाल्या पाहिजेत व अशा वार्डात विकास कामे पण व्हावयास पाहिजेत.

**श्री. अविनाश कुमावत :** झोन वाईज माहिती मिळू शकते तर वार्ड वाईज सुध्दा देण्यास हरकत नाही. प्रत्येक वार्डात किती टक्के वसूली झाली हे दिसून येईल.

**श्री. भरत लकडे :** झोनवाईज वसूली माहिती दिल्यास कोणत्या वार्डात किती वसूली झाली ते समजून येत नाही. त्यासाठी वार्डवाईज वसूलीचा तपशील द्यावा.

**सौ. विजया रहाटकर :** आताच मा. आयुक्त यांनी सांगितले वसूलीसाठी सन्माननीय सदस्यांचा हातभार लाभला पाहिजे व त्यांचे सत्कार करु. फायदा वैयक्तीक स्वरुपाचा नाही. सामुहीक स्वरुपात एखादे काम बजेटमध्ये सामील करावे. सदस्यांचे सहकार्य तर राहीलच परंतु ज्या वार्डात वसूली चांगली करुन दिली तर काय कन्शेशन देणार हा माझा प्रश्न होता.

**मा. आयुक्त :** एक महिन्यात याचा प्रयत्न करतो.

**श्री. मोतीलाल जगताप :** आताच टॅक्स वसूली जास्तीत जास्त व्हावी म्हणुन चर्चा झाली. नागरिकांनी जास्तीत जास्त प्रमाणात टॅक्स भरावा यास सर्वाचेच सहमत आहे. आपल्याकडे भरत जैस्वाल नावाचे कर्मचारी इमारत निरीक्षक म्हणुन काम करतात. आजही कार्यरत आहे. आजपर्यंत जवळपास २-३ वेळेस निलंबीत झालेले आहे. त्यांचे सेवा कालावधीत त्यांनी औरंगाबाद शहराच्या चारही बाजूने त्यांचे नातेवाईकांच्या नांवे कोटयावधीची मालमत्ता जमा केली. तो नातेवाईकांची आहे माझी नाही असे म्हणतो. याची चौकशी व्हावयास पाहिजे. कोटयावधी रुपयांची मालमत्ता जमा केली. ज्या ज्या ठिकाणी मालमत्ता व वाद निर्माण झाल्यास भरत जैस्वालच पुढे येतात. जर त्यांची मालमत्ता नसेल तर पुढे येण्याचे कारण काय याची मनपा प्रशासनातर्फे चौकशी व्हावी. शहरामध्ये मुकुंदवाडीला १००X१०० चे मिळकत असून १८ खोल्या आहेत. मुकुंदवाडीला मुख्य बांधकाम, त्यांच्या १८ गिरण्या आहेत. इतर बरेच व्यवसाय चालू आहेत. या अगोदर एका प्रकरणात श्री. पानझडे प्रशासकीय अधिकारी यांना मी पत्र देऊन अनाधिकृत बांधकाम रोखण्यासंबंधी सुचना केली असता तो भाग सिडकोमध्ये येतो असे उत्तर अधिकाऱ्यांनी दिले. सिडकोमध्ये येत असेल तर मनपाने ना हरकत प्रमाणपत्र चालू केले. दि. १९-४-९३ ला या जागेसंबंधीचे प्रकरण न्यायालयात चालू केले. जिल्हा कोर्टाने संबंधीत व्यक्ती विरुध्द निकाल दिला असतांना परवानगी देण्यात येते. त्याचे कमाईने मालमत्ता घेऊन इतरांच्या नांवावर करुन दिल्या व या सर्वच मालमत्तेला लावलेला टॅक्स वसूल होत नाही. एखाद्या ठिकाणी २५ खोल्या असतील तेथे दोन खोल्या दाखवून तेवढाच टॅक्स आकारला जातो. यामुळे मनपाचे नुकसान होत असून

पदाचा गैरवापर करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करुन मालमत्ता जमवलेली आहे. हे प्रकरण तात्काळ हाताळावे. आमच्याकडून काय मदत पाहिजे ती मिळेल.

माझ्याकडे एक निवेदन तयार केलेले आहे त्यात त्यांच्या शहरात कुठे व किती मालमत्ता आहे हे सविस्तर दिले आहे. (पत्राची प्रत मा. आयुक्तांकडे सादर करतात.) त्यांचे सर्वच ठिकाणच्या मालमत्तेची चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी आहे. त्यांची प्रॉपर्टी किती आहे हे नाही. पण मालमत्ता कर आकारला जातो किंवा नाही.

**मा.सभापती :** या प्रकरणी मा. आयुक्त यांनी सखोल चौकशी करुन कार्यवाही करावी.

**श्री. नारायण सुरगोणीवार :** सिडको भागात सिडकोने २०x३० च्या घराना टॅक्स आकारलेले आहे. शहरात गोल्डी नविन सिनेमागृह झालेले असून किती टॅक्स आकारला जातो. शासन नियमानुसार टॅक्स आकारला जातो का?

**मा. सभापती :** सिनेमा साठी टॅक्स लावण्याची पध्दती काय आहे. त्याचा खुलासा द्यावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी :** जे जुने चित्रपटगृह आहे व त्यावेळचे नियमानुसार भोगवटा तत्वावर आकरणी केली जात असे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी घेऊन ३०% ४०% टॅक्स आकारला जातो व गोल्डी सिनेमागृहाची कर वसूलीची माहिती निश्चित किती झाली, तुर्त सांगता येणार नाही.

**श्री. मधुकर सावंत :** माझ्या वार्डात एका खुल्या जागेवर १५४०० चौरस फुटाचे जागेवर बांधकाम झाले. २७६/- रुपये टॅक्स आकारला गेला. (टॅक्स आकारणीची प्रत मा. आयुक्तांकडे देतात)

**मा. आयुक्त :** या संबंधीची चौकशी करण्यात येईल.

**मा. सभापती :** मा. आयुक्त यांनी या संदर्भात चौकशी करावी.

**श्री. नारायण सुरगोणीवार :** सिडकोतील म्हाडा कॉलनी मनपा अंगर्तत येते व सिडकोने या भागात विकास कामे करण्यासाठी मनपास ५० लक्ष रुपये दिलेले आहे. व म्हणाव्या तशा सुविधा देण्यात येत नाही. यासंबंधी ८ महिन्यापासून बोलतो. दि. २४-११-२००० रोजी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यातच आयुक्तांच्या नियमित होणाऱ्या बदल्यामुळे कार्यवाही होत नाही.

मालमत्ता कर भरण्यास तेथील लोक तयार असून तशा सुविधा ही दिल्या गेल्या पाहिजे.

**मा. आयुक्त :** तेथील जनतेनी वेळेवर टॅक्स भरणा केला पाहिजे. त्यानुसार आपणांस सुविधा देता येईल. ३१ मार्चनतर टॅक्स वसूल करुन द्यावा. १ एप्रिलला सर्व सुविधा देण्यात येतील. मध्यंतरी सन्माननीय सदस्या सौ. कुलकर्णी हया सुध्दा माझ्याकडे आलेल्या होत्या. त्यांनी त्यांच्या प्रभागातील नागरिकांची बैठक घेतली व आपले ही अधिकारी होते व कर भरण्यासाठी विनंती केली. समजावून सांगितले अशाच प्रकारे आपण सुध्दा नागरिकांना बोलवून तसे वातावरण निर्माण करुन सभा घ्यावी अधिकारी येतील. एक महिन्याच्या आत कर भरावा संपुर्ण सुविधा देण्यात येतील.

**श्री. नारायण सुरगोणीवार :** वार्डात शॉपींग सेंटर करण्याचा निर्णय घेतलेला होता. काम सुरु झालेले नाही. ड्रेनेजची कामे झाली नाहीत. तसेच गटार नालीची कामे सुध्दा सुरु झालेली नाही.

**मा. आयुक्त :** विकास कामांबाबतच्या जवळपास १००६ कामाच्या २३ कोटी रुपयांच्या संचिका मंजुर केलेल्या आहेत. स्पील ओव्हरची २१ कोटीची कामे आहेत.

त्यात काही कामाच्या संचिका नसतील आपण सर्वांनी मला असे सहकार्य करावे की, संपुर्ण टॅक्स वसूल व्हावा त्यानुसार विकास कामे करता येतील.

**श्री. साहेबराव कावडे :** वसूली करण्यासाठी कर्मचारी कमी होत असेल तर देण्यात यावे. काही ठिकाणी ५-६ वर्षापासून तेच ते कर्मचारी वसूलीस आहेत. त्यांचेत बदल करुन जास्तीचे कर्मचारी नेमावे.

**मा. आयुक्त :** प्रत्येक झोनमध्ये ५-६ जास्तीच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. एकुण ५० कर्मचारी सर्व झोन मिळून दिलेले आहेत.

**श्री. मधुकर सावंत :** काही दैनिक वेतनावरील वर्ग-४ चे सफाई करणारे कर्मचारी कर वसूली करतांना आढळून येतात.

**उप अभियंता (स्लम) :** कर वसुली मोहिम साठी जे कर्मचारी दैनिक वेतनावर नेमलेले होते तेच कर्मचारी दोन वर्षापासून वसूली करतात. सफाई कामगार वसूलीसाठी नाहीत.

**ठराव :**

दिनांक ७-१२-२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ७४/२ :**

औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता महानगरपालिका मध्ये विकासाच्या कामांच्या व्यापामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. कामाचा वाढता व्याप लक्षात घेता विकासाच्या कामांना सत्वरतेने मंजुरी मिळणे व कामाचे व्यवस्थित नियोजन करणे क्रमप्राप्त ठरले. सद्य:स्थितीत रुपये ३०००/- व रु. ४०००/- वरील कामाचे अंदाजपत्रक मंजुरीच्या संचिका कार्यकारी अभियंता शहर अभियंता व अतिरिक्त शहर अभियंता यांच्याकडून आयुक्तांकडे येतात व अशा संचिका मोठया प्रमाणावर विभागाकडून प्राप्त होतात.

कार्यकारी अभियंता, शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता यांचेकडील एकंदर कामाचे स्वरुप लक्षात घेता तसेच वाढता कामाचा व्याप लक्षात घेता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(१) नुसार आयुक्त, महानगरपालिका यांना प्राप्त अधिकारान्वये खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येतो.

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.), शहर अभियंता व अतिरिक्त शहर अभियंता या विभाग प्रमुखांना खालील प्रमाणे मासिक खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) | रुपये ०७.०० लाख |
| २. | शहर अभियंता | रुपये ०४.०० लाख |
| ३. | अतिरिक्त शहर अभियंता | रुपये ०४.०० लाख |

या आर्थिक मर्यादेमध्ये वरील विभाग प्रमुखांच्या अधिपत्याखालील उप विभागांची सर्व प्रकारची कामे अंतर्भुत असतील. या कामाचे नियोजन विभाग प्रमुखांनी करावे. या कामामध्ये दरपत्रकावरील (रेट-लिस्ट) कामाचाही समावेश असेल.

तसेच कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) शहर अभियंता अतिरिक्त शहर अभियंता यांना प्रत्येकी प्रति काम रुपये २५,०००/- आर्थिक मर्यादे पर्यंत अंदाजपत्रक मंजुर करणे, निविदा मंजुर करण्याचे अधिकार तसेच देयक मंजुरीचे अधिकार देणेची शिफारस करण्यात येते. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. सलीम पटेल :** प्रस्तावात दर्शविलेले अधिकार कोणत्या कामाचे आहेत, ते दर्शविलेले नाही. जूनेही कामे होतील काय? एम.ॲड आर. व स्वेच्छानिधीच्या कामाचा यात समावेश आहे का? का फक्त भांडवली कामे होतील.

**मा. आयुक्त :** हे अधिकार नविन कामाचे सुध्दा आहेत. एम.ॲड आर. व्यतिरिक्त कामे सुध्दा आहेत. २५ हजारापर्यंत अंदाजपत्रक निविदा मंजुर करणे व देयक सुध्दा मंजूर करण्याचे अधिकार येतात. २५ हजारापर्यंत एम.ॲड आर. असो किंवा नविन असो ती कामे केली जातील.

**श्री. सलीम पटेल श्री. अविनाश कुमावत :** २५ हजारापर्यंतचीच कामे करण्याचे पॉवर्स देणार काय? पत्र दिल्यानंतर स्वेच्छा निधीतून सुध्दा २५ हजार पर्यंत कामे होतील काय? आपण पत्र दिलेले आहे. काम होत असतील तर करावे.

**मा. आयुक्त :** स्वेच्छा निधी आपण वेगळा ठेवलेला आहे. यात स्वेच्छा निधीतून कामे होणार नाही. तसे आपण सजेशन द्यावे. त्याचा मी विचार करेन. हे जे अधिकार आहेत हे प्रचलित नियमांना धरुन आहे. त्या ठिकाणी बजेट प्रोव्हीजन असली पाहिजे. नॉर्मली असे पाहिले की, अधिकार दिल्यानंतर त्याची मर्यादा फार ओलांडली जाते. या अगोदर रेट-लिस्टची कामे मर्यादा सोडून वाढवून झाली. यामध्ये एक पैसा सुध्दा अधिकाऱ्यांना मर्यादा ओलाडण्या इतपत कामे करता येणार नाही. आणि ए-१ टेंडर वगैरे सर्व गोष्टींचा उहापोह केला पाहिजे. नियमाच्या अधिन राहूनच कामे केली पाहिजेत. काही वेळा काम महत्वाचे होते म्हणुन मी करुन टाकले असे होते. जेथे काम करणे आवश्यक आहे तेथे काम करण्यास आमची हरकत नाही. जर चुकीची कामे करण्यात आली तर अधिकार दिल्यानंतर ती संपुर्ण जबाबदारी त्यांचेवर राहिल. त्यांना नियमाचे उल्लंघन केल्यास त्यांना जबाबदार धरल्या जाईल.

**श्री. सलीम पटेल :** ए-१ टेंडर कशा पध्दतीने निघणार. संचिका लेखा विभागातून कार्यकारी अभियंता कडे जाणार काय? रेट-लिस्टची मर्यादा काय असणार?

**मा. आयुक्त :** लेखा विभागाकडूनच टेंडर काढले जातील. मनपा शहराचे क्षेत्रातील किती अंदाजपत्रक मंजुर झाले कितीचे निघालेले आहे. एक थर्ड पार्टी म्हणुन कंट्रोल राहील.

**श्री. सलीम पटेल :** तिन्ही अधिकाऱ्यांना ७ व ४-४ लाखापर्यंतचे अधिकार दिले. एका अधिकाऱ्यास ७ लाखाचे अधिकार दिले. शहर अभियंता यांना सुध्दा तेव्हढेच द्यावे.

**मा. आयुक्त :** आपण सजेशन दिले आहे त्याचा विचार करता येईल. सध्या देण्यांत आलेले अधिकार हे नियमाने बरोबर दिले आहे.

**मा. सभापती :** विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता महानगरपालिकेतील विकासाच्या कामाच्या व्यापामध्ये दिवसेंदिवस होत असलेली वाढ लक्षात घेऊन विकासाच्या कामांना सत्वरतेने मंजुरी मिळणे तसेच कामाचे व्यवस्थित नियोजन करणेच्या दृष्टीने मा. आयुक्तांनी प्रस्तावित केल्यानुसार कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) शहर अभियंता व अतिरिक्त शहर अभियंता या विभाग प्रमुखांना खालील प्रमाणे मासिक खर्चाची मर्यादा निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१. कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) रुपये ०७.०० लाख

२. शहर अभियंता रुपये ०४.०० लाख
३. अतिरिक्त शहर अभियंता रुपये ०४.०० लाख

तसेच कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता यांना प्रत्येकी प्रति काम रु. २५०००/- आर्थिक मर्यादे पर्यंत अंदाजपत्रक मंजुर करणे, निविदा मंजुर करण्याचे अधिकार तसेच देयक मंजुरीचे अधिकार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, मिलकॉर्नर ते बलवंत वाचनालय (महात्मा फुले चौक) पर्यंत रस्त्याचे पुनडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९९-२००० चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये १७,४४,०२७=०० चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "नविन डांबरी रस्ते" (शासकीय अनुदान १० कोटी सन २०००-२००१) या लेखा शिर्षाखाली करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलकॉर्नर ते बलवंत वाचनालय (महात्मा फुले चौक) पर्यंत रस्त्याचे पुनडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १७,४४,०२७=०० चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/४ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. नक्षत्रवाडी येथे दगडी गटारी व अर्धगोलाकार गटार बांधणे व स्लॅब टाकणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांचे वर्ष ९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये १३,९७,८८८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "शासकीय अनुदान २०००-२००१" या शिर्षकातून करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २४-१२-२००० ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले रु. १३,९७,८८८/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नक्षत्रवाडी येथे दगडी गटार व अर्थगोलाकार गटार बांधणे व स्लॅब टाकणे बाबतच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १३,९७,८८८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. भावसिंगपुरा, पेठेनगर अंतर्गत १५० मी.मी. व्यासाची व २२५ मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता रक्कम रुपये ११,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम भाडवली कामे २०००-२००१ या लेखाशिर्षातून प्रस्तावित केले आहे. सदरील कामास अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन १९९९-२०००

च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. मा. आयुक्तांनी दि. २९-१२-२००० अन्वये प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अविनाश कुमावत :** प्रस्तावात चिनी मातीची पाईपलाईन दाखवली ती टाकण्यास लवकर बदलावी लागेल. त्याऐवजी सिमेंट पाईप लाईन टाकावी ती पुन्हा बदलावी लागणार नाही.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** चिनी मातीची पाईपलाईन जलनि:सारणासाठी वापरली जाते. त्यात वाहून नेण्याची क्षमता जास्त आहे. एक फुटाच्या डायमीटर पर्यंत ही पाईपलाईन वापरली जाते व त्यापेक्षा जास्तीच्या साठी सिमेंट पाईप लाईन वापरली जाते.

**श्री. सलीम पटेल :** असे प्रस्तावात मंजुर केल्यानंतर २४ तासाच्या आत कामे सुरु झाली पाहिजे. नंतर बजेट संपणार आहे. कामे होणार नाही.

**मा. आयुक्त :** जास्तीचे जे अधिकार दिले अशा रकमेच्या सर्वच संचिका माझ्याकडे मंजुरीसाठी आहेत. लवकरच मंजुर होतील. कोणती विकास कामे थांबणार नाही याची दक्षता प्रशासन घेईल.

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. भावसिंगपुरा पेठेनगर अंतर्गत १५० मी.मी. व २२५ मी.मी. व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ११,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/६ :**

उप आयुक्त (प्र) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे सन्माननीय नगरसेवक स्वेच्छा निधीतून बेरोजगार युवक/युवतींसाठी चार चाकी वाहन चालक प्रशिक्षण व तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षण देण्याकरिता शासनमान्य संस्थांकडून निविदा मागविल्या होत्या.

खालील पाच संस्थानी विहित मुदतीत निविदा सादर केल्या.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | प्राप्त दर व प्रशिक्षण | |
|---|---|---|---|
| | | चार चाकी वाहन चालक प्रशिक्षण (एल.एम.व्ही.) | तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षण (ए.आर.) |
| १ | महाराट्र मोटार ड्रायव्हींग स्कुल, औरंगाबाद. | रु. २६००/- | रु. २०५०/- |
| २. | बॉम्बे मोटार ट्रेनिंग स्कुल, भडकलगेट, औरंगाबाद. | रु. २६००/- | रु. १७००/- |
| ३. | नोबल मोटार ड्रायव्हींग स्कुल, काला दरवाजा, औरंगाबाद. | रु. २६००/- | रु. २०५०/- |
| ४. | परफेक्ट मोटार ड्रायव्हींग स्कुल, सिल्कमील कॉ. रे.स्टेशन, औरंगाबाद. | रु. २६००/- | रु. २१५०/- |
| ५. | डिसेन्ट मोटार ड्रायव्हींग स्कुल, शहाबाजार, औरंगाबाद. | रु. २६००/- | रु. २१००/- |

चार चाकी वाहन चालक प्रशिक्षणाचे सर्वात कमी दर रु. २६००/- व तीन चाकी वाहन चालक दर रु. १७००/- प्राप्त झाले. दिनांक ६-१-२००१ रोजी ११.३० वाजता मुख्य लेखाधिकारी व प्रकल्प संचालक यांचे समक्ष वाटाघाटी होऊन चार चाकी वाहन चालक प्रशिक्षण दर प्रती प्रशिक्षणार्थी रु. १५००/- व तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षण दर प्रति

प्रशिक्षणार्थी रु. १०००/- करणेत आला सदरील वाटाघाटीत पाचही संस्थानी दर मान्य असल्याबाबत स्वाक्षऱ्या केल्यात रिक्षा चालक व चार चाकी वाहन चालक प्रशिक्षणासाठी नियमावली.

१) वरील संस्था शासन मान्य आहेत.

२) सदरील संस्थेकडे स्वत:च्या मालकीच्या रिक्षा-२ चार चाकी वाहन किमान ४ असणे आवश्यक आहे. निविदेत नमुद अटींची पुर्तता सदर संस्था करतात.

३) संस्थेकडे किमान ४ प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.

४) प्रतिदिन प्रति प्रशिक्षणार्थीस ७ कि.मी. अथवा ३० मिनिटे प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. प्रशिक्षण कालावधी एक महिना राहील.

५) प्रशिक्षण संपल्यानंतर संस्थेने स्वखर्चाने प्रशिक्षणार्थींना परवाना मिळवून देणे आवश्यक राहील.

६) प्रशिक्षण देते वेळी अपघात वा नुकसान झाल्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

७) परवाना झेरॉक्स प्रत देणे आवश्यक राहील. (देयक सोबत)

८) ज्या प्रशिक्षणार्थींना प्रकल्प विभागामार्फत पाठविण्यात येईल अशा लेखी आदेश धारकासच प्रशिक्षण देण्यात यावे.

९) मनपा आदेशापुर्वी प्रशिक्षण देण्यात येणार नाही. त्यासाठी मनपा जबाबदार राहणार नाही.

१०) निविदा भरण्याऱ्या पात्र व एकुण पाच एजन्सींना समान प्रशिक्षणार्थी पाठविण्यात येतील. त्यासाठी सन्माननीय नगरसेवकांकडुन दिनांक १४ जानेवारी २००१ पर्यंत प्रशिक्षणार्थीची यादी, पत्ता वय, शेक्षणिक पात्रता, जात इत्यादी तपशीलासह मागविण्यात येतील. सन्माननीय नगरसेवकांच्या सुचनेनुसार त्यांच्या प्रभागात प्रशिक्षणाची व्यवस्था करणे एजन्सीवर बंधनकारक राहील. उप आयुक्तांनी सर्व संस्थांना समान प्रशिक्षणार्थी मिळतील याची दक्षता घ्यावी. दर मान्य असल्याबाबत इच्छुक निविदा भरण्याऱ्या इच्छुक एजन्सीजनी रु. २०/- च्या बॉड पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. सन्माननीय नगरसेवकांनी गरीब असावेत. सन्माननीय नगरसेवक श्री. भाऊसाहेब वाघ यांनी दिनांक ३०-१२-२००० रोजी पत्र देऊन विनंती केली आहे की, सन्माननीय नगरसेवक यांनी शिफारस केलेल्या संस्थेकडे प्रशिक्षणार्थी पाठविण्यात यावेत.

यावर देखील निर्णय व्हावा.

सन्माननीय नगरसेवक यांनी कृपया वरील दरात रु. २५,०००/- च्या मर्यादेत प्रशिक्षणार्थींची नांवे (प्रकल्प विभागात) दारिद्रय निर्मुलन कक्षाकडे शिफारस करावी. तरी वरील नियम व वाटाघाटीत कमी केलेले दरास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अविनाश कुमावत :** प्रस्तावात नियमावलीत क्र.१० वर १४ जानेवारी २००१ तारीख दिलेली असून ती तारीख संपलेली आहे. तारीख वाढवून देण्यात यावी.

**मा. सभापती :** प्रशिक्षणार्थींची माहिती घेण्यासाठी १४ जानेवारी २००१ तारीख दिलेली असून ती संपलेली आहे. त्यामुळे मर्यादा वाढवून २५ जानेवारी २००१ पर्यंत माहिती देण्यात यावी. अशी दुरुस्ती करण्यात येते व प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन्माननीय नगरसेवक स्वेच्छा निधीतून बेरोजगार युवक/युवतींसाठी चार चाकी, वाहन चालक व तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षण देण्याकरिता मागविण्यात आलेल्या निविदानुसार एकुण प्राप्त झालेल्या पाच निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार प्रस्तावातील अ.क्र. १ ते १० च्या नियम व अटीनुसार खालील दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | चार चाकी वाहन चालक प्रशिक्षण | प्रति प्रशिक्षणार्थी रु. १५००/- |
| २. | तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षण | प्रति प्रशिक्षणार्थी रु. १०००/- |

तसेच सन्माननीय नगरसेवक यांनी शिफारस केलेल्या संस्थेकडे प्रशिक्षणार्थी पाठविण्यास व सर्व संस्थाना समान प्रशिक्षणार्थी मिळतील यास अधिन राहून आणि सन्माननीय नगरसेवकांकडून दि. १४-१-२००१ ऐवजी दि. २५-१-२००१ पर्यंत प्रशिक्षणार्थींची यादी प्रकल्प विभागात देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** ऐनवेळचे एकुण ८ प्रस्ताव सादर झालेले आहेत. सर्व अंदाजपत्रकीय प्रस्ताव आहेत. मंजुरी देण्यात येते.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. ७९/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सावरकर चौक ते जवाहरनगर पोलिस स्टेशन या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामा करीता सा.बां. खात्याच्या सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १६,६६,७६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन २०००-२००१ वर्षाच्या पुनडांबरीकरण (वित्त आयोग अनुदान) या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

तरी र.रु. १६,६६,७६०/- चे अंदाजपत्रक मंजुरीची प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावकर चौक ते जवाहरनगर पोलिस स्टेशन या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १६,६६,७६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मिलिंदनगर ते बीड डायव्हर्शन रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र.रु. ११,२६,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च सन २०००-२००१ वर्षाच्या पुनडांबरीकरण (वित्त आयोग अनुदान) या लेखा अंतर्गत करण्यात येईल.

तरी र.रु. ११,२६,४००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलिंदनगर ते बीड डायव्हर्शन रोड पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ११,२६,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जाफरगेट ते लक्ष्मणचावडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र.रु. १२,१०,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च सन २०००-२००१ वर्षाच्या नविन डांबरीकरण (शासकीय अनुदान) या लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

तरी र.रु. १२,१०,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट ते लक्ष्मण चावडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १२,१०,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, आरेफ कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन १९९९-२००० वर्षाच्या दरसुचीनुसार र.रु. ११,१०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील कामाचा खर्च सन २०००-२००१ वर्षाच्या नविन डांबरीकरण (शासकीय अनुदान) या लेखाशिर्षा अंतर्गत असलेल्या तरतुदी मधून करण्यात येईल.

तरी र.रु. ११,१०,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरेफ कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ११,१०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/५ :**

कार्यकारी अभियंता, (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पिरबाजार जवळ संजयनगर गृहनिर्माण संस्था व प्रतापनगर येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सन १९९९-२००० च्या सा.बां. विभागाच्या दरसुची दराने र.रु. १९,७१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १९,७१,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

सदरील कामाचा समावेश दहाव्या वित्त आयोगाच्या अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामामध्ये करण्यात आलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पिरबाजार जवळ संजयनगर गृहनिर्माण संस्था व प्रतापनगर येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १९,७१,०००/- च्या अंदाजपत्रकस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/६ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, ईटखेडा येथे गट नं ५२, ५३ मंजुर रेखांकनामध्ये २२५ मी.मी. व्यासाची चिनी मातीची पाईपलाईन टाकणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या दरसुची दराने र.रु. १०,३८,११०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १०,३८,११०/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर. सदरील कामाचा समावेश दहाव्या वित्त आयोगाच्या अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामामध्ये करण्यात आलेला आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ईटखेडा येथे गट नंबर ५२,५३ मंजूर रेखांकनामध्ये २२५ मी.मी. व्यासाची चीनी मातीची पाईपलाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १०,३८,११०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५/७ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु समर्थनगर येथे संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी सन १९९८-९९ च्या सा.बां. विभागाच्या दरसुची दराने र.रु. ११,२२,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ११,२२,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु समर्थनगर येथे नाल्यात संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ११,२२,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६/८ :**

एन-४ सिडको या भागात अंदाजे १५ वर्षापुर्वी जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी सदरील भागात बहुतांश भुखंड रिकामे होते. आजमितीस सदरील भाग पुर्णपणे झालेला असून बऱ्याच ठिकाणी सदनिकाचे (अपार्टमेंट) बांधकाम झालेले आहे. त्यामुळे सदरील ठिकाणी नागरीकांची (नळधारकांची) संख्या वाढलेली असल्याने पुर्वीच्या कमी व्यासाच्या जलवाहिनीव्दारे होणारा पाणी पुरवठा हा अत्यंत कमी स्वरुपाचा होत असल्याने सदरील भागात पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सिडकोचे पुर्वीचे नियोजन व आताची वाढलेली लोकसंख्या (घरे) यापमध्ये प्रचंड तफावत निर्माण झालेली आहे. त्यामुळे सदरील भागाचा पाणी पुरवठा सुधारण्यासाठी एन-४ या भागात १००,१५०,२०० व ३०० मी.मी. व्यासाची ए.सी. आणि सी.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दरसुचीनुसार १९९९-२००० नुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील अंदाजपत्रक र.रु. १२,८७,६४१/- चे तयार करण्यात आलेले असून या कामावर होणारा खर्च आर्थिक वर्ष २०००-२००१ मधील भांडवली कामे पाणी पुरवठा मधून होणार आहे.

तरी एन-४ या भागात जलवाहिनी टकाण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये १२,८७,६४१/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-४ या विभागात १००,१५०,२०० व ३०० मी.मी. व्यासाची ए.सी. आणि सी.आय. जलवाहिनी टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १२,८७,६४१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** ऐनवेळी दुसरा एक प्रस्ताव गाडया (कार) खरेदीचा आहे.

**श्री. मधुकर सावंत :** प्रस्तावातील माहिती वाचून दाखवावी.

**नगर सचिव :** (प्रस्ताव वाचून दाखवतात)

**विषय क्र. ८७/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या खालील जीप जुन्या झाल्या असून त्या सुस्थितीत नसल्यामुळे निर्लेखित कराव्या लागतील.

१. एम.ए.ए./३०८ (जीप) : ऑगस्ट १९८५ चे मॉडेल असून १५ वर्षे जुने आहे. अंदाजे ३.२ लाख कि.मी. चालले आहे.

२. एम.एफ.यु./९९३० (जीप) : ऑक्टोबर १९८६ चे मॉडेल असून १४ वर्षे जूने आहे. व अंदाजे ३.१ लाख कि.मी. चालले आहे.

शासन निर्णय क्रमांक विअप/१०९१/प्र.क्र.-१२/विनियम दि. १ ऑक्टोबर १९९१ प्रमाणे मोटार वाहने व जीप कि.मी. २,४०,०००/- व १० वर्षे आयुष्य असते. त्या नंतर वाहने निर्लेखित करता येतात. तरी वरील दोन वाहने निर्लेखित करण्यास मंजुरी मिळाली.

वरील दोन वाहने निर्लेखित करुन त्या जागी दोन नविन वाहने ॲम्बेसिडर आय.एस.झेड-१८०० पेट्रोल (ईसुसु) बुकेट/एसी खरेदी करण्यासाठी खालील दरपत्रक मागविले असून औरंगाबाद शहरात हिंदुस्थान मोटार्स लि. कंपनीचे दोन अधिकृत विक्रेते असून त्यांचेकडून कोटेशन नोटीस काढून दरपत्रके मागविले असता एकुण दोन दरपत्रके प्राप्त झाले. सदरील दरपत्रके दिनांक १५-१-२००१ रोजी उघडण्यात आले. त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | वाहनाचा प्रकार | किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १. | मे. कैलास एजन्सीज लि. औरंगाबाद. | आय.एस.झेड-१८०० पेट्रोल (ईसुजु) बुकेट ए.सी. | ४,४९,६००-०० |
| २. | मे. भारत इंजि. कंपनी औरंगाबाद. | --//-- | ४,५०,१००-०० |

तुलनात्मकदृष्टया मे. कैलास एजन्सीज लि. औरंगाबाद यांचे दर कमी असून दोन कार खरेदीसाठी एकुण रुपये ८,९९,२००/- खर्च येईल. सदरील दर आर.टी.ओ/इन्शुरन्स/जकात कर वगळून आहे.

तसेच इतर ॲक्सेसरीज, सिट कुशन, टॉप यासाठी कार खरेदी केल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

सदरील दोन कार खरेदी करण्यासाठी येणाऱ्या एकुण रुपये ८,९९,२००/- खर्चास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील खर्च सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात ठेवलेल्या घसारा निधी र.रु. १०.०० (लाख) यातुन भागवता येईल. तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे दोन जुन्या जीप निर्लेखित करण्यास व दोन नविन कार खरेदी करण्याच्या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी मिळणेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. सलीम पटेल :** लोडींग रिक्षा खरेदी करणार होते. काय झाले. वार्डात बऱ्याच ठिकाणी कचरा पडुन असतो. रिक्षा खरेदी करणेही आवश्यक आहे. यात रिक्षा खरेदीचा समावेश करावा. नसता सर्व वाहने खरेदीचा एकत्र प्रस्ताव सादर व्हावा. गाडया खरेदी करावयाच्या असेल तर पेट्रोलची मर्यादा वाढवणे सुध्दा आवश्यक आहे. ती २५० लि. वरुन ३०० लि. करावी.

**श्री. मधुकर सावंत :** रिक्षा खरेदी प्रस्ताव या अगोदरच यावयास पाहिजे होता.

**मा. सभापती :** रिक्षा खरेदीचा स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा. हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या जुन्या झालेल्या (१) एमएए-३०८ आणि एमएफ्यु-९९३० या दोन जीप सुस्थितीत नसल्यामुळे निर्लेखित करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

त्याचप्रमाणे दोन नविन वाहने ॲम्बेसिडर कार आय.एस.झेड-१८०० पेट्रोल (ईसुजु) बुकेट/एसी खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी सर्वात कमी दराचे मे. कैलास एजन्सीज लि.औरंगाबाद यांचे प्रति वाहन रक्कम रु. ४,४९,६००/- या दराने दरपत्रकानुसार त्यांचेकडून दोन नविन वाहने खरेदी करण्यास व यासाठी येणाऱ्या र.रु. ८,९९,२००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/१० :**

श्रीमती मरीयमबी बेगम, सहशिक्षिका (बडतर्फ), मुलींची प्राथमिक शाळा, औरंगपुरा यांचे जा.क्र. मनपा/अस्था-१/२०००/२१९५ दिनांक ९-८-२००० च्या बडतर्फी आदेशा विरुध्दचे दिनांक ४-९-२००० च्या अपिलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

श्रीमती मरीयमबी बेगम, सहशिक्षिका (बडतर्फ), मुलींची प्राथमिक शाळा, औरंगपुरा यांनी कार्यालयाची परवानगी न घेता मनपा सार्वत्रिक निवडणुक-२००० साठी उभ्या राहिल्या या "बबी खाली त्यांना कार्यालयाने मनपा सेवेतून दिनांक ९-८-२००० ला बडतर्फ केलेले आहे. या बडतर्फीच्या आदेशाविरुध्द त्यांनी स्थायी समितीकडे अपिल सादर केलेले असून त्यांनी निवडणुकीचे उभे राहण्यापुर्वीदिनांक ८-३-२००० ला स्वेच्छा सेवा निवृत्ती मागितलेली होती. त्याबाबत प्रशासनाने निर्णय घेतलेला नाही. त्यांनी आतापर्यंत महानगरपालिकेमध्ये केलेली सेवा लक्षात घेता व स्वेच्छा सेवा निवृत्तीचा त्यांनी अर्ज दिलेला असल्याने व त्यांची पेन्शनेबल सर्व्हीस झालेली असल्यामुळे सहानुभूती व माणुसकीच्या दृष्टीकोणातून त्यांचे अपिल मंजुर करण्यात येऊन जा.क्र. मनपा/अस्था-१/२०००/२१९५ दिनांक ९-८-२००० चा बडतर्फीचा आदेश येतव्दारे रद्द करण्यात येतो. त्यांनी केलेल्या विनंतीवरुन त्यांना दिनांक ८-३-२००० पासून स्वेच्छा निवृत्ती देऊन नियमाप्रमाणे निवृत्तीचे व त्यानंतर देय होणारे सर्व लाभ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,

महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक ०७-०२-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दि. ०७.०२.२००१ रोजी दुपारी ३.००० वाजता मा. सभापती श्री अशरफ युनुस मोतीवाला यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. श्री कावडे साहेबराव राणुबा | सदस्य |
| २) स. श्री कैसरखान बद्रोद्दीन खान | --//-- |
| ३) सौ. खरात कुसूमबाई दौलत | --//-- |
| ४) श्री गणेश रामचंद्र तांबे | --//-- |
| ५) श्री जगताप मोतीलाल रघूनाथ | --//-- |
| ६) श्री सिध्द जगदीश कन्हैयालाल | --//-- |
| ७) श्री तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ८) श्री. लकडे भरत श्रीपती | --//-- |
| ९) वाघ भाऊसाहेब बाबुराव | |
| १०) श्री रहाटकर विजया किशोर | --//-- |
| ११) श्री सलीम पटेल समशेर पटेल | --//-- |
| १२) श्री सावंत मधुकर दामोधर | --//-- |
| १३) श्री सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | --//-- |

**संवाद :**

**श्री कैसरखान :** प्रथमतः गुजरात मधील भुकंपात मृत्यु झालेल्यांना सभागृहातर्फे दोन मिनीटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करावी.

**मा. सभापती :** ठिक आहे, दोन मिनिटे श्रध्दांजलीसाठी सर्वांनी उभे रहावे.
(याच वेळी सभागृहातर्फे गुजरातमध्ये भुकंपात झालेल्यांना दोन मिनीटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

**मा. सभापती :** सर्वसाधारण चर्चा करण्यापुर्वी विषयपत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र. ८९/१ :**

दिनांक १६-१-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री भरत लकडे :** दिनांक १६-०१-२००१ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. ७८/६ मध्ये "सर्व संस्थांना समान प्रशिक्षणार्थी मिळतील यास अधीन राहुन आणि" असे नमुद केलेले आहे, ते वगळण्यात यावे.

**मा. सभापती :** सन्माननीय सदस्य श्री लकडे यांनी केलेल्या सुचनेनुसार नगरसेवक स्वेच्छा निधीतुक वाहन चालक प्रशिक्षणासंबंधीच्या ठरावातील "सर्व संस्थांना समान

प्रशिक्षण मिळतील यास अधिन राहुन आणि" हे वाक्य वगळण्यात येते. त्यानुसार दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री कैसरखान** : मागील बैठकीत ठराव क्र. ८७/९ नुसार दोन ॲम्बेसिडर गाडया खरेदीचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला. सदर गाडया कुणासाठी खरेदी करणार याचा खुलासा द्यावा.

**मा. सभापती :** एक गाडी मा. सभागृहनेता तसेच एक गाडी सभापतींसाठी खरेदी करणार आहोत.

**श्री मधुकर सांवत :** ॲम्बेसिडर गाडया घेण्याऐवजी शहरात खुप मोठया प्रमाणात कचरा साचुन असतो त्यासाठी ट्राली रिक्षा खरेदी कराव्यात ज्यांच्यासाठी गाडया घ्यावयाच्या त्यांचेकडे सध्या पेट्रोल गाडया आहेत.

**श्री सलीम पटेल :** बजेटमध्ये कार गाडया खरेदीचा निर्णय घेतलेला नव्हता. कचरा गाडया खरेदीसाठी बजेट ठेवलेले होते. किती बजेट होते त्याचा खुलासा करावा. रिक्षा खरेदी करणार होते. काय कार्यवाही केली खुलासा द्यावा.

**उप अभियंता (यांत्रिकी) :** गाडया खरेदी ३० लाख रुपयांचे बजेट ठेवलेले होते.

**श्री सलीम पटेल, कैसरखान :** रिक्षा तसेच वाहुन नेण्यासाठी गाडया खरेदी करण्यासाठी बजेटमध्ये तरतुद केलेली होती. त्याचे काय झाले. का गाडया खरेदी केलेल्या नाही. शहराची साफसफाई व्हावी या दृष्टीने कचऱ्याच्या गाडया खरेदी करणे आवश्यक आहे. त्या खरेदी कराव्यात.

**अतिरिक्त शहर अभियंता :** कचरा उचलण्यासाठी गाडया खरेदी करण्याचे प्रपोजल तयार केलेले आहे. लवकरच कार्यवाही होईल.

**श्री सलीम पटेल, श्री कैसरखान :** ॲम्बेसिडर गाडया कुणासाठी खरेदी करणार याचा खुलासा प्रशासनाने करावा. पदाधिकाऱ्यांना नियमाने गाडया देता येतात का?

**मा. सभापती :** उप आयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त (प्र) :** या अगोदर सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार वाहने दिलेली आहेत, दूरध्वनीही दिलेले आहे. गाडया देण्याविषयी विरोधी पक्षनेता, सभागृहानेता यांचाच मुद्दा आहे. या सदंर्भात न्यायालयीन प्रकरणही झालेले आहे. तथापी पुर्वीची परंपरा लक्षात घेता गाडया देण्यास काही अडचण येणार नाही असे मला वाटते.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी कचऱ्यासाठी रिक्षा खरेदीचा प्रस्ताव लवकरच मंजुरीसाठी ठेवण्यात यावा. विषय क्रमांक १ दुरुस्ती सह सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक १६-१-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या ठराव क्र. ७८/६ मध्ये "सर्व संस्थांना समान प्रशिक्षणार्थी मिळतील यास अधिन राहुन आणि" हे वाक्य वगळण्यात येते. या दुरुस्तीसह दिनांक १६-१-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ९०/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटाकारंजा येथे जुने मटन मार्केट तोडुन दुकान केंद्र बांधणेकरीता सा. बां. विभागाचे सन ९९-२००० नुसार र. रु.

१६,१३,५८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आहे आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. १७.१.२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षा अंतर्गत शासकीय अनुदान २०००-०१ मधुन करण्यात येईल. त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र. रु. १६,१३,५८०/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री किशोर तुळशीबागवाले :** जुने मार्केट तोडुन नविन दुकान केंद्र बांधावयाचे आहे असे प्रस्तावात नमुद केले आहे परंतु महानगरपालिकेतर्फे जी दुकान केंद्रे आहेत, जी बांधण्यात आली त्या सर्व दुकान केंद्रापासुन महानगपालिकेस फायदा होत आहे काय? किती उत्पन्न मिळते. जी दुकान केंद्रे बांधलेली आहे त्याचा जर उपयोग करुन घेत नसेल तर नवीन दुकाने बांधुन महानगरपालिकेचा विनाकारण खर्च होऊ नये अशी माझी सुचना आहे. शहागंज येथील दुकान केंद्रापासुन म्हणावे तसे उत्पन्न मनपास मिळत नाही. सध्या तेथे भाजी विक्रेते नाही. ज्यांना दुकाने दिली त्यांनी दुसऱ्यांना दुकान भाडयाने दिलेली आहेत.

**मा. सभापती :** आजही शहागंज येथील दुकानामध्ये भाजीपाल्याची विक्री होते आहे मी स्वत: तेथील पाहणी केलेली आहे व उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने प्रशासन कार्यवाही करत आहे.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** शहागंज येथील भाजी मंडई जाधववाडीत जाऊन ८ महिने झाले. शहागंज येथील महानगरपालिकेच्या मालकीची दुकाने ज्यांना ज्या व्यासायासाठी दिली होती त्याच व्यवसायासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीने संबंधितांना जाधववाडी येथे दुकाने दिलेली आहेत व शहागंज येथील मनपाची दुकाने संबंधीतांनी दुसऱ्याच व्यक्तींना भाडे तत्वावर दिलेली आहे व भाडे वसुल करत आहे. त्यामुळे मनपाचे उत्पन्न कमी झालेले आहे. जो करार महानगपालिकेने केलेला होता तो संपलेला असुन सर्व दुकाने संबंधीताकडुन काढुन घेऊन टेंडर पध्दतीने कार्यवाही व्हावी. यामुळे मनपाचे उत्पन्न वाढेल. या सभागृहाने महानगपालिकेच्या फायद्याचे निर्णय घ्यावेत.

**मा. सभापती :** सर्व दुकान धारकांना कृषि उत्पन्न बाजार समितीने दुकाने दिलेली नाही. मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्री गणेश तांबे :** महानगरपालिकेने केलेल्या कराराची मुदत संपलेली असेल तर संबंधीतांकडुन दुकाने काढुन घेऊन नव्याने टेंडर काढुन देण्यात यावे. उत्पन्न वाढेल.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** पर्यायी जागा दिल्यानंतर संबंधीताकडुन दुकाने परत घेणे आवश्यक आहे.

**मालमत्ता अधिकारी :** शहागंज येथील होलसेल भाजी मार्केट कृषि उत्पन्न बाजार समितीकडे गेले आहे. किरकोळ स्वरुपात विक्री सध्या शहागंज येथे होत आहे. काही दुकान धारकांना कृषि उत्पन्न बाजार समितीने दुकाने दिलेली नाही व काहींना मिळालेली आहे. ज्यांना दिली आहे त्यांची तपासणी करत आहोत. उत्पन्न वाढवण्याचे दृष्टीने सुध्दा कार्यवाही चालु आहे.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** किरकोरळ विक्री होत नसुन घाऊक विक्री होत आहे. हर्रासी होते. त्यानंतर दिवसभर बसुन दुकानदार भाजीपाला विक्री करतात. अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहे.

**मा. सभापती :** संबंधीत दुकान धारकांना भाडे दर वाढवु शकतो. दुकाने काढुन घेतल्यास सदरील दुकानधारक न्यायालयात जातील व जे उत्पन्न सध्या मनपास मिळते तेही मिहणार नाही.

**श्री गणेश तांबे :** दुकानदार न्यायालयात जातील या भितीने मनपाचे उत्पन्न वाढवण्याचा विचार होत नसेल तर योग्य नाही. ज्या वेळी मनपाची मालमत्ता दुसऱ्याकडे दिली जाते त्यावेळी करार केलेला असतो व त्यात नमुद केलेल्या नियम अटीला अधीन राहुन करार केलेला असतो. म्हणुन दुकानदार न्यायालयात गेले तरी महानगरपालिकेकडे सर्व कागदपत्रांची पुर्तता होऊ शकेल. कराराची मुदत संपलेली असेल तर महानगरपालिका प्रशासनाने स्वतःहुन दुकाने खाली करण्याची कार्यवाही करावी.

**श्री जगदीश सिध्द :** संबंधीत दुकान धारकांना भाजीपाला विक्रीसाठी पर्यायी जागा कृषि उत्पन्न बाजार समितीने दिलेली असल्याने व मनपाचा करार संपलेला असल्याने जागा खाली करुन घ्यावी. एखाद्या भाडेकरुच्या नांवावर घर असेल व तो किरायाने राहात असेल व घर सोडण्यास तयार नसेल तर न्यायालयीन प्रकरण झाल्यानंतर न्यायालय सुध्दा घर मालकाकडुन न्याय देतात.

**श्री मधुकर सांवत, श्री गणेश तांबे :** करारनामा केलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. केवल संबंधीत लोक न्यायालयात जातील या भितीने कार्यवाही न करणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती :** दुपटीने भाडे वाढवण्यात यावे. प्रत्येक दुकान धारकांस कृषि उत्पन्न बाजार समितीने दुकान दिलेले नाही. म्हणुन दुकाने काढुन घेणे योग्य होणार नाही.

**श्री गणेश तांबे,श्री.मधुकर सावंत :** सभापती महोदय यांनी जी रुलींग दिली ती मनपाचे उत्पन्न वाढवण्याच्या हिताची नव्हे. आपण संबंधीत दुकानधारकांना पाठींबा देत आहे, असे दिसुन येते. करार पध्दतीने दुकाने दिलेली आहे. ती पुन्हा मनपाच्या ताब्यात घेण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री भरत लकडे :** ज्यांना कृषि उत्पन्न बाजार समितीने दुकानासाठी जागा दिलेली असेल व त्यांचेकडे मनपाच्या मालकीची शहागंज येथेही दुकान असेल त्यांचेकडुन दुकाने काढुन घेण्याची कार्यवाही करावी.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** या सभागृहाने महानगरपालिकेचा फायदा होईल या दृष्टीने चर्चा करुन निर्णय घ्यावयास पाहिजे. दुकाने काढुन घ्यावी. जास्तीचे दराने व त्यादृष्टीने मनपाचे उत्पन्न वाढेल तशी कार्यवाही करावी. संबंधीत दुकानधारक नविन दराने दुकाने घेण्यास तयार असेल तर त्यांना सुध्दा देण्यात यावे.

**श्री मधुकर सावंत :** कोणत्या नियमाने भाडेवाढ करु शकतो. करार केलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाहीचे आदेश द्यावेत.

**मा. सभापती :** आजच्या बाजारभावा प्रमाणे जे भाडे निश्चित करता येईल त्या प्रमाणे कार्यवाही करावी. विषय क्रमांक २ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोटाकारंजा येथे जुने मटन मार्केट तोडुन दुकान केंद्र बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १६,१३,५८०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वित्तीय वर्ष सन २००१-२००२ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महानगरपालिकाने दि. २२.२.२००१ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००१-२००२ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत.
खालील दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील.

अ) महानगरपालिकेचे दर

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००० ते २००१ चे दर | | सन २००१-२००२ चे प्रस्तवावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मुल्य | दर | करयोग्य मुल्य | दर |
| १) | सामान्य कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | | | |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | २७% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | २८% | ५०००१ ते १००००० | ३३% |
| | | १००००० ते पुढे | २९% | १००००० ते पुढे | ३५% |
| २) | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | |
| | अ) निवासी वापर | --//-- | ३% | --//-- | ३% |
| | ब) निवासेत्तर कर | --//-- | ६% | --//-- | ८% |
| ३) | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४) | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५) | मनपा शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६) | पथकर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७) | जलनिःसारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८) | जललोध कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९) | मोकळया जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील. | | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येतील. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री किशोर तुळशीबागवाले :** या प्रस्तवात नमुद केल्याप्रमाणे जे नागरिक नियमित कर भरतात त्यांचेवर आणखी जास्तीचा कराचा बोला लावुन कर वसुल करण्याचा प्रयत्न प्रशासन करत आहे. परंतु मागील विषयाच्या अनुषंगाने बोलु इच्छितो की, शहागंज येथील दुकाने ही मनपाच्या मालकीची असतांना व महानगरपालिकेने केलेला करार संपलेला असतांना प्रशासन दुकानाचा ताबा घेण्यास हलगर्जीपणा करत आहे. जे आपल्या हातात आहे त्याची कार्यवाही न करता जे कर भरतात त्यांचेवर आणखी कर लावणे योग्य नाही. कोणतीही कार्यवाही करत असतांना प्रशासनाने नियमाने कार्यवाही करावी.

**श्री मधुकर सावंत :** गरीब नागरीक लहान लहान घरामध्ये राहतात. त्यांचेवर कर लावण्याचा हा प्रस्ताव आहे असु दिसुन येते. जे कर प्रस्तावित केले आहे त्याप्रमाणे वाढ करण्यात येऊ नये.

**करमुल्य निर्धारण अधिकारी -२ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण व कलम ९९ नुसार दि. २०.२.२००१ रोजी किंवा त्यापुर्वी मालमत्ता कराचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. दरवाढ २० फेब्रुवारीच्या अगोदर दर निश्चित करणे बंधणकारक आहे. मागील वर्षी ठराव ठेवला असता कराच्या दरात कसल्याही प्रकारीच वाढ केलेली नसल्याने कायदेशीरदृष्टया यावर्षी कराच्या दरात निश्चित पणे काही ना काही वाढ करणे आवश्यक आहे.

**श्री गणेश तांबे :** महानगरपालिका कोणत्याही प्रकारच्या तातडीच्या सुविधा नागरीकांना देत नाही. त्यामुळे कराचे दर वाढवणे योग्य होणार नाही.

**मा. सभापती :** मा. आयुक्त या संदर्भात खुलासा करतील.

**मा. आयुक्त :** मालमत्ता कर वाढवण्याचा हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा तसेच महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बळकटीकरण करण्याचा विषय आहे. कलम ९९ अन्वये दरवर्षी २० फेब्रुवारी पर्यंत मालमत्ता कराचे दर निश्चित करणे आवश्यक आहे. बारकाईने अभ्यास केलयास असे आढळुन येईल की, ज्यांचे करयोग्य मुल्य २३% आहे व २३% च ठेवलेले आहे. ज्यांचे लहान करयोग्य मुल्य आहे, व्याप्ती वाढ करु इच्छित नाही. जेवढे करयोग्य मुल्य वाढत जाईल त्याच धर्तीवर कर वाढवण्याचा आपला प्रयत्न राहील. सभागृहाला विनम्रपणे विनंती करतो की, जे प्रस्ताव करवाढीचे मंजुरीसाठी येतात त्यावर विचार विनिमय न करता फेटाळुन लावणे योग्य नाही. कारण बजेटच्या वेळी मोठा प्रश्न निर्माण होईल. जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळेल व विकास कामे कसे होतील याचा विचार आपण केला पाहिजे. ज्यांचेकडे मोठया प्रमाणात मालमत्ता आहे त्यांचेवर कर लावण्याचा विचाराने हा प्रस्ताव सादर केलेला असुन यावर सातत्याने विचार करुन विषय फेटाळुन न लावता मंजुर करावा.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** मालमत्ता कराचे दर वाढवण्या संबंधीच्या या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यासाठी येत्या २६ तारखेला विशेष सभा बोलवावी.

**मा. आयुक्त :** या विषयावर निर्णय होऊन प्रस्ताव येत्या २० तारखेच्या आत होणाऱ्या सर्वसाधारण सभेत ठेवावा लागणार असुन आजच्या बैठकीत काही ना काही तरी निर्णय घेणे आवश्यक आहे.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** प्रस्तावात सामान्य करामध्ये २८% चे ३३% तसेच २९% चे ३५% प्रमाणे दरवाढ केलेली आहे ते आम्हाला मान्य नाही.

**श्री गणेश तांबे :** या अगोदरच्या विषयावर उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने चर्चा झालेली आहे. त्यावेळेस प्रशासनाने का खुलासा केला नाही. आता या विषयावर उत्पन्न वाढवण्याचे शब्द प्रशासनाकडुन बोलले जाते. हे योग्य नाही.

**मा. आयुक्त :** सभागृहाला काय जो निर्णय घ्यावयाचा तो घ्यावा. सर्वसाधारण सभेपुढे हा प्रस्ताव जाणारच आहे. मा. सभापतींनी आदेश करावेत. विषय क्रमांक २ वर खुलासा करण्यात येईल.

**गणेश तांबे, मधुकर सांवत :** मा. सभापती यांनी मा. आयुक्त यांना विषय क्रमांक २ च्या संदर्भात खुलासा देण्याचे आदेश करावेत. नसता घेतलेल्या निर्णयाचा आम्ही स. सदस्य निषेध करतो.

**मा. सभापती :** हा विषय स्थायी समितीने मंजुर केल्यानंतर सर्वसाधारण सभेपुढे जाणारच आहे. पुन्हा चर्चा होणारच आहे. सर्वसाधारण सभेत चर्चा होऊन काय जो निर्णय होईल तो होईल. म्हणुन हा प्रस्ताव जशाच्या तसा कराचे दर निश्चित करण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात येते. असे सर्वानुमते निर्णय घेण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यासंबधी प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात कोणताही बदल न करता सर्वसाधारण सभेस शिफारस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाचा प्रस्ताव खालील प्रमाणे .

वित्तीय वर्ष सन २००१-२००२ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिकाक्षेत्रातील मालमत्तावरील मालमत्ता कराचे दर हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ व कलम ९९ अन्वये महानगरपालिकाने दिनांक २०.२.२००१ रोजी किंवा त्यापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००१-२००२ या वित्तीय वर्षासाठी खालील प्रमाणे दर प्रस्तावित आहेत.

खालील दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील.

<u>अ) महानगरपालिकेचे दर</u>

| अ. क्र. | कराचे नांव | सन २००० ते २००१ चे दर | | सन २००१-२००२ चे प्रस्तवावित दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | करयोग्य मुल्य | दर | करयोग्य मुल्य | दर |
| १) | सामान्य कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | | | |
| | | १ ते १००० | २३% | १ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १०००० | २४% | १००१ ते १०००० | २४% |
| | | १०००१ ते २०००० | २५% | १०००१ ते २०००० | २५% |
| | | २०००१ ते ५०००० | २७% | २०००१ ते ५०००० | ३०% |
| | | ५०००१ ते १००००० | २८% | ५०००१ ते १००००० | ३३% |
| | | १००००० ते पुढे | २९% | १००००० ते पुढे | ३५% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २) | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | | कोणत्याही करयोग्य मुल्यावर | |
| | अ) निवासी वापर | --//-- | ३% | --//-- | ३% |
| | ब) निवासेत्तर कर | --//-- | ६% | --//-- | ८% |
| ३) | वृक्ष कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ४) | अग्निशमन कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ५) | मनपा शिक्षण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ६) | पथकर | --//-- | १% | --//-- | २% |
| ७) | जलनिःसारण कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ८) | जललोध कर | --//-- | १% | --//-- | १.५% |
| ९) | मोकळया जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येतील. | | | | |

तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी उपकर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येतील. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**विषय क्र. ९२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री के. एम. बोथरा यांची प्रथम नियुक्ती नाका कारकुन म्हणुन कार्यालयीन आदेश क्र. अस्था/६३६०/७८ दिनांक २२.९.७८ अन्वये झालेली आहे. प्रशासकीय कारणास्तव त्यांची पाणी पुरवठा सिडको या विभागात जा.क्र. मनपा/अस्था-१/९२/१८६३ दि. २५.९.९२ च्या आदेशान्वये बदली करण्यात आलेली होती.

पोली उप अधिक्षक -१, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद ांयनी त्यांचेकडील गोपनीय पत्र जा. क्र. सापळा/कामिबी९३/१३६१ दि. ७.९.९३ अन्वये कळविलेले होते की, श्री आदेश चंदेशेखर गोजे, रा. सिडको, औरंगाबाद यांचे मामाचे बंगल्यात त्वरीत नळ कनेक्शन देण्यासाठी श्री के. एम. बोथरा यांनी पंचासमक्ष १०००/- रुपये लाचेची मागणी करुन १०००/- रुपयांची लाच स्विकारलेली आहे. म्हणुन त्यांना रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. यावरुन त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद येथे गु. र. नं. II/३८/९३ कलम ७, १३(२) ला. लु.प्र. कायदा १९८८ प्रमाणे दाखल झाला आहे व सदर गुन्हाचा तपास करीत आहे.

त्या अनुषंगाने कार्यालयीन आदेश जा. क्र. मनपा/अस्था/-१/९३/३३०१ दिनांक १८.९.९३ नुसार श्री बोथरा यांना निलंबीत करण्यात आलेले होते.

पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचे कडील गोपनीय पत्र जा. क्र. सीआर-१८५/औरंगाबाद/९३/४९९ दि. १५.३.९४ सोबत सदर गुन्हायातील तपासाचे कागदपत्रांच्या नकलांचा संच व एक सिलबंद पाकीटात न्यायालयात दोषारोप दाखल करण्याचा मंजुरीचा नमुना करुन पाठविला व सोबतच्या कागदपत्रांचा अभ्यास करुन

जेव्हा आरोपि विरुध्द खटला पाठविण्याची मंजुरी देण्याच्या निर्णयास याल तेव्हा सोबतचे सिलबंद पाकिट उघडुन त्यातील नमुन्याप्रमाणे ३ प्रती शाईच्या सहीचा व कार्यालयाचे मोहोरबंद मंजुरी आदेश त्यांचे कार्यालयास पाठविण्यात यावा असे कळविले होते.

त्या अनुषंगाने जा. क्र. मनपा/अस्था/-१/२७२०/९४ दिनांक ९.८.९४ सोबत श्री बोथरा यांचेविरुध्द खटला पाठविण्याची मंजुरी देण्याच्या निर्णया संबंधीचे मंजुरी आदेश ३ प्रतींमध्ये पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेले होते.

त्यानुसार श्री बोथरा यांचे विरुध्द दि. २४.८.९४ रोजी मा. स्पेशल जज्ज साहेब, स्पशेल कोर्ट, औरंगाबाद यांचे कोर्टात दोषारोप पत्र क्र. २६/९४ दि. २४/८/९४ अन्वये दाखल करण्यात आला असुन त्याचा स्पेशल कोर्ट केस नं. ७/९४ असा असल्याचे पोलीस उप अधिक्षक -३ ॲटी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र. गुन्हा-१८५/औरंगाबाद/९३/७७९ दि. २४-८-९४ नुसार कळविलेले होते. दरम्यान श्री के. एम. बोथरा यांना निलंबन कालावधीत देण्यात येत असलेल्या निलंबन भत्त्यात ५०% वाढ करण्याबाबतचे आदेश जा. क्र. मनपा/अस्था-१/९४/२६८८ दि. ५-८-९४ अन्वये निर्गमित करण्यात आलेले होते.

दिनांक ३०.३.९८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत श्री बोथरा यांचे निलबंन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहुन रद्द करण्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्याची व त्यांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहीत धरण्यात यावा व संबंधीतास कामावर रुजु करुन घेण्याचे आदेश द्यावेत असा ठराव, ठराव क्र. ५८५/१२ नुसार पारीत करण्यात आलेला होता. याच संदर्भाने मा. सर्वसाधारण सभेमध्ये सुध्दा श्री बोथरा यांना न्यायालीन निर्णयाच्या अधीन राहुन कामावर रुजु करुन घेण्यासाठी दि. ३.१२.९८ च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १६४/३ पारीत केलेला होता. या अनुषंगाने कार्यालयीन आदेश क्र. जा. मनपा/अस्था-१/९९/६० दि. ५.१.९९ च्या आदेशान्वये श्री के. एम. बोथरा यांना न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घेण्याचा आदेश निर्गमीत करण्यात आलेले होते व त्यानुसार श्री बोथरा हे कामावर रुजु झालेले आहे.

आता पोलीस उप अधिक्षक-३, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा. क्र. निकाल/औरंगाबाद/२०००/१९६६ दि. १०.१०.२००० नुसार कळविलेले आहे की, सदर गुन्हायात मा. विशेष न्यायालयात सुनावणी होऊन आरोपीस कलम ७ अन्वये एक वर्ष शिक्षा व २००/- रुपये दंड आणि कलम १३ (१) (ड) सह १३ (२) अन्वये २ वर्षे शिक्षा व ५०० रुपये दंड लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये शिक्षा झाली आहे. सोबत निकालाची प्रतही पाठविलेली आहे. मा. विशेष न्यायालयाचय आदेशाविरुध्द श्री के. एम. बोथरा यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपील क्र. ३६७/२००० असे दाखल केले असुन त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने श्री बोथरा यांस जामीनावर सोडण्यात येत असल्याचे आदेश दिलेले आहे. तथापी मा. विशेष न्यायालयाने दिलेल्या शिक्षेस मा. उच्च न्यायालयाने स्थगनादेश दिलेला नाही.

उक्त परिस्थितीवरुन श्री के. एम. बोथरा यांनी लाच स्विकारणे हा जो गुन्हा केला व या गुन्हयात न्यायालयाने शिक्षा दिली असुन त्यास दोषी ठरविलेले आहे यावरुन त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९४९ चे कलम ३ चा भंग केला असल्याचे निष्पन्न झ ाालेले आहे. करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील तरतुदी नुसार त्यांचेवरती शास्ती लावणे आवश्यक आहे.

करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उप कलम २ (ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल, अशा प्रकारे

महानगरपालिकेच्या सेवेतुन श्री के. एम. बोथरा, कनिष्ठ लिपीक यांस बडतर्फ करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** या विषयावर उप आयुक्त (प्र.) यांनी सविस्तर खुलासा करावा.

**उप आयुक्त (प्र) :** प्रस्ताव सविस्तर माहितीसह ठेवण्यात आलेला आहे. (मा. उप आयुक्त (प्र.) सादर केलेला प्रस्ताव वाचून दाखवतात)

**श्री मधुकर सांवत :** संबंधीत कर्मऱ्चास न्यायालयाने दोषी ठरवलेले आहे. त्यांना बडतर्फ करण्यात यावे. प्रस्ताव मंजुर करावा.

**श्री जगदीश सिध्द :** विशेष न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर संबंधीत कर्मचारी श्री बोथरा यांनी उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपील केलेले असुन त्यांना जामीनवर सोडण्यात आलेले आहे. सदर केलेले अपीलावर जोपर्यंन्त निर्णय लागत नाही तोपर्यंन्त त्यांना बडतर्फ करणे योग्य नाही. विधी सल्लागार यांचा खुलासा घेण्यात यावा.

**मा. सभापती :** उप आयुक्त (प्र) तथा विधी सल्लागार श्री कांबळे साहेब यांनी या विषयावर सविस्तर खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र) :** प्रस्तावच माझ्या मार्फत सादर झालेला असुन प्रस्तावात नमुद केलेल्या माहितीशी सहमत आहे. दुसरा वेगळा खुलासा करण्यासारखे या प्रस्तावात काहीही नाही.

**श्री कैसरखान :** संबंधीताने हायकोर्टात अपील केलेले आहे.

**उप आयुक्त :** अपील न्यायालयाने मंजुर केलेले नाही. जामीनवर त्यांची सुटका केलेली आहे.

**श्री जगदीश सिध्द :** जामीन मंजुर झालेला आहे. प्रस्तावानुसार त्यांचेवर कार्यवाही होऊ नये. मा. उच्च न्यायालयाचा निकाल येऊ द्यावा. नंतरच कारवाई करण्यात यावी. या अगोदर बऱ्याच कर्मचाऱ्यांना दोषी ठरवुन कामावर घेतलेले आहे.

**श्री मधुकर सावंत :** श्री बोथरा हे गुन्हायात सापडलेले असून न्यायालयाने सुध्दा त्यांना दोषी ठरवलेले आहे व त्यानुसार प्रशासनामार्फत प्रस्ताव बडतर्फ करण्याचा सादर झालेला आहे. तो मंजुर करणे योग्य होईल नसता या स्थायी समितीचा काहीही धाक कर्मचाऱ्यावर राहणार नाही. याचीही सभागृहाने दखल घ्यावी. उच्च न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरविल्यास त्यांना पुन्हा कामावर घेण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवावा असे माझे मत ओह. आजच्या परिस्थितीत त्यांना बडतर्फ करणे योग्य आहे.

**सौ. विजया रहाटकर :** श्री बोथरा यांनी न्यायालयात अपील केलेले आहे. त्यांना जामीनवर सोडण्यात आले. विशेष न्यायालयाने त्यांना दोषी ठरवलेले आहे. म्हणुन सेवेतुन बडतर्फ करणेही योग्य वाटते. त्यांनी केलेल्या अपीलावर न्यायालयाने निर्दोष ठरविल्यास त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे असे आदेश करावेत. परंतु आज त्यांना बडतर्फ करणेच योग्य होईल.

**मा. सभापती :** सभागृहाच्या भावना लक्षात घेता हा विषय मंजुर करण्यात येतो. संबंधीत श्री बोथरा यानी उच्च न्यायालयात अपील सादर केलेले आहे. त्या अपीलावर न्यायालयाने ते निर्दोष असल्याचा निकाल दिल्यास त्यांना पुन्हा ताबडतोब कामावर घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री के. एम. बोथरा, कनिष्ठ लिपीक यांनी लाच स्विकारणे हा गुन्हा केलेला असुन या गुन्हायात न्यायालयाने त्यांना शिक्षा दिली असुन त्यास दोषी ठरविलेले आहे. यावरुन त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९४९ चे कलम ३ चा भंग केल्याचे निष्पन्न झालेले असल्याने त्यांना मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६ मधील उपकलम २ (ह) नुसार पुढे नोकरी मिळण्यास सामान्यपणे अपात्र होईल अशा प्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापी श्री के. एम. बोथरा यांनी विशेष न्यायालयाचे निर्णयाचे विरोधात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपील दाखल केलेले असल्याने या अपीलावर न्यायालयाने ते निर्दोष असल्याचा निकाल दिल्यास त्यांना पुन्हा ताबडतोब कामावर घेण्या बाबतची कार्यवाही करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/५ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, नक्षत्रवाडी मुख्य जलकुंभस ते विटखेडा गावापर्यंत३०० मी.मी. व्यासाची डी. आय. के. ९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र. रुपये ९२,५६,४००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्रं. १२८/३ दिनांक १३.१०.२००० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ५०/२००० जी, दै. वर्तमानपत्र प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पंधरा (१५) कोऱ्या निवदि विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकुण आठ (८) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा हया खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. अशोका कन्स्ट्रक्शन | १६.५१ % |
| २. | श्री व्ही. आर. कन्स्ट्रक्शन | १ % |
| ३. | श्री एम. टी. फड | १२.९९९ % |
| ४. | मे. पी. पी. गोगड | १८.०८ % |
| ५. | मे. रुद्राणी कन्स्ट्रक्शन कं. | १५.०७ % |
| ६. | मे न्यु महावीर कन्स्ट्रक्शन | १४.२० % |
| ७. | मे. जी. आर. घोडेले | १२.१२ % |
| ८. | मे. आर. जी. सानप | ८.१ % |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा मे. पी.पी. गोगड यांचा आहे. म्हणजेच अं. प. दरापेक्षा १८.०८% कमी असादर आहे. तरी मे. पी. पी. गोगड यांची अं. प. दरापेक्षा १८.०८% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री जगदीश सिध्द :** सर्वात कमी दराने काम करुन देण्याची जी निविदा प्राप्त झाली. शासन निर्णयाप्रमाणे एवढया कमी दराने काम करुन घेता येतात काय? खुलासा करावा. शासनाच्या नियमाप्रमाणे निविदा प्राप्त झालेली असेल तरच मंजुरी देण्यात यावी.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पापु) यांनी खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** १८.०८% सर्वात कमी दराची श्री गोगड यांची निविदा प्राप्त झालेली आहे. शासन निमयमानुसार १५% कमी दराने निविदा भरुन यावयास पाहिजे. त्यापेक्षा जास्त कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास संबंधीताकडुन कामाचा दर्जा चांगला राहील म्हणुन हमीपत्र लिहुन व नंतर करारपत्र करुन घेतले जाते. असा सर्वसाधारण सभत निर्णय झालेला आहे. तसेच बॅन्क गॅरंटी सेक्युरीटी साठी द्यावयाचे व नंतरच काम करुन घ्यावयाचे असा नियम आहे.

**मा. सभापती :** विषय क्रमांक ९३ सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी मुख्य जलकुंभ ते विटखेडा गावापर्यंत ३०० मीमी व्यासाची डी. आय. के. ९ जलवाहिनी टाकावयाचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १८.०८% कमी दराची मे. पी. पी. गोगड यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९४/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की टेलीकॉम मुख्य कार्यालय व्हावा रविवार बाजार ते जाफर गेट या मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सा. बां. खात्याचे सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार अं. प. रक्कम रु. १७,४६,५००/- चे तयार करण्यात आले असुन सदरील खर्च सन २०००-०१ वर्षातील "नविन डांबरीकरण" (शा. अ. २०००-२००१) या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल. करीता अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टेलीकॉम मुख्य कार्यालय व्हावा रविवार बाजार ते जाफर गेट या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १७,४६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/७ :**

अतिरिक्त शहर अभियता प्रस्ताव सादर करीत आहे की, समर्थनगर प्रभागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९९-२००० सा. बां. खात्याचे डी. एस. आर. दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १७,७३,३६६/- चे तयार करण्यात आले असुन सदरचा खर्च सन २०००-२००१ या वर्षातील "नविन डांबरीकरण" (शासकीय अनुदान २०००-२००१) या लेखाशिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर प्रभागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यचात आलेल्या र. रु. १७,७३,३६६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**-: ऐनवेळचे विषय :-**

**मा. सभापती :** ऐनवेळी सादर झालेले सर्व प्रस्ताव मंजुर करण्यात येतात.

**श्री जगदीश सिध्दा :** ऐनवेळचे प्रस्ताव मंजुर करण्यात येऊ नयेत व यापुढे मंजुर करु नयेत. अशी माझी सुचना आहे.

**श्री गणेश तांबे :** ऐनवेळच्या प्रस्तावामध्ये शाळेच्या संदर्भात आलेलाच प्रस्ताव मंजुर करण्यात यावा बाकीचे सर्व प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

**मा. सभापती :** रुलींग दिलेले आहे. ऐनवेळचे विषय क्र. १, २, ३, ४ सर्वानुमते मंजुर करण्यात येतात.

**विषय क्र. ९६/१ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामाकरीता सा. बां. खातेच्या वर्ष ९९-२००० च्या दरसुचीनुसार र. १८,२४,५४८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "खुली गटार व संरक्षित भिंत बांधणे + शासकीय अनुदान २०००-०१" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १.२.२००१ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या रु. १८,२४,५४८/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. किराडपुरा (स्लम) येथे नाला संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १८,२४,५४८/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मरीमाता येथे २० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था करणे हे काम करावयाचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची दरसुची सन १९९९-२००० नुसार रक्कम रु. २,०७,२१,४८०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास सर्वसाधारण सभेची मान्यताही ठराव क्र. १२९/४ दिनांक १३.१०.२००० अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान वर्ष २०००-०१ मधून करण्यात येणार आहे.

कार्यालयाची निविदा सुचना क्र. ५०/२००० जी की दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण १६ (सोळा) कोऱ्या निविदा स्विकारण्याचा नियोजीत तारखेस एकुण दहा (१०) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा हया खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी | १७.५०% | कमी |
| २. | श्री व्ही. आर. महाजन | ३% | कमी |
| ३. | मे. सेठी कन्स्ट्रक्शन | ५.५५% | कमी |
| ४. | मे. अशोका कन्स्ट्रक्शन | १६.५१% | कमी |
| ५. | श्री बी. एम. मुरकुटे | १३.६९% | कमी |
| ६. | मे. पी. पी. गोगड | १७% | कमी |
| ७. | मे. न्यु महावरी कन्स्ट्रक्शन | ११.२९९% | कमी |
| ८. | मे. एन. आर. घोडेले | ८.८८% | कमी |

९. मे. आर. जी. सानप कन्स्ट्रक्शन कंपनी ७.४% कमी

वरील प्रमाणेचा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा म. रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५०% कमी असा दर आहे.

तरी मे. रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं. प. दरापेक्षा १७.५०% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मरीमाता येथे २० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था करणे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्म्कदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५०% कमी दराची मे. रुद्राणी कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९८/३ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्ली गेट ते मकाई गेट उर्वरीत साखळीमध्ये ४५७ मीमी व्यासाची एम. एस. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांची दरसुची सन ९९-२००० नुसार रक्कम रु. १८,०५,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. सदर कामाचा खर्च हा दहावा वित्त आयोगाच्य प्राप्त होणाऱ्या निधीमधुन करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रक र. रु. १८,०५,०००/- एवढयाचे मंजुरीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्ली गेट ते मकाई गेट पर्यन्त उर्वरीत साखळीमध्ये ४५७ मीमी व्यासाची एम. एस. जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १८,०५,०००/- च्या अंदापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९९/४ :**

उप आयुक्त (म) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, एकनाथनगर, गाळा नं. ३२ घर नं. २८२ येथील आर्दश प्रायमरी स्कुल या शाळेचा अतिक्रमीत भाग अतिक्रमण विभागाने पाडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपाययोजनेसाठी मनपा शाळेचा सद्यपरिस्थितीत एकनाथनगर येथील शाळेच्या वापरात नसलेल्या जुन्या कॉलनीतील इमारतीच्या दोन खोल्यचा (क्र १०३ व १०४) भाडेतत्वावर एप्रिल अखेर पर्यंत देण्यात याव्यात अशी विनंती आर्दश प्रायमरी स्कुल या शाळेने केलेली आहे.
विद्यार्थ्यांच्या नजिकच्या काळात असणाऱ्या परीक्षा लक्षात घेता शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी मानवतेच्या दृष्टीकोनातुन सध्या रिक्त असलेल्या या दोन खोल्या भाडे समिती निश्चित करेल त्या भाडे दरानुसार व करारनामा करुन एप्रिल अखेर पर्यंत आदर्श प्रायमरी स्कुल या शाळेस भाडयाने देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथनगर गाळा नं. ३२ घ. नं. २८२ येथील आदर्श प्रायमरी स्कुल या शाळेचा अतिक्रमीत भाग मनपाचे अतिक्रमण विभागाने पाडल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपाय योजनेसाठी मनपा शाळेच्या सद्यस्थितीत एकनाथनगर येथील शाळेच्या वापरात नसलेल्या जुन्या कॉलनीतील इमारतीच्या खोली क्रं. १०३ व १०४ या दोन

खोल्या भाडे समिती निश्चित करेल त्या भाडे दरानुसार व करानामाकरुन एप्रिल अखेर पर्यंत आदर्श प्रायमरी स्कुल या शाळेस भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/५ :**

औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर सन २०००-२००१ या वित्तीय वर्षामध्ये खाजगी तत्वावर बांधा, वापर हस्तांतर करणे बोट पध्दतीने बरीचशी कामे करण्यासाठी प्रस्तावित आहे. सदरील कामे योग्य रितीने व्हावे, सदील कामांच्या अटी व शर्ती निश्चित करणे, तांत्रिक दृष्टया अंदाजपत्रक तयार करणे, सर्व कामांचे नियोजन करणे इत्यादी कामे करणेस्तव एक अधिक्षक तांत्रिक अधिकारी असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत शहर अभियंता/कार्यकारी अभियंता आहेत. यांच्याकडे फार मोठया प्रमाणात कामाचा व्याप आहे. त्याकरीता बोट पध्दतीने करावयाच्या कामाकरीता एक स्वतंत्र्य सेल तयार करुन त्यांचे मार्फत आपण कामाचे नियोजन आणि अंदाजपत्रक तयार करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदरील योजना तात्काळ मार्गी लावता येईल. या करीता कार्यकारी अभियंता किंवा अधिक्षक अभिंयता दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी सल्लागार म्हणुन नेमणे योग्य.

उपरोक्त प्रस्तावात सर्व कामे तांत्रिक सल्लागार यांनी करावे यासाठी त्यांना मदतीसाठी एक उपअभियंता व दोन कनिष्ठ अभियंता देण्यात येतील. म्हणजे त्यांनी सेल मार्फत बोट पध्दतीने सर्व कामे हाताळणे योग्य. त्यास्तव रुपये १०,०००/- प्रती माहे "मानधन" म्हणुन तांत्रिक सल्लागार यांची नेमणुक करणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्त सादर.

**संवाद :**

**श्री किशोर तुळशीबागवाले :** ऐनवेळचा एक प्रस्ताव सादर होऊन त्यात खाजगी तत्वावर बांधा, वापरा, हस्तांतर करा. बोट पध्दतीने काम करण्यासाठी १०,०००/- रुपये मानधनावर कार्यकारी अभियंता /अधिक्षक अभियंता सेवानिवृत्त असलेल्या अधिकाऱ्यांची तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणूक करावी. प्रस्तावात असेही नमुद केलेले आहे की, आपल्याकडील शहर अभियंता /कार्यकारी अभियंता यांचेकडे कामाचा व्याप जास्त आहे, म्हणुन अधिकऱ्यांची नेमणुक करावयाची आहे. आपले अधिकारी सक्षम नाही काय? यात असेही नमुद करण्यात आले की, एक उप अभियंता व दोन कनिष्ठ अभियंता देण्यात येतील. आपले अधिकारी त्यांचे बरोबर काम करण्यासाठी जाणार तर आपले अधिकारी सक्षम नाही काय. १०,०००/- रुपये मानधनावर असे अधिकारी नियमाने नेमता येतात काय, तशी तरतुद करण्यात येते का? याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :** आपण ऐनवेळचे सर्व विषय मंजुर केलेले आहे.

**श्री गणेश तांबे :** ऐनवेळचे कोणतेच विषय सभागृहातच वाचुन दाखवले नाही म्हणुन मंजुर झाले असे गृहीत धरता येणार नाही.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** सदरचे काम करण्यासाठी आपल्याकडील अधिकारी सक्षम नाही काय? नेमावयाचा असेल तर कायमस्वरुपी नेमावे.

**मा. सभापती :** हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे. या प्रस्तावावर विचार विनिमय करुन नंतरच निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :**

हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. या प्रस्तावावर विचार विनिमय करुन नंतर निर्णय घेण्यात येईल.

**सभागृहातील चर्चा :**

**श्री भरत लकडे :** मांडकी नारेगांव येथे खत निर्मीतीचा कारखाना आहे. किती जमीन भाडेने दिलेली आहे व मनपास त्यांचा काय फायदा होतो याची माहिती द्यावी.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** एकुण सात हेक्टर जमीन भाडेने दिलेली आहे. १/- रुपया प्रती हेक्टर जमीन भाडेने दिलेली आहे व एकुण खत निर्मीती वर ५% प्रमाणे रॉयल्टी घेण्यात येते.

**श्री भरत लकडे :** सरासरी किती रक्कम मनपास मिळावयास पाहिजे आतापर्यन्त किती रक्कम मिळालेली आहे?

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दर वर्षाला एकुण खत निर्मीतीवर नियमाने येणारी रक्कम वसुल करण्यात येते. बाकी राहीलेली रक्कम जमा करण्या संबंधी संबंधीतास नोटीस दिलेली आहे. त्यानंतर झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**श्री साहेबराव कावडे :** जे टेंडर झाले असेल ते रद्द करण्यात यावे. कचऱ्यामध्ये पाणी सोडले जाते. त्यामुळे जवळील सर्व नागरीकांना त्रास होतो. त्यासाठी खत म्हणुन विक्री केले तर २-३ लाख रुपये मनपास फायदा होतो.

**श्री भाऊसाहेब वाघ :** आपले अधिकारी/कर्मचारीच खत विकतात व मनपाच्या फंडातुन त्यांचा पगारही केला जातो. त्यामुळे मनपाचे दुप्पट नुकसयान होत आहे.

**मा. सभापती :** यात महानगरपालिकेस जास्तीत जास्त काय फायदा होऊ शकतो ते पहावे. संबंधीत अधिकारी यांनी पुढच्या बैठकीत ॲग्रिमेंट बाबत माहिती दाखवुन द्यावी. त्यानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

**श्री जगदीश सिध्द :** महानगरपालिकेतील इमारत निरिक्षक श्री भरत जैस्वाल यांनी खुप मोठया प्रमाणात मालमत्ता जमविली व त्याची चौकशी करण्या संदर्भात एक सन्माननीय सदस्य यांनी मागील बैठकीत चर्चा केलेली होती त्यानुसार संबंधीताने न्यायालयात दावा दाखल करुन सन्माननीय सदस्य यांना नोटीस दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांना जनतेनी महानगरपालिकेच्या हिताचे कामकाज करण्यासाठी निवडुन दिलेले आहे. नुकसान होणार नाही म्हणुन सन्माननीय सदस्य प्रश्न उपस्थित करणारच. अशा प्रकारची नोटीस स. सदस्यांना देणे नियमानुसार बरोबर आहे. का? विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा (नोटीसीची प्रत सनमाननीय सदस्य सभागृहात सर्वांना दाखवतात.)

**श्री मधुकर सांवत :** श्री जैस्वाल यांनी न्यायालयामार्फत सन्माननीय सदस्य यांना नोटीस दिली. न्यायालयात जाण्यासाठी त्यांनी मा. आयुक्तांची परवानगी घेतलेली आहे काय? घेतलेली नसल्यास कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

**उप आयुक्त (प्र) :** न्यायालयाची नोटीस प्रशासनाकडे आलेली आहे. सदर क्लेममध्ये काय दिलेले आहे हे वाचुन दाखविण्यात येईल. संबंधीताचे न्यायालयात जाण्यासाठी प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.

**सौ. विजया रहाटकर :** नगरसेवकांना अशा प्रकरणात नोटीस येत असेल तर योग्य नाही. असे होत असेल तर यापुढे सभा कामकाजही चालवता येणार नाही. श्री जैस्वाल यांनी न्यायालयात दावा दाखल करण्याची कोणतीही परवानगी मा. आयुक्तांची घेतलेली नसल्याने त्यांनी त्यांचे सेवेचा, पदाचा गैरफायदा

घेतलेला आहे. म्हणुन कायदेशीररित्या माननीय आयुक्त यांनी त्यांचेवर कार्यवाही करावी.

**श्री जगदीश सिध्द :** शासनाच्या नियमानुसार त्यांनी त्यांचे पदाचा गैरवापर केलेला आहे. त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. शासनाचे जी. आर. वाचुन दाखवावे. त्यानुसार ताबडतोब त्यांचेवर कारवाई करण्यात यावी.

**उप आयुक्त (प्र) :** शासनाकडुन जो जी. आर. प्राप्त झालेला आहे, तो वाचुन दाखवतो. (मा. उप आयुक्त (प्र) शासन जी. आर. ची प्रत वाचुन दाखवतात.)

"अखिल भारतीय सेवा (वर्तणूक) नियम, १९६८ च्या नियम ३ व ७ व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम ३ व ९ अन्वये प्रत्येक शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी कधीही असे कृत्य करु नये जेणे करुन शासनाच्या नियमांचा भंग होईल. त्याच प्रमाणे त्यांनी असे कोणतेही कृत्य करु नये ज्यामुळे केंद्र व राज्य शासन यांच्या मधील परस्पर संबध अडचणीत येतील. सदर नियमांचा भंग झाल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतात.

शासनातील गाऱ्हाणे निराकरणाची प्रक्रिया न पाळणे व परस्पर न्यायालयाकडे धाव घेणे, त्याच प्रमाणे परस्पर केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करुन राज्य शासनावर टिका करणे हे स्पष्टपणे वर नमुद केलेल्या नियमांचे उल्लघंन होय."

(शासन परिपत्रक क्र. भाप्रसे १५९९/प्र. क्र.२०६-९९/नऊ,दिनांक २८/७/१९९९)

या शासन जी. आर. नुसार संबंधीताने जी कार्यवाही केलेली आहे ती बसते किंवा काय याची तपासणी करुन संबंधीत श्री बी. के. जैस्वाल यांचेवर नियमाने कार्यवाही करण्यात येईल.

**श्री मधुकर सांवत, श्री जगदीश सिध्द :** शिस्तभंगाची कार्यवाही म्हणुन मा. आयुक्तांनी त्यांना ताबडतोब निलंबीत करावे व तसे आदेश मा. सभापती यांनी द्यावेत.

**मा. सभापती :** शासन नियमानुसार संबंधीत श्री जैस्वाल यांनी शिस्तभंग केलेला असेल तर नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री सलीम पटेल :** १० लाखापर्यंतच्या कामाचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना प्रदान झालेले आहे. तसेच तीन कार्यकारी अभियंता दर्जाचे जे अधिकारी आहेत त्यांना अधिकार देण्यात आले. परंतु टेक्नीकल विभागास किती रुपये पर्यंतचे अधिकार देण्यात आले.

**मा. सभापती :** पुढील बैठकीत या संबंधी सविस्तर माहिती देण्यात यावी.

**श्री जगदीश सिध्द :** साडया खरेदी करण्यासाठी टेंडर निघाले होते. टेंडर नुसार कार्यवाही न करता ज्यांनी वॉईस करुन दिल्या त्या नुसार साडया घेण्यात आले. परंतु ज्यांनी टेंडर भरले होते त्यांना वाटाघाटीसाठी पुन्हा बोलावले नाही. का बोलावण्यात आले नाही याचा खुलासा करावा.

**मुख्य लेखाधिकारी :** किती रक्कमेपर्यंत साडया खरेदी करावयाच्या त्याची रक्कम निश्चित सांगता येणार नाही. परंतु आपल्या महानगरपालिकेत सन १९९६ ला निर्णय घेतलेला आहे की, साडया खरेदीसाठी महानगरपालिकेत ज्या संघटना आहेत त्या संघटनेचे पदाधिकारी व प्रत्येक संघटनेचे काही कर्मचारी बोलावुन त्यांचे पसंतीनुसार खरेदी कराव्यात. त्यानुसार कार्यवाही केलेली आहे.

**मा. सभापती :** १० मिनीटात संबंधीत अधिकाऱ्यांनी संचिका मागवुन सविस्तर माहिती द्यावी.

**श्री जगदीश सिध्द :** संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना बोलावुन साडया खरेदी करावयाच्या होत्या तर टेंडर कशासाठी मागवले.

**मुख्य लेखाधिकारी :** सन १९९६ ला स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे की, कर्मचाऱ्यांच्या पसंतीने साडया खरेदी कराव्यात तसा प्रशासकीय प्रस्ताव सादर करण्यात येतो. परंतु काही संघटना होय म्हणतात, काही नकार देतात. त्यामुळे वाद निर्माण होतो. साधारणतः ४ ते ४ १/२ (चार ते साडेचार लाख) लाखापर्यंतची खरेदी असते. पसंतीनुसार खरेदी करायचे नसेल तर पुन्हा स्थायी समितीने तसा निर्णय घ्यावा. त्यानुसार पुढील वर्षापासुन कार्यवाही करण्यात येईल व कोणत्या प्रकारचा ड्रेस खरेदी करावयाचा तेही निश्चित करण्यात यावे. असे केल्यास अडचण येणार नाही व पुढील वर्षापासुन तशी कार्यवाही करण्यात येईल.

**श्री जगदीश सिध्द, श्री कैसरखान :** कोणते ड्रेस खरेदी करावयाचे ते निश्चित करावे.

**मा. सभापती :** शासनाच्या नियमानुसार कोणते ड्रेस असावेत त्यानुसार कार्यवाही व्हावी. ड्रेस पंसत करण्यासाठी महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, मा. आयुक्त तसेच मुख्य लेखाधिकारी राहतील व पुढील वर्षापासुन त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. यापुढे संघटनेच्या किंवा कर्मचारी ड्रेस पसंत करतील त्यानुसार कार्यवाही होऊ नये.

**श्री जगदीश सिध्द :** साडया खरेदी बाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**मुख्य लेखाधिकारी :** एकुण ५ एजन्सीकडुन साडयाचे निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यात एकुण ३३० नग होते. एजन्सीचे दर, नग प्राप्त झालेल्यात ४८६, ४६२, ६५४, ४००, ३०३, २७५, ४५४ असे साडयांचे दर होते. सन १९९६ मध्ये स्थायी समितीने असा निर्णय घेतलेला आहे की, साडया खरेदीच्या वेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यां समवेत चर्चा करुन त्यांचे सोबत काही कर्मचारी यांचे पसंतीनुसार घ्याव्यात. त्यानुसार काही वाद निर्माण होऊ नये म्हणुन संघटनेच्या पदाधिकारी व काही कर्मचारी यांच्या पसंतीने साडया घेण्याची कार्यवाही केली. वरील दरापैकी ४५०/- रुपये किमंतीची साडी खरेदी करण्याचे मान्य केल्यानुसार कार्यवाही केली. प्रत्येक एजन्सीच्या दर, नगा सहित निविदा झालेल्या होत्या म्हणुन चर्चेसाठी इतर एजन्सीला बोलावण्याची गरज नाही, असे माझे मत आहे.

**श्री सलीम पटेल :** श्री अब्दुल कदीर, मक्तेदार यांची विनंती अर्ज आलेला आहे. त्यांची निविदा मान्य करण्यात आली होती व गणेश कॉलनी येथील विहिरीतील गाळ काढण्यासाठी २% अनामत रक्कम त्यांनी न भरल्यामुळे त्यांचा काळया यादीत समावेश केलेला आहे. ते रक्कम भरण्यास तयार आहे. तरी त्यांचे नांव काळया यादीतुन काढण्यात यावे असे अर्ज दिलेले आहे. ते मान्य करावे.

**श्री गणेश तांबे :** एकदा काळया यादीत नांव समाविष्ट केल्यानंतर अशा मक्तेदारास पुन्हा कामे देण्याची प्रथा बंद करावी व त्याचे नांव काळया यादीतच ठेवावे.

**कार्य. अभियंता :** गणेश कॉलनी येथील विहिरीतील गाळ काढण्याची निविदा त्यांची मान्य करण्यात आलेली होती व २% अनामत रक्कम भरण्याबाबत त्यांना वेळोवेळी सुचना दिलेल्या असतांनासुध्दा रक्कम भरलेली नाही म्हणुन त्यांचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्यात आलेले आहे.

**श्री सलीम पटेल :** त्याचा एम. बी. फॉरमेट करु शकतो. काळया यादीत नांव समाविष्ट करणो योग्य ओह काय. ते अनामत रक्कम भरण्यास आता तयार आहे. तरी त्यांचे अर्जावर निर्णय व्हावा.

**मा. सभापती :** ठिक आहे. सन्मानयी सदस्यांच्या भावना लक्षात घेता अब्दुल कदीर, मक्तेदार यांचे काळया यादीतुन नांव वगळण्यास मंजुरी देण्यात येते.

**श्री सुरगोणीवार नारायण :** पावसाळयामध्ये एका नालीचे पाणी येऊन थांबते, त्यामुळे मोकळया जागेवर घाण येऊन साचते. तेथे काम करण्यासाठी सहा महिन्यांपासुन टेंडर निघालेले आहे. परंतु अद्याप कामास सुरुवात झालेली नाही.

**कार्य. अभियंता (पापु व ज. नि.) :** या कामाबाबतचय निविदा प्राप्त झालेल्या आहे. निविदा अंतिम मंजुरीसाठी आहे. मंजुरी मिळाल्यानंतर ताबडतोब काम सुरु करण्यात येईल.

**मा. सभापती :** अंतिम मंजुरी झाल्यानंतर तात्काळ काम सुरु होण्याबाबत दखल घेण्यात यावी.

**मा. आयुक्त :** सन्माननीय सदस्य श्री सुरगोणीवार यांनी जी सुचना मांडली त्या संदर्भात तेथील जनतेने मनपास मालमत्ता कर भरावा, त्यानुसार सुविधा देण्यात येतील.

**मा. सभापती :** तेथील जनता मालमत्ता कर भरण्यास तयार आहे, असे सन्माननीय सदस्य यांचे म्हणणे आहे. कर देण्यास नागरीक तयार असतील तर अगोदर सुविधा द्याव्यात. तेथील नागरीक कर भरतील.

**श्री मोतीलाल जगताप :** अनाधिकृत वस्त्यांमध्ये सर्व्हे करण्याबाबतचे टेंडर निघालेले आहे. अंतिम निर्णयास्तव आहेत. निर्णय झाल्यानंतर ताबडतोब वर्क ऑडर देण्यात येतील व त्यामध्ये सर्व्हे करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिलेला आहे. शहरात एकुण ७० वसाहती आहे. एका महिन्यात सर्व्हे करण्याचे काम होईल का?

**श्री साहेबराव कावडे :** ज्या एजन्सीला हे काम दिलेले आहे त्यांचेकडे आवश्यक कर्मचारी वर्ग दिलेला आहे काय?

**मा. सभापती :** सर्व्हे ताबडतोब व्हावा यासाठी वेळेची मर्यादा ठेवावी. उशीर झाल्यास संबंधी अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री भरत लकडे, श्री भाऊसाहेब वाघ :** संगणक प्रशिक्षण तसेच वाहन चालक प्रशिक्षण देणार होते. त्या संबंधी काय झाले, खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** यासबंधीचे टेंडर निघालेले आहे. उत्कृष्ट दर्जाचे साहित्य कसे मिळेल या दृष्टीने योग्य ती सवीस्तर माहिती मागवलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**श्री सलीम पटेल :** उप अभियंता (टेक्नीकल) हे पद आपल्याकडे रिक्त आहे काय.

**मा. सभापती :** यासंबंधी सविस्तर माहिती पुढील बैठकीत देण्यात येईल.

(राधा प्रेम ट्रॅव्हल द्वारे आयातीत विना जकात आयात मला संदर्भात चौकशी समितीचा अहवाल मा. मुख्य लेखाधिकारी यांनी सभागृहासमोर सादर केला. अहवाल खालील प्रमाणे.)

(दिनांक ७.१२.२००० रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीच्या सभेत झालेल्या चर्चेनुसार राधा प्रेम ट्रॅव्हल्स द्वारे विना जकात मालाची दंड वसुलीबाबत चौकशी समितीचा अहवाल खालील प्रमाणे आहे.)

दिनांक २१.१२.२००० रोजी चौकशी समितीच्या सदस्यासह मध्यवर्ती नाका स्थित कार्यालय येथे जकात अधिक्षक व निरिक्षक यांचा राधाप्रेम ट्रॅव्हलस द्वारे आयातीत विना जकात माला संदर्भात जाब जबाब घेतला. दिनांक १.१२.२००० रोजी राधा प्रेम ट्रॅव्हल्सेच विधवा मालकीण यांच्या मोठया मुलीचे लग्न असल्यामुळे व लग्न समारंभा करीता नातेवाईक व पाव्हणे मंडळी जमा झालेली होती. त्यामुळे जकात अधिक्षक व जकात निरिक्षक यांनी मानवतावादी दृष्टीकोन ठेवुन विना जकात संपुर्ण माल मध्यवर्ती नाका येथे न आणता व माल आयातक विना जकात मालावर दंड भरण्यास तयार असल्यामुळे व जकात अधिक्षक हे प्रत्यक्ष घटना स्थळावर उपस्थित राहुन मालाची खुली तपासणी करण्यात येवुन जकात व जकातीचे दहापट दंड वसुली बाबत कार्यवाही केली.

**निष्कर्ष :**

राधा प्रेम ट्रॅव्हल्सचे विधवा मालक यांच्या मोठया मुलीच लग्न असल्यामुळे जकात अधिक्षक यांनी त्यांच्या नातेवाईक समोर त्यांची बदनामी होवु नये हा मानवतावादी दृष्टीकोन ठेवल्यामुळे त्यांनी माल मध्यवर्ती नाका येथे न आणता घटना स्थळीच मालाची खुली तपासणी करण्यात येवुन दहापट दंडापोटी र. रु. २२,९९०/- इतकी वसुली केलेली असुन ती नियमानुसार करण्यात आलेली आहे. दंड वसुली करताना जकात अधिक्षक हे प्रत्यक्ष घटना स्थळी उपस्थित राहिल्यामुळे त्यांच्यावर संशय घेणे संयुक्तीक वाटत नाही. तथापी यापुढे अशा प्रकरणात सन्माननीय सदस्य अथवा पदाधिकारी, वरीष्ठ अधिकारी यांचे सुचनांचे पालन करण्यात येवुनच कार्यवाही करणेबाबत जकात अधिक्षक यांना सुचित करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| मुख्य लेखाधिकारी | उप आयुक्त (प्र) | सभापती |
| म.न.पा. औरंगाबाद. | म.न.पा. औरंगाबाद. | म.न.पा. औरंगाबाद. |

याच बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सभापती | नगर सचिव |
| स्थायी समिती | महानगरपालिका औरंगाबाद |
| महानगरपालिका औरंगाबाद. | |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १३-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**मंगळवार दिनांक १३-०३-२००१ रोजी दुपारी ३.३० वाजता मा.सभापती श्री.अशरफ युनुस मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " येथे "वंदे मातरम्" या गिताने सुरूवात झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
२) स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
३) स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
४) स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
५) स.स.श्री.सिध्द जगदीश कन्हैय्यालाल
६) स.स.श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
७) स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर
८) स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
९) स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१०) स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
११) स.स.श्री. सलिम पटेल समशेर पटेल
१२) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
१३) स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या

**संवाद :**

**श्री.गणेश तांबे :** तालीबान यांनी ५३.४ मी.उंचीचे भगवान बुध्दांचे पुतळे फोडले अशा अमानवीय व गैरकृत्य करणाऱ्यांचा या सभागृहातर्फे निषेध करण्यात यावा.

**श्री.जगदीश सिध्द:** सन्माननीय सदस्य श्री.तांबे यांनी माडलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे. या संदर्भात इमाम बुखारी यांनी जे वक्तव्य केले जे की, या देशातील नतेमध्ये असंतोष निर्माण झाला. त्याबदद्लही असे वक्तव्य करणाऱ्या इमाम बुखारी यांचाही सभागृहाने करावा.

**श्री.भरत लकडे :** यास माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :** सभागृहातर्फे निषेध करण्यात येतो.

**श्री.जगदीश सिध्द:** लोकशाही दिनाच्या दिवशी मा.जिल्हाधिकारी यांनी सन्माननीय सदस्या सौ.विजया रहाटकर यांना ही काही महानगरपालिकेची सर्वसाधरण सभा नाही असे बोलून अपमानीत केले. स. सदस्या त्यांचे वार्डातील काही नागरिकांसह निवेदन घेवून त्यासंबंधि बोलण्यास उभे राहील्या असता वरील शब्द बोलून अपमान केला. तो सन्माननीय सदस्य याचाच अपमान झालेला नाही तर या सभागृहाचा अपमान झालेला आहे. करीता मा. जिल्हाधिकारी यांचा याबदद्ल निषेध करण्यात यावा.

**श्री.गणेश तांबे :** स.सदस्य श्री.सिध्द यांनी अत्यंत महत्वाचा निषेधाचा प्रस्ताव मांडलेला आहे. एक लोकप्रतिनिधी त्यांचे वार्डातील काही समस्या सोडवण्या निमित्त निवेदन घेवून गेलेल्या होत्या. प्रत्यक्ष निवेदन देवून बोलण्यास उभे राहिल्यास मा. जिल्हाधिकारी यांनी ही महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा नाही . आपली

तक्रार वैयक्तीक नाही. म्हणून खाली बसण्यास सांगितले म्हणून एक लोकप्रतिनिधी हा एका वार्डातील जवळपास १० हजार नागरिकांनी निवडून दिलेले असते व असे वक्तव्य करून स.सदस्यांना बोलणे योग्य नाही. म्हणून मा.जिल्हाधिकारी यांनी स.सदस्या सौ.रहाटकर यांचाचा नाही तर महानगरपालिकेचा अपमान केलेला आहे.

शहराचा कारभार पाहणाऱ्या महानगरपालिकेच्या एका स.सदस्यांना अपमानीत केले जाते म्हणजेच महानगरपालिकेच्या सभागृहाला तुच्छ समजणाऱ्या मा.जिल्हाधिकारी यांचा निषेध करणे योग्यच आहे आणि तसा सभागृहातर्फे निषेध करावा.

**मा.सभापती :** मा.जिल्हाधिकारी यांनी आपल्या सभागृहाच्या स.सदस्या सौ.रहाटकर यांना अपमानीत केले त्याबदद्ल मा.जिल्हाधिकारी याचां या सभागृहातर्फे निषेध करण्यात येतो.

**श्री.गणेश तांबे ,सौ.विजया रहाटकर :** या सभागृहाचे स.सदस्य श्री.दलबिरसिंग जबिंदा हे गुरूद्वारा बोर्डवर निवडू आले त्याबदद्ल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

**मा.सभापती :** या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.दलबिरसिंग जबिंदा यांचे गुरूद्वारा बोर्डवर निवडून आल्याबदद्ल या सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत येते. आता विषय क्रमांक १ वर चर्चा करावी. नंतर जनरल चर्चा करण्यात येईल.

**विषय क्र.१०२/१:**

दिनांक ७.२.२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री.जगदिश सिध्द:** मागील बैठकीत श्री.के.एम.बोथरा, क.लिपीक यांना बडतर्फ करण्या बाबतचा ठराव पारीत करण्यात आला.

इतिवृत्त कायम करण्यापुर्वी त्यांनी मा. उच्च न्यायालयात स्थगिती मिळविली. तोपर्यंत त्यांना बडतर्फ करणे योग्य होणार नाही. त्याचा विचार व्हावा.

**मा. उप आयुक्त (प्र):** न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कार्यवाही होईल.

**मा.सभापती :** विषय क्र.१ सर्वानुंमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक ७.२.२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०३/२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला कि, एन-६ साईनगर येथील म्हाडा वसाहतीमधील खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे बाबतचे अंदापजत्रक र.रू.११,७१,१४०/- चे सन ९९-२००० च्या सा.बां. विभागाच्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च " शासकीय अनुदान" या लेखा शिर्षकातून करण्यात येणार आहे. सदर खर्चास मा. आयुक्तांनी दिनांक १२.१.२००१ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**मा.सभापती :** विषय क्र.२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन -६ साईनगर येथील म्हाडा वसाहतीमधील खुलया जागेवर उद्यान विकसित करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.११,७१,१४०/- च्या अंदापजत्रकास सर्वानुते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०४/३:**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, मो.किराडपूरा (स्लम) वार्ड क्र.७२ मध्ये काँक्रीट रस्ते तयार करणे व इतर कामाकरीता सा.बां. खातेच्या ९८-९९ च्या दरसुचीनुसार अंदापजत्रक र.रू.१३,६४,३८६/- चे तयार करण्यात आले ओ. सदरील कामाचा खर्च म्हाडाच्या राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम वर्ष २०००-२००१ अंतर्गत करण्यात येईल.

सदरच्या अंदापजत्रकास मा. आयुक्त यांनी दिनांक २.३.२००१ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. करीता अंदापजपत्रक रू.१३,६४,३८६/- चे मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री.गणेश तांबे :** नऊ महिन्यापुर्वी स्लम भागात काम व्हावे म्हणून संबंधीत अधिकारी यांना पत्र दिलेले होते. निधी उपलब्ध नाही म्हणून काम करता येत नाही असे अधिकाऱ्यांनी उत्तर दिलेले आहे. तर हा स्लम भागामध्येच काम करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. यासाठी निधी कसा उपलब्ध करण्यात आलेला आहे याचा खुलासा द्यावा.नगरसेवकांची अधिकारी दिशाभूल करत असून भेदभाव करत आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवर आम्ही विश्वास ठेवतो परंतु अधिकारी खोटी माहिती देतात असे या प्रस्तावावरून दसून येते. याचाही खुलासा करावा.

**श्री.मधुकर सावंत :** माझ्या वॉर्डामध्ये स्लम भागात ज्युनिअर इंजिनिअर यांनी २ ते २.२५ लाखाचे एक इस्टीमेट केलेले असून त्याचा पाठ पुरावा करतो आहे. बजेट नाही म्हणून काम होत नाही. आम्ही मागणी केल्यानुसार कामे व्हावीत.

**श्री.नारायण सुरगोणीवार:** माझ्या वार्डामध्ये चिश्तिया कॉलनी येथे स्वेच्छा निधीतून तसे इतर बजेटमधून सुध्दा कोणतेही कामे झालेली नाहीत.

**श्री.गणेश तांबे:** स्लमसाठी जो बजेट ठेवण्यात आलेला आहे तो स्लममध्येच कामावर खर्च करावा. दुसरीकडे वळती करू नये.

**सौ.कुसुमताई खरात :** माझा वार्ड स्लम भाग असून रोजाबाग सिध्दार्थनगर येथील गटार व्यवस्थेसंबंधिची एक संचिका सहा महिन्यापासून चालू होती.ती संचिका निधी उपलब्ध नाही म्हणून परत पाठविलेली आहे. तसेच रोजाबाग येथे महानगरपालिकेची उर्दू माध्यमाची शाळा असून ७ वर्ग व शिक्षक ३ अशी अवस्था आहे. मुलांना बसण्यास जागा अपुरी पडते शाळेच्या खोल्या लहान असून मुलांना मुत्री नाही. तसेच शाळेमध्ये लाईटची, पाण्याची व्यवस्था नाही. यासाठी योग्य सुविधा मिळाव्या म्हणून मी प्रशासनाकडे पत्र दिलेले होते. अद्याप काहीही कार्यवाही करण्यात आलेली नसून उर्दु शाळेमध्ये सर्व गरीबांची मुले शिक्षण घेत आहेत. मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या संदर्भात प्रशासन का कार्यवाही करत नाही. मा. सभापती यांनी खुलासा घ्यावा.

**श्री.गणेश तांबे:** अधिकारी यांनी सर्व स.सदस्यांचा स्वभाव पाहून घेतलेला असून जे. स.सदस्य खडसून बोलतात त्यांचेच वार्डामध्ये विकास कामे हात आहेत असे दिसून येते.

**प्र.कार्य.अभियंता (स्लम):** स्लम भागामध्ये विकास कामे होण्यासाठी म्हाडाकडे आपण एक कोटी ६७ लाख चे प्रस्ताव दिलेले होते. म्हाडा कडून दरडोई संख्या विचारात घेवून प्रशासकीय मान्यता म्हाडाकडून मिळालेली असून हे काम म्हाडाच्या राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार कार्यक्रम यामधून करण्यात येत आहे.

**श्री.मधुकर सावंत :** ठराविक नगरसेवकांच्या वार्डात कामे होत आहे. अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहे. माझ्या वार्डामध्ये या योजनेतून केव्हा कामे केलेली आहे, खुलासा द्यावा. माझ्या वार्डात दलित वस्ती जास्त आहे.

**प्र.कार्य.अभियंता (स्लम):** आपण म्हाडाकडे सविस्तर प्रपोजल पाठविलेले आहे. म्हाडा दरडोई विचार करून मान्यता देते. त्यांनी वेगवेगळया वस्तीसाठी पैसे दिलेत. राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम व दलित वस्ती सुधारणा कार्यक्रम हया वेगवेगळया योजना आहेत.

**श्री.मधुकर सावंत,गणेश तांबे :** अधिकारी सभागृहाची दिशाभूल करत आहेत. या कामा संदर्भात इस्टीमेट कोण तयार करतात. जाणीव पुर्वक दलित वस्त्यामध्ये विकास कामे थांबून आहेत. ताबडतोब कामे केली जातील असे अधिकाऱ्यांकडून नेहमीच आवश्वासन मिळते जनतेची कामे होत नसतील तर जनतेनी आम्हाला कशासाइी निवडून दिलेले आहे.

**श्री.मधुकर सावंत :** म्हाडाने मंजुर केलेल्या प्रस्तावात कोणकोणत्या वार्डामध्ये कामे केलेली आहेत त्याचा खुलासा करावा.

**श्री.गणेश तांबे :** माझ्या वार्डामध्ये लाखो रूपये खर्च करून संरक्षित भिंतीचे काम केलेले आहे. कारण की नाल्यालगत असलेल्या घरांना धोका हावू शकतो. परंतू गेल्या तीस वर्षापासून त्या नाल्याला भयंकर महापूर आलेला नाही हे कुणीही सांगू शकेल. झालेला खर्च वाया गेलेला आहे. ज्या कामासाठी निधी खर्च करायचा ती कामे करण्याचे धाडस प्रशासन करत नसून ज्या कामाची आवश्यकता नाही ती कामे करत आहे. संबंधित ठेकेदारानी मातीसुध्दा उचलून बाजूला केलेली नाही. जवळच बाजुला १० फुट माती व मुरूम पसरवून दिला व आता पुन्हा ती माती उचलण्यासाठी टेंडर सादर होईल. मनपाचा खर्च होईल. एक नगरसेवक हे ठेकेदार कसे होवू शकतात याचाही खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती :** आपण यादी द्या ावी. नगरसेवक यांच्या नावांवर काम चालू आहे का ते पाहू. जे नगरसेवक ठेकेदार असतील त्यांचेवर प्रशासन कार्यवाही करेल. हा प्रस्ताव स्थगित ठेवायचा किंवा कसे याबाबत मत मांडावे.

**श्री.दलबिरसिंग दबिंदा :** स.सदस्य श्री.तांबे यांचा प्रश्न वेगळा आहे. त्यांचे वार्ड स्लम असून कामे का होत नाही, असे त्यांचे म्हणणे असून प्रस्ताव स्थगित ठेवू नये.

**श्री.गणेश तांबे :** प्रस्ताव स्थगित ठेवू नये. यास मंजुर करण्यास आमचा विरोध नाही. परंतू आमच्या वार्डात कामे का होत नाही हा माझा प्रश्न आहे.

**मा.सभापती :** मा. आयुक्त या संदर्भात खुलासा करतील.

**मा.आयुक्त :** सभागृहाला माझे अत्यंत विनम्र विनेदन आहे. जसे आमदार निधी, खासदार निधी किंवा डी.पी.डी.सी. चा काही प्लॅन असेल. पुढचा वर्षिचा अगोदरचा

जो प्लॅन असतो हा आदल्या वर्षीच्या ऑगस्ट-सप्टेंबर पासून सुरू होत असतो . १ एप्रिल पासून आाले आर्थिक वर्ष सुरू होत असते. ५३ स्लम घोषित आहे. त्या ठिकाणी येणाऱ्या वर्षामध्ये आता समान पध्दतीने काम करण्याबाबत आजच आपण असा निर्णय घ्यावा. १ एप्रिल पासून सर्वच स्लम वार्डाना समान निधी वापरता यावा. आपण प्रस्ताव तयार करतांना कामे वाढून दिली. असमतोल होणार नाही. दरी पडली तर थांबवू शकतो. आपण १ कोटी ६७ लक्ष रूपयांची प्रस्ताव दिलेले आहे. त्यातून फक्त ५५ लक्ष रूपयांची कामे करण्यास मंजुरी प्राप्त आहे. हा निधी आताच आपण वापरण्याबाबत कार्यवाही केली नाही तर तो निधी वाया जाईल व वर्ष चालू असतांना निधी उपलब्ध करण्यास व तसे प्रस्ताव सादर करण्यास वेळ लागल्यास प्रत्येक वार्डात समान कामे जे की आता आपल्याकडे ५५ लक्ष रूपयांचा निधी प्राप्त झाला असून ३१ मार्च पर्यंत कामे करणे शक्य होणार नाही म्हणून आपण अगोदर कार्यवाही करत असून यापुढे १ एप्रिल पासून ज्या वार्डात स्लम ओत व त्या वार्डातील नगरसेवकांनी कोणती कामे करावयाची ते सुचविल्यास तया प्रमाणे इस्टीमेट बनविता येईल. असे जर सर्वांना मान्य असेल तर मा. सभापतींनी निर्णय घ्यावा.

**श्री.साहेबराव कावडे :** जे स्लम भागासाठी बजेट ठेवलेले आहे ते आणखी वाढवून देण्यांत यावे.

**मा.आयुक्त :** जिल्हाधिकारी म्हणून काम करतांना आमदारांच्या निधीतून जो प्लॅन तयार करण्यात येत असतो, शाळेला सुध्दा निधी देता येतो. आमदार साहेबांकडे बऱ्याच लाकांचे डिमांड असतात व तशी यादी आपण तयार केली व त्याला जर प्राधान्य करून दिले जे कि, ही माझी १० कामे करणे आवश्यक आहे तशी यादी दिली त्यानुसार कामे वेळेवर होतील. काही अडचण येणार नाही या संदर्भात सर्वांचे संमतीनेच कामे केली जातील. तसा निर्णय घेण्याची तयारी असेल तर कार्यवाही करण्यात येईल.

**मा.सभापती :** विषय क्र.३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.किराडपूरा (स्लम) वार्ड क्र.७२ मध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे व इतर कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१३,६४,३८६/- च्या अदापजत्रकास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०५/४:**

स्थायी समिती विषय क्र.५७९/२० दिनांक ४.२.२००० अन्वये सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळेकरीता व्यायामाचे साहित्य खरेदी करण्यांस मंजुरी प्राप्त झाली आहे. परंतु, प्रस्तावात नजरचुकीने ॲटम क्रमांक २ ते २१ चे दर मे.रणवीर इंजिनिअरिंग यांनी दिलेल्या दरापेक्षा २५% कमी दराने साहित्य खरेदी करण्यात यावे असे नमुद करण्यांत आले होते. वास्तविक संचिकेत ॲटम क्र.२ ते २१ हे साहित्य त्यांच्या दरापेक्षा ५% कमी करून खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

मे. रणवीर इंजिनिअरींग यांच्याशी दराबाबत प्रत्यक्ष वाटाघाटी करण्यांत आल्या असता ॲटम क्र.१ "मल्टीजीम " हा रूपये १,४४,९३०/- ऐवजी रूपये २,२५,०००/- मध्ये ॲटम क्रमांक २ ते २१ मध्ये सरसकट ५% दर कमी करून रू.१,६९,५७५/- मध्ये एकूण

ॲटम क्रमांक १ ते २१ चे सर्व ॲटम रक्कम रू.२,९४,५७५/- मध्ये मे.रणवीर इंजिनिअरींग यांच्याकडून खरेदी करण्यास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

तरी मा. स्थायी समिती ठराव क्र.५७९/२० दिनांक ४.२.२००० मध्ये दुरूस्ती करून ॲटम क्र.१ रक्कम रूपये १,२५,०००/- मध्ये ॲटम क्रमांक २ ते २१ यांचे दर २५% कमी ऐवजी ५% कमी करून रक्कम रूपये १,६९,५७५/- असे एकूण रक्कम रूपये २,९४,५७५/- मध्ये मे.रणवीर इंजिनिअरींग यांच्याकडून खरेदी करण्याचे दुरूस्ती करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ जलतरण तलाव येथील व्यायाम शाळेकरीता व्यायामाचे साहित्य खरेदी करण्याकरीता स्थायी समिती ठराव क्र.५७९/२० दिनांक ४.२.२००० मध्ये ॲटम क्र.२ ते २१ यांचे दर २५% कमी या दराने मंजुरी मिळालेली आहे. उपरोक्त ठरावात मंजुर निविदा प्रमाणे दुरूस्ती करून ॲटम क्र.१ रू.१,२५,०००/- मध्ये व ॲटम क्र.२ ते २१ यांचे दर २५% कमी ऐवजी ५% कमी करून र.रू.१,६९,५७५/- असे एकूण र.रू.२,९४,५७५/- मध्ये मे.रणवीर इंजिनिअरींग यांच्याकडून खरेदी करण्याचे दुरुस्त प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६/५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे कि, महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री इत्यादीचा जाहीर लिलाव दिनांक ८.२.२००१ रोजी यांत्रिकी कार्यशाळा, बायजीपुरा येथे बोली पध्दतीने करण्यात आला. जाहीर लिलाव करण्याबाबतची नोटीस दैनिक लोकमत, एकमत, नवा मराठा व आलमगीर टाईम्स (उर्दु) या वर्तमानपत्रात देण्यांत आली होती. मा. आयुक्त ,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी जाहीर लिलाव संबंधि निर्णय घेण्यासाठी खालील अधिकाऱ्यांची "लिलाव समिती स्थापन करण्यास मंजुरी दिली होती.

१ उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद
२ अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद
३ मुख्य लेखा परीक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद
४ मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद
५ मेकॅनिकल इंजिनिअर,एस.टी.वर्कशॉप,औरंगाबाद
६ मोटार वाहन निरीक्षक, आर.टी.ओ.औरंगाबाद
७ उप अभियंता (यांत्रिकी) , इरिगेशन मेकॅनिकल डिव्हीजन,औरंगाबाद

एकूण ६९ बोली दारांनी रूपये १०,०००/- प्रत्येकी अनामत रक्मेचा भरणा करून लिलावात भाग घेतला. हया पुर्वीच्या ॲक्शन कमिटीने दिनांक २८.१.१९९९ रोजी ठरविलेल्या अपसेट व्हॅल्युचा सिलबंद लिफाफा कमिटी मेंबर्स समोर फोडण्यात आला. जुन्या टायर्स, ऑईल, भंगार स्पेअर पार्टस् मध्ये वाढ झाल्यामुळे त्यांचीकिंमत ठरविण्यात आली. मनपाने प्रत्येक ॲटमसाठी खालीलप्रमाणे किंमत (अपसेट व्हॅल्यु) काढली होती.

| अ.क्र. | विवरण | मॉडेल | ठरविलेली किंमत |
|---|---|---|---|
| १ | एम.एक्स.व्ही.१७९/(ॲम्बेसिडर कार) | १९७९ | १५,०००/- |
| २ | एम.व्ही.जी.८८९०/(ॲम्बेसिडर कार) | १९८८ | १५,०००/- |
| ३ | एम.व्ही.जी.८८९०/(ॲम्बेसिडर कार) | १९८८ | १५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | एम.एच.२०/ई -२०० /(ॲम्बेसिडर कार) | १९८९ | १५,०००/- |
| ५ | एम.एच.२०/ई -२०० /(ॲम्बेसिडर कार) | १९९२ | ३५,०००/- |
| ६ | एम.एच.२०/ई -२०० /(ॲम्बेसिडर कार) | १९९२ | ३०,०००/- |
| ७ | एम.ए.ए.१०५ (जीप) | १९८५ | ३५,०००/- |
| ८ | एम.एच.२०/३८६८(मीनी बस) | १९८३ | ३५,०००/- |
| ९ | एम.डब्ल्यु.पी/१५०७ (मेटाडोर) | १९८३ | २६,०००/- |
| १० | एम.एक्स.व्ही.५२६६ (ट्रक्टर इंटरनॅशनल) | १९८२ | २०,०००/- |
| ११ | एम.टी.बी. ४१४८ (ट्रॉली) | १९८० | १२,०००/- |
| १२ | एम.डब्ल्यु.पी.५८५ (ट्रॉली) | १९८२ | २२,०००/- |
| १३ | जुने निरूपयोगी टायर्स (३४६ नग) | लॉट | २६,०००/- |
| १४ | जुने भंगार स्पेअर पार्टस् | ६.२ टन | ५१,०००/- |
| १५ | जुने जळालेले ऑईल | ४८ बॅरलसह | २४,०००/- |
| १६ | ॲसफाल्ट मिक्सर | १५ वर्ष जुन | ६,०००/- |

वरील पैकी ॲटम क्र.१,२,३,४,६,८,९,१४ हया ॲटमसाठी जाहीर लिलावामध्ये बोली झाली नाही. खालील ॲटमसाठी सरकारी बोलीच्या किंमतीपेक्षा जास्तीची किंमत आलेली आहे. घेण्याऱ्यास सेल्सटॅक्स भरावा लागेल व आर.टी.ओ. इन्शुरन्सचा पुर्ण खर्च करून त्यांचे नांवावर वाहन करून घ्यावे लागेल.

| ॲटम क्र. | वर्णन | जास्तीचे बोली बोलणाऱ्याचे नांव | मनपाने काढलेली किंमत | बोलीमध्ये आलेली किंमत | सेल्स टॅक्स | बोली दारास भरावा लागणारा सेल्सटॅक्स |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | एम एच २०/ई २०० (कार) | श्री.महंमद हुसेन म.अहमद औरंगाबाद | ३५००० | ३५१०० | १०% | ३५१० |
| ७ | एम ए ए १०५ (जीप) | श्री.मच्छींद्र रामभाऊ कुटे,जालना | ३५००० | ३५३०० | १०% | ३५३० |
| १० | एमएक्सव्ही ५२६६ (ट्रॅक्टर) | श्री.एस.ए.खान औरंगाबाद | १२००० | ३७००० | १०% | ३७०० |
| ११ | एमटीबी ४१४८ (ट्रॉली) | श्री.शिवाजी काळे | १२००० | २२६०० | १३% | २९३८ |
| १२ | एमडब्ल्युपी ५८५ (ट्रॉली) | श्री.जावेद कुरैशी | २२००० | २६५०० | १३% | ३४४५ |
| १३ | ३४६ टायर्स | श्री.धम्मसिंग वजीरसिंग,औरंगाबाद | २६००० | ५७३०० | १०% | ५७३० |
| १५ | जळालेले ऑईल | डी.एस.नवगिरे, एमआयडीसी गोकुळ शिलगांव जिल्हा कोल्हापूर | २४००० | ८११०० | १३% | १०५४३ |
| १६ | ॲस्फाल्ट मिक्सर | श्री.करीम खान बशीर खान,औरंगाबाद | ६००० | १२७०० | १३% | १६५१ |

वरील प्रमाणे आठ (८) ॲटमसाठी खालील प्रमाणे किंमत होते.

१ मनपाची ठरविलेली किंमत : रूपये १,७२,०००/-

२ जाहीर लिलावात आलेली किंमत: रूपये ३,०७,६००/-

३ भरून घ्यावयाच्या सेल्सटॅक्सची रक्कम : रूपये ३५,०४७/-

मनपाने ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा जास्त किंमत जाहीर लिलावात आल्यामुळे हे ॲटम्स प्रचलित विक्री करासह वसुल करून विक्री करण्यास सर्व समिती सदस्यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा. आयुक्त, मनपा, औरंगाबाद यांनी दिनांक २८.२.२००१ रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर. इतिवृत्त कायम करण्यासह मंजुरी मिळाल्यास संबंधीत बोलीदाराकडून रक्कम वसुल करून मनपाच्या फंडात जमा करून वाहन व यंत्रसामुग्री इत्यादीचा ताबा देता येईल.

ज्या ॲटमचा जाहीर लिलाव करूनही बोली आली नाही व बीट झाले नाही त्या ॲटमसाठी खालीलप्रमाणे एक निर्णय घ्यावा लागेल.

१ जाहिर लिलाव पध्दतीने फेर लिलव

२ टेंडर पध्दतीने फेर लिलव

३ कोणी खरीदरार अर्ज करून मनपाने ठरविलेल्या किंमतीपेक्षा जास्त रक्कम भरून घेण्यास तयार असेल, त्यांना ॲटम देण्यासाठी मंजुरीस्तव सादर करणे.

वरील बाबत स्वतंत्र कार्यवाही करण्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. तरी मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

**श्री.दलबीरसिंग जबिंदा:** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जी किंमत काढण्यात आली ती व्हॅल्युअर कडून काढली किंवा त्यास काय आधार आहे, याचा खुलासा करावा.

**उप अभियंता (यांत्रिकी):** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जे ॲटम दाखवलेले आहे त्यांची जी किंमत वाढण्यात आली त्यासाठी एक समिती नेमण्यात आलेली होती. त्या समितीमध्ये उप आयुक्त, अति.शहर अभियंता ,मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी, एस.टी.वर्कशॉपचे मेकॅनिकल इंजिनिअर, आर.टी.ओ.कडील मोटर वाहन निरीक्षक तसेच उप अभियंता (यांत्रिकी) , इरिगेशन मेकॅनिकल डिव्हीजन,औरंगाबाद असे सदस्य संख्या होती. या समितीने या गाडयांच्या किंमती ठरविलेल्या आहेत. बोलीमध्ये जास्तीची आलेली किंमतही दर्शविण्यात आलेली आहे.

**श्री.दलबिरसिंग जबिंदा :** मोटार वाहन निरीक्षक सहकारी गाडयांचे व्हॅल्युएशन काढून प्रमाणपत्र देतो. याबाबतचे प्रमाणपत्र आहे काय ?असलयास दाखवावे.

**उप अभियंता (यांत्रिकी):** (प्रमाणपत्र असलयाचे मा.सभापती यांना दाखवतात)

**श्री.मधुकर सावंत :** प्रस्तावात जे विवरण दर्शविलेले आहे त्यामध्ये बोली झालेल्या पैकी अ.क्र.१५ मध्ये जुने जळालेले ऑईल हे महानगरपालिकेच्या समितीने काढलेली किंमत २४,०००/- आहे व बोलीमध्ये आलेली किंमत ही ८१,१००/- अशी आलेली आहे. या ॲटममध्येच जास्त रक्कम आल्याचे दाखविण्यात आले व इतर ॲटम मध्ये सरासरी म्हणवी तशी बोलीप्रमाणे किंमत आलेली नाही. यात काही संगनमत झालेले दिसते अशी शंका निर्माण होत आहे. कमिटीने चुकीची माहिती दिलेले आहे असे वाटते.

**मा.सभापती :** इतर गाडयांचे बोलीमध्ये किंमती कमी का आल्या त्याचा खुलासा करावा.

**उप अभियंता (यांत्रिकी) :** जळालेले ऑईलचा जे जे जास्त प्रमाणात वापर करणार आहे म्हणून बोलीसाठी एकूण ७१ लोक आलेले होते. सर्वात जास्त बोली श्री.नवगिरे यांनी केलेली असल्याने तसे नमुद केलेले आहे.

**श्री.मधुकर सावंत :** ट्रक्टर कोणत्या कंपनीचे व ट्रॉली कोणत्या कंपनीची आहे त्याचा खुलासा द्यावा. तसेच ट्रॅक्टरची किंमत कमिटीने फक्त १२,०००/- रूपयेच

म्हणजे एवढी कमी कशी येवू शकते. कमिटीने काय निकष लावला. वजनाने ट्रॅक्टर विकले तर यापेक्षा जास्त किंमत येऊ शकते. असे माझे मत आहे.

**उप अभि. (यां)** : ट्रक्टर १९८२ चे मॉडेल असून, इंटरनॅशनल कंपनीचे आहे. २०,०००/- दर काढलेला आहे.

**श्री. मधुकर सावंत, श्री. दलबीरसिंग जबिंदा** : जवळपास संपूर्ण गाडयाच्या किंमती महानगरपालिकेच्या कमीटीने कमी ठरविलेल्या असून, यामध्ये काहीतरी गौडबंगाल दिसून येत असून, महानगरपालिकेचे यात नुकसान होईल म्हणून फेरलिलाव करण्यात यावा. म्हणून प्रस्तावातील विवरणमधील अ. क्र. १ ते १२ पर्यंतच्या ॲटमकरीता पुन्हा फेरलिलाव करार यामध्ये समितीत स्थायी समिती सदस्यांचा समावेश करावा अशी विंनती आहे.

**मा. सभापती** : विषय क्र. ५ मध्ये प्रस्तावात दार्शविल्याप्रमाणे विवरणामध्ये अ. क्र. १ ते १२ चे संदर्भात पुन्हा अल्प मुदतीचे जाहीर प्रगटन देऊन फेरलिलाव करण्यात यावा व जी समिती कार्यान्वित करण्यात आली होती त्या समितीमध्ये स्थायी समिती सदस्य सौ. विजया रहाटकर, श्री. जगदीश सिध्द, तसेच श्री. सलीम पटेल हे समिती सदस्य म्हणून समावेश करण्यात येतो. हा लिलाव जाहीर लिलाव पध्दतीने करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या मालकीची जुनी वाहने व यंत्रसामुग्री इत्यादीचे जाहीर लिलाव संबंधाने सभाहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावातील अ. क्र. १ ते १२ करीता वर्तमानपत्रात अल्पमुदतीची सूचना देऊन फेर जाहीर लिलाव करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. तसेच सदर लिलाव करते वेळी स्थायी समिती सदस्य सौ. विजया रहाटकर, श्री. जगदीश सिध्द, श्री. सलीम पटेल यांचा लिलाव समितीमध्ये समावेश करण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

ॲटम क्र. १३, १५५, १६ साठी प्राप्त झालेल्या लिलाव बोलीच्या किंमतीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, मील कॉर्नर ते बलवंत वाचनालय पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी दिनांक १६-०१-२००१ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ७५/३ अन्वये अं. प. र. रु. १७,४४,०२७/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/६२/२००१ दिनांक १९-०१-२००१ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकुण (१६) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण (०८) आठ निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे अलीफ असोसिएटस | २७.९२% |
| २. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २७.८६% |
| ३. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | २१% |
| ४. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | २०.८८% |
| ५. | श्री. डी. अजितसिंग | ११% |
| ६. | मे. चारनिया कन्स्ट्रक्शन | ११.११% |

| | | |
|---|---|---|
| ७. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | निविदा उघडण्यात आली नाही. |
| ८. | मे. आदीनाथ कंन्स्ट्रक्शन | निविदा उघडण्यात आली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.९२% कमी दराची मे. अलिफ असोसिएटस् यांची निविदा आहे. करीता सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २७.९२% कमी दराची मे. अलिफ असोसिएटस् यांची निविदा असून, प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** खुपच कमी दराने निविदा सादर झालेली आहे. काम चांगले झाले नाही तर कुणास जबाबदार धरणार.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

**उप अभि. (बां.१) :** निविदा २७.९२% कमी दराने प्राप्त झालेली आहे. काम चांगल्या प्रकारे व्हावे याकरीता संबंधितास तशी विचारणा करण्यात आलेली होती व काम चांगले करुन देण्याचे हमीपत्र संबंधित ठेकेदार यांनी दिलेले आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** एकदा रस्त्याचे डांबरीकरण झाल्यानंतर कमीत कमी ते ३ वर्ष पुन्हा करण्याची आवश्यकता पडली नाही पाहिजे. अशा पध्दतीने काम व्हावे.

**मा. सभापती** : चांगले काम होईल याची खात्री करुन घ्यावी व याची संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी राहिल. हा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिल कॉर्नर ते बलवंत वाचनालय पर्यंत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २७.९२% कमी दराची मे. अलिफ असोसिएटस् यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्वितीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, आरेफ कॉलनी भागातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी दिनांक १६-०१-२००१ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ८२/४ अन्वये अं. प. र. रु. ११,१०,०००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/६२/२००१ दि. १९-०१-२००१ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजित तारखेस एकूण (१४) चौदा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारण्याच्या तारखेस एकूण (३) तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | १५.८६% कमी |
| २. | मे. अमान कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री. एम. ए. सिद्यीकी | २४.८६% जास्त दराने |

तुलनात्मकष्ट्या कमी व अं. प. दरापेक्षा १५.८६% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून, प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : विषय क्रमांक ७ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरेफ कॉलनी भागातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा १५.८६% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर कीरत आहे की, जाफरगेट ते लक्ष्मण चावडी पर्यंत मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी दि. १६-०१-०१ च्या स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ८१/३ अन्वये अंदाजपत्रक र. रु. १२,१०,१००/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठील कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/६२/२००१ व १९-०१-२००१ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकूण (१४) चौदा निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण (७) सात निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २८.८६% कमी |
| २. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | २१% कमी |
| ३. | मे. अमान कन्स्ट्रक्शन | २०.९९% कमी |
| ४. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | २०.८८% कमी |
| ५. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | ११.२१% कमी |
| ६. | मे. चारनिया कन्स्ट्रक्शन | ९.९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २८.८६% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून, प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : विषय क्र. ८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट ते लक्ष्मण चावडी पर्यंत मुख्य रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २८.८६% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सावरकर चौक ते जवाहरनगर पोलीस स्टेशन या ८० फुट विकास योजना रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १५,८७,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सोळा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सात निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २७.८६% कमी |
| २. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | २१.८८% कमी |

| | | |
|---|---|---|
| ३. | श्री. डी. अजितसिंग | १९.४१% कमी |
| ४. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | २१.००% कमी |
| ५. | मे. चारनिया कन्स्ट्रक्शन | १५.१५% कमी |
| ६. | मे. गुरुनानक कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |
| ७. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २७.८६% कमी आहेत. करीता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : विषय क्र. ९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावरकर चौक ते जवाहरनगर पोलीसस्टेशन या ८० फुट विकास योजना रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा २७.८६ कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मिलिंदनगर ते बीड डायव्हर्शन रोड (सातारा रोड) पर्यंत रस्त्यास डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १०,७२,७६७/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत पंधरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी नऊ (९) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ३१.०२% कमी |
| २. | श्री. डी. अजितसिंग | १९.४१% कमी |
| ३. | श्री. के. बीपाथ्रीकर | २५.३१% कमी |
| ४. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | २५.००% कमी |
| ५. | मे. चारनिया कन्स्ट्रक्शन | १४.१४% कमी |
| ६. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | २३.८८% कमी |
| ७. | मे. अमान कन्स्ट्रक्शन | १९.१९% कमी |
| ८. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |
| ९. | मे. गुरुनानक कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.०२% कमी आहेत. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

मा. सभापती : हा प्रस्ताव सुध्दा रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा असून, खूपच कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. चांगले काम होईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी

खात्री करुन घ्यावी व कोणत्याही रस्त्याचे डांबरीकरण झाल्यानंतर कमीत कमी ३ वर्ष पुन्हा डांबरीकरण करण्याची वेळ येऊ नये याची दक्षता घ्यावी.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंदनगर ते बीड डायव्हर्शन (सातारा रोड) पर्यंत रस्त्यास डांबरीकरण करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३१.०२% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ११२/०१ :**

प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स. नगरसेवक स्वेच्छा निधीतून महानगरपालिक हद्दीतील बेरोजगार युवक युवतींना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी संगणक व संगणक साहित्य जाहीर खरेदीसाठी निविदा मागविण्यात आली होती. परंतु फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे तुलना होत नसल्यामुळे मा. आयुक्तांच्या मान्यतेने फेर निविदा प्रकाशित करण्यात आली. पेन्टीयम संगणकाच्या बाबतीत शासनाने एच. सी. सी. कंपनी सोबत दराबाबत केलेल्या रेट कॉन्ट्रॅक्ट मध्ये (जून २००१ पर्यंत मान्यता प्राप्त) दर्शविल्यात आलेल्या Configuration नुसार दरात वाटाघाटी (दिनांक १५-०२-२००१) करुन खालील प्रमाणे दर प्रस्तावित कर येत आहे.

फेरनिविदेप्रमाणे एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्याची नांवे खालील प्रमाणे आहे.

१. भक्ती कॉम्प्युटर शॉप, औरंगाबाद.
२. वर्गो सेल्स व सर्विसेस, औरंगाबाद.
३. ॲपल कॉम्प्युटर्स, औरंगाबाद.
४. मायक्रोट्रॉनिक्स, औरंगाबाद (कागदपत्राअभावी उघडण्यात आले नाही.) वाटाघाटीनंतर खालील तक्त्यात दर्शविल्यात आल्याप्रमाणे दर मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तपशील | एजन्सीचे नांव | निविदेप्रमाणे दर प्रति नग | वाटाघाटीत निश्चित केलेले दर | प्रस्तावित खरेदी | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संगणक | वर्गो सेल्स व सर्व्हीसेस, औरंगाबाद | ४४,९००/- | ४४,०००/- | ३० नग | १३,२०,००० |

Computer system :- HCL BUSYBEE 2000 (Qty-One)
CPU : Intel Pentium iii-700 Mhz with :
CHIPSET : Intel i 810 E
BUS ARCHITECTURE : pci of better
SLOTS : 4 pci, 1 amr
MEMORY : 64 mb sd ram 100
MHz expandable upto 512 mb
HARD DISK : 20 gb
FLOPPY DRIVE : 1.44 MB
CD DRIVE : 52 x
MONITOR : 14" SVGA Color
KEYBOARD : 104 keys
MOUSE : 2 button with antistatic pad
CABINET : minitower
BAYS : 5 bays or better

PORTS : 2 USB port, 2 serial port,
1 parallel port, 1 ps/2 mouse port
DMI : DMI 2.0 Compliancce and support
OPERATING SYSSTEM : windows 98
preloaded licenced

| अ. क्र. | तपशील | एजन्सीचे नांव | निविदेप्रमाणे दर प्रति नग रु. | वाटाघाटीत निश्चित केलेले दर रु. | प्रस्तावित खरेदी | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | प्रिंटर Wipro २४ pin २०९०+ | वर्गो सेल्स व सर्व्हीसेस, औरंगाबाद | १७,४००/- | १७,४००/- | ३ नग | ५२,२००/- |
| | | | | | | एकूण हार्डवेअरसाठी येणार खर्च रु. १३,७२,२००/- |
| ३. | सॉफ्टवेअर | भक्तीज कॉम्प्युटर | २,०००/- | २,०००/- | १X२००० | २,०००/- |
| (१) | Lotus Smart suit OEM | | | | | |
| (२) | Wordstar 7.00 | -//- | २,१००/- | २,१००/- | १X२१०० | २,१००/- |
| (३) | M. S. Office 2000 proff Edition | -//- | २०,०००/- | २०,२००/- | १,२०,२००/- | २०,२००/- |
| (४) | page Maker 6.5 | -//- | २७,५००/- | २७,५००/- | १X२७५०० | २७,५००/- |
| | | | | | | एकूण सॉफ्टवेअरसाठी येणारा खर्च रु. ५१,८००/- |

सिडको एन-७, टाऊन हॉल व लोटा कारंजा येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत, संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी वरील खरेदी प्रस्तावित आहे. वरील इमारतीत संगणक विभागाच्या ताब्यात आल्यावर, विद्युत व्यवस्था पुर्ण झाल्यानंतर तसेच अस्था-१ व २ मार्फत पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध झाल्यावर प्रति स. नगरसेवक पाच प्रशिक्षणार्थी संगणक विभागाकडे शिफारस केल्यानुसार प्रशिक्षण सुरु करण्यात येईल.

संगणक प्रशिक्षणाकरीता वेळोवेळी अभ्यासक्रम तयार करणे, नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण सुरु करणे, परिक्षा घेणे, शासन मान्यता घेणे याबाबत कार्यवाही सुरु करणे योग्य राहील. तसेच प्रशिक्षण केंद्राच्या इमारतींच्या दुरुस्तीचे व विद्युतीकरणाचे काम संबंधित विभागांनी त्वरीत पूर्ण करुन संगणक विभागाला ताबा देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी असे वाटते. सॉफ्टवेअर व हार्डवेअर खेरदीसाठी एकूण खर्च रु. १४,२४,०००/- इतका अप श्री. भाऊसाहेब वाघ : संगणकाच्या किंमती सध्या कमी झालेल्या आहेत. प्रस्तावात सादर केलेले दर जुने असून, नविन निविदा काढून संगणकाची खरेदी करण्यात यावी.

**श्री. सलीम पटेल :** मागच्या वर्षीच्या बजेटमध्ये संगणक खरेदी करुन मुलांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतलेला असतांना आजपर्यंत कार्यवाहीच चालू आहे, हे योग्य नाही. या प्रस्तावास मंजुरी देऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. मधुकर सावंत :** अल्प मुदतीची निविदा मागवून संगणक खरेदी करण्यात यावे. सध्या किंमती कमी झालेल्या असून, यात महानगरपालिकेचा फायदा होईल.

**श्री. जगदीश सिध्द :** ज्यांनी निविदा भरुन पाठविल्या त्यांना मा. आयुक्तांनी वाटाघाटीसाठी बोलवावे. वाटाघाटी करुन कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. भरत लकडे :** संगणक प्रशिक्षण केंद्र किती ठिकाणी उभारणार आहेत. प्रस्तावामध्ये लोटाकारंजा, टाऊन हॉल दिले आहे. खुलासा करावा.

**प्रकल्प संचालक :** सर्वसाधारण सभेत संगणक प्रशिक्षण केंद्र लोटाकारंजा येथे व्हावे म्हणून मंजुरी दिलेली आहे. येथील प्रशिक्षण केंद्र उभारणी खर्च स. सदस्य श्री. तकी हसन खान यांचे स्वेच्छा निधीतून खर्च करणार आहे. म्हणून प्रस्तावात तसे नमुद केलेले आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** दोन ठिकाणी संगणक प्रशिक्षण होण्याबाबत निर्णय झालेला होता. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** तिसरे संगणक प्रशिक्षण केंद्र होण्याबाबत सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी. विषय मंजुर करण्यात येत आहे. मा. आयुक्त यांना कॉम्प्युटर ऑपरेटरची पोस्ट भरण्यासाठी २०-०१-१९९९ ला स्थायी समितीने आदेश दिलेले होते. आजपर्यंत का कार्यवाही झालेली नाही. खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त :** कॉम्प्युटर ऑपरेटरचे पद का भरण्यात आले नाही असा प्रश्न मा. सभापती यांनी केलेला आहे. जी चर्चा चालू आहे ती संगणक खरेदी करण्या संदर्भात आहे. संगणक खरेदी अगोदरच म्हणजे २६ फेब्रुवारी २००१ रोजी या संदर्भात शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. ठराव मंजूर केलेला आहे. परंतु आता पुढील कार्यवाहीचे काम नियमाने करावे लागेल.

प्रशिक्षणासाठी आवश्यक स्टेशनरी भांडार विभागातर्फे पुरविणे अपेक्षित आहे. दर मान्यतेनंतर संबंधित एजन्सीशी करारनामा करण्यात येईल. तरी वाटाघाटीत कमी केलेले दर व प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर सावंत :** संगणक खरेदी करण्यात आलेले नाही तर पद कशासाठी करायचे असा प्रश्न निर्माण होतो. दि. ३०-०९-२००० च्या सर्वसाधारण सभेत पद करण्याचा प्रस्ताव आहे.

**मा. सभापती :** मा. आयुक्त या पदासंदर्भात योग्य खुलासा करु शकले नाहीत. म्हणून मा. उप आयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा.

**उप आयुक्त (प्र.) :** एक पत्र माझ्याकडे कॉम्प्युटर ऑपरेटर पद भरण्यासंदर्भात आलेले आहे. परंतू सध्या पदे भरण्यास शासनाची मनाई असून शासनाने पदे भरण्याची स्थगिती उठविल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. तुर्त शासनास एक पत्र पाठवून विनंती करण्यात येईल की, महानगरपालिकेने संगणक खरेदी केलेली आहे त्यासाठी एक पद भरणे आवश्यक आहे. मान्यता देण्यात यावी म्हणून विनंती करता येईल.

**श्री. जगदीश सिध्द :** संगणकाच्या नविन किंमती काय आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी नसता या प्रस्तावास मंजुरी देण्यास माझा विरोध नोंदवावा.

**मा. सभापती :** विषय क्र. १ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. ताबडतोब संगणक साहित्य खरेदी करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स. नगरसेवक स्वेच्छा निधीतून महानगरपालिका हद्दीतील बेरोजगार युवक/युवतींना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी संगणक व संगणक साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी २००० CPU : Intel Pentium iii-७०० Mhz प्रतिनग रु, ४४,०००/- या दराने एकूण ३० नग व प्रिंटर Wipro २४ pin २०९० + प्रतिनग रु. १७,४००/- या दराने ३ नग मे. वर्गो सेल्स व सर्व्हीसेस, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास व यासाठी अनुक्रमे रक्कम रुपये १३,२०,००० + ५२,२०० अशा एकूण र. रु. १३,७२,२००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सॉफ्टवेअरसाठी प्रस्तावात अनुक्रमांक ३ मधील १ ते ४ सॉफ्टवेअर ॲटम करीता भक्तीज कॉम्प्युटर शॉप या एजन्सीचे दर कमी असल्यामुळे ॲटमसमोर दर्शविलेल्या दरास तसेच त्यासाठी येणाऱ्या एकूण र. रु. ५१,८००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३/२ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, फारोळा येथील जलशुध्दीकरणासाठी लागणारी तरतुदी खरेदी करण्यासाठी सर्वात कमी दराची निविदा मे. फोनेक्स केमिकल्स यांची असुन रुपये २२३४/- प्रती मेट्रीक टन असा दर दिलेला आहे. त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला असता ठराव क्रमांक ६०/५ दिनांक २४.१०.२००० अन्वये सदरील प्रस्ताव मा. आयुक्त यांच्याकडे वर्ग करण्यास मान्यता दिली आहे. सदर निविदा स्विकारणे ही स्थायी समितीच्या अधिकारातील बाब असल्याने यास मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

तरी फोनेक्स केमिकल्स यांची वरील दर्शविलेल्या दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री सलीम पटेल :** या अगोदर केंव्हा पावडर खरेदी केलेले होते.

**कार्य. अभियंता (पापु):** प्रस्ताव पावडर खरेदीचा नसुन तुरटी खरेदीचा आहे. एक वर्षासाठी जवळपास १५० मे. टन तुरटी खरेकी करणे आवश्यक असते. सदर निविदा स्थायी समितीच्या अधिकारातील असुन ठराव क्र. ६०/५ नुसार मा. आयुक्तांकडे वर्ग केल्याने प्रस्ताव पुन्हा मंजुरीसाठी आणण्यात आलेला आहे.

**मा. सभापती :** विषय क्रमांक २ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारी तुरटी खरेदी करण्याकरीता प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराची मे. फोनेक्स केमिकल्स यांची प्रती मे. टन रु. २२३४/- या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानीक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, साईनगर म्हाडा कॉलनी जवळील खुल्या जागेत व्यापारी संकुल बांधणे करीता सन ९७-९८ च्या सा. बां. विभाग जिल्हा दरसुचीनुसार र. रु.१६,१०,०८०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यतेस्त मा. सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस आदेशित केलेले होते. त्यानुसार मा. सर्वसाधारण सदरील प्रस्तावास ठराव क्र. ८१/१ दि. २०.५.९९ च्या इतिवृत्ताने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१३/९९ दि. ११.५.९९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता सर्वाता कमी दराची निविदा म्हणजेच

अं. प. दरापेक्षा ७% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली होती. तथापी दराबाबतच्या वाटाघाटीअंती अं. प. दरापेक्षा ७% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने सदरील प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली होती. तसेच मा. आयुक्त महोदय याची आदेशान्वयचे सदरील प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवला असता सदरील प्रस्तावास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ३७७/१९/ दि. ३.१२.९९ चे इतिवृत्तान्वये मान्यता दिलेली होती. त्यानुसार संबंधीत गुत्तेदाराकडुन काम सुरु करण्यात आले असुन काम प्रगती पथावर आहे.

तथापी सदरील ठिकाणी मोठया प्रमाणात झाडे झुडपे असल्याने रस्त्यापासुन प्रत्यक्ष जागा ही चार ते पाच फुट खोलवर होती. तसेच सदीलर ठिकाण हे उताराचे असल्याने जागा दलदलीची व भुसभूशीत मातीची आहे. त्यानुसार वास्तु विशारत यांचे सल्लान्वये जास्त खोदकाम करण्यात आले. तसेच इमारतीच्या कॉलमची खोली, फाँडेशन ट्रिटमेंट, प्लींथ बीम, इत्यादी सर्वसाधारण बांधकामापेक्षा जास्तीचे घ्यावे लागले. तसेच प्लीथ्ची उंची वाढल्यामुळे भरती वाढली.

सदरील कामामध्ये वरील प्रमाणे वाढ झाली असल्या कारणाने पर्यायाने अंदाजपत्रकीय रक्कम वाढलेली आहे. मुळ अंदाजपत्रक र. रु. १६,१०,०८०/- +७,२१,७९०=२३,३१,८७०/- चे अतिरिक्त बाबीसह सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी निर्णयास्तव मा. स्थायी समितीपुढे ठेवणेस आदेशित केलेले आहे.

त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु. २३,३१,८७०/- चा प्रस्ताव तसेच दरवाढी काम मुळ गुत्तेदाराकडुन मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्त विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** दि. ३.१२.९९ च्या बैठकीत ठराव पास झाला. ९९ चे टेंडर असुन आज वाढीव कामासाठी पुन्हा प्रस्ताव मंजुरीसाठी येतो. एवढा उशीर का झाला, खुलासा द्यावा. वाढीव कामासाठी पुन्हा प्रस्ताव मंजुरीसाठी आला असताना काम प्रगतीपथावर आहे असे म्हटले आहे. हे चुकीचे दाखविण्यात आले आहे. वाढीव कामचे अंदाजपत्रक कसे करण्यात आले.

**श्री नारायण सुरगोणीवार :** मा. आयुक्त प्रत्यक्ष पाहणीसाठी येण्याचे आश्वासन दिले होते, अद्याप आलेले नाही प्रत्यक्ष पाहणी करुनच कार्यवाही व्हावी.

**उप अभियंता (इ) :** अंदाजपत्रक रु. १६,१०,०८०/- एवढे होते. नॉर्मल डिझाईन गृहीत धरुन टेंडर काढण्यात आलेले होते. मुळ जो पाया असतो त्या कामाच्या पध्दतीत बदल करावा लागला त्यामुळे जास्त प्रमाणात पायाभरणी करुन रोडच्या उंची बरोबरीने आणावा लागला ट्रायल पीट घेतले. तेथे पाणी भरलेले होते. त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा वाढीव काम झाल्याने खर्च वाढलेला आहे.या कामामध्ये २७ लाख अनामत जमा झालेली आहे.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** भरती टाकण्यासाठी वाढीव टेंडर काढुन गुत्तेदारास मदत होत आाहे असे दिसते. हे चुकीचे आहे. हे काम करण्यासाठी किती दिवसांचा अवधी होता.

**उप अभियंता (इ) :** कामाची मुदत ७ महिने होती. वर्क ऑर्डरची तारीख २०.१२.९९ असुन आर. सी. सी. चे डिजाईन दिले होते. त्यानंतर पुन्हा त्यात बदल झाला. आर. सी. सी. चे काम वाढले. नेहमीच्या प्रमाणे प्रमाणे अंदाजपत्रक केले होते.

**श्री मधुकर सावंत :** आपल्याकडील इंजिनिअरला यासंबधी माहिती नाही का?

**श्री नारायण सुरगोणीवार :** मा. आयुक्त या कामाबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन मंजुरी व्हावी. नसता या कामाचे नवीन इस्टीमेंट तयार करण्यात यावे.

**श्री मधुकर सांवत, श्री दलबीरसिंग जबिंदा :** प्रस्ताव स्थगित ठेवावा. सिमेंट कॉंक्रीटचे काम मुद्दामहुन वाढवलेले आहे असे दिसते. सदरचे काम करण्यास उशीरही झालेला आहे.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठैवण्यात येत आहे. मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष या ठिकाणी कामाबाबतची पाहणी करुन कार्यवाही करावी. विषय पत्रिका संपलेली असुन आता सर्वसाधारण चर्चेस सुरुवात करावी. मंजुर केलेल्या सर्व प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**सर्वसाधारण चर्चा :**

**श्री किशोर तुळशीबागवाले :** औरंगपुरा येथील अप्सरा टॉकीजचे दुरुस्तीचे काम करण्याची परवानगी घेतलेली होती परंतु संबंधीत मालकाने या टॉकीजचे पुर्ण:त नविन काम केल्याचे वृत्तपत्रात आलेले आहे. याचा खुलासा करावा.

**उप अभियंता नगर रचना :** संबंधीत मालकास निोव्हेशन ऐवजी उंची वाढविण्यासाठी परवानगी दिलेली होती. बालकनी वाढवण्यासाठी उंची वाढवावयाची होती.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** दुरुस्तीची परवानगी घेतली, कॉलमच नविन केलेले आहे. टॉकीजचा बाहेरील जवळपास सर्वच डिजाईन बदलुन नविन काम केल्याचे दिसते. बांधकामाच्या वेळेस आपले अधिकारी पाहणी करत नाही काय. यामुळे डेव्हलपमेंट चार्जेस महानगरपालिकेस मिळालेले नाही. मनपाचे नुकसान झालेले नाही. तुर्त काम थांबवावे. एक नोटीस तशी देण्यात यावी.

**मा. सभापती :** मा. आयुक्त व संबंधीत विभागाचे अधिकारी यांनी पाहणी करावी व अनाधिकृतपणे काम झालेले असेल तर मा. आयुक्तांनी योग्य ती कार्यवाही करावी. तुर्त संबंधीत अधिकारी यांनी संबंधीत अप्सरा टॉकीज मालकास नोटीस देऊन काम थांबविण्याबाबत कळवावे.

**श्री नारायण सुरगोणीवार :** म्हाडा कॉलनी, अविष्कार कॉलनीचे पावसाचे पाणी नाली तुन जाण्यासाठी एक इस्टीमेट एकुण २,६२,०००/- तयार करण्यात आलेले आहे. टेंडर मंजुर झाले परंतु प्रत्यक्षात काम सुरु झालेले नाही.

**कार्यकारी अभियंता :** टेंडर अंतिम मंजुरीसाठी आहे. एक आठवडयाच्या आत मंजुरी घेऊन काम चालु करण्यात येईल.

**श्री मोतीलाल जगताप :** माझ्या वार्डातील सध्या मुकूंदवाडी येथे रस्ता रुंदीकरणाची काम कामे चालु आहेत. कोणत्याही ठिकाणी आतमध्ये जवळपास २ कि. मी. पर्यन्त कोणतीही वाहने जाऊ शकतात. बस सुध्दा जाऊ शकते. परंतु एका ठिकाणी रस्ता रुदींकरणाच्या संदर्भात आपल्या महानगरपालिकेत असलेले श्री भरत जैस्वाल यांच्या सासऱ्यांची श्री भिकुलाल जैस्वाल यांची एक जागा रस्ता रुंदीकरणास अडथळा आणत आहे व श्री भरत जैस्वाल यांनी स्वत: त्या जागेचे मार्कीग करुन घेतलेले आहे व रस्ता रुदींकरणाचे काम थांबलेले

आहे. मा. सभापती यांनी स्वत: तेथे पाहणी केली. एका जागेसाठी पुर्ण रस्ता रुंदीकरणाचे काम थांबत असेल तर जनतेच्या दृष्टीने योग्य नाही. ती जागा अतिक्रमणात आहे. ताबडतोब तोडण्यात येऊन काम सुरु करावे.

**श्री जगदीश सिध्द :** डेव्हलपमेंट प्लॅन नुसार रस्त्यामध्ये येत असेल तर ताबडतोब तोडण्यात यावे.

**मा. सभापती :** प्रशासकीय अधिकारी यांनी सदर ठिकाणी त्वरीत पाहणी करुन कार्यवाही करण्यात यावी.

**श्री सलीम पटेल :** स्वेच्छा निधीमधुन रु. २५,०००/- पर्यन्तच्या काही कामाच्या वर्क ऑडर निघालेल्या आहेत. काम सुरु करण्यात आलेले नाही. मार्च अखेरपर्यंत कामे व्हावीत अशी विनंती आहे.

**मा. सभापती :** मागील वर्षाचे व चालु वर्षातील सर्व विकास कामे मार्च अखेर पर्यंत पुर्ण करण्याची कार्यवाही व्हावी.

**श्री साहेबराव कावडे :** मागली बैठकीमध्ये मी कचऱ्याचा विषय काढला होता. जे ॲग्रिमेंट केले ते रद्द करावे. त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. कंपनीचे पाणी सोडले जाते. त्यामुळे जवळील नागरीकांना त्रास होतो. पाणी बंद करण्यात यावे. पाण्यामुळे कचरा बाहेर पसरतो.

**श्री गणेश तांबे :** स. सदस्य श्री कावडे या संदर्भात सहा महिन्यापासुन प्रश्न उपस्थित करतात. प्रत्येक वेळी अधिकारी कुठे ना कुठे गेलेले असतात. ज्यावेळी अधिकारी उपस्थित असतात त्यावेळी योग्य खुलासा केला जात नाही. हेतुपुरस्सर टाळाटाळ होत असेल तर संबंधीत अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार.

**मा. आयुक्त :** या कंपनीने सबसीडी करता राज्य शासनाकडे मागणी केलेली होती. देय सबसीडी देण्यात येऊ नये. सदर कंपनीने अटी व शर्तीची पुर्तता केलेली नाही. म्हणुन शासनाकडे तसे कळविळण्यात आलेले आहे व पुढील करार करतांना विधी सल्लागार यांचा सल्ला घेऊन कार्यवाही करण्यात येईल. नोटीस वगैरे दिली हा भाग वेगळा पंरतु कायद्याच्या चौकटीत बसेल अशीच कार्यवाही करणे योग्य होईल.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** मालमत्ता विभागामध्ये दि. १४.९.२००० रोजी पत्र देवुन विचारणा केली की, महानगरपालिकेच्या शहरात किती मालमत्ता आहेत. त्या जागेला तार फेन्सींग आहे किंवा काय, मालमत्तेचे सर्व रेकॉड आहे की नाही. सदर जागेवर आपल्या महानगरपालिकेचे बोर्ड लावलेले आहे किंवा काय, जागेची देखरेख कोण करते. अशी विचारणा करण्यात आलेली होती. अद्याप उत्तर दिलेले नाही. मनपाच्या जागा सुरक्षित ठेवण्यासाठी कर्मचारी नेमावे. मालमत्ता अधिकारी यांचे श्री शहापुरावाड नावाचे कुणी कर्मचारी कुठे बांधकामे चालु असल्यास जाऊन अडथळा आणतात. काही पैशांची मागणी करत असतील. परंतु त्यांचा काहीही संबंध येत नाही. कोण ते खुलासा द्यावा. मनपाच्या जागेवर काही लोकांनी पी. आर. कार्ड केलेले आहे. आपले अधिकारी काय करतात.

**मालमत्ता अधिकारी :** स. सदस्यांनी ज्या कर्मचाऱ्यांचे नांव सांगितले त्या संदर्भात कार्यवाही लवकरच होईल.

**मा. सभापती :** संबंधीत कर्मचारी यांचेवर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. तसेच स. सदस्य यांनी जे पत्र दिलेले आहे त्या संदर्भात ही कार्यवाही करण्यात यावी.

**मा. आयुक्त :** स. सदस्य यांनी गंभीर स्वरुपाची तक्रार मांडलेली आहे. त्याची चोकशी उप आयुक्त (प्र) हे दोन दिवसात करतील व २० तारखेच्या आत त्यांनी त्यांचा अहवाल माझ्याकडे द्यावा व त्यानुसा कडक कारवाई संबंधीत कर्मचाऱ्यावर करण्यात येईल. निलंबनाची सुध्दा कार्यवाही होईल. परंतु एकदा कार्यवाही केलयानंतर काही स. सदस्य माझ्याकडे केलेली कार्यवाही मागे घेण्याची मागणी करतात हे योग्य नाही. कार्यवाहीला आपणापासुन पाठींबा पाहिजे की, कृपया कुणीही अडथळा आणु नये.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** काही लोकांनी मातीच्या संदर्भात चेक दिलेले आहे ते चेक वटवले गेले नाही. रोख रक्कम दिली पाहिजे.

**मा. सभापती :** मालमत्ता अधिकारी यांनी या संदर्भात कार्यवाही करावी.

**श्री जगदीश सिध्द :** उन्हाळा लागला आहे. शहरास पिण्याच्या पाण्याची गंभीर परिस्थिती निर्माण होणार असुन जे लोक कर भरतात त्या भागात पुरेपुर पाणी येत नाही व ज्या भागातील जनता कर भरत नाही तेथे मुबलक पाणी पुरवठा देण्यात येतो. अशी परिस्थिती झालेली असुन यापुढे जर शहरास पाणी टंचाई झाली तर प्रशासनाने काय उपाय योजना केलेली आहे. त्याचा खुलासा करावा.

**श्री नारायण सुरगोणीवार :** नागरीकांकडुन दर वर्षाला १२००/- रु. घेतले जाते. आठवडयातुन दोन-तीन वेळा पाणी येत नाही. जे पाणी येते ते अर्धातास असते. कोणत्या भागामध्ये कमी पाणी मिळते त्याचा सर्व्हे करावा. काही तक्रारी देण्यास आल्यावर कार्यकारी अभियंता भेटत नाही.

**कार्य. अभियंता (पापु) :** शहराला होणारा पाणी पुरवठा १००% चालु आहे. धरणातुन १३० एम.एल.डी. क्षमतेने पाणी उचलण्याची जी यंत्रणा आहे ती १००% चालु आहे. या यंत्रणेवर अहोरात्र लक्ष देण्यात येते. स. सदस्य श्री जगदीश सिध्द यांचे वार्डात पाणी आले नसेल तर त्याची पाहणी करुन कार्यवाही करण्यात येईल. कारण तांत्रिक अडचण येऊ शकते. त्यामुळे पाणी आले नसेल.

**श्री गणेश तांबे, श्री जगदीश सिध्द, श्री सलीम पटेल :** वस्तुस्थिती वेगळी आहे. हिवाळा, पावसाळयामध्ये ज्या प्रमाणात पाणी येते त्या प्रमाणात पाणी येते त्या प्रमाणात उन्हाळयात पाणी येत नाही. असे चित्र आहे. पाणी पुरवठा फक्त ३५ मिनिटेच होत आहे. शहरात सर्वत्र हीच परिस्थिती आहे. एकाच वार्डातला हा प्रश्न नाही. खरा उन्हाळा यापुढे आहे. त्या अगोदरच ३५ मिनिटे पाणी येत आहे.

**कार्य. अभियंता (पापु) :** जी यंत्रणा चालु आहे ती आपण कमी जास्त करु शकत नाही. म्हणुन पाणी कमी जास्त शहरात येते, असे होऊ शकत नाही.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (पापु) यांनी शहरातील संपुर्ण वार्डात पाहणी करुन ज्या ज्या वार्डात पाणी पुरवठा कमी प्रमाणात होतो त्या संबंधी तात्काळ कार्यवाही करावी.

**साहेबराव कावडे :** जे कर्मचारी पाणी सोडण्यास असतात त्यांचेवर कार्यवाही झाली पाहिजे.एखाद्या ठिकाणी २०० घरांना १० नळाचे पाणी दिले जाते व एखाद्या ठिकाणी २०० घराच्या पुढे आणखी नळ कनेक्शन देऊन १० नळाचे पाणी सोडले जाते. काही ठिकाणी २४ तास पाणी दिले जाते. ही पध्दत बरोबर नसून काही तरी नियोजन असले पाहीजे व जे कर्मचारी पाणी सोडतात त्यांचेवर वरीष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण असले पाहीजे.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** बऱ्याच ठिकाणी नळाला पाणी आल्यावर काही लोक विद्युत मोटार लावून जास्तीचे पाणी घेतात. त्यामुळे बाजुच्या घरांना पाणी मिळत नाही. अशा लोकांच्या मोटारी जप्त करण्याची मोहीम हाती घ्यावी.

**श्री.जगदीश सिध्द :** काही वार्डामध्ये मुख्य जलवाहिनीमधून नळ कनेक्शन घेतलेले आहे.त्यामुळेही इतर लोकांना पाणी कमी मिळत असेल. संबंधित लोकांनी तशी परवानगी घेतलेली आहे का?

**श्री.सलीम पटेल :** काही ठिकाणी बोरींगमधून नळ कनेक्शन घेतलेले आहे.समी कॉलनी येथे ८-१० घरांना बोरींगमधून पाणी मिळते. तसेच वार्ड क्र. ७६ कैसरकॉलनी मध्ये १० घरांना सुध्दा अशाच प्रकारे पाणी मिळते व बोरींग विद्युत मोटारींचे बील महानगरपालिका भरते.

**मा.सभापती :** जे मोटार लावून पाणी घेतात त्यांचेवर कार्यवाही करावी. तसेच ज्यांनी अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेतलेले आहे. त्यांचेवरही कार्यवाही व्हावी. जे बोरींगमधून पाणी घेतात त्यांचे बील महानगरपालिका भरते.सदरची बील संबंधीत नळ धारकांकडून वसुल करावे.

**श्री.साहेबराव कावडे :** जे पाणी घेतात त्यांचेकडून वीज बिल वसुल करावे.

**श्री.जगदीश सिध्द :** जे जास्तीचे पाणी घेतात त्यांचे मोटारी काढण्यास गेल्यावर भांडणे होतील. त्यासाठी सकाळी ६ ते ७ दरम्यान वीज कनेक्शन बंद ठेवावे.

**श्री.सलीम पटेल :** संबंधित नागरीकांकडे नळ कनेक्शन आहे. दोन-दोन नळांचे बील भरणार नाही.

**मा.सभापती :** संबंधीत अधिकारी यांनी ज्यांनी बोरींगमधून नळ कनेक्शन घेतलेले आहे ते काढून टाकण्याची कार्यवाही करावी.

**सौ.विजया रहाटकर :** महानगरपालिकेच्या रेखांकनातील खुल्या जागा मोठया प्रमाणात असून दुर्देव असे की, त्या जागा महानगरपालिकेला सांभाळता येत नाही. काही वेळा नगरसेवकांनी लक्ष दिले म्हणून जागा राहिलेल्या आहेत असे वाटते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास एस.बी.एच. कॉलनीमधील अतिक्रमण महानगरपालिकेने हिमतीने काढलेले आहे. परंतु तोंडी तक्रारी देऊन अशा जागावर महानगरपालिकेच्या नावाने बोर्ड लावावे. तार फेन्सींग करावी. गार्डन करावे, झाडे लावावी. परंतु काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे काही लोकांनी न्यायालयात दाद मागवून त्या जागेवर स्टे आणला व दिलेल्या पत्राचे उत्तर न्यायालयाचा स्टे आल्यानंतर मिळते की, न्यायालयाची या प्रकरणात स्थगिती आदेश आहे. हे बरोबर नाही.जागेवर एका इसमाने माझी जमीन आहे म्हणून प्रकरण न्यायप्रविष्ट केले. स्टे मिळाला व आता त्या जागेचा जवळपास १.१० गुंठे जागेचा तुळशीराम गंगाराम यांचे नावे वाहिती म्हणून एका तहसिलदार दर्जाच्या अधिकाऱ्याने मान्यता दिली. ही गोष्ट महानगरपालिकेला माहित नाही. दुर्दैवाची बाब आहे. मा.आयुक्तांनी अशा प्रकरणात लक्ष घालणे गरजेचे आहे. मध्यंतरी हे प्रकरण मा.जिल्हाधिकारी यांचेकडे गेलेले होते. तुळशीराम गंगाराम ले आऊटच्या नावाने बोर्ड लावण्यात आलेला होता. त्यावेळीच महानगरपालिका संबंधीत अधिकाऱ्यांना बोर्ड काढण्याबाबत कळविले होते. परंतु अगोदर अतिक्रमण काढावे मग ती कार्यवाही करतो अशा प्रकारची टाळाटाळ महानगरपालिकेचे दोन्हीही विभाग करतात. त्यामुळे अशा जागा महानगरपालिकेला सांभाळता येत नसतील तर वार्डातील लोकांना विकास कामासाठी देण्यात याव्या,

चोरांच्या हातात देऊ नये. अशी टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासन कार्य कार्यवाही करणार. शहरातील महानगरपालिकेच्या सर्वच जागा अतिक्रमण करुन बळकावून घेतल्यानंतर , कोटयवधीच्या जागा जातात. महानगरपालिका काहीच करत नाही. म्हणून जनता दोष देतील. कोटयावधी रुपयांची जागा जात आहे. प्रशासन काहीच करत नाही. लोकांनी कुणाकडे न्याय मागायचा असा प्रश्न निर्माण होतो. एक प्रश्न १०-१० वेळेस सभागृहात उपस्थित करावा लागत असेल तर प्रशासनाचे कामकाजाविषयीचे धोरण योग्य नाही. व्यवस्थित जागेचे रक्षण करावे. महानगरपालिकेचे बोर्ड लावावे. मा.आयुक्त यांनी यात लक्ष घालावे. अन्यथा चोरांच्या हाती सर्व जागा जातील व जनता दोष महानगरपालिकेला देतील व जो विकास करायचा तोही होणार नाही. तहसिलदार महानगरपालिकेची जागा असतांना एका व्यक्तीच्या नांवाने वहीती जमीन म्हणून डिक्लेअर करतो तर आपले अधिकारी काय करतात. काही तरी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा जागेचा विकासासाठी वापर करावा.

**मा.सभापती :** स.सदस्या यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. यासंबंधी प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. ती जागा कुणाची आहे. महानगरपालिकेची जागा असेल तर संबंधीत तुळशीराम गंगाराम यांचेवर नियमाने कार्यवाही व्हावी.

**श्री.दलबीरसिंग जबिंदा :** महानगरपालिकेच्या शहरातील जेवढयाही मालमत्ता आहेत त्या सुरक्षित ठेवण्यासाठी एक ठराविक निर्णय घेण्यात यावा. झोन अधिकारी यांचेकडे ही जबाबदारी सोपवावी तसेच ज्या त्या भागात जे कर निरीक्षक आहेत त्यांनाही जागेवर कुणी अतिक्रमण केल्यास जबाबदार धरावे.

**सौ.विजया रहाटकर :** एक व्यक्ति महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर अतिक्रमण करुन नळ कनेक्शन, लाईट मीटर, टॅक्स लावून घेतो. ही खेदाची बाब आहे.

**मा.सभापती :** महानगरपालिकेच्या खुल्या जागा सुरक्षित राहण्यासाठी व अतिक्रमण झालेल्या जागेची कार्यवाही करण्यास किती दिवस लागतील. मा.आयुक्तांनीच खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** स.सदस्या सौ.रहाटकर यांनी एस.बी.एच.कॉलनीचा जो मुद्दा उपस्थित केला. त्यावेळी त्या जागेवर तहसिलदार यांचा स्टे होता. महानगरपालिका हद्दीत ज्या जागा आहे त्यास कुळ कायदा लागू होत नाही. परंतु जोपर्यंत आपण प्रॉपर कोर्टाकडे अेप्राच होऊन त्यांनी चुकीचा दिलेला स्टे व्हॅकेट करुन घेत नाही तोपर्यंत आपणास कायदेशीर हस्तक्षेप करता येत नाही. आताच आपण उपजिल्हाधिकाऱ्याकडून तहसिलदाराने जो निर्णय दिलेला आहे तो अत्यंत चुकीचा निर्णय दिलेला आहे. जी ऑर्डर पास केली त्याचे विरुध्द स्टे दिलेला आहे. जे आपणांस करायचे होते ते केलेले आहे. स्टे असल्याने काही करता आले नाही हे मला मान्य आहे. मी स्वत: ती जागा पाहिली आहे. स.सदस्य श्री.जबिंदाही त्यावेळी होते. ही जागा पाहिल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, ही जागा महानगरपालिका क्षेत्रातील असुन कुळ कायद्याचे कलम लावून तहसिलदार यांनी स्टे दिलेला आहे.पाहणी केली त्यावेळेस मी स.सदस्या यांना बोललो होतो यासंबंधी ताबडतोब कार्यवाही करावी लागेल. मालमत्ता अधिकारी यांच्या सहीने आपण मा. जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी यांना तसे पत्र दिलेले आहे व तहसिलदाराने जी ऑर्डर पास केलेली आहे ते स्थगित ठेवण्यासाठी तसे

अपील सारखा अर्ज मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे व या अर्जाचा निकाल लागत नाही तोपर्यंत तहसिलदाराने निर्णय ग्राहय धरु नये, ती ऑर्डर स्थगित ठेवावी असे कळविलेले आहे. या प्रकरणात स्थगिती आदेश मिळालेले नव्हते. आता प्रयत्न करुन मिळालेले आहे. आपण पोटतिडकीने प्रश्न मांडला, आपली सर्व गोष्ट आम्हाला मान्य आहे,मनपाच्या खुल्या जागा अशा कुणीही गिळंकृत करुन नये व त्यासाठी आता सतर्क राहिले पाहिजे. त्यासाठी येत्या १५ दिवसाच्या आत म्हणजेच येत्या स्थायीसमिती सभेच्या आत ज्या जागा महानगरपालिकेने रेखांकन केलेल्या आहे व इतर जागा या बऱ्याचशा जागांना सिटी सर्व्हेचे नंबर लागलेले नाही. त्या बाबतीत संबंधीत सिटीसर्व्हे अधिकारी यांना बोलावून सांगितलेले आहे. आपले मालमत्ता अधिकारी यांना सुध्दा तशी सुचना दिलेली आहे की, सिटी सर्व्हे कार्यालयात जावून मनपाच्या मोकळया जागेचे प्रथम कार्ड काढावे. त्यासाठी अडचण अशी की, बऱ्याच भागांमध्ये सिटीसर्व्हेचा अंमल नाही. जो सिटीसर्व्हे झालेला आहे तो मर्यादीत स्वरुपात झालेला असून महानगरपालिकेची हद्द त्यापेक्षा खुप मोठी आहे. म्हणून संबंधीत विभागाला तसे कळवून संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील जागेचा सिटीसर्व्हे करुन महानगरपालिकेचे नांव नोंदवून घ्यावे लागेल. आपण काहीच कार्यवाही करत नाही असे नाही. कारण दोन-तीन विभाग हे बाहेरील आहेत. सिटीसर्व्हे विभाग महानगरपालिका प्रशासनाच्या अंतर्गत नाही. म्हणून संबंधी ताबडतोब कार्यवाही करावी. १५ दिवसांमध्ये कार्यवाही न केल्यास संबंधीत मालमत्ता अधिकारी यांना जबाबदार धरुन निलंबनाची सुध्दा कार्यवाही करण्यात येईल. ज्या जागेच्या तक्रारी आलेल्या आहेत, ज्या जागा अतिक्रमणात आहेत अशा जागेसंबंधी तक्रारी आहे. त्यासंबंधी तरी त्यांनी कार्यवाही तात्काळ करणे आवश्यक आहे. त्यानुसार सि.स.नंबर, महानगरपालिकेचा बोर्ड, इतर जागेवरसुध्दा व आपल्या नावाने सिटीसर्व्हे मध्ये नोंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

याबरोबरच "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सभापती | नगर सचिव |
| स्थायी समिती | महानगरपालिका औरंगाबाद |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०-३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक ३०-०३-२००१ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " मा. सभापती श्री. अशरफ मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेची " वंदे मातरम् " या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| १) स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | स. सदस्य |
| २) स. स. श्री. कावडे साहेबराव राणुबा | -//- |
| ३) स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान | -//- |
| ४) स. स. सौ. कुसुमबाई दौलत खरात | -//- |
| ५) स. स. श्री. गणेश रामचंद्र तांबे | -//- |
| ६) स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ | -//- |
| ७) स. स. श्री. जगदीश कन्हैयालाल सिध्द | -//- |
| ८) स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | -//- |
| ९) स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | -//- |
| १०) स. स. श्री. लकडे भरत श्रीपती | -//- |
| ११) स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव | -//- |
| १२) स. स. सौ. विजया किशोर रहाटकर | -//- |
| १३) स. स. श्री. सलिम पटेल समशेर पटेल | -//- |
| १४) स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर | -//- |
| १५) स. स. श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या | -//- |

**विषय क्र. ११५/१ :**

दिनांक १३-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अविनाश कुमावत :** इतिवृत्तांतील पान क्र. १७ वर मागील बैठकीत ऐनवेळचा विषय म्हणून संगणक खरेदीचा आलेला होता. त्या विषयास मंजुरी दिलेली आहे. परंतु इतिवृत्त आज आपण कायम करणार आहोत. शासनाकडून स्वेच्छानिधीतून संगणक यंत्र खरेदी करता येणार नाही अशी माहिती प्राप्त झाली. आहे. त्यानुसार आपण संगणक यंत्र खरेदी करु शकत नाही तसेच सर्वसाधारण सभेत दोनच ठिकाणी सिडको, तसेच महानगरपालिका टाऊन हॉल येथे प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा निर्णय झालेला असतांना लोटाकारंज येथे केंद्र स्थापन करणार असे दिले आहे. असे करता येणार नाही. कार्यालयासाठी घेण्यात यावे. इतर रद्द करावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** लोटाकारंजा येथे संगणक केंद्र स्थापन करण्यासंदर्भात सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झालेला आहे. त्यानुसार या प्रस्तावात तसे नमुद केलेले बरोबर आहे. शासनाचा जी. आर. येण्याअगोदर आपण संगणक केंद्र उघडण्याबाबतचा निर्णय झालेला आहे म्हणून प्रस्तावात नमुद

केल्याप्रमाणे संगणक केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. संबंधित स. सदस्य हे लोटाकारंजा येथे केंद्र उभारणीसाठी स्वतः त्यांचा स्वेच्छानिधी खर्च करणार आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** आता शासनाचा जी. आर. प्राप्त झालेला त्यानुसार कार्यवाही करावी लागेल. याबाबतचा सविस्तर खुलासा आयुक्तांनी करावा.

**मा. सभापती** : लोटाकारंजा येथे संगणक केंद्र उभारण्याबाबत सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. स. सदस्य स्वतः त्यांचा स्वेच्छानिधी खर्च करणार आहे. त्यापासून महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल. सर्व नियंत्रण मनपाचे राहणार आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** संगणक केंद्राची उभारणी व साहित्य स्वेच्छा निधीतून घेता येईल काय? शासनाचा जी. आर. प्राप्त झालेला आहे. मा. आयुक्त यांनी या संदर्भात खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : संगणक साहित्य खरेदीचा प्रस्ताव मागच्या बैठकीत आलेला होता. नगरसेवक स्वेच्छा निधी मार्गदर्शक तत्वे परिपत्रक दि. २६-०२-२००१ रोजी शासनाकडून प्राप्त झालेला आहे व त्यात नगरसेवकांनी स्वेच्छानिधी कसा वापरावयाचा याची मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. परिपत्रक प्राप्त झाल्यानंतर हा विषय मंजुरीसाठी आलेला आहे. परिपत्रकाच्या अंतर्गत शासनाने सर्वच महानगरपालिकेस परिशिष्ट " अ " व परिशिष्ट " ब " असे दिले आहे. परिशिष्ट " अ " मध्ये अनुज्ञेय कामांची यादी त्यात ३४ प्रकारची कामे दिलेली आहेत व " ब " मध्ये नगरसेवकांचा स्थानिक विकास कार्यक्रमांच्या मार्गदर्शक तत्वात बसत नसलेल्या कामाची नमुना यादी दिलेली आहे. यात १५ प्रकारची कामे दिलेली आहेत. क्रमांक ३ मध्ये असे दिले आहे की, रु. २.०० लाखापेक्षा जास्त अंदाजित खर्चाची म्हणजे मोठया स्वरुपाची कामे, उदा. स्टेडीयमचे बांधकाम व इतर कामे घेता येत नाही. यामध्ये क्र. ५ वर असे दिले आहे की, एखाद्या मोठया कामाला कमी पडणारी पुरक तरतुद करावयाची असेल तर हे सुध्दा नगरसेवकांच्या मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नाही. ज्या विषयावर चर्चा चालू आहे. त्याचा आज अंतिम निर्णय आपण घेता आहोत. म्हणून मागील बैठकीत निर्णय घेत असतांना ही मार्गदर्शक तत्वे अंमलात आणणे आवश्यक आहे. एखादे काम मंजूर झाल्यानंतर भविष्यात त्यावर येणारा खर्च उदा. संगणक प्रशिक्षण केंद्र उभारणार आहोत. परंतु भविष्यात कर्मचारी व इतर खर्च याचा सुध्दा विचार आपणांस करावा लागणर आहे. व म्हणूनच दोन प्रशिक्षण केंद्र आपण मंजूर केलेले होते व त्यासाठी संगणक खरेदीचा प्रस्ताव होता व तो आपण मंजूरही केलेला होता. परंतु शासनाचे परिपत्रकानुसार जी मार्गदर्शक तत्वे दिली आहे. त्यात हे बसत नसल्याने रद्द करण्याचा तसा प्रस्ताव मी स्वतः लेखा विभागाकडे पाठविला आहे. त्यात असे नमुद केले की, नगरसेवकांचा स्वेच्छा निधी प्रशिक्षण व इतर कामासाठी खर्च होणार होता. आता तो खर्च ३१ मार्च पर्यंत होणार नाही म्हणून ती रक्कम त्या त्या नगरसेवकांच्या नावावर शिलकी राहील. ती या वर्षीच्या स्वेच्छा निधीमध्ये समाविष्ट करण्यात येऊन त्या नगरसेवकांना तो स्वेच्छा निधी यावर्षी खर्च करता येईल. यावर आपणा सर्वांना काय निर्णय घ्यावयाचा तो घ्यावा. तसेच

सर्वसाधारण सभेत यावर चर्चा करुन निर्णय घेतल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. सलीम पटेल :** संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत सर्वसाधारण सभेने अगोदर निर्णय घेतलेला आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील वर्षापासून कार्यवाही करण्यात यावी. ठराव मंजूर झाल्यानंतर ताबडतोब कार्यवाही का करण्यात आली नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** संगणक साहित्य खरेदीसाठी टेंडर पास केलेले आहे. हा प्रस्ताव मंजुरी देण्यात यावी. लोटाकारंजा येथे संगणक केंद्र होण्या संदर्भात सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करणे योग्य आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** लोटाकारंजा येथे संगणक केंद्र करायचे असेल तर अशा प्रकारचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत अगोदर मंजुरी घेण्यात यावी.

**श्री. सलीम पटेल, श्री. कैसरखान :** लोटाकारंजा येथे संगणक केंद्र होण्याबाबत ठराव पास केलेला आहे. मागच्याच बैठकीत मा. आयुक्तांनी यावर खुलासा करावयास पाहिजे होता. आपण प्रस्ताव मागील बैठकीत मंजूर केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**मा. आयुक्त** : या विषयावर मी मागीत बैठकीतच खुलासा करणार होतो. परंतु मला खुलास करु दिला नाही. आता मी शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार खुलासा केलेला आहे.

**श्री. सलीम पटेल :** ठराव मागील बैठकीत मंजुर केलेला आहे. आता इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री. अविनाश कुमावत :** ठराव मंजूर करु शकत नाही. आमचा काही सदस्यांचा होणार नाही. मतदान घेण्यात यावे. त्यानुसार निर्णय घ्यावा.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. कुमावत यांचा संगणक खरेदी व लोटाकारंजा येथे संगणक केंद्र उभारण्याच्या प्रस्तावास विरोध आहे तशी नोंद इतिवृत्तात करण्यात यावी. हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

(विषय मंजूर केल्यामुळे बरेच स. सदस्य सभागृहात मोठमोठयाने बोलतात. काही ऐकू येत नाही.)

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** दोन सदस्य होकार देणार म्हणून हा प्रस्ताव मंजूर करणे योग्य नाही. एका स. सदस्यांच्या वार्डात संगणक केंद्र केल्यास इतरही स. सदस्य मागणी करतील. त्यांचेही वार्डामध्ये स्वेच्छानिधीतून संगणक केंद्र उभारणार काय? याचा खुलासा करण्यात यावा.

**श्री. अविनाश कुमावत :** आम्ही सेना-भाजप सदस्य या प्रस्ताव मंजूर करण्यास विरोध करत आहोत. मतदान पध्दतीने आमचा विरोध म्हणून कार्यवाही व्हावी.

(मतदान पध्दतीने या प्रस्तावावर निर्णय घेण्याची स. सदस्य मागणी करतात.स. सदस्य मा. सभापती यांचे डायस जवळ जाऊन मोठमोठयाने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

**मा. सभापती** : सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**श्री. सलीम पटेल :** जे स. सदस्य सभागृहात मोठमोठयाने बोलत असतील व कामात अडथळा निर्माण करत असतील अशा स. सदस्यांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** लोटाकारंजा येथे स. सदस्य श्री. तकी हसन खान हे त्यांचे स्वेच्छा निधीतून संगणक प्रशिक्षण केंद्रासाठी खर्च होणार आहे व तसा ठराव सर्वसाधारण सभेने मंजूरही केलेला आहे. त्यावेळी अशी चर्चा झाली की, जे स. सदस्य त्याचा स्वत:च्या स्वेच्छानिधी खर्च करण्यास तयार असतील तर त्यांनी सुध्दा त्यांच्या वार्डात संगणक प्रशिक्षण केंद्र उघडण्यास मंजुरी देण्यात येईल. असा निर्णय झालेला आहे. ज्याचा स्वेच्छा निधी असेल त्यांनी तसा ठराव मांडावा व पुढील कार्यवाही प्रशासन करेल.

**मा. सभापती** : हा प्रस्ताव आपण मंजूर केलेला आहे.

**श्री. जगदीश सिध्द :** मा. सभापती हे महाराष्ट्र शासनाच्या जी. आर. ला धुडकावीत आहेत. हा शासनाचा अवमान आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** १६ पैकी ९ स. सदस्यांचा या प्रस्तावास विरोध आहे. मतदान घेण्यात यावे.

**श्री. सलीम पटेल :** हात वरु करुन मतदान घ्यावे.

**मा. सभापती** : लोटाकारंजा येथील संगणक प्रशिक्षण केंद्र उघडण्यास कोणाचा विरोध आहे त्यांनी हात वर करावे.

ज्यांनी विरोध दर्शविला त्या बाजूने बहुमत न आल्याने हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** लोटाकारंजा येथे संगणक प्रशिक्षण केंद्र व संगणक साहित्य खरेदीचा प्रस्तावास मान्यता दिल्याने आम्ही सेना-भाजप सदस्य निषेध करत आहोत. याची इतिवृत्तांत नोंद व्हावी. (याच वेळी सेना भाजप सदस्य सभागृहाबाहेर जातात)

**मा. सभापती** : इतिवृत्तांतील पान क्र. २३ वर ठराव क्र. ११४/३ स्थगित ठेवण्यात आलेला होता त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. विषय क्र. १ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

(सभागृहाबाहेर गेलेले सर्व स. सदस्य पुन्हा सभागृहात येऊन बसतात.)

**सौ. विजया रहाटकर :** इतिवृत्तांतील पान क्र. २८ वर १.१० गुंठे ही जागा एस. बी. एस. कॉलनी येथील असून तुळशीराम गंगाराम यांचे नांवे वहीती म्हणून करण्यात आलेली जागा ही वेगळी आहे. तशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : सुधारणा मान्य करण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १३-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतील पान क्रमांक २३ वर स्थगित ठेवण्यात आलेल्या ठराव क्र. ११४/३ यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्यानुसार साईनगर म्हाडा कॉलनी जवळील खुल्या जागेत व्यापारी संकुल बांधण्याचे कामामध्ये इमारतींच्या कॉलमची खोली, फौंडेशन ट्रिटमेंट प्लींथ बीम इ. जास्तीचे वाढीव कामामुळे मुळ अंदाजपत्रक र. रु. १६,१०,०८०/- वाढीव अंदाजपत्रक र. रु. ७,२१,७९०/- असं एकूण र. रु. २३,३१,८७०/- च्या अतिरिक्त बाबीसह सुधारीत अंदाजपत्रकास त्याचप्रमाणे वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदाराकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या व इतर दुरुस्त्यांसह दिनांक १३-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११६/२ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव केला आहे की, रेल्वेस्टेशन परिसरातील साधना लॉज मागील मनपा मालकीच्या दुकान केंद्रातील दुकान बांधून त्या भाडेतत्वावर देणेकरीता मा.सर्वसाधारण सभा दिनांक १६-०३-९६ अन्वये ठराव क्र. १६३/३ अन्वये अनामत र. रु. ४०००/- प्रति चौ. मी. प्रमाणे घेण्याबाबत ठराव पारीत केला आहे. तसेच स्थायी समिती सभा ठराव क्र. ८१/७ दिनांक १८-०६३-९७ नुसार दुकानाचे भाडे रु. ६०.०० प्रति चौ. मीटर प्रतिमाह व मागील बाजुच्या दुकानाकरीता रु. ५०.०० प्रति चौ. मी. प्रतिमाह प्रमाणे निश्चित करण्यात येऊन दुकानाचा लिलाव करण्यात आलेला आहे. तथापी उपरोक्त ठराव क्र. ८१/७ दि. १८-०६-९७ च्या ठरावात खालील प्रमाणे दुरुस्त करुन करारनामा करुन दुकानाचा ताबा संबंधितांना देणे योग्य.

**दुरुस्ती :** भाडयाऐवजी अनामत रक्कम जास्तीत जास्त जो देईल त्यास देण्यास येईल. मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** या जागेवर दुकान बांधून देण्याबाबतचा कालावधी काय निश्चित केलेला होता. काम करण्यासाठी का उशिर झालेला आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** लिलाव पध्दतीने भाडे कमी येणार होते काय? खुलासा द्यावा.

**मालमत्ता अधिकारी :** अगोदर ही दुकाने भाडे तत्वावर देण्याबाबतचा निर्णय झालेला होता. त्यानंतर १९९७ मध्ये ६० रुपये प्रति चौ. मी. द्रव मागील बाजूस रु. ५० प्रति चौ. मी. प्रमाणे दुकाने देण्यात यावी. असे ठरले. जो जास्तीत जास्त अनामत रक्कम देईल त्यांना ही दुकाने देण्यात यावी असा स्थायी समितीने घेतलेला निर्णय जो की, ठराव क्र. ८१/७ नुसार बदल करण्यात येत आहे. सदर वेळी दुकानाचे बांधकाम प्रस्तावित केलेले नव्हते. अगोदर भाडे तत्वावर, नंतर अनामत रक्कम ४००० जो देईल त्यांना देण्याचे ठरले होते. त्यानंतर सन ९९ ला लिलाव पध्दतीने कार्यवाही झाली व आता जास्तीत जास्त अनामत रक्कम जो देईल त्यांना द्यावयाचे असल्याची दुरुस्ती करण्यात येत आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** सन ९७ ला लिलाव व सन ९९ ला फेरलिलाव असे दोन वेळेस लिलाव करण्यात आले. का करण्यात आले? अनामत रक्कम जमा झालेली नव्हती काय?

**मालमत्ता अधिकारी :** अगोदर ३५ दुकाने झालेली होती. त्याचे डिपॉझिट आपण घेतलेले होते व त्यानंतर १२ दुकाने वाढविण्यात आली. बांधकाम चालू होते व ठरल्यापेक्षा जास्तीत जास्त अनामत रक्कम जो देईल त्यांना देण्यात यावे अशी दुरुस्तीसह प्रस्ताव आलेला आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** एकदा लिलाव झाल्यानंतर बदल करता येत नाही. वेगळी काय दुरुस्ती करायची असेल ती करावी.

**मा. आयुक्त :** ठराव मांडतांना वेगळया पध्दतीने मांडलेला आहे. जो जास्तीत जास्त रक्कम देईल त्याप्रमाणे दुकान देण्यात येईल.

**मा. सभापती :** विषय क्र. २ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन परिसरातील साधना लॉज मागील मनपा मालकीच्या दुकान केंद्रातील दुकाने बांधून त्या भाडेतत्वावर देण्यासंबंधी स्थायी समिति ठराव क्रमांक ८१/७ दिनांक १८-०६-९७ मध्ये " भाडयाऐवजी अनामत रक्कम जास्तीत जास्त जो देईल त्यास देण्यात येईल अशी दुरुस्ती करुन करारनामा करुन देणारास दुकानाचा ताबा संबंधितांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/३ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्लम वार्ड नं. ७२ मध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करणे बाबतच्या कामाकरीता सा. बा. खाते यांचे वर्ष ९८-९९ च्या दरसुचीनुसार र. रु. १३,६४,३८६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम म्हाडाच्या राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम २०००-२००१ या शिर्षकातून खर्च करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दिनांक ०३-०२-२००१ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखे पर्यंत एकूण १८ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मन्नान खान | ०.५% कमी |
| २. | श्री. एस. कन्स्ट्रक्शन | ५% जास्त |
| ३. | श्री. सुजात अली हाश्मी | ८% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं. प. दरापेक्षा ०.५% कमी दराची श्री. मन्नान खान यांचे निविदेस मान्यतेच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**मा. सभापती** : विषय क्रमांक ३ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. किराडपुरा स्लम वार्ड नं. ७२ मध्ये कॉंक्रीट रस्ते तयार करण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची श्री. मन्नान खान यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/४ :**

प्रभारी कार्यकारी अभियंता (स्लम) यांनी मा. मुख्यलेखाधिकारी, मनपा यांच्या मतानुसार प्रस्ताव सादर केला की, मजनुहिल येथील मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्याच्या कामाचे र. रु. १,११,७८,१६५/- च्या निविदेचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर निर्णयास्तव ठेवला असता सदरील प्रस्तावास मा. स्थायी समितीने ठराव क्र. ४६१/२ दि. ०८-०१-१९९९ च्या इतिवृत्तांतान्वये मान्यता दिली.

तथापी इमारतीसाठी आत येण्यास व बाहेर जाण्यास असे दुतर्फा मुरुम भराव करुन अप्रोच रोड तयार करण्याच्या कामाच्या र. रु. ३,१२,०००/- चे अतिरिक्त बाबीस तत्कालीन मा. आयुक्त महोदय यांनी यापुर्वीच दिनांक २७-०६-२००० रोजी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तसेच इमारतीच्या बाह्य रचनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने कलातमक स्वरुपाचे काम उदा. आर. सी. सी. डोम बसविणे, कॉंक्रीटचे कलात्मक डिझाईन (पाकळया) व कळस तयार करणे, आर. सी. सी. पडदी तयार करणे तसेच प्रायोजित कंपाउँड वॉलच्या आर्कीटेक्चरल डिझाईनचे इत्यादी कामाच्या अतिरिक्त बाबींचे रु. ७,९२,०१६/-

तरी सदरील दोन्हीही अतिरिक्त बाबींचा खर्च हा मुळ अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १०% च्या आतच होत आहे. मा. आयुक्त महोदच यांनी मान्यता प्रदान केलेल्या सदरील अतिरिक्त बाबींचा एकूण खर्च हा १०.००% च्या आतच होत आहे. मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केलेल्या सदरील अतिरिक्त बाबींचा एकूण खर्च हा १०.०० लाखांपेक्षा जास्त असल्याने अतिरिक्त बाबींचा एकूण खर्च र. रु. ११,०४,०१६/- चा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अविनाश कुमावत :** संशोधन केंद्रासाठी स्वतंत्र बजेट असतांना स्लम मधून दाखविले.

**मुख्यलेखाधिकारी :** मुळ प्रस्तावाची कार्यवाही कार्यकारी अभियंता (स्लम) यांच्या मार्फतच होणार आहे.

**श्री. अविनाश कुमावत :** लेखाधिकारी यांचे मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे असे दाखविले. या अगोदर स्थायी समितीने या कामासाठी मंजुरी दिलेली असतांना पुन्हा प्रस्ताव आणण्याची गरज काय?

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे. या अगोदर ज्या एजन्सीजकडून काम करुन घेतले त्यांना हे काम देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राच्या इमारतीसाठी आत येण्यास व बाहेर जाण्यास असे दुतर्फा मुरुम करुन अप्रोच रोड तयार करण्याच्या कामासाठी येणाऱ्या र. रु. ३,१२,०००/- चे अतिरिक्त खर्चास त्याचप्रमाणे इमारतींच्या बाह्य रचनेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने कलात्मक स्वरुपाचे कामाच्या अतिरिक्त रक्कम रु. ७,९२,०१६/- असे दोन्ही मिळून र. रु. ११,०४,०१६/- च्या अतिरिक्त बाबींच्या खर्चास आणि हे काम मुळ गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ११९/१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, सन २०००-२००१ साठी आरोग्य विभागातील सर्व रुग्णालय व आरोग्य केंद्रासाठी औषध व साहित्यांची अत्यंत गरज आहे. त्यासाठी म्हणून जाहीर निविदा क्र.मनपा/आरोग्य/१२४९/२००० दिनांक ०५-१०-२००० प्रमाणे तीन वृत्तपत्रातून रोटेशनप्रमाणे जाहीरात देऊन दरपत्रके मागविण्यात आली. त्यानुसार खालील तीन पुरवठा धारकांकडुन दरपत्रके प्राप्त झाली.

१. मे. सर्जिको मेडीकल इंटरप्राईजेस, मुंबई
२. मे. केंकरे ब्रदर्स, मुंबई,
३. अश्विनी फार्मास्युटीकल्स, औरंगाबाद

वरील प्रमाणे प्राप्त तीन निविदापैकी दोन निविदाधारकांचे दर त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ॲटम क्रमांकांचे कमी दराचे आहेत.

१. मे. केंकरे ब्रदर्स- १ ते ११, १३ ते २१, २५ ते ३१, ३४ ते ३८, ४० ते ४२, ४४, ४६ ते ५०, ५७, ६० ते ६२, ६६, ६८, ७० ते ८८, ९०, ९२, ९३, ९९, १०१ ते १०९, १११, ११७, ११८, १२१, १२४, १२५, १२७ ते १२९, १३१ ते १३९, १४२ ते १४४, १४८ ते १६४, १६६, १६८ ते १७३, १७५, १७७ ते १७९, १८१ ते २०१, २०४ ते २११, २२१ ते २२८, २३०, २३२ ते २६४, २६६ ते २८५, २८७ ते ३०२, ३०४ ते ३२६, ३३० ते ३६४, ३६८, १७० ते ३७५, ३७७ ते ३८६, ३९० ते ४२३, ४२५ ते ४२९, ४३१ ते ४४०, ४४२ ते ४५९, ४६१ते ४७७, ४७९ ते ४८५, ४८७, ४८८, ४९० ते ४९२, ४९४ ते ५०२, ५०४, ५०५, ५०७, ते ५३८, ५४० ते ५४९, ५५५, ५५७ ते ५६०, ५६२ ते ५८४, ५८६ ते ६१७, ६२२ ते ६२७, ६३४, ६३५ आणि ६५२ -(एकूण ५३८ ॲटम्स)

२. अश्विनी फार्मास्युिटीकल्स- १२, ५१, ६९, ९४ ते ९७, १००, ११५, ११९, १२०, १२३, १२६, १६५, १६७, १७४, १७६, १८०, २०२, २०३, २२९, २३१, ६३६ ते ६४७ -(एकूण ३४ ॲटम्स)

मा. आयुक्तांनी पुरवठा धारकांबरोबर दि. ०२-०१-२००१ रोजी चर्चा केली. त्यानुसार दरपत्रकातील वाढीव दर गतवर्षी प्रमाणेच्या दरात देणे बाबत संबंधितांनी लेखी संमती दिली व तसेच गतवर्षीपेक्षा कमी दर ह्या वर्षाच्या दरपत्रकाप्रमाणे खरेदी करण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार मे. केंकरे ब्रदर्स, मुंबई यांचे एकूण ॲटम्स ५३८ चे दर तसेच मे. अश्विनी फार्मास्युटीकल्स यांचे एकूण ३४ ॲटम्सचे दर मंजूर करण्यात यावे. करीता, प्रस्ताव सादर केला आहे.

**संवाद :**

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** कोणती औषधी खरेदी करणार तसे प्रस्तावात दिलेले नाही. नुसते ॲटम क्रमांक दिलेले आहे. किती दवाखाने आहेत, कुठे आहे, खर्च किती येणार याची माहिती नमुद करावयास पाहिजे होती.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** ठराविकच वृत्तपत्रात जाहीरात देऊन दरपत्रके मागविली. सर्वच वृत्तपत्रात जाहीरात देऊन दरपत्रके मागविण्यात यावी.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मुंबईची औषधी कमी किंमतीची आहेत व दर्जाही चांगला नाही. यात औरंगाबाद मेडीसीन दर्शविलेले आहे. चांगल्या क्वॉलीटीचे असल्यास येण्यास हरकत नाही. परंतु त्यांची सुध्दा तपासणी करुनच कार्यवाही व्हावी. प्रस्तावात ॲटम क्रमांक दाखविले. नावासहीत माहिती द्यावयास पाहिजे. टेंडर अंतिम करण्यास इतका उशीर का झाला याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

**आरोग्य वैद्य अधिकारी :** डिसेंबर २००० मध्येच औषधी खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात आलेली होती. आज प्रस्तावास मान्यता देणे गरजेचे आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** मागील वर्षासाठी औषधी खरेदी केलेली होती काय केली असल्यास त्यासाठी मंजुरी घेण्यात आलेली आहे काय? खुलासा द्यावा.

**आरोग्य वैद्य अधिकारी :** मा. आयुक्तांना ३ लाखा पर्यंतचे अधिकार असल्याने गेल्या वर्षीसाठी औषधी खरेदीसाठी मा. आयुक्तांच्या मंजुरीनुसार कार्यवाही केलेली आहे.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा :** मा. आयुक्तांना जे अधिकार प्रदान केलेले आहे. तेवढयाच रक्कमेचे म्हणजे ३ लाखापर्यंत औषधी खरेदी करण्याची कार्यवाही व्हावी. प्रस्ताव सविस्तर माहितीसह सादर करावा.

**श्री. अविनाश कुमावत :** १५ लाख रुपयांचे औषधी खरेदीचे बजेट होते. याच बरोबर दोन एक्स-रे मशिन खरेदी करणे गरजेचे आहे. त्यासाठी १० लाख रुपये असे एकूण २५ लाख रुपये खर्च येईल.

**श्री. सलीम पटेल, श्री. दलबीरसिंग जबिंदा :** प्रस्तावात सविस्तर माहिती दिलेली नसल्याने सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी आणावा व तात्काळ उपाययोजना म्हणून मा. आयुक्तांच्या अधिकारात थोडयाफार प्रमाणात औषधी खरेदी करण्याचे आदेश द्यावेत.

**आरोग्य वैद्य अधिकारी :** या प्रस्तावाबाबतची सविस्तर माहिती मा. सभापती यांचेकडे दिलेली आहे.

**मा. सभापती :** माहिती सविस्तर मला दिलेली नाही म्हणून त्यावर रिमार्क देण्यात आलेला होता. त्यानुसार पुन्हा माहिती दिलेली नाही.

**श्री. दलबीरसिंग जबिंदा, श्री. मधुकर सावंत :** तीन महिन्यांसाठी लागणारे औषधी खरेदी करावे व तसे अधिकारी मा. आयुक्तांना द्यावे व पुन्हा प्रस्ताव सविस्तर माहितीसह सादर करावा.

**मा. सभापती :** प्रस्ताव सविस्तर माहितीसह सादर करावा. ३ महिन्यांसाठी जी औषधी खरेदी करणे गरजेचे आहे. तेवढीच औषधी खरेदी करण्याची कार्यवाही मा. आयुक्तांच्या मंजुरीने करण्यात यावी. तसे मा. आयुक्तांना अधिकार देण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २०००-२००१ साठी आरोग्य विभागातील सर्व रुग्णालय व आरोग्य केंद्रासाठी औषधी व साहित्यांच्या खरेदीचा प्रस्ताव सविस्तर माहितीसह पुन्हा सादर करावा.

तसेच रुग्णांसाठी औषधीची गरज पडत असल्याने तीन महिने पुरेल इतकी आवश्यक असलेली औषधी खरेदी करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२०/२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिडको एन-४ भागात विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकावयाच्या आहेत. त्यासाठी र. रु. १२,८७,६४१/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून स्थायी समितीची मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना क्र. ६६/२००१ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चौदा (१४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणेच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एस. कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. जी. आर. घोडेले | ३.२५% जास्त |
| ३. | मे. विपुल कन्स्ट्रक्शन | ५% जास्त |
| ४. | श्री. बादल महेंद्रकुमार | २% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा मे. एस. कन्स्ट्रक्शन यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार असा दर दिलेला आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तरी मे. एस. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरानुसारची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** या अगोदर कमी दराचे प्रस्ताव सादर झालेले आहे. आता ५% जास्त दराने आहे. आता जास्त दराने का आलेले आहेत.

**मा. सभापती** : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-४ भागात विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१/३ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट ते मकाई गेट पर्यंतच्या उर्वरीत साखळीमध्ये एम. एस. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र. रु. १८,०५,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. कार्यालयाची निविदा सूचना क्र. ७०/२००१ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ (८) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. अशोक कन्स्ट्रक्शन | १२.२१% जास्त |
| २. | श्री. व्ही. आर. महाजन | ७.८६% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री. व्ही. आर. महाजन यांचा आहे. म्हणजेच अं. प. दरापेक्षा ७.८६% जास्त असा दर दिलेला आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा जास्तीचा वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दरानुसार मान्य केला आहे. तरी मा. आयुक्त यांनी मान्य केलेला दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार श्री. व्ही. आर. महाजन यांनी निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**मा. सभापती** : विषय क्र. २ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिल्लीगेट ते मकाई गेट पर्यंतच्या उर्वरीत साखळीमध्ये एम.एस. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री. व्ही. आर. महाजन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ओखार्ड कंपनी ते नारेगांव पर्यंत २०० मी मी व्यासाची पोलीदी जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी र. रु. २४,७९,६७५- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली. कार्यालयाची निविदा सूचना क्र. ६६/२००१ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस

देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यता आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण बारा (१२) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एस कन्स्ट्रक्शन | १५% जास्त |
| २. | श्री. जी. आर. घोडेले | ११.८८% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दर हा श्री. जी. आर. घोडेले यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८८% जास्त असा दर दिलेला आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा जास्तीचा वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांच्यासोबत दराबाबत वाटाघाटी झाल्या. त्यामध्ये अंदाजपत्रकीय दरानुसार असा दर मान्य करण्यात आला असून, त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार जी. आर. घोडेले यांची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ओखार्ड कंपनी ते नारेगांव पर्यंत २०० मी. मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम जी. आर. घोडेले यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३/५ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, जालना रोड रस्ता रुंदीकरणाच्या कामात बाधीत होणारी जुनी २०० मी. मी. व्यासाची जलवाहिनी काढून रस्त्याच्या कडेला २०० मी. मी. व्यासाची डी. आय. के.-९ नविन जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र. रु. २४,८१,४७३/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभा दिनांक १९-०१-२००१ मध्ये ठराव क्र. १९२/२ अन्वये मान्यता मिळाली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक ६४/२००१ जी की, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तेरा (१३) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण पाच (५) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेच्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | व्ही. आर. महाजन | १७.२% कमी |
| २. | जी. आर. घोडेले | १७.५१% कमी |
| ३. | पी. पी. जोशी | ६.७८६% कमी |
| ४. | मन्नान खान | १७% कमी |
| ५. | एम.एस. काथार | निविदा उघडण्यात आली नाही. |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हा जी. आर.घोडेले यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५१% कमी असा दर आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. तरी जी. आर. घोडेले यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५१% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**मा. सभापती** : विषय क्रमांक ५ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड रस्ता रुंदीकरणाच्या काता बाधीत होणारी जुनी २०० मी. मी. व्यासाची जलवाहिनी काढून रस्त्याच्या कडेला २०० मी. मी. व्यासाची डी. आय. के-९ नवनि जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.५१% कमी दराची जी. आर. घोडेले यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४/६ :**

कार्यकारी अभियंता (पापु व ज. नि.) प्रस्ताव सादर करीत आहे की, मो. भावसिंगपुरा पेठेनगर येथे १५० व १२५ मी मी व्यासाची एस. ड. ब्ल्यु. जी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी दि. २६-०१-२००१ चे स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र. ५ अन्वये अंदाजपत्रक र. रु. ११,८९,१५२/- ला मान्यता मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र. मनपा/लेखा/नि/६२/२००१ दि. १९-०१-२००१ चे निविदा सूचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकूण (२३) निविदा विक्री झाल्या. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या तारखेस एकूण (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रकाश जाधव | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. एस. एम. शेख | २.५०% जास्त दराने |
| ३. | श्री. शे. इकबाल अहमद | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. प्रकाश जाधव यांची निविदा आहे. तसेच श्री. शे. इकबाल अहेमद यांनी निविदेसोबत १% इसारा रक्कम जमा न केल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आली नाही.

करीता सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दराची श्री. प्रकाश जाधव यांची निविदा असून, प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : विषय क्रमांक ६ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. भावसिंगपुरा पेठेनगर येथे १५० व १२५ मी. मी. व्यासाची एम. डब्ल्यु.जी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. प्रकाश जाधव यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५/७ :**

उप आयुक्त (म) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत प्राणी संग्राहालयासाठी सन २००१-२००२ या एका वित्तीय वर्षाकरीता बीफ (खन्नी) ल्युसर्न घास, शाळु-कडबा/बाळुक, मासोळी, ऊस, ब्रेड, भाजीपाला, फळाफळावळ व किराणा पदार्थ इ. निविदा मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त निविदापैकी निविदा धारकांचे नांव व त्यांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

१. बीफ (खन्नी) : बीफ (खन्नी) करीता विक्रीच्या नियोजीत तारखेस एकूण (७) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली. पैकी निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस

एकूण (४) निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये श्री. हुसेन खान मजीदखान यांनी निविदापत्रकासोबत डीएमडी भरलेली जोडलेली नाही.

| अ. क्र. | निविदा धारकांचे नांव | दर प्रति किलो रुपये |
|---|---|---|
| १. | श्री. फिरोजखान अ. रहेमानखान | ३२=०० |
| २. | श्री. शे. मलील शे. चाँद | ३५=०० |
| ३. | श्री. मुसा अ. करीम | ३६=०० |
| ४. | श्री. हुसेनखान मजीदखान (नो इएमडी) | ४०=०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री. फिरोजखान अ. रहेमानखान यांचे दर प्रतिकिलो रु. ३२=०० कमी आहेत. तथापी मा. आयुक्त यांचेशी वाटाघाटी केल्यानंतर बीफ (खन्नी) चे दर रु. २३=०० प्रतिकिलो प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहेत. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

२. मासोळी : मासोळी करीता विक्रीच्या नियोजीत तारखेस एकूण (२) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली असून, त्यापैकी स्विकृतीच्या तारखेस एकूण (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | मासोळीचा प्रकार | भाव प्रति किलो रुपये |
|---|---|---|---|
| १. | श्री. मुमताज अहमद | अ) कतला | ६३=५० |
| | | ब) राहु | ६३=५० |
| | | क) मिरगळ | ६३=५० |
| | | झिंगे | ७५=०० |
| २. | श्री. वालचद च. गुगले | अ) कतला | ६९=०० |
| | | ब) राहु | ६९=०० |
| | | क) मिरगळ | ६९=०० |
| | | झिंगे | १२५=०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री. मुमताज अहमद यांचे मासोळीचे दर व झिंगेचे दर सर्वात कमी आहेत. तथापी मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटी नंतर मासोळी प्रतिकिलो रु. ६०=०० झिंगे प्रतिकिलो रु. ७५=०० प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

३. ल्युसर्न घास : ल्युसर्न घासाकरीता एकूण (५) कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली असून, एकूण (३) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | दर प्रति किलो रुपये |
|---|---|---|
| १. | श्री. मजाराम देविदास देवखळे रा. नारेगांव, औरंगाबाद | १=५० |
| २. | श्री. जनार्दन कोंडाजी शेळके रा. अब्दीमंडी, औरंगाबाद | १=५० |
| ३. | श्री. संतराम बंडुजी नवपुते रा. चिकलठाणा, औरंगाबाद | १=५० |

श्री. मंजाराम देविदास देवखळे व श्री. जनार्दन को. शेळके यांचे ल्युसर्न घासचे दर प्रतिकिलो रु. १=५० समान आहेत. तथापी मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार

श्री. जनार्दन को. शेळके रा. अब्दीमंडी, औरंगाबाद यांनी ल्युसर्न घास प्रतिकिलो रु. १=४९ प्रमाणे पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

४. शाळु ज्वारी बाळुक व कडबा : शाळु ज्वारी कडबा व बाटुक करीता एकूण (४) कोऱ्या निविदापत्रकांची विक्री झाली असून, त्यापैकी एकूण (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये एका निविदाधारकाने निविदापत्रकासोबत इ. एम. डी. जोडलेली नाही. म्हणून विचारात घेण्यात आलेले नाही व इतर (३) निविदा धारकांचे प्राप्त दराचे तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | दर प्रति किलो टन रुपये शाळु ज्वारी बाळुक शाळु ज्वारी कडबा | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जनार्दन को. शैळके रा. अब्दीमंडी, औरंगाबाद | ५२५०=०० | ४२१०=०० |
| २. | श्री. शे. इसाक शे. फकीर महंमद रा. जांभळी ता. पैठण | ५५००=०० | ४५००=०० |
| ३. | श्री. जे. बी. मोगल, रा. गजानननगर, गारखेडा, औ. | ७५००=०० | ३८००=०० |

अनुक्रमे १ व ३ याचे दर कमी असल्यामुळे मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटीनंतर श्री. जनार्दन कों. शेळके रा. अब्दीमंडी यांनी शाळु बाटुक रु. ५०००=०० प्रतिटन प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहेत. तसेच श्री. जे. बी. मोगल रा. गजाननगर, गारखेडा यांनी कडबा (शाळु) प्रतिटन रु. ३८००=०० प्रमाणे पुरवठा करण्यास तयारी दर्शविली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

५) पशुखाद्य व कोंबडी खाद्या (गोदरेज) : याकरीता एकूण एक कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली व ही निविदा दर भरुन प्राप्त झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नॅशनल ट्रेडींग कं., सिटीचौक औरंगाबाद | १२००=०० प्रति क्विंटल (पशुखाद्य) | १६५०=०० रु. प्रति क्विंटल (पक्षी खाद्य) |

वरील प्रमाणे एक निविदापत्रक दर भरुन प्राप्त झालेले असून, मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटीनंत नॅशनल ट्रेडींग कं., सिटीचौक, औरंगाबाद खालील दरानुसार पुरवठा करण्यास तयार आहेत. पशुखाद्य (गोदरेज) साठी रु. ११५०.०० व पक्षी खाद्यासाठी रु. १६५०.०० करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

६) ब्रेड - ब्रेड करीता २ कोऱ्या निविदा पत्रकांची विक्री झाली असून, त्यापैकी दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | ब्रेडचे दर प्रति किलो पुडा रुपये (२०० ग्रॅम) | (२५० ग्रॅम) |
|---|---|---|---|
| १. | श्री. जनार्दन को. शैळके रा. अब्दीमंडी, औरंगाबाद | ५=०० | ६=०० |
| २. | एलोरा बेकरी, जुनाबाजार, औरंगाबाद | ६=०० | ७=०० |

मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटीनंतर सवेरा बेकरी, जुनाबाजार औरंगाबाद यांनी २०० ग्रॅम ब्रेडसाठी रु. ५=०० व २५० ग्रॅम ब्रेडसाठी रु. ६=०० प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

(७) किराणा पदार्थ : किराणा पदार्थांसाठी (३) को-या निविदापत्रकांची विक्री झाली. त्यापैकी (२) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली.

| अ.क्र. | मालाचा तपशील | श्री. गजानन म. हारदे दर प्रति किलो रुपये | युनूस किराणा स्टोअर्स दर प्रति किलो रुपये |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | हरभरे | १९=०० | २२=०० |
| २. | गहू | ९=०० | १०=०० |
| ३. | तांदुळ | ११=५० | १५=०० |
| ४. | शेंगदाणे | २६=०० | २८=०० |
| ५. | गुळ | १३=०० | १९=०० |
| ६. | साखर | १६=०० | १६=०० |
| ७. | कॉफीवडी | ५=०० | १४=०० |
| ८. | निरमा पावडर | १७=५० | १९=०० |
| ९. | माचीस बॉक्स | ७=०० | ५=०० |
| १०. | लक्स सोप | १०=०० | १५=५० |
| ११. | रिन सोप | १७=०० | १६=०० |
| १२. | लाईफबॉय सोप | १०=५० | ८=५० |

तुलनात्मकदृष्टीने श्री. गजानन यमाजी हारदे यांचे ॲटम नंबर १, २, ३, ४, ५, ७, ८ व १० यांचे दर सर्वात कमी आहेत. तसेच युनूस किराणा स्टोअर्स ॲटम नंबर ९, ११, व १२ यांचे दर कमी आहेत. मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटीनंतर श्री. गजानन हारदे यांनी ॲटम नंबर १, २, ३, ४, ५, ७, ८ व १० आणि युनुस किराणा स्टोअर्स यांनी ॲटम नंबर ९, ११ व १२ निविदा दरानुसार पुरवठा करण्यास तयार आहेत. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

(८) भाजीपाला व फळफळावळ : याकरीता एकूण (३) को-या निविदापत्रकांची विक्री झाली असून, त्यापैकी एकूण (२) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | मालाचा तपशील | श्री. प्रभाकर पवार दर प्रति किलो रु. | मो. सलीम ॲण्ड कं. दर प्रति किलो रु. |
|---|---|---|---|
| १. | केळी | ८=०० | १२=०० |
| २. | मोसंबी | १२=०० | २४=०० |
| ३. | चिकु | १६=०० | २४=०० |
| ४. | पि. टोमॅटो | ७=०० | १३=०० |
| ५. | काकडी (खिरे) | १६=०० | १८=०० |
| ६. | गाजर | ६=०० | १०=०० |
| ७. | बटाटे | ६=०० | १०=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | कोबी | ८=०० | १४=०० |
| ९. | वांगी | ६=०० | ९=०० |
| १०. | पालक भाजी | ५=०० | ६=०० |

मा. आयुक्त यांचेशी झालेल्या वाटाघाटीनंतर श्री. प्रभाकर श्री. पवार (ॲटम क्र. १ ते १०) यांनी निविदेमध्ये नमुद केलेल्या दरानुसार पुरवठा करण्यास तयार आहेत. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्राणी संग्राहालयातील प्राण्यासाठी खाद्यपदार्थ खरेदीचा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या प्राणी संग्राहालयासाठी सन २००१-२००२ या वित्तीय वर्षाकरीता बीफ (खन्नी), ल्युसर्न घास, शाळु कडबा/बाटुक, मासोळी, ब्रेड, भाजीपाला, फळफळावळ व किराणा पदार्थ खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे खालील दर्शविलेल्या निविदाचे दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. बीफ (खन्नी) - करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीनुसार श्री. फिरोजखान अ. रहेमान खान यांचे प्रतिकिलो रु. २३=०० या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

| अ.क्र. | निविदाधारकांचे नांव | वस्तुंचे विवरण | मंजूर दर (भाव) |
|---|---|---|---|
| २. | श्री. मुमताज अहमद | मासोळी | रु. ६० प्रति किलो |
| | | शिंगे | रु. ७५ प्रतिकिलो |
| ३. | श्री. जनार्दन को. शेळके | ल्युसर्न घास | रु. १-४९ प्र. किलो |
| ४. | श्री. जनार्दन को. शेळके<br>श्री. जे. बी. मोगल | शाळु बाटुक<br>शाळु कडबा | रु. ५००० प्र. टन<br>रु. ३८०० प्र. टन |
| ५. | नॅशनल ट्रेडींग कं., सिटीचौक | पशुखाद्या (गोदरेज) | रु. ११५० प्रति क्विंटल |
| | | पक्षीखाद्य | रु. १६५०-//- |
| ६. | सवेरा बेकरी, जुनाबाजार | ब्रेड-२०० ग्रॅम | रु. ५=०० प्रति |
| | | ब्रेड-२५० ग्रॅम | रु. ६=०० पुडा |
| ७. | श्री. गजानन यमाजी हारदे | किराणा पदार्थ | प्रति किलो |
| | | १. हरभरे | रु. १९.५० |
| | | २. गहू | रु. ०९.०० |
| | | ३. तांदुळ | रु. ११.५० |
| | | ४. शेंगदाणे | रु. २६.०० |
| | | ५. गुळ | रु. १३.०० |
| | | ७. कॉफीवडी | रु. ५.०० |
| | | ८. निरमा पावडर | रु. १७.५० |
| | | १०. लक्स सोप | रु. १०.०० |
| | युनुस किराणा स्टोअर्स | ९. माचीस बॉक्स | रु. ०५.०० प्रतिनग |
| | | ११. रिन सोप | रु. १६.०० प्रतिनग |
| | | १२. लाइफबॉय सोप | रु. ०८.०० प्रतिनग |

८. श्री. प्रभाकर वि. पवार यांनी भाजीपाला व फळाफळावळसाठीचे प्रस्तावातील ॲटम क्रमांक १ ते १० चे दर्शविलेल्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, समर्थनगर मधील अंतर्गत रस्त्याने पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी सा. बां. खात्याच्यासन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र. रु. १७,७३,३३६-०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता एकूण अकरा कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त सात निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ०९-०३-२००१ रोजी उघडण्यात आली असून, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | ३०.३५% कमी |
| २. | श्री. डी. अजितसिंग | २६.२५८% कमी |
| ३. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | २१.८८% कमी |
| ४. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २०.८६% कमी |
| ५. | मे. गरुनानक इंडस्ट्रीज | १८.००% कमी |
| ६. | श्री. ए. सी. कोठारी | १७.९९% कमी |
| ७. | श्री. जी. एम. जग्गी | ११.४५% कमी |

.

वरीलप्राप्त निविदापत्रकापैकी मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०.३५% कमी दराचे आहेत. करीता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर मधील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३०.३५% कमी दराची मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, टेलिकॉम मुख्य कार्यालय ते रविवार बाजार ते जाफरगेट या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामासाठी सा. बा. खात्याच्या सन १९९९-२००० च्या दरसुचीनुसार र. रु. १७,४६,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. स्थायी समितीची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविण्यता आली असता एकूण नऊ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त सात निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक ०९-०३-२००१ रोजी उघडण्यात आली असून, खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जग्गी कन्स्ट्रक्शन | ३३.३२% कमी |
| २. | श्री. ए. सी. कोठारी | २९.९५% कमी |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | २६.२५% कमी |
| ४. | श्री. एम. ए. सिद्यीकी | २५.३४% कमी |
| ५. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | २०.८६% कमी |
| ६. | मे. पाटील कन्स्ट्रक्शन | २०.८८% कमी |
| ७. | मे. रे कन्स्ट्रक्शन | २०.१७% कमी |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३३.३२% कमी दराचे आहेत. करीता निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टेलिकॉम मुख्य कार्यालय ते रविवार बाजार ते जाफरगेट या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ३३.३२% कमी दराची मे. जग्गी कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८/१० :**

सिडको एन-११ व परिसरासाठी २६ लाख लि. क्षमतेचा कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग म. न. पा. यांनी सन १९९८-९९ च्या दरसुची नुसार उपरोक्त जलकुंभाच्या रु. ५७.८६ लाखांच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानंतर सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवाव असे आदेशित केले. त्यानुसार सदर प्रस्ताव हा ११/२००० च्या सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आला.

सर्वसाधारण सभेत विषय क्र. २३०/७ अन्वये सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली. सिडको प्रभागात पाणी पुरवठा योजनासाठी रु. १.०० कोटी ठेवण्यात आले होते. परिसराचा पाणी प्रश्न व अत्यावश्यकता पाहता सर्वसाधारण सभेने त्यास ठेकेदारांच्या नावांसहीत मान्यता दिली. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर तांत्रिकदृष्ट्या प्रस्तावास स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. परंतु त्या काळात स्थायी समिती अस्तित्वात नव्हती.

या प्रस्तावा अंतर्गत सदर योजनेस स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको एन-११ परिसरासाठी २६.०० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधणेच्या कामाकरीता ११/२००० च्या सर्वाधारण सभेत विषय क्रमांक २३०/७ अन्वये ठेकेदाराच्या नावांसहीत मान्यता दिलेल्या ठरावास सर्वानुमते स्विकृतीसह कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
स्थायी सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ३०-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दिनांक ३०-०३-२००१ रोजी दुपारी ३.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील " मलिक अंबर स्थायी समिती सभागृह " मा. सभापती श्री. अशरफ मोतीवाला यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेची सुरुवात झाली. या सभेस मनपा अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१. स. स. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण स. सदस्य
२. स. स. श्री. कैसरखान बद्रोद्दीन खान -//-
३. स. स. श्री. कावडे साहेबराव राणुबा -//-
४. स. स. सौ. कुसुमबाई दौलत खरात -//-
५. स. स. श्री. गणेश रामचंद्र तांबे -//-
६. स. स. श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ -//-
७. स. स. श्री. जगदीश कन्हैयालाल सिध्द -//-
८. स. स. श्री. जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग -//-
९. स. स. श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल -//-
१०. स. स. श्री. लकडे भरत श्रीपती -//-
११. स. स. श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव -//-
१२. स. स. सौ. विजया किशोर रहाटकर -//-
१३. स. स. श्री. सलिम पटेल समशेर पटेल -//-
१४. स. स. श्री. सावंत मधुकर दामोधर -//-
१५. स. स. श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या -//-

**विषय क्र. १२९/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ पोट कलम "ड" अन्वये आणि महाराष्ट्र शासन सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १७ दि. १६ सप्टे २००० अन्वये झालेल्या दुरुस्ती प्रमाणे मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी रु. ५०,०००/- पेक्षा जास्त परंतु रु. १०,००,०००/- (दहा लाख रु.) मर्यादेपर्यंत मंजूर केलेल्या निविदांचे तपशील विभाग प्रमुखांकडे प्राप्त झालेले आहेत. तो विभाग निहाय मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

विभाग- कार्यकारी अभियंता (पा.पु. व जलनिःसारण) जलनिःसारण विभाग-१

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | उस्मानपुरा येथील गुरुद्वारा ते पीरबाजार रोड वरील संत गुलाब कॉम्प्लेक्स व राम मंदीरासमोर १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | २,९३,०००/- | |
| २. | रेल्वेस्टेशन रोडवर चेलीपूरा हायस्कुल मागे १५० मी. मी. व्यासाची चीनी पाईपलाईन टाकणे | ७८,६६९/- | |
| ३. | चौसरनगर व दशमेशनगर येथे डॉ. बोरकर यांचे घराजवळ १५० मी.मी. व्यासाची चीनी पाईपलाईन टाकणे | ७६,३००/- | |
| ४. | प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा जवळील कब्रस्तानमधील ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन शिफ्ट करणे. | २,१३,४००/- | |
| ५. | सुपारी हनुमान रोडवरील श्री.नाईक यांच्या घरापासुन श्री. जैस्वाल यांच्या | ५८,१२५/- | |

| | | | |
|---|---|---|---|
| | घरापर्यंत २२५ मी. मी. व्यासाची चिनी मातीची जलनि:सारण वाहिनी टाकणे | | |
| ६. | गारखेडा येथे अपुलकी अपार्टमेंट जवळ २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे. | ५४,२००/- | |
| ७. | नासगल्ली येथे २२५ मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी लाईन अंजठा हॉटेल पर्यंत टाकणे. | ५७,२३८/- | |
| ८. | पद्मपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे व विविध ठिकाणी गटार दुरुस्त करणे. | ६६,८३०/- | |
| ९. | पद्मपुरा येथे हनुमान मंदिरासमोरील जलनि:सारण वाहिनी अप्रूटींग करणे. | १,३८,०६३/- | |
| १०. | खोकडपुरा येथील श्री. शेळके निवास ते श्री. तिवारी यांचे घरापर्यत गटार दुरुस्त करणे. | ७०,८००/- | |
| ११. | उस्मानपुरा येथे ललीत कला भवन जवळ दगडी गटार बांधणे | ९९,९००/- | |
| १२. | चुनाभट्टी सुपर मार्केट पर्यंत नाल्यातील गाळ काढणे | ६३,७६३/- | |
| १३. | बॉम्बे मर्केटाईल बँक ते औरंगपुरा नाल्यातील गाळ काढणे | ५८,०००/- | |
| १४. | राहुलनगर भागात ड्रेनेज लाईन टाकणे. | ३,०५,२७६/- | |
| १५. | पंचशिलनगर ते बालाजीनगर नाल्यापर्यंत पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटार बांधणे. | ९९,६००/- | |
| १६. | अमान कॉलनी सादतनगर येथे २०० मी. मी. व्यासाची चिनी पाईप लाईन टाकणे. | ३,३३,५६१/- | |

जलनि:सारण विभाग - २ :

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मो. शरीफ कॉलनी वार्ड क्र. ७१ च्या अंतर्गत असलेली ३०० मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे. | ९८,५८४/- | |
| २. | रहेमानिया कॉलनी मलिक अंबर हा. सो. अंतर्गत असलेली जुनी १५० मी. मी. व्यासाची लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | १,१०,८३७/- | |
| ३. | रोषण कॉलनी रोषण मस्जीदजवळच्या गल्लीतील १५० मी. मी. व्यास लाईन काढून २५० मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन टाकणे. | १,२६,५००/- | |
| ४. | किराडपुरा वार्ड क्र. ७२ मजीदच्या समोरील लाईन काढून २५० मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन टाकणे | १,०१,२५०/- | |
| ५. | लालमंडी टिंबर गल्ली बेगमपुरा येथे १५० मी. मी. व्यास लाईन काढुन २२५ मी. मी. लाईन टाकणे | ६६,१२१/- | |
| ६. | रोहिला गल्ली येथे श्री. मुश्ताक अहेमद यांच्या घराजवळ १५० मी. मी.व्यास ड्रेनेज लाईन टाकणे. | ५६,०६०/- | |
| ७. | मो. शहाबाजार येथे मौलाना आझाद प्रा. शाळेच्या पाठीमागे असलेली जुनी १५० मी. मी. व्यास लाईन काढून २५० मी. मी. व्यास लाईन टाकणे. | १,०५,०००/- | |
| ८. | मो. शहाबाजार अशोकनगर येथे जुनी लाईन काढुन २२५ मी मी व्यास ड्रेनेज लाईन टाकणे | २,३७,०१३/- | |
| ९. | कैसर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे. | २,१७,६००/- | |
| १०. | अशोकनगर बौध्द समाजमंदिर समोर १५० मी. मी. व्यासाची लाईन काढून २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ८८,१७२/- | |
| ११. | मो. प्रगती कॉलनी येथे १५० मी. मी.व्यासाची लाईन काढुन ३०० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | ३,०६,९८८/- | |
| १२. | करीम कॉलनी येथे शे. इद्रिस यांच्या घरासमोरील १५० मी. मी. व्यासाची लाईन काढुन २२५ मी मी चिनी मातीची लाईन टाकणे. | ८१,८९७/- | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | नेहरुनगर वार्ड क्र. ४६ मध्ये विविध गल्यामध्ये ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. | ७१,५११/- | |
| १४. | निजामगंज येथे ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे. | १,५०,०००/- | |
| १५. | कैलासनगर येथे ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे. | ६५,१००/- | |
| १६. | मो. मुलूमची बाजार येथे गोणी गल्लीतील १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे. | १,१६,०४०/- | |
| १७. | कैलासनगर येथे गटारीची दुरुस्ती करणे व चौकोणी ढापे टाकणे. | ७०,५००/- | |
| १८. | सिध्दार्थनगर येथे १५० मी. मी. व्यासाची लाईन काढून २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ९८,८५४/- | |
| १९. | मो. फाजलपुरा एसटी कॉलनी येथे जुनी १५० मी. मी. व्यासाची लाईन काढुन २२५ मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ९३,३५०/- | |
| २०. | माळीवाडा काचीवाड अंतर्गत १०० मी. मी. व्यासाची लाईन काढुन २२५ मी. मी. ड्रेनेज लाईन टाकणे. | ५३,०७३/- | |
| २१. | रमनस्तपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन अपरुटींग करणे. | ५८,६५०/- | |
| २२. | गौतमनगर घाटी येथे जुनी १५० मी. मी. व्यासाची लाईन काढुन २५० मी. मी. ड्रेनेज लाईन टाकणे. | २,१८,८००/- | |
| २३. | रहेमानिया कॉलनी येथे मजीदच्या मागे २५० मी. मी. व्यास लाईन अपरुटींग करणे. | १,११,०५०/- | |
| २४. | मो. किराडपुरा येथे मोहम्मदी ३०० मी. मी. व्यासाची लाईन टाकणे. | २,३३,७७०/- | |
| २५. | मो. कैलासनगर येथे गटारीची दुरुस्ती करणे व चौकोणी ढापे टाकणे. | ७०,५००/- | |
| २६. | बुढ्ढीलेन मधील जुनी गटार दुरुस्त करणे व नादुरुस्त गटार ठिकाणी अर्धगोल गटार बांधणे. | १,८६,२००/- | |
| २७. | मो. बुढ्ढीलेन येथे २५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ६४,९२०/- | |
| २८. | आनंदनगर व्ही. आय. पी. रोडवर ड्रेनेज लाईन टाकणे. | ६९,४५०/- | |
| २९. | मो. आरेफ कॉलनीच्या अधिकृत वस्तीमध्ये २५० व ३०० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ७,७०,५००/- | |
| ३०. | महाराष्ट्र हा. सौ. येथे रोषणगेटकडे जाणाऱ्या मुख्य रोडवर १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ५७,५००/- | |
| ३१. | मो. शेरखॉन कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची लाईन काढून २५० मी. मी. ड्रेनेज लाईन टाकणे. | १,६७,८१०/- | |
| ३२. | मो. किराडपुरा येथे २५० मी. मी. व्यास व ३०० मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन टाकणे. | ३,८६,८८०/- | |
| ३३. | मो. भावसिंगपुरा स. न. ५१ मधील वसुंधरा को. ऑप. हा. सो. १५० मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन टाकणे. | ३,०५,२५०/- | |
| ३४. | मो. किराडपुरा अक्सा मस्जीद व इतर गल्यामध्ये २५० मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन टाकणे. | १,२३,९८३/- | |
| ३५. | मो. शांतीपुरा भागात २२५ मी मी व्यास चिनीमातीची ड्रेनेज लाईन टाकणे. | १,४४,०००/- | |
| ३६. | राजाबाजार कुंवारफल्ली येथील जुनी मोडकळीस आलेली दगडी गटार तोडुन नविन ३०० मी. मी. व्यास व ४५० मी. मी. व्यास अर्धगोल गटार बांधणे. | ५,२२,५००/- | |
| ३७. | किराडपुरा पाण्याच्या बंबाजवळ ते कटकटगेट मार्गे पुढे अशोकनगर स्मशानभुमी पर्यंत असलेल्या नाल्याची साफ सफाई करणे. | १,१७,३११/- | |
| ३८. | मो. हर्षनगर ते बी. एम. सी. बँकेपर्यंत नाला साफ करणे. | ५८,१६०/- | |
| ३९. | गांधीनगर येथे नाल्याची साफसफाई करणे. | ७४,९००/- | |
| ४०. | जाफरगेट ते स्मशान मारुती मंदिर पुलापर्यंत नाल्याची सफाई करणे. | ७६,९३०/- | |
| ४१. | मो. रहिम कॉलनी किराडपुराच्या अंतर्गत असलेल्या नाल्याची सफाई | ९१,५४२/- | |

| | | | |
|---|---|---|---|
| | करणे. | | |
| ४२. | करीम कॉलनी येथील श्री. इंद्रिस यांच्या घरापासुन ते अशोकनगर ते काचीवाडा पर्यंत नाला साफ करणे. | ७१,१६६/- | |
| ४३. | गादीयापार्क बसैय्यानगर येथे ४५० मी. मी. व्यास अर्धगोल गटार बांधणे | १,५०,५२०/- | |
| ४४. | किलेअर्क व्ही. आय. पी. रोड लगत २२५ मी. मी. व्यास चिनीमातीची ड्रेनेज लाईन टाकणे | ५९,०००/- | |
| | पाणीपुरवठा - १ | | |
| ४५. | भुमी अभिलेख प्रशिक्षण संस्था दमडी महल येथे पाणी पुरवठा व्यवस्था करण्यासाठी १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | १,९७,१००/- | |
| ४६. | श्री. निकेतन कॉलनीत १००० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी जलवाहिनी टाकणे. | ४,०१,२५२/- | |
| ४७. | जालना रोड रस्ता रुंदीकरणाच्या कामात बांधीत होणाऱ्या ७०० मी. मी. व्यासाच्या हॉलला चेंबर बांधणे व सलग्न कामे करणे. | ४,९८,९५५/- | |
| ४८. | जालना रोड रस्ता रुंदी करणाच्या कामात बाधीत होणारी १५० मी. मी. व्यासाची ए.सी. जुनी जलवाहिनी काढुन नविन १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | ८,१७,०६०/- | |
| ४९. | शहाबाजार काचीवाडा येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणे. | २,६४,१५५.०० | निविदा मागविण्यात अल्यात. |
| ५०. | नाथ नगर जालना रोड येथे १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | १,६४,१२,९.०० | -//- |
| ५१. | विविध व्यासाचे सी. आय. डी. जॉयन्टस खरेदी करणे. | ४,९६,९५०.०० | साहित्य पुर्ण प्राप्त झाले. |
| ५२. | पद्मपुरा येथील विशाल निवास ते सोनार गल्लीकडे जाणारी १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी स्थलांतरीत करणे. | ६३,८५५.०० | कामपुर्ण झाले. |
| ५३. | स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील गणपती विसर्जन विहीरीतील गाळ काढून साफ करणे व रंग देणे. | ५५,९४१.०० | -//- |
| ५४. | कृष्ण गल्ली बेगमपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणे. | ५८,५६६.०० | काम पूर्ण देयक देणे बाकी |
| ५५. | मलीक अंबर कॉलनी मौलाना आझाद चौक येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ५६,६५०.०० | काम सुरु आहे. |
| ५६. | जालना रोड रस्ता रुंदीकरणाच्या कामात बाधात होत असलेल्या जलवाहिनीची खोली वाढवून कॉक्रींटींग करणे. | ५,७३,८००.०० | काम पुर्ण अंतिम देयक देणे बाकी |
| ५७. | रोहीला गल्लीत १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ५६,२६८.०० | काम सुरु आहे. |
| ५८. | कोटला जलकुंभास इनलेट करीता ४०० मी. मी. व्यासाचा स्लुस व्हॉल बसविणे | १,१९,१६०.०० | काम सुरु आहे. |
| ५९. | लक्कर मंडी मोंढा येथे १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | ५४,७०७.०० | दुसऱ्या वेळसे निविदा मागविण्यात आल्या. |
| ६०. | समतानगर येथे १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे | ९४,८१४.०० | काम सुरु आहे. |
| ६१. | कैसर कॉलनीत १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | १,३१,८००.०० | -//- |
| ६२. | जवाहर कॉलनी हॉटेल सावली समोर १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ७८,५१५.०० | -//- |
| ६३. | ज्युब्ली पार्क पम्प हाऊसला संरक्षित भिंत बांधणे | १,३२,१६६.०० | कार्यौदेश स्वाक्षरीस्तव सादर. |
| ६४. | मेहेरनगर साठी १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ५६,०८०.०० | काय सुरु आहे. |
| ६५. | सिल्कमिल कॉलनीत नियोजीत मंगल कार्यालयाच्या जागेत | ७८,९८०.०० | निविदा मंजुरीस्तव |

| | | | |
|---|---|---|---|
| | जलवाहिन्या स्थलांतरीत करणे. | | सादर. |
| ६६. | जालना रोड रस्ता रुंदीकरणाच्या कामात येणाऱ्या १४००, ७५०, ७०० व ४०० मी. मी. व्यासाच्या जलवाहिन्या वरील एअर व्हॉल स्थलांतरीत करणे. | ३,६२,८७५.०० | काम पुर्ण देयक देणे बाकी |
| ६७. | रमानगर येथे दुसऱ्या गल्लीत श्री. गायकवाडा ते श्री. गंगावणे यांच्या घरापर्यंत १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ८६,२४३.०० | निविदा मंजुरीस्तव सादर. |
| ६८. | बोहरी कठडा येथे १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | ८४,३६२.०० | -//- |
| ६९. | खाराकुँवा येथे महादेवाच्या गल्लीत १०० व १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | २,३५,०७४.०० | -//- |
| ७०. | राहुलनगर येथील विविध ठिकाणची १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी स्थलांतरीत करणे. | ७४,०४०.०० | -//- |
| ७१. | देवडी बाजार येथील मिना फक्शन हॉल ते मिठाईवाले यांच्या घरापर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | ८२,६४०.०० | -//- |
| ७२. | रॉयल रेसीडेन्सी वृंदावर कॉलनी करीता १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ८९,०४२,०० | दुसऱ्या वेळेस निविदा मागविण्यात आल्या. |
| ७३. | पडेगांव येथील जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे | ६५,७००.०० | काम सुरु आहे. |
| ७४. | निजामगंज कॉलनीत १०० व १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे. | ८४,१२१.०० | निविदा मागविण्यत आल्या. |
| ७५. | उस्मानपुरा भागात विविध ठिकाणी १०० व १२० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे. | ६,००,९८३.०० | -//- |
| ७६. | उस्मानपुरा भागातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी १५० मी. मी. व्यासाचा हॉल टाकुन अस्तित्वातील १५० मी. मी. व्यासाच्या जलवाहिनीस मिळविणे. | ५६,०८५.०० | -//- |
| ७७. | कैलास नगर येथे पाणपोई बांधणे | १,०३,१५०.०० | काम सुरु आहे. |
| ७८. | बुढीलेन नेहरु भवन जवळील जामा मस्जिद समोरील खुल्या जागेत पाणपोई बांधणे | १,४४,७१५.०० | निविदा मागविण्यात आल्यात. |
| ७९. | १४००/७०० मी. मी. व्यासाच्या पाईप लाईनसाठी मशीन ॲण्ड पुरविणे | १,१८,४५०.०० | काम पुर्ण |
| ८०. | फारोळा येथील फिल्टर बेड दुरुस्ती | ९५.३००.०० | -//- |
| ८१. | फारोळा येथे एम. एस. पाईपला इपॉकशी पेंट देणे. | ८९,४००.०० | निविदा मंजुरीमध्ये |
| ८२. | १४०० मी. मी. व्यासाची गुरुत्व वाहिनी दुरुस्ती (डॉ. बऱ्हाळे दवाखाना जवळ) | ९५,८००.०० | -//- |
| ८३. | नक्षत्रवाडी येथील ७.५ द. ला. लिटर क्षमतेच्या क्लोरी नेटर करीता शेड उभारणे | ५६,७२०.०० | निविदा मागविण्यात आल्या आहेत. |
| ८४. | क्रांतीचौक येथील पंपवर स्लॅब टाकणे | २,४९,२५०.०० | -//- |
| ८५. | २०० मी. मी. व्यासाच्या एअर व्हॉल बाल पुरवठा करणे बाबत | ९७,०२०.०० | -//- |
| | पाणीपुरवठा-२ | | |
| ८६. | एन११/सी-३ सिडको येथे जलवाहिनी टाकणे | १,५०,३२९.०० | |
| ८७. | एन ४ भागात विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकणे. | १२,८७,६४१.०० | |
| ८८. | वोखार्ड कंपनी ते नारेगांव पर्यंत सी. आय. जलवाहिनी टाकणे. | २४,७९,६७५.०० | |
| ८९. | वार्ड क्र. ४५ या ठिकाणी एन-११/बी सेक्टर जलवाहिनी टाकणे | ६४,९३५.०० | |
| ९०. | एन ११/ई सेक्टर येथे जलवाहिनी टाकणे | २९,८०४.०० | |
| ९१. | बौध्दवाडा चिकलठाणा येथे जलवाहिनी टाकणे बाबत. | ६२,१८५.०० | |
| ९२. | एन ६/ई सेक्टर येथे १०० मी. मी. व्यासाची अे. सी. जलवाहिनी | ३१,३८९.०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| | टाकणे. | | |
| ९३. | ए. सी. पाईप व सि. आयडी. जॉइन्ट खरेदी करणे बाबत. | ६,२२,८७९.०० | |
| ९४. | एन ७ येथील जलकुंभ १ चे गनायटींग करणे. | ५,७८,६४०.०० | |
| ९५. | सिडकोने हर्सूल पर्यत टाकलेल्या ३०० मी. मी. ची लाईन दोन ठिकाणी ४५० मी. मी. ला जोडणे | २,२०,०५५/- | |
| ९६. | हर्सूल गावातील जळगाव रस्ता रुंदीकरणासाठी जलवाहिनी शिफ्ट करणे. | ९६,२०१/- | |
| ९७. | एन-६ सिडको येथे १०० मी. मी. आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. | ५१.५८४.०० | |
| ९८. | एन-७ एफ आयोध्यानगर येथे पाणपोई बांधणे बाबत. | २४,९७४.०० | |
| ९९. | एन-९ बळीराम पाटील हायस्कुल जवळ पाणपोई बांधणे. | २४,९७३.०० | |
| १००. | एन-९ के सेक्टर येथे जलवाहिनी टाकणे. | ७८,१२०.०० | |
| १०१. | एन-९ एम२ सिडको येथे १५० मी. मी. जलवाहिनी टाकणे | १,११,९१५.०० | |
| १०२. | एन-७ मनपाच्या शाळेत स्वेच्छानिधीतुन पाणपोई बांधणे बाबत. | २४,९७३.०० | |
| १०३. | एन-५ सह्याद्रीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. | १२,८९३.०० | |
| १०४. | एन-६ मनपाच्या शाळेजवळ आवारात पाणपोई बांधणे. | २४,९७३.०० | |
| १०५. | एन-८ परिसरात मनपाच्या दवाखान्याजवळ पाणपोई बांधणे. | २४,९७३.०० | |
| १०६. | एन-२ ठाकरेनगर येथे महालक्ष्मी चौक येथे पाणपोई बांधणे बाबत. | २४,९७३.०० | |
| १०७. | एन १३ ज्ञानसागर शाळाजवळ पाणपोईल बांधणे | २४,९७३.०० | |
| १०८. | एन-७ चर्चजवळ जलवाहिनी टाकणे. | २४,८०७.०० | |
| १०९. | रामनगर भागात पाणपोईल बांधणे | २४,९७३.०० | |
| ११०. | एन-५ मॅग्नन हाऊसिंग सोसायटी येथे जलवाहिनी टाकणे. | ५१,५८४.०० | |
| १११. | हडको टिव्ही. सेंटर येथे पाणपोईल बांधणे | २४,९७३.०० | |
| ११२. | एन-८ गरुनगर येथे जलवाहिनी टाकणे. | ८९,५९५.०० | |
| ११३. | एन-८ शिवदत्त हा सोसा. येथे जलवाहिनी टाकणे. | ४४,९१०.०० | |
| ११४. | एन-२ मुंकूंदवाडी येथे मनपाच्या खुल्या जागेत पाणपोई बांधणे बाबत. | २४,९७३.०० | |
| ११५. | एन-११ येथे २६ लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधणे बाबत. | ५३,९१,०००.०० | |

पाणी पुरवठा विभाग-२ :

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १. | ए. सी. पाईप व सी. आय. डी. जॉईन्ट खरेदी करणे बाबत. | ६,२२,८७९/- | कमी दराने |
| २. | एन-११/बी १ ते ९ या ठिकाणी जलवाहिनी टाकणे बाबत. | ६५,०००/- | -//- |
| ३. | हर्सुल गावातीत रस्ता रुंदीकरण जलवाहिनी बाजुला सरकाविणे | ९६,२०१/- | निविदा मागविल्या (अंदाजपत्रक मंजुर) |
| ४. | बौध्दवाडा चिकलठाणा येथे जलवाहिनी टाकणे. | ६२,१८५/- | -//- |
| ५. | एन-११/सी-३ सिडको या ठिकाणी जलवाहिनी टाकणे. | १,४५,०००/- | ०.०५% कमी दराने |
| ६. | एन-७ येथील आर-१ (जलकुंभ-१) दुरुस्ती करणे बाबत. | ५,७८,६४४/- | १७.८२% कमी दराने |
| ७. | एन-६ सिडको येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे. | ५१,५८४/- | अंदाजपत्रक मंजूर (निविदा अंतर्गत) |
| ८. | एन-९/के सिडको येथे १०० व १५० व्यासाची जलवाहिनी | ७८,१२०/- | -//- |

| | | | |
|---|---|---|---|
| | टाकणे (स्वेच्छा निधीतुन) | | |
| ९. | एन-९/एम-२ सिडको येथे १५० मी. मी. व्यासाची लाईन टाकणे. | १,११,९१५/- | -//- |
| १०. | एन-५ ते हर्सूल पर्यंत टाकलेल्या ३०० मी. मी. लाईन दोन ठिकाणी ४५० मी. मी. ला जोडणे बाबत. | २,२०,०५५/- | -//- |
| ११. | लोकमत टाऊन सेंटर येथे जलवाहिनी टाकणे बाबत. | ३,१९,५००/- | ३०.९९% कमी दराने |

जलनिःसारण विभाग-२ :

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| १. | भावसिंगपुरा पेठेनगर अंतर्गत १५० मी. मी. व्यास व २२५ मी. मी. व्यास ड्रेनेज लाईन टाकणे. | १२,९३,,४९५/- | |

विभाग-प्रकल्प संचालक :

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | स. नगरसेवक स्वेच्छानिधीतुन दोन प्रशिक्षण केंद्र उभारणे. | १६,००,०००/- | |
| २. | स. नगरसेवका श्री. तकी हसन खान यांच्या स्वेच्छा निधीतुन लोटा कारंजा येथे संगणक केंद्र उभारणे. | ३,६७,४००/- | |
| ३. | दारिद्रय रेषेखालील कुटुंबीयाची यादी संगणकावर तयार करुन घेणे. | १,०१,८५५/- | |
| ४. | स. नगरसेवक स्वेच्छानिधीतुन चार चाकी/तीन चाकी वाहन चालक प्रशिक्षक | १६,००,०००/- | |

**मुख्यलेखाधिकरी :**
**भांडार विभाग -:**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका कार्यालयासाठी आवश्यक साहित्य खरेदीसाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येवुन साहित्य खरेदी करण्यात आले.

**१. किटक नाशके :**

सन २०००-२००१ या वर्षासाठी नुव्हान, फिमेल व कार्बोलिक पावडर खरेदीस्तव निविदा प्रसिध्द करण्यात येवून निविदा दरपत्रके मागविण्यात आली. एकुण चार निविदा दरपत्रके प्राप्त झाली. मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २८/५ दिनांक ०३-०८-२००० नुसार दरास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात आले.

| | |
|---|---|
| मेगसल्वा इंटरप्रायजेस-कार्बोलिक पावडर | रु. ३,९६,०००.०० |
| इंशा ट्रेडींग कंपनी-फिनेल | रु. १,९५,०००.०० |
| मे. रोशन सेल्स कार्पो-फिनेल | रु. १,९५,०००.०० |
| मे.रोशन सेल्स कार्पो-नुव्हान | रु. १,१४,०००.०० |
| | रु. ९,००,०००.०० |

**२. स्वच्छता साहित्य :**

सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी विभागीय कार्यालये व इतर विभागांची स्वच्छता साहित्य देणेस्तव निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा दरपत्रके मागविण्यात आली. एकुण ६ निविदा पैकी चार निविदा उघडण्यात आल्या. मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २९/६, दिनांक ०३-०८-२००० अनुसार साहित्याचे दरास मान्यता घेण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. इन्शा ट्रेडींग कं. .. | एकूण ३० ॲटम | र. रु. ३,१७,०६३.०० |
| २. | मे. न्यु भारत स्टोअर्स .. | एकूण ०४ ॲटम | र. रु. ३६,५६०.०० |
| | | एकूण | ३५३६२३=०० |

**३. लिखान साहित्य :**

सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालयास लागणारे लिखान साहित्य/ड्रॉइंग साहित्य/संगणक साहित्य इत्यादी साहित्य खरेदीसाठी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा दरपत्रके मागविण्यात आली. एकूण १० निविदा प्राप्त झाल्या. पैकी ८ निविदा उघडण्यात आल्या. मा. स्थायी समिती ठराव क्र. ३०/२७ दिनांक ०३-०८-२००० अनुसार साहित्याचे दरास मान्यता घेण्यात येवून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. प्रियंका ट्रेडर्स | एकूण ॲटम २ | र. रु. १२,७६४.०० |
| २. | महिला आ. वि. महामंडळ | एकूण ॲटम २५ | र. रु. १६,७६९.०० |
| ३. | एस. एस. इंटरप्रायजेस | एकूण ॲटम ५ | र. रु. १०,०२०.०० |
| ४. | मे. न्यु भारत स्टोअर्स | एकूण ॲटम ४२ | र. रु. ६१,२००.०० |
| ५. | मे. आर. एल. दौलताबादकर | एकूण ॲटम २३ | र. रु. ३१,६०४.०० |
| ६. | मे. विजय जनरल स्टोअर्स | एकूण ॲटम १९ | र. रु. १,८४,०७२.०० |
| ७. | मे. मुरली स्टेशनर्स | एकूण ॲटम ३५ | र. रु. २,००,५४०.०० |
| ८. | मे. एम. जे. ट्रेडींग कं. | एकूण ॲटम २७ | र. रु. २,२८,४४४.०० |
| | | एकूण | र. रु. ७,४५,४१३.०० |

**४. छपाई साहित्य :**

सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका कार्यालय व जकात विभागास लागणारी छपाई साहित्य खरेदीसाठी निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आल्या एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा दर व मागील वर्षीचे दर याची तुलना केली असता ज्या साहित्याचे दर गतवर्षी पेक्षा जास्त आले त्यासाठी संबंधितांना दर वाटाघाटीस बोलाविण्यात आले असता, दर कमी करण्यास नकार दिल्याने एकूण ७२ ॲटमसाठी फेर निविदा काढण्यात आल्या. प्राप्त निविदा दर व यापुर्वीचे दर यामध्ये फारसा फरक पडला नसल्याने तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे साहित्यास मान्यता घेण्यात आल्या. त्यानुसार खालील प्रमाणे खर्च आला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | मे. लिबर्टी प्रिंटर्स | एकुण ॲटम .. | २७.. | र. रु. २,६०,७८५.०० |
| २. | न्यू रत्नमाला प्रिंटर्स | एकुण ॲटम.. | ३ | र. रु. २०,८३०.०० |
| ३. | श्री कृष्णा प्रिटींग प्रेस | एकुण ॲटम.. | १ | र. रु. ५,४७८.०० |
| ४. | श्री गणेश मुद्रणालय | एकुण ॲटम.. | ८ | र. रु. ४,७६,९१७.०० |
| | | | र. रु. | ७,६४,०१०.०० |

**५) बांबु खरेदी :-**

सन २०००-२००१ या आर्थिक वर्षासाठी विभागीय कार्यालयात ड्रेनेज चोक उप काढण्यासाठी बांबु खरेदीस्त निविदा सुचना प्रसिध्द करण्यांत येवुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली. एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या पैकी एक निविदा उघडण्यात आली. गतवर्षीचे दर व प्राप्त दर यामध्ये बराच फरक असल्याने दराचे वाटाघाटी करुन दर कमी करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) नॅशनल बांबु मर्चंट | रु. ५.५० प्र.र.मि. | ४०,८३२.०० |

या आर्थिक वर्षात मान्य निविदा दरानुसार वरील प्रमाणे बांबु खरेदी करण्यांत आला.

६) गणवेश खरेदी

१) सुरक्षा कर्मचाऱ्यांना दरवर्षी १५ ऑगस्ट पुर्वी गणवेश व गणवेश साहित्य देण्यात येते. त्यानुसार निविदा सुचना प्रसिध्द करण्यांत येवुन निविदा दरपत्रके मागविण्यात आली. तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे साहित्य व कापड पसंतीनुसार खरेदी करण्यात येवुन वाटप करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| १) मिस्त्री इंटप्रायजेस | गणवेष कापड | र. रु. ६२,०१६.०० |
| २) विजय जनरल स्टोअर्स | गणवेष साहित्य | र. रु. १७,२९९.०० |
| ३) रोशन सेल्स कार्पो. | गणवेष साहित्य | र. रु. २३,५१३.०० |
| | | र. रु. १,०२,८२८.०० |

## <u>२) गरम कपडे :-</u>

महानगरपालिका गणवेष निनिमय अनुसार देय असणाऱ्या कामगार कर्मचाऱ्यांना प्रत्येकी तीन वर्षाला गरम कपडे देण बाबत नियम असल्याने यापुर्वी १९९६-९७ या आर्थिक वर्षात साहित्य दिले होते. त्यामुळे यावर्षी साहित्य देणे् आवश्यक होते. त्यानुसार निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येवुन दरपत्रके मागविण्यात आली. प्राप्त नमुने कामगार कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व उपस्थित प्रतिनिधी यांनी पसंत केलेले साहित्याचे दरात वाटाघाटी करुन दर कमी खालील प्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आले.

१) विजय जनरल स्टोअर्स - र. रु. ५,९२,४५३.००

## २) साडी खरेदी :-

महानगरपालिका गणवेष विनियमानुसार दरवर्षी संक्रातीपुर्वी चतुर्थश्रेणी स्त्री कर्मचारी व नर्सेस यांना साडी, ब्लाऊजपिस, शर्ट सलवार व ओढणी कापड खरेदीस्तव मागविण्यात आल्या. प्राप्त नमुने संघटनेचे पदाधिकारी व उपस्थित स्त्री प्रतिनिधी यांचे समोर ठेवण्यात आले. पंरतु एकही नमुना पसंत न पडल्याने पुन्हा फेर निविदा मागविण्यात आल्या. यामध्ये प्राप्त नमुन्यात पुन्हा पसंतीस्तव ठेवण्यात आले. पसंत साहित्याचे दरात वाटाघाटी करुन पुन्हा पंसतीस्तव ठेवण्यात आले. पसंत साहित्याचे दरात वाटाघाटी करुन दर कमी करण्यांत येवुन खालील प्रमाणे आदेश देण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| मे. अरमान | साडी (९ वार, ६ वार पांढरी, रंगीत)<br>ब्लाऊज पिस, शर्ट सलवार व<br>ओढणी कापड | र. रु. ४,८३,४४८.०० |

करीता प्रकरण माहितीस्त सादर.अतिरिक्त शहर अभियंता

-----------------------

सहा. अभियंता (यांत्रिकी)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | एम एच २० अे ५७४९ व्हॅक्युम एम. टी. आर. करीता नविन पंप खरेदी करणे. | ३,२५,५०९.०० | |
| २. | सिडको एन-५ पंप हाऊस येथील ३०० अ. श. पंप सेट नं. ६ दुरुस्ती करणे. | ६१,२१०.०० | |
| ३. | भीमनवगर भावसिंगपुरा येथे दोन ठिकाणी विंधन विहिर सोडुन हातपंप बसविणे | ५७,४००.०० | |
| ४. | आरेफ कॉलनी वार्ड क्र. ४१ येथे ३ विंधन विहीर खोदुन हातपंप बसविणे | ५०,९१२.०० | |
| ५. | सिडको एन ५ पंप हाऊस येथील १००० के. व्ही. ए. ट्रान्सफार्मर करीता एच. टी. केबल खरेदी करणे. | ८६,७२६.०० | |

विभाग :- कार्यकारी अभियंता (स्लम)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मो. मुकूंदवाडी येथे नाल्या दुरुस्त करणे व काही भागात नविन नाली बांधणे | ६,९६,९७८.०० | |
| २. | मो. नारेगांव येथील जुन्या गटारी दुरुस्त करणे. | ५,४९,२८७.०० | |
| ३. | मो. आंबेडकर नगर येथे शौचालय बांधणे | ३,९२,८७९.०० | |
| ४. | मो. नक्षत्रवाडी गांव येथे पुर्नडांबरीकरणे करणे | १,९०,०१७.०० | |
| ५. | मो. कांचनवाडी गांव येथे सार्वजनिक शौचालयाची दुरुस्ती करणे. | ४०,९४९.०० | |
| ६. | मो. बनेवाडीगांव येथे डांबरीकरण करणे् | ९५,०६५.०० | |
| ७. | मो. हमालवाड (स्लम) भागात पुर्नडांबरीकरण करणे | १,१५,४८८.०० | |
| ८. | मो. प्रज्ञानगर येथे पुर्नडांबरीकरण करणे | ९७,१६३.०० | |
| ९. | मो किराडपुरा वार्ड क्र. ७१ मध्ये फुटपाथ ब्रिज बांधणे | १,७१,०७६.०० | |
| १०. | मो. घाटी जयभीम नगर असिफिया कॉलनी येथे पुर्नडांबरीकरण करणे | ४,१०,९०९.०० | |
| ११. | मो. किराडपुरा वार्ड क्र. १७ येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे. | १,२५,५६७.०० | |
| १२. | मो. शताब्दीनगर येथे नविन संरक्षित भिंत बांधणे | ७,२४,२१९.०० | |
| १३. | मो. मजनुहील येथील शताब्दीनगर आणि मौलाना आझाद रिर्सच सेंअर दरम्यान येथे संरक्षित भिंत बांधणे | ९,१५,८७२.०० | |
| १४. | मो. मिलींदनगर अजबनगर येथे गल्ल्या मध्ये शहाबादी फरशी बसविणे | १,३५,१२०.०० | काम पुर्ण |
| १५. | मो. ब्रिजवाडी गल्ली क्र. २ येथे सी. सी. रस्ते तयार करणे. | १,४८,२००.०० | काम पुर्ण |
| १६. | मो. बुढ्ढीलेन येथे कॉक्रींट रस्ते तयार करणे | १,३०,३८३.०० | प्रगती पथावर |
| १७. | मो. चिकलठाणा गांव बौध्दवाडा चिकलठाणा (स्लम) येथे सिमेंट कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ६,०३,६२५.०० | प्रगती पथावर |
| १८. | मो. संजयनगर बायजीपुरा (स्लम) वार्ड क्र. ५७ मध्ये जुनी शहाबादी फरशी बसविणे व कॉक्रीट रस्ते तयार करणे | ६२,१५७.०० | निविदास्तव |
| १९. | मो. इंदिरानगर बायजीपुरा (स्लम) येथे वार्ड क्र. ७४ मध्ये दगडी गटारीवर स्लॅब टाकुन रस्ता करणे | ६९,५६१.०० | --//-- |
| २०. | मो. नुर कॉलनी (स्लम) येथील नाल्यातील गाळ काढणे | ९४,१८५.०० | --//-- |
| २१. | मो. किराडपुरा (स्लम) येथे खडी रस्ता दुरुस्त करणे | ८५,८५५.०० | --//-- |
| २२. | मो. मसनतपुर येथे गटड्रिंर रिपेर करणे व नविन गटार बांधणे | ३,१८,७४९.०० | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | मो. किराडपुरा (स्लम) येथे कुबा मस्जीद जवळ स्लॅब कलर्व्हट करणे. | १,३३,१६२.०० | --//-- |
| २४. | मो. किराडपुरा (स्लम) येथे डॉ. मतीन यांच्या दवाखान्यासमोरील रस्त्याच्या कडेला १/२ गोलाकार गटार बांधणे | ७०,४४१.०० | --//-- |
| २५. | मो. संजयनगर बायजीपुरा (स्लम) वार्ड क्र. ५७ मध्ये कॉक्रीट रस्ते तयार करणे | ७७,४५६.०० | --//-- |
| २६. | मो. किराडपुरा वार्ड क्र. ७१ मध्ये कॉक्रीट रस्ते तयार करणे | १,६४,४५७.०० | --//-- |
| २७. | मो. किराडपुरा वार्ड क्र. ७३ मध्ये गटार बांधंणे | २,७३,००७.०० | --//-- |
| २८. | मो. मुकूंदवाडी येथे पुर्णडांबरीकरण करणे | ५,७०,२८५.०० | --//-- |
| २९. | मो. संजयनगर बायजिपुरा वार्ड क्र. ५६ येथे रस्ता क्रॉसिंग जाळया बसविणे व गटार दुरुस्त करणे. | ८८,९४६.०० | --//-- |
| ३०. | मो. शहाबाजार येथे शहाबादी फरशी बसविणे व कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ७७,१३४.०० | --//-- |
| ३१. | मो. इंदीरानगर (स्लम) येथे खांडकीवर कॉक्रीट रस्ते करणे | २, ०६,४६३.०० | --//-- |
| ३२. | मो. भिमपुरा उस्मानपुरा येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे | ३,५३,२४३.०० | --//-- |
| ३३. | मो. किराडपुरा (स्लम) येथील उर्वरीत रस्त्याचे खडीकरण करणे | ५१,७६६.०० | --//-- |
| ३४ | मो. चिकलठाणा येथील जुन्या गटारी दुरुस्त करणे. | ९,३०,४६९.०० | --//-- |
| ३५. | मो. चिकलठाणा येथे आठवडी बाजार येथे मुख्य दाराजवळील विंग बांधणे | ९१,४७३.०० | निविदास्तव |
| ३६. | मो. चिकलठाणा येथे नविन सभागृहाजवळ दगडी गटार बांधणे | २,७७,४८०.०० | --//-- |
| ३७. | मो. सादत नगर (स्लम) रस्त्याची दुरुस्ती व खडीकरण करण | २,८१,१४९.०० | |
| ३८. | मो. रमानगर येथे पुर्नडांबरीकरण करणे | २,३१,८५०.०० | |
| ३९. | मो. पडेगांव येथे आर. सी. सी. पाईप टाकुन रस्ता तयार करणे. | ६०,७४०.०० | |
| ४०. | मो. नारेगाव येथे पुर्नडांबरीकरणे करणे | ४,१२,४७५.०० | |
| ४१. | रोजाबाग येथे १० बैठकीचे शौचालय बांधणे व कॉक्रीट रस्ते तयार करणे. | ३,२९,५००.०० | |
| ४२. | नुर कॉलनी येथे संरक्षित भिंत बांधणे व कॉक्रीट रस्ते तयार करणे | ३,२९,५००.०० | |
| ४३ | मो. मुकूंदवाडी मनपा शाळालगतचा रस्ता मोठा करुन खडीकरण करणे | ७२,४५७.०० | |
| ४४. | मो. संजयनगर वार्ड क्र. ५६ येथे आर. सी. सी. पुल तयार करणे. | २,५९,२६३.०० | |

**संवाद :**

**श्री अविनाश कुमावत :** इतिवृत्तातील पान क्र. १२ वर प्रकल्प संचालक यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावातील अ.क्र. २ मध्ये स. सदस्य री लकी हसन खान यांच्या स्वेच्छा निधीतुन लोटाकांरजा येथे संगणक केंद्र उभारणे असे दिले ते रद्द करण्यात यावे.

**मा. सभापती :** दिनांक ३०.३.२००१ च्या बैठकीसाठी विषय क्र. मध्ये १० लाखांच्या आतील सर्व विकास कामे स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर केली आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. मा. आयुक्त या सर्व विकास कामाच्या प्रस्तावावर नियमाने कार्यवाही करतील.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ पोट कलम ड अन्वये आणि महाराष्ट्र शासन सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १७ दि. १६ सप्टेंबर २००० अन्वये झालेल्या दुरुस्तीप्रमाणे मा. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी रु. ५० हजारापेक्षा जास्त परंतु रु. १० लाख मर्यादेपर्यन्त मंजुर केलेल्या निविदाचा प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आलेल्या तपशिलास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**चर्चा :-**

**मा. सभापती :** मनपाचे अधिकारी श्री मतीन कादरी यांनी अपील सादर केलेले असुन त्यांनी ५००/- रुपये दंड करण्यात आलेला होता.

**श्री अविनाश कुमावत, श्री दलबीरसिंग जबिंदा :** अपील घेवु नये. स्थायी समितीस अशा पध्दतीने अपील सादर करणे चुकीचे आहे. अपील सादर केल्यानंतर त्यावर स्वतत्र्यंपणे चर्चा होऊन निर्णय घ्यावयाचे असतात.

**श्री सलीम पटेल :** संबंधीत अधिकाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही केलेली होती. दंडात्मक केलेली कार्यवाही मागे घेण्यात यावी असे अपील आहे. मंजुर करण्यात यावे.

**श्री अविनाश कुमावत :** मनपा गेटसमोर ११ अभियंत्ये उपोषणास बसलेले आहेत. त्यांनी सर्वांना प्रत दिलेली आहे. त्यांना कामावर घेण्यात यावे. ते आपले कर्मचारी आहेत. या अगोदरची सदर कर्मचारी उपोषणास बसलेले होते. त्यांना कामावर घेण्याचे नुसतेच आश्वासने दिली गेली. परंतु अद्याप कामावर घेण्यात आलेले नाही. एक अपील मंजुर करायचे, दुसरे नाही हे बरोबर - नाही. पक्षपातीपणाचा हा प्रकार आहे.
(याच वेळी स. सदस्य श्री कुमावत यांनी इतिवृत्त व विषय पत्रिका सभागृहात फाडुन टाकली)

**मा. सभापती :** या विषयावर चर्चा करावी. योग्य निर्णय घेतला जाईल. जे उपोषणास बसले त्यांचे अपील माझ्याकडे आलेले नाही. यात भेदभाव व पक्षापात करण्याचा प्रश्न येत नाही.

**श्री मधुकर सावंत :** ठराविक सदस्य सांगतील त्यानुसार आपण निर्णय घेत आहात, हे बरोबर नाही. कुणाचेही अपील मंजुर करण्यात येऊ नये.

**श्री अविनाश कुमावत :** कुणाचेही अपील मंजुर करु नये. मंजुर करण्यास अमचा विरोध आहे. याची इतिवृत्तात नोंद घ्यावी.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** जे उपोषणास बसलेले आहे त्यांच्याही बाबतीत विचार व्हावा. तसे अपील त्यांनी द्यावे.

**मा. सभापती :** जे कर्मचारी उपोषणास बसलेले आहे त्यांचे अपील माझ्याकडे आलेले नाही. त्यांनी तसे अपील द्यावे. त्यानुसार निर्णय घेतला जाईल. जे अभियंत्ये उपोषणास बसलेले आहे त्यांना मा. आयुक्तांनी या अगोदर उपोषणावरुन उठविलेले होते. त्या संदर्भात मा. आयुक्त खुलासा करतील.

**मा. आयुक्त :** जे ११ कर्मचारी उपोषणास बसलेले आहे ते महानगरपालिकेचे वर्कचार्ज म्हणुन कार्यरत होते. वर्कचार्जचा अर्थ असा की, एखाद्या विशिष्ट कामाशी संलग असलेला कर्मचारी. मुख्य लेखा परिक्षक यांनी ऑडीट आक्षेप - नोंदविलेले आहे. या आक्षेपामुळे तत्कालीन आयुक्त श्री बलदेवसिंग यांनी या

११ अभियंत्यांना कामावरुन कमी केले. त्या कर्मचाऱ्यांचे आदेश रुढ पध्तीने काढावयास पाहिजे होतो. ते झाले नाही. ते कामावर आले त्यांनी कामेही केलेली आहे. कामे केलीत त्याप्रमाणे वेतनही त्यांना दिलेले आहे. जी पहिल्यांदा नियुक्ती केली मुळातच चुकीची आहे. अशा प्रकारचा आक्षेप लेखा परिक्षणात आल्याने कार्यवाही झालेली आहे. अस्थापनेवर एकुण किती पदे मंजुर आहे हे पाहणे आवश्यक आहे. माझ्या माहिती प्रमाणे ५९ मंजुर पदे आहेत. त्यापैकी दोन पदे रिक्त आहेत. त्यांचे वाटप वेगवेगळया विभागामध्ये झालेले आहे. पी. डब्ल्यु. डी. नार्मस् नुसार कार्यकारी अभियंत्याकडे किती कर्मचारी असावेत याचे प्रमाण ठरलेले असते. एका उपविभागास, २२६ लाखांचा भार असावा. त्यामध्ये ४ ज्युनियर इंजिनियर असतील. एका ज्युनियर इंजिनिअरला किती काम पाहिजे, याचेही काही नार्मस आलेले आहेत. सरासरी ४५ ते ५० लाख एका ज्युनियर इंजिनिअरसाठी धरले तर आपल्याकडे एकुण ५९ अभियंत्ये आहेत. त्यांना किती काम पाहिजे याचा निकषाुसार विचार केला तर त्यांचे २ वर्षाचा खर्च रु. २४ कोटींचा आहे. दुसऱ्या वर्षाचा खर्च २४ कोटी ९० लाख आहे. जवळपास २५ कोटी खर्च होईल असे नाही. चालु वर्षाचा खर्चाचा तपशील १ एप्रिलनंतर समजेल. तरी तो खर्च २५ कोटींच्या वर जाणार नाही असे वाटते. म्हणुन एका अभियंत्यास ४५ ते ५० लाखापर्यंत खर्चाची निकषानुसार मर्यादा विचारात घेता २४ कोटींचा खर्च होत आहे. नार्मस् नुसार खर्च वाढत चाललेलला असतांना अस्थायी अभियंत्याची नेमणुक का करण्यात आलेली आहे, अशा प्रकारचा आक्षेप ऑडीट विभागाकडुन आलेला आहे. म्हणुन नार्मस् प्रमाण् जे काही इंजिनिअर आपल्याकडे आहेत ते होणाऱ्या कामासाठी बरोबर आहे. व नविन इंजिनियर अस्थायी बेसीसवर लावण्याची आवश्यकता नव्हती असाही लेखा परीषक्षणात आक्षेप निघालेला आहे. ज्या नेमणुका झालेल्या आहेत त्या नियमाचे पालान होता झालेल्या आहेत या दोन कारणाने तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना कामावरुन कमी केलेले आहे. त्यानंतर त्यांनी निवेदने दिली, उपोषण केले, त्याना कामावर घेण्याबाबत आश्वासने दिली गेली. परंतु ज्यावेळी सर्व कागदपत्रे समोर आली व नॉमर्स नुसार त्यांची आवश्यकता नाही असे दिसुन येते. सहानुभूतीपुर्वक म्हणजे कायद्याच्या चौकटीत बसत असेल तर आपण त्यांना कामावर घेऊ. परंतु नव्याने आम्ही इंजिनियरला असे सांगितले की, एकुण खर्च किती झालेला आहे व २००० ते २००१ मध्ये किती बजेट होते. शिल्लक असलेली कामे तसेच सिडको हस्तांतरण झाल्यानंतर सर्व भागात आपणास कामे करावी लागतील. ही करत असतांना जर कर्मचारी कमी पडत असेल तर सदर अभियंत्याना कायद्यायाच्या चौकटीत बसत असेल तर त्यांना आपण कामावर घेऊ. जो आक्षेप निघालेला होता तो त्या आयुक्तांनी मान्य केलेला आहे. म्हणुन त्यांना कामावरुन कमी केलेले आहे. सर्व बाब तपासुनच कार्यवाही होईल. त्यामुळे त्यांना आपण पुन्हा कमावर घेऊ शकलो नाही. व घेतल्यास पुन्हा कमी करणे अवघड होईल म्हणुन सर्व गोष्टींचा विचार करुन कार्यवाही करावी लागणार आहे. त्यांचेतील काही कर्मचारी आमच्याकडे आलेले होते. त्यांना सुध्दा मी स्वत: समजावुन सांगितलेले आहे. आपल्याकडे नॉर्मस काय आहे, जिल्हा परिषदेकडे काय आहे, तरी सुध्दा आपले अतिरिक्त शहर अभियंता हे पी.

डब्ल्यु. डी. विभागामध्ये् जाऊन योग्य चौकशी करतील व या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचा काही स्कोप आपल्याला मिळत असेल तर या बाबतीत आपण सहानुभूतीपुर्वक विचार करु.

**श्री अविनाश कुमावत :** दोन जागा रिक्त आहेत. दोघांना तरी घेण्यात यावे. दोन-तीन वेळेस सदर कर्मचारी उपोषणास बसलेले आहेत. काही कर्मचारी दवाखान्यात दाखल झालेले आहेत. ही जबाबदारी कुणाची राहील.

**श्री सलीम पटेल :** नॉमर्स तपासणी करुन त्यांना ताबडतोब कामावर घेण्याची कार्यवाही व्हावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** मुख्य लेखापरिक्षक विभागाकडून ऑडीट तपासणीमध्ये वर्क चार्जवर या कर्मचाऱ्यांनी आवश्यकता नाही असा आक्षेप घेतलेला असल्याने त्यांना कामावरुन कमी केलेले आहे. येत्या तीन दिवसांत तपासणी करुन कार्यवाही कमी केलेले आहे. येत्या तीन दिवसांत तपासणी करुन कार्यवाही करण्यात येईल.

**मा. आयुक्त :** सनमानीय सदस्यांच्या भावना आलेल्या आहेत. परंतु याची संपुर्ण तपासणी करावी लागेल. ऑडीटमध्ये आक्षेप घेतलेला आहे. येत्या १५ एप्रिल पर्यंत तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** आताच मा. आयुक्तांनी खुलासा केलेला आहे की, नियमानूसार जे नार्मर्स आहेत ते तपासणी करुन संबंधीत अभियंत्यानां कामावर घेण्याबाबत विचार होईल. सदर कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल तर त्वरीत कामावर घेण्याबाबत प्रशासनाच्या माध्यमातुन कार्यवाही व्हावी.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** मागील एका सभेत म.न.पा. चे कर्मचारी श्री भरत जैस्वाल यांची चौकशी करण्यास सांगितले होते. ते परत घेण्यात यावे.

**मा. सभापती :** ठिक आहे. मान्य करण्यात येते.

**श्री नारायण सुरगोणीवार :** माझ्या वार्डातील १९९५ मध्ये म्हाडाचे हस्तांतर मनपाने केलेले आहे. तेथे सध्या साफसफाई होत नाही. प्रत्येक वेळेस सभागृहात सुचना मांडावी लागते. आश्वासने दिली जातात. कार्यवाही होत ााही.

(स. सदस्य श्री सुरगोणीवार मा. सभापती यांच्या डायससमोर खाली बसतात.)

**मा. सभापती :** उप आयुक्त (प्रशासन) यांनी खुलासा करावा. समाानीय सदस्य श्री सुरगोणीवार यांनी त्यांचे जागेवर बसावे. त्यांचे प्रश्नाचा खुलासा केला जाईल.

(याच वेळी स. सदस्य श्री सुरगोणीवार त्यांचे जागेवर जाऊन बसतात.)

**उप आयुक्त (प्र) :** समाानीय सदस्य हे ६ महियापांसुन या संदर्भात पाठपुरावा करीत आहेत. त्यानुसार झोन क्र. ५ व ८ मधील काही कर्मचाऱ्यांना एक दिवसाआड त्यांचे वार्डात साफसफाईसाठी दिले आहे. तरी सुध्दा एप्रिल मध्ये त्यांचेकडे कायमस्वरुपी कर्मचारी देणार आहोत.

**श्री नारायण सुरगोणीवार :** पावसाचे पाणी वाहुन जाणाऱ्या नालीच्या कामा संदर्भात मा. आयुक्तांनी पाहणी केलेली आहे. टेंडर निघुनही कार्यवाही होत नाही. तसेच ९५ मध्ये हस्तांतरण झाल्यानंतर म्हाडातील नागरीकांवर ९१ पासुन टॅक्स आकारला गेला आहे. ज्यावेळी हस्तांतर झाले तेंव्हापासुन टॅक्स भरतील. जवळपास एक घराना १०-१० हजार टॅक्स आकारला गेला आहे. सुविधा दिल्या जात नाहीत. टॅक्स कसा लावण्यात येतो. हे योग्य नाही.

**उप आयुक्त (प्र) :** सन १९९१ मध्ये सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार सिडको-हडको तसेच म्हाडा कॉलनीमध्ये टॅक्स लावलेला आहे व ९१ पासुन टॅक्स वसुल करण्यात येत आहे. म्हाडाच्या बाबतीत पुहा काहीही वेगळा निर्णय झालेला नाही. म्हणुन ९१ पासुन टॅक्स वसुल करण्यात येत आहे.

**श्री नारायण सुरगोणीवार :** ९१ पासुन टॅक्स आकारता ९५ पासुन आकारावा व तेथील - नागरीकांना योग्य त्या सुविधा देण्यात याव्यात.

**श्री अविनाश कुमावत :** टॅक्स कमी करण्याच्या बाबतीत सर्वसाधारण सभेत या संबंधी निर्णय घेऊ शकते. हा विषय स्थायी समिती सभेचा नाही. तसा ठराव सर्वसाधारण सभेत घ्यावा लागेल.

**श्री मोतीलाल जगताप :** सिडको व म्हाडा एकाच एरियामध्ये येतात. म्हणुन ९५ ला हस्तांतरण झाले म्हणुन वेगळे धरता येणार नाही. नियमाने टॅक्स लावावा.

**उप आयुक्त (प्र) :** सिडको आणि म्हाडा हे दोही वेगवेगळे ॲथॅारिटीज आहेत. नियम क्रमांक १२८ चे प्रमाणे म. न.पा. हद्दीत ज्या कोणत्याही मालमत्ता असतील त्या मालमत्तेवर टॅक्स लावतो येतो. त्या नुसार आपण टॅक्स लावत आहोत. म्हाडा सुध्दा महानगरपालिका हद्दीतमध्ये हस्तांतर झालेली आहे. सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहे की, जोपर्यंत सिडको महानगरपालिकेकडे हस्तांतरण होत नाही तोपर्यंत तेथे टॅक्स लावला जाणार नाही. म्हाडा व सिडको यांचे दोन वेगवेळया टाऊन प्लॉनिंग ॲथारिटीज आहेत. तसेच महानगरपालिका सुध्दा वेगळी प्लॅनिंग ॲर्थारिटी आहे. त्या-नुसारच आपण म्हाडाला टॅक्स लावलेला आहे. कुणावर अन्याय होतो असा काही प्रकार नाही. म्हाडा १९९५ ला महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेले आहे. परंतु १९९१ ला सर्वसाधारण सभेने असा ठराव मंजुर केला की, महापालिका हद्दीत जे की, ज्या भागात निवडणुक लढवुन नगरसेवक निवडुन आलेले आहेत त्या भागातील सर्व मालमत्तांना घेतल्यानंतरच पुढील कार्यवाही करता येईल.

**श्री किशोर तुळशीबागवाले :** १२८ चे नियम दाखवतात. महानगरपालिका हद्दीत बरीच घरे झालेली आहेत त्या सर्व घरांना टॅक्स लावण्यात यावे. ज्यांना घरे नाही अशांना टॅक्स आकारण्यात आलेला आहे.

**मा. सभापती :** टॅक्स कमी करण्या संदर्भात सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी लागेल. जो भाग महनागरपालिकेकडे हस्तांतरण झालेला आहे त्या भागातील - नागरीकांकडुन टॅक्स वसुल करावा व त्याप्रमाणे सुविधा देण्याची कार्यवाही व्हावी.

**सौ. विजया रहाटकर :** मागील बैठकीत अतिक्रमणाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यानुसार काही वेळा प्रशासनाच्या वतीने चांगल्या प्रकारची कामे होत नाही. चांगले कामे केल्यानंतर शहरातील जनतेच्या मनात महा-नगरपालिकेविषयी चांगली प्रतिमा राहील. अशाच चांगल्या कामाचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास जुनाबाजार (औरंगपुरा) भाजी मंडई जवळील महा-नगरपालिकेची जागा हडप करण्याचा एका व्यक्तीचा हेतु होता व चारच दिवसांपुर्वी प्रशासकीय विभागाने ते होत असलेले मोठया धाडसाने काढुन टाकले. मागच्या बैठकीत मी ज्या ज्या जागा मनपाच्या मालकीच्या आहेत त्या सुरक्षित ठेवण्या संदर्भात सुचना केलेली आहे. व अतिक्रमण होत असलेल्या जागेवर प्रशासााने वेळी कार्यवाही केलयास शहरातील जनता

मनपाच्या जागेवर अतिक्रमण करण्यास प्रवृत्त होणार नाही. अशीच कार्यवाही वेळोवेळी व्हावयास पाहिजे. सदरचे अतिक्रमण काढतांना मा. आयुक्त, उप आयुक्त तसेच संबंधीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष तेथे थांबुन ते अतिक्रमण काढलेले आहे. चांगले काम केलेले असलयाने मी या सर्वांचे माझ्या वतीने अभिनंदन करते.

**श्री जगदीश सिध्द :** यास माझे अनुमोदन आहे.

**श्री गणेश तांबे :** झोन क्र. ३ मध्ये एका कर्मचाऱ्याची वसुलीसाठी नियुक्ती केलेली होती. कोणत्याही प्रकारचे कारण नसंताना त्यांना निलंबीत केलेले आहे. त्याची काही चुक असेल तर योग्य आहे. परंतु त्या कर्मचाऱ्यांनी १४ लाखांची वसुली करुन दिली असतांना त्यांना कामावरुन कमी करणे कितपत योग्य आहे.

**उप आयुक्त (प्र) :** कार्यालयीन आदेश दि. २५.३.२००१ नुसार झोन क्र. ३ मध्ये काही कर्मचारीचे वसुलीसाठी आदेश काढण्यात आलेले होते व झोनल आयुक्त यांनी कोणत्या कर्मचाऱ्यांनी किती वसुली करावी असे लेखी आदेश दिलेले होते. ज्यांना निलंबीत केले त्या कर्मचाऱ्यानी वरीष्ठ अधिकाऱ्यांचे लेखी आदेशाचे पालन केले नाही व तसा अहवाल आमच्याकडे आलेला आहे. त्यांना वसुलीसाठी दिले होते. त्यांनी वसुली केलेली नाही असे प्राथमिक स्वरुपाचें आरोप त्यांच्यावर आहेत. त्याचा विचार करुन त्यांना निलंबीत केलेले आहे. निलंबन आदेश त्यांना दिलेले आहेत. व त्यानुसार संबंधीताचे त्यावर काय म्हणणे आहे. लेखी माहिती आल्यानुसार आपणांस निर्णय घेता येईल. यामध्ये जनगणनेची कामे करुनही कार्यालयीन वसुलीची कामे करायची असतात. अशाच प्रकारची कामे झोन ७ मधील कर्मचाऱ्यांनी केलेली आहेत.

**श्री दलबीरसिंग जबिंदा :** संबंधिताचा यावर खुलासा घ्यावा. त्यांचे काय म्हणणे आहे त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

**श्री अविनाश कुमावत :** संबंधीत कर्मचाऱ्यांनी जनगणनेची कामे केलेली आहेत. म्हणुन विचार करावा. त्यांना कामावर घेण्यात यावे.

**उप आयुक्त (प्र) :** झोन मधील वसुलीचे काम हे जनगणनेची कामे करुन करायची असतात. त्यांना दिलेले आदेशाचे पालन केल्यामुळे त्यांना निलंबन आदेशा संदर्भात संबधीतांचा लेखी खुलासा सादर झाल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :** ठिक आहे. संबंधीत कर्मचाऱ्यावर या संदर्भात लेखी खुलासा घ्यावा. त्यानुसार त्यांना कामावर घेण्याबाबतची कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३१-०३-२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शनिवार दिनांक ३१-०३-२००१ रोजी मा.सभापती यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा.
२) स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
३) स.स.सौ.खरात कुसुमबाई दौलत
४) स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
५) स.स.श्री.सिध्द जगदीश कन्हैय्यालाल
६) स.स.श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
७) स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर
८) स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
९) स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१०) स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
११) स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
१२) स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
१३) स.स.श्री.सुरगोणीवार नारायण चंद्रय्या.

**मा.सभापती :** आजच्या सभेमध्ये स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी ८ सदस्यांची चिठ्ठया काढून त्यांना निवृत्त करायचे आहे. सभा कामकाजासंबंधीचे नियम मा.नगरसचिव वाचून दाखवतील.

**विषय क्र. १२९/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) व २० (४) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठया टाकून (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (३) व २० (४) अन्वये स्थायी समितीचे आठ सदस्य चिठ्ठया टाकून (ड्रॉ पध्दतीने) निवृत्त करणे संबंधी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(२) अन्वये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका नंतर आपल्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमणूक केली पाहिजे.

पोट कलम ३ अन्वये स्थायी समितीच्या १६ सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम २ मध्ये उल्लेख केलेले महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल.

त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील. महानगरपालिकेची पहिली सभा २९-४-२००१ रोजी संपन्न झाली होती.

त्यामुळे दि. १-४-२००१ रोजी मध्यानानंतर निम्मे सदस्य निवृत्त होतील. परंतु सार्वत्रिक निवडणुक घेण्यात येतील तेव्हा स्थायी स्थायी समितीचे जे सदस्य पदावर असतील ते सर्व पोट कलम २ अन्वये नविन समितीची नेमणूक झाल्यावर पदावरुन निवृत्त होतील. आता स्थायी समितीच्या ८ सदस्य निवृत्त होण्यासाठी स्वतंत्र नावाच्या १६ सदस्यांच्या मा.सभापती पेटीत चिठ्ठया टाकतील. चिठ्ठया टाकातांना त्या सर्वांना दाखवण्यात येतील व बंद पाकीटात टाकुण बंद पेटीत त्या टाकण्यात येतील व सरमिसळ करुन एक-एक अशा आठ नावाच्या चिठ्ठया काढण्यात येतील व ज्याचे नावाची चिठ्ठी निघेल ते स.सदस्य निवृत्त होतील असे समजण्यात येईल.

याच वेळी नगर सचिव हे १६ स्वतंत्र नावे असलेल्या १६ चिठ्ठया मा.सभापती यांचे कडे देतात व मा.सभापती १६ नावे स्वतंत्र असलेल्या चिठ्ठयांवरील नावे वाचुन दाखवतात व नावाच्या चिठ्ठया पण दाखवतात.

**नगर सचिव :** १६ सदस्यांच्या नावाच्या चिठ्ठया करण्यात आलेल्या व नावे मा.सभापती यांनी वाचून दाखवली व नावे असलेल्या चिठ्ठया पण दाखवल्या आहेत.याबद्दल कुणाचा काही आक्षेप असेल तर तसे सुचवावे.

यानंतर कुणाचाही आक्षेप सादर होत नाही . म्हणून मा.सभापती त्याची पाकीटासह गोल पुंगळया करुन एकाच रंगाचे रबर बँड लावण्यात आल्याचे सभागृहास दाखवुन देण्यात आले व या चिठ्ठया १६ असल्याबाबत एक-एक मोजणी करुन सर्वासमक्ष काचेच्या पादरर्शक बरणीत टाकले. बरणीत १६ चिठ्ठया टाकुन बरणीत बंद करुन सर्वांना दाखविण्यात आले व चिठ्ठयांची सरमिसळ करण्यात आली व येथ पर्यंतच्या कार्यवाही बद्दल कोणास काही आक्षेप वा सुचना असेल तर ती सभागृहात मांडावी अशी सुचना करण्यात आली. त्यावर कोणीही हरकत अथवा सुचना केली नाही. नंतर या काचेच्या बरणीतील १६ चिठ्ठया दुसऱ्या एका कपडा लावलेल्या बंद बरणीत टाकुन त्यास हलवून पुन्हा सरमिसळ करण्यात आली व मा.सभापतींकडे दिले.

**मा.सभापती :** कुणाचा आक्षेप नसल्याने १६ नावे असलेल्या स्वतंत्र चिठ्ठया बंद पेटीत टाकण्यात आलेल्या आहेत. आता ज्या आठ चिठ्ठया काढण्यात येतील ते आठ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरुन निवृत्त होतील.

**श्री.गणेश तांबे :** बंद पेटीत टाकलेल्या १६ नावाच्या स्वतंत्र चिठ्ठया त्यापैकी ८ चिठ्ठया काढण्यासाठी मा.आयुक्त किंवा उपआयुक्त यानां काढण्याची परवानगी देण्यात यावी.

**मा.सभापती :** आपणांस नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे. मा.नगरसचिव नियम वाचून दाखवतील.

**नगरसचिव :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० चे पोट कलम (४) मध्ये स्पष्ट तरतुद केलेली आहे. पोट कलम (२) अन्वये निवडणूक झाल्यानंतर १ वर्षाने पोट कलम (२) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील, ते पोट कलम (२) मध्ये निम्ननिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपुर्वी स्थायी समितीचे सभापती ठरवील. अशा वेळी अशा रितीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल.

**मा.सभापती :** १६ नावाच्या स्वतंत्र चिठ्ठया पेटीत टाकलेल्या आहे व त्यातून एक-एक चिठ्ठी काढून अशा ज्या आठ चिठ्ठया ज्यांच्या नावाच्या निघतील ते सदस्य निवृत्त होतील.

मा.सभापती यांनी बंद पेटीतुन एक-एक अशा आठ स्वतंत्र नावे असलेल्या चिठ्ठया काढल्या त्यावर खालील स.सदस्यांची नावे होती.

**मा.सभापती :** स.सदस्यांची नावे वाचुन दाखवण्यात येत आहे ती अशी.

१) स.स.श्री. मोतीलाल रघुनाथ जगताप
२) स.स.सौ. कुसुमबाई दौलत खरात
३) स.स.श्री. भाऊसाहेब बाबुराव वाघ
४) स.स.श्री. कैसरखान बद्रुद्दीन खान
५) स.स.श्री. गणेश रामचंद्र तांबे
६) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
७) स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
८) स.स.श्री. नारायण चंद्रय्या सुरगोणीवार.

असे एकूण आठ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरुन निवृत्त झालेले आहे. त्यांची नावे पुन्हा नगरसचिव वाचुन दाखवतील.

**नगरसचिव :** एकुण १६ सदस्यांच्या बंद पेटीत चिठ्ठया टाकुन त्यातुन मा.सभापती यांनी ८ स.सदस्यांच्या चिठ्ठया काढल्या त्यात खालील स.सदस्यांची नावे निघालीत.

१) स.स.श्री. मोतीलाल रघुनाथ जगताप
२) स.स.सौ. कुसुमबाई दौलत खरात
३) स.स.श्री. भाऊसाहेब बाबुराव वाघ
४) स.स.श्री. कैसरखान बद्रुद्दीन खान
५) स.स.श्री. गणेश रामचंद्र तांबे
६) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
७) स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
८) स.स.श्री. नारायण चंद्रय्या सुरगोणीवार.

**मा.सभापती :** चिठ्ठया टाकुन व ड्रा पध्दतीने काढण्यात आलेल्या ०८ चिठ्ठयांद्वारे स्थायी समिती सदस्य पदावरुन ०८ स.सदस्य निवृत्त होत आहे.त्यांची नावे खालील प्रमाणे.

१) स.स.श्री. मोतीलाल रघुनाथ जगताप
२) स.स.सौ. कुसुमबाई दौलत खरात
३) स.स.श्री. भाऊसाहेब बाबुराव वाघ
४) स.स.श्री. कैसरखान बद्रुद्दीन खान
५) स.स.श्री. गणेश रामचंद्र तांबे
६) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
७) स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
८) स.स.श्री. नारायण चंद्रय्या सुरगोणीवार.

वरील ८ सदस्य स्थायी समिती सदस्य पदावरुन निवृत्त झाल्याचे मी घोषीत करतो. स.सदस्यांनी मी सभापती झाल्यापासून हे सभागृह चालवण्यासाठी चांगल्या प्रकारे सहकार्य केले. तसेच अधिकारी / कर्मचारी यांचे सर्वांचे अभिनंद करतो. तसेच उर्वरित ८ सदस्य व येणारे नविन ८ सदस्य हे सर्वजण हे सभागृह चालविण्यासाठी येणारे नविन सभापती यांना चांगल्या प्रकारे सहकार्य करतील विकास कामे करण्यास मदत करतील अशी अपेक्षा बाळगतो.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) व २०(४) अन्वये चिठ्ठया टाकुण सोडत पध्दतीने खालील प्रमाणे ८ (आठ) स्थायी समिती सदस्य निवृत्त झाल्याने त्यांचे निवृत्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) स.स.श्री. मोतीलाल रघुनाथ जगताप
३) स.स.सौ. कुसुमबाई दौलत खरात
३) स.स.श्री. भाऊसाहेब बाबुराव वाघ
४) स.स.श्री. कैसरखान बद्रुद्दीन खान
९) स.स.श्री. गणेश रामचंद्र तांबे
१०) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
११) स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
१२) स.स.श्री. नारायण चंद्रय्या सुरगोणीवार.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जण गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद | स्थायी समिती,महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०५-०५-२००१ रोजी संपन्न झालेल्या (स्थायी समिती सभापती निवड) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची "ड" चे प्रकरण २ मधील नियम क्र. ३ (ब) मध्ये मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी बोलाविलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्याकरीता स्थायी समितीची पहिली सभा दिनांक ०५ मे २००१ रोजी "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरुवात झाली. सभेत अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

१) स.स.श्री.अशरफ युनूस मोतीवाला
२) स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
३) स.स.श्री.सिध्द जगदीश कन्हैय्यालाल
४) स.स.श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजीतसिंग
५) स.स.श्री.तुळशीबागवाले किशोर बाबुलाल
६) स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
७) स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
८) स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
९) स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
१०) स.स.श्री.शिंदे किशोर रावसाहेब
११) स.स.श्री.इलियास किरमानी शे.उमर
१२) स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
१३) स.स.श्री.ओक जयवंत केशवराव

१४) स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
१५) स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
१६) स.स.श्री.प्रशांत सुभाष देसरडा.

**मा.पिठासन अधिकारी :** आजची सभा ही महानगरपालिकाचे नुतन स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्याकरीता आयोजीत केलेली आहे.

**विषय क्र. १ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करणे.

**चर्चा :**

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** बरेच स.सदस्य नव्याने निवडून आलेले आहे. त्याकरीता या सभेत सभापती पदाची निवड करण्यासंदर्भात निवडणूक प्रक्रिया कशी होणार याची थोडक्यात माहिती देण्यात यावी. मतदान कसे घेता येईल त्याची सुध्दा माहिती देण्यात यावी.

**नगरसचिव :** जशी जशी निवडणूक प्रक्रीया पार पडेल त्या त्यावेळी सर्वांना माहिती देवून कार्यवाही करणार आहोत.

**श्री.जयवंत ओक :** नामनिर्देशनपत्र किती सादर झाले त्यांची नावे वाचून दाखवावी व मतदान प्रक्रियेस सुरुवात करावी.

**पिठासिन अधिकारी :** मतदानासंबंधीची माहिती सभागृहात देण्यात यावी.

**नगरसचिव :** (१) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभाग निहाय स.सदस्यांची नावे पुकारण्यात येतील. (२) महानगरपालिकेने पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे. (३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (आय) प्रमाणे सभासदांना दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना पिठासिन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल. (४) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ५० अन्वये कोणत्याही सभासदाला एका पेक्षा जास्त इच्छुकांना आपले मत देता येणार नाही. मतदान करते वेळी प्रत्येक सभासद मत प्रक्रीयेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छुकांना मत दयावयाचे असेल त्यांच्या नावासमोर फुली करील. मतपत्रिका तयार केल्यानंतर नमुना मतपत्रिका सभागृहातील फलकावर लावण्यात येईल. (५) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जे) अधिन तरतुदी नुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१) जर सभासदाने मतपत्रिकेवर आपले नाव किंवा शब्द लिहिला अथवा ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खून केलेली असेल अथवा (२) जी छिद्रांकित (परफोटेड) नसेल अथवा (३) जिच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरुपयोगी आहे.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** नियम क्र. ५० अन्वये मतदान मतपत्रिकेच्या उजच्या बाजूने इच्छुकांच्या प्रकरण न्यायालयात गेले असता दोन्ही बाजूने मतदान करता येईल असा निर्णय दिला होता. त्यानुसार नियमात बदल केला काय?

**नगरसचिव :** महानगरपालिकेने सभा कामकाज नियमावलीमध्ये दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. त्यास शासनाची मंजुरी घ्यावी लागणार आहे. ४ मते अवैध ठरवली त्यास आव्हान देण्यात आले होते. त्यावर निर्णय झालेला आहे. सभा कामकाज नियमावलीत दुरुस्ती झाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**पिठासिन अधिकारी :** महानगरपालिकेने जी नियमावली तयार केलेली आहे त्याप्रमाणे कार्यवाही होईल. नियमावलीत दुरुस्ती झाल्यास त्याप्रमाणे पुढील वेळेस तशी कार्यवाही करता येईल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक २३ एप्रिल २००१ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५,व ४७ अन्वये निवडणुक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २५ एप्रिल ते १ मे पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक १ मे २००१ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

१) श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२) श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३) श्री.सावंत मधुकर दामोधर
४) श्री.सलीम पटेल समशेर पटेल.

**नगर सचिव :** सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करावी अशी मी मा.पिठासिन अधिकारी यांना विनंती करतो.

**पिठासिन अधिकारी :** वरील प्रमाणे छननीचे काम पूर्ण झाले असून खालील नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत.

१) श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग
२) श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३) श्री.सावंत मधुकर दामोधर
४) श्री.सलीम पटेल समशेर पटेल.

**श्री.मधुकर सावंत :** नामनिर्देशनपत्र परत घेण्यासाठी १० मिनिटांचा वेळ देण्यात यावा. असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने १ तास अवधि म्हणजेच दुपारी ०१.०० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समिती सभापती पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव दुपारी ०१.०० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समिती सभापती पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी. आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे १२.०० वाजले आहे.

**जयवंत ओक :** सभेच्या कामकाजामध्ये ३० मिनिटाचा अवधी दिला. आपण ३० मिनिटे आणखी वाएवून दिले. हे योग्य नसून फक्त नामनिर्देशन पत्र परत घेण्यासाठी ३० मिनिटांचा अवधी ठेवावा.

**श्री.किशोर तुळशीबागवाले :** १ तासाचा वेळ दिला हा अधिकार सभापतीचा आहे.

**पिठसिन अधिकारी :** नामनिर्देशन पत्र परत घेण्यासाठी १ तासाचा वेळ दिलेला आहे त्यात बदल करता येणार नाही. ज्यांना फॉर्म परत घ्यायचे त्यांनी दुपारी १.०० वाजेपर्यंत परत घ्यावे.

**पिठासिन अधिकारी :** स्थायी समिती सभापती पदासाठी ४ उमेदवार पैकी विहित मुदतीत श्री.मधुकर दामोधर सावंत यांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

आता स्थायी समिती सभापती निवडणुकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १) | श्री.जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग |
| २) | श्री.देसरडा प्रशांत सुभाष |
| ३) | श्री.सलीम पटेल समशेर पटेल. |

**पिठासिन अधिकारी :** मतदानाबाबत गोपनीयता पाळता याची म्हणून मतपत्रिकेच्या स्थळप्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यांत येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका एक तासात तयार होतील व मतदानाला सुमारे दु.०२.०० वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांनी सर्व स.सदस्यांच्या माहितीसाठी नमुना मत पत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

मतपेटी जवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे. व मतपेटीला कुलूप लावून तिची चावी माझेकडे आणून द्यावी व मतपेटी मोहोरबंद करुन घ्यावी.
(पिठासिन अधिकारी स्वतःच्या सहीने मतपेटी मोहोरबंद करुन घेतात.) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरीता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापूर्वी म्हणजे आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगर सचिव यांनी कृपया मतदाना संबंधीच्या सुचना सभागृहाच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

**नगरसचिव :** मतदाना संबंधीच्या सुचना सभागृहात या अगोदर सांगितलेल्या असून जे उमेदवार निवडणुकीसाठी रिंगणात आहे त्यांचे नावाची नमुना मतपत्रिका

सभागृहातील फलकावर लावण्यात आलेली असून अ.क्र.१ वर श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग, अ.क्र.२ वर श्री.देसरडा प्रशांत सुभाष, अ.क्र.३ वर श्री.सलीम पटेल समशेर पटेल यांचे नांवे आहेत.

**पिठासिन अधिकारी :** नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यांत आलेली आहे.

आता मतदानाला सुरुवात होत आहे. स.सभासदांची नांवे पुकारण्यांत येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी ३० मिनिटांचा कालावधी देण्यात येत असून सभागृहातील घडयाळा प्रमाणे आता दुपारी २.२० वाजले असून मतदान दुपारी २.५० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समिती सभापती पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स.सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यांस सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदी प्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/नस/२००१/३१० दिनांक २६-०४-२००१ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना जी कामे नेमून देण्यांत आलेली आहेत त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावित. आता मतदानास सुरुवात होत असून जनसंपर्क अधिकारी यांनी नांवे पुकारण्यास सुरुवात करावी.

**जनसंपर्क अधिकारी :** (एक-एक स.सभासदांची नांवे पुकारतात.) नांवे पुकारल्यानुसार स.सदस्य तथा पिठासिन अधिकारी श्री.अशरफ युनूस मोतीवाला यांनी मतदान केले. त्यांचे मतदान होईपर्यंत पिठासिन अधिकारी म्हणून स.स.श्री.किशोर तुळशीबागवाले यांनी काम पाहिले, यानंतर स.सदस्य श्री.कावडे साहेबराव राणुबा, स.स.श्री.सिध्द जगदीश कन्हैय्यालाल, स.स.श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग, स.स.श्री.किशोर बाबुलाल तुळशीबागवाले, स.स.श्री.लकडे भरत श्रीपती, स.सदस्य श्री.सलीम पटेल समशेर पटेल, स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर, स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, स.स.श्री.किशोर रावसाहेब शिंदे, स.स.श्री.इलियास किरमानी शे.उमर, स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू, स.स.श्री.ओक जयवंत केशवराव,स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव, स.स.श्री.प्रशांत सुभाष देसरडा, स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे इ. एकूण सर्व १६ स.सदस्यांनी मतदानात भाग घेऊन मतदान केले.

**पिठासिन अधिकारी :** आता दुपारी २.५० वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स.सदस्यांनी मत मोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य करावे ही विनंती. स.स.श्री.सलीम पटेल यांचे प्रतिनिधी म्हणून स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली उपस्थित राहणार असून स.स.देसरडा प्रशांत सुभाष यांचे प्रतिनिधी म्हणून

स.स.श्री.जयवंत केशवराव ओक हे उपस्थित राहणार असून स.स.श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग हे स्वतः उपस्थित राहणार आहे.

(मतपेटीटीतील मतपत्रिका एका ट्रेमध्ये काढून त्याची एकत्रित जोडणी करुन मा.पिठासिन अधिकारी यांच्या मतपत्रिकेच्या मागील बाजूस स्वाक्षरी घेण्यात येते व त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होते.)

**पिठासिन अधिकारी :** मतमोजणीचे काम पूर्ण झाले आहे.

| | |
|---|---|
| एकूण मतदान | १६ |
| अवैध मते | ०० |
| वैध मते | १६ |

उमेदवारांना पडलेली मते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवाराची नांवे | पडलेली मते |
|---|---|---|
| १) | श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग | ०४ |
| २) | श्री.देसरडा प्रशांत सुभाष | १० |
| ३) | श्री.सलीम पटेल समशेर पटेल | ०२ |

(सन्मानीय सदस्य श्री.जबिंदा दलबीरसिंग रणजितसिंग यांना चार मते तर सन्माननीय सदस्य श्री. देसरडा प्रशांत सुभाष यांना दहा मते तर सन्माननीय सदस्य श्री.सलीम पटेल समशेर पटेल यांना दोन मते मिळाली.)

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतमोजणीच्या निकालावरुन सन्माननीय सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांना सर्वात जास्त मते मिळाल्याने सभापती, स्थायी समिती पदावर त्यांची निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**पिठासिन अधिकारी :** मतमोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित करतो की, स्थायी समिती सभापती पदासाठी श्री.प्रशांत सुभाष देसरडा यांची निवड झाली असून ती त्यांचे अभिनंदन करतो.

नुतन सभापती सन्माननीय श्री.प्रशांत देसरडा यांनी त्याचे सभापती पदाच्या खुर्चीवर बसावे अशी मी त्यांना विनंती करतो.

(नुतन सभापती हे सभापती पदाच्या खुर्चीवर बसतात. यानंतर नुतन सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच अधिकारी संघटनेच्या वतीने मुख्य लेखा परीक्षक श्री.म.न.सोनार यांनी नुतन सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यानंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.पिठासन अधिकारी यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती,महानगरपालिका,
औरंगाबाद.